म. ग्रं. सं. ठाणें

विषय	लेखक हि.गो.लढ्ढे	सन
संग्रहालय क्रमांक	पुस्तकाचें नांव हिंद आणि ब्रिटानिया	

किरण १ ला

हिंद आणि ब्रिटानिया

03

हिंद आणि ब्रिटानिया

काढं

٩٢٠١٤٢



MARQUIS OF RIPON.

मार्किस ऑफ़ रिपन.


सार्वजनिक वाचनालय
लुकनंबर ३५।
भिवंडी.

सूर्यकिरणमाला.

किरण १ ला.

हिंद आणि ब्रिटानिया

एक राजकीय चित्र.



भाषांतरकर्त्ता

दिनकर गोविंद वझे.



मुंबई:
" तत्त्वविवेचक " छापखान्यांत छापिलें.

सन १८९१.

किंमत दीड रुपया.

(सर्व हक्क स्वाधीन ठेविले आहेत.)

" जो उदार वृत्तिचा, संपत्तिमान्, सद्गुणी, विनीत आणि "
" ज्ञानाचा अभिलाषी—जो शक्तिमान् आणि धर्मज्ञ असून पवित्र— "
" जो निःपक्षपाती, दृढविचारी आणि स्वतंत्र—जो राज्यकारभारांत "
" राजा आणि प्रजा यांमधील मध्यस्थ—जो संसार व्यवहारांत आपल्या "
" देशास शोभादायक;—व जो जगतांत शांतीची आणि व्यवस्थित "
" नियमांची पूर्ण वृद्धि होईल अशा सर्व साधनांची मनःपूर्वक सुदृढतेनें "
" विपुलता करितो तो महात्मा त्या देशाचें एक सर्वोत्तम धन होय. "

रे० सिडनी स्मिथ.

नेक नाम खुदावंत

ज्यार्ज फ्रेड्रिक साम्युअल

मारक्विस ऑफ रीपन,

के.जी., पी.सी., जी.एम.एस.आय.,

भरत खंडाचे माजी व्हैसराय आणि गव्हरनर जनरल;

१८८०-८४.

यांचे

प्रतापि राज्यकारकिर्दीच्या स्मरणार्थ हें पहिल्याच
राजकीय गुजराती कादंबरीचें मराठी भाषांतर
परमादर पूर्वक अर्पण
केलें असे.

"रत्नांत जसा कोहिनूर तसें राज्यांत भरतखंड."

सर चार्लस नेपियर.

T 23



पहिल्या आवृत्तीचा उपोद्घात.

"**फेरफार**" हा ह्या सृष्टींत एक सर्वसामान्यनियम आहे. आणि ह्याच नियमास अनुसरून मनुष्याच्या जिंदगींत व राजकीय विषयांत नेहमीचे बनाव बनत असतात. **हिंदुस्थान**चा इतिहास हा ह्या फेरफाराचा एक अपूर्व नमूना आहे. आणि वरील नियमाप्रमाणें एखाद्या वेळीं सर्व **भरत**खंडातील लोकांत फेरफाराची एखादी ऊर्मि उत्पन्न झाल्यास आश्चर्य मानण्याचें कांहींच कारण नाहीं! परंतु ती ऊर्मि तूर्त निघणें वाजवी आहे काय? ह्या प्रश्नाचेंच ह्या ग्रंथांत यथार्थ स्पष्टीकरण केलें आहे.

इसवी सन १८७६ पासून इसवी सन १८८० अखेरपर्यंत ह्या देशांत मोठमोठ्या राजकीय गडबडी चालू होत्या. त्यानंतर सन १८८३ त तर काळे आणि गोरे लोकांचें मन, फारच संतप्त झालें होतें. त्या दोघांचेही गुणावगुण दर्शवावे, अशी माझी मनोवृत्ति झाल्यामुळें आज हा ऐतिहासिक निबंध रचून तयार केला आहे. काळ्यागोऱ्यांच्या, –स्वदेशीय परदेशीयांच्या,–**आर्य** आणि **इंग्रज**ांच्या–मानसिक लहरी एखाद्या बारिक आणीबाणीच्या प्रसंगीं मोठ्या जोमानें बाहेर पडतात; आणि त्यामुळें असंतोष व अप्रीति—वैर आणि द्वेष–वाढण्याचें वारंवार भय असतें. दोन्ही पक्ष परस्परांचें अनहित इच्छून अति अमर्याद व वाईट भाषणें बोलत असतात. ते, जर हा निबंध निःपक्षपातानें आणि निर्मल अंतःकरणानें वाचितील, तर त्यांस कबूल करावें लागेल कीं, दोन्ही पक्ष सारख्या दोषास पात्र आहेत. परंतु या ग्रंथांत कोठें कोठें **ब्रिटानि**येचा पक्ष प्रसिद्धपणें घेतला आहे; आणि त्याचें कारण देखील उघड आहे. कालयोगानें **मोंगल** व **मराठे** यांचा पराभव करून तें राज्य जर आज सर्वोपरी बलवान् होऊन या जगांतील सर्वश्रेष्ठ प्रजेवर

सत्ता चालवीत आहे, तर त्याविषयीं **ईश्वरा**ची कांहींतरी विशेष आज्ञा असली पाहिजे? अशा विद्वानांच्या मतास अनुसरून माझा जो समज आहे, तोच खरा असावा; असें मला वाटतें. **ब्रिटानिये**नें हें राज्य आपल्या सर्व सद्गुणानें प्राप्त केलें आहे, असें म्हणण्यापूर्वी इतकें म्हटलें म्हणजे पुरे आहे कीं, कोणीही परराज्य मिळविण्यांत छल–प्रपंच केला नसेल, असें म्हणणें आणि असत्य बोलणें हीं दोन्ही समान आहेत! बहुतांशीं नीतीनें राज्य मिळत नाहीं, असें म्हटलें तरी चालेल; आणि त्या प्रमाणेंच सामदामभेददंडादि उपायांस अनुसरून **ब्रिटीश**राज्य स्थापित झालें आहे. **ब्रिटिश** राज्यांत जसें दुःख आहे तसेंच सुखही आहे. सर्व राज्यांत दुःख हें असावयाचेंच. दुःखाशिवाय राज्य नाहीं; आणि राज्य तेथें दुःख हें ठरलेलेंच आहे.

"In every Government, though terrors reign,
Though tyrant kings or tyrant laws restrain,
How small, of all that human hearts endure,
That part which laws or kings can cause or cure".

हें गोल्डस्मिथचें म्हणणें खोटें नव्हे. प्रत्येक राज्यांत कायद्याचा किंवा राजाचा जुलूम असतोच. पण त्या सर्वांत सगळाच दोष राजाचा असतो, असें नाहीं. कित्येक दुःखें, आपल्या अनास्थेनें किंवा बेपर्वाईनें उत्पन्न झालेलीं असतात; आणि त्यांचा दोष आम्हीं दुसऱ्यांवर लोटितों. तूर्तच्या प्रकरणांतही असे प्रकार पुष्कळ सांपडतील. परंतु आपण दुःखांतून सुखाचेंच ग्रहण करावें, अशीच तूर्त जगन्नियंत्याची इच्छा आहे! **ब्रिटिश** राज्याच्या समागमानें आपले नेत्र उघडले आहेत; म्हणजे आपण ज्ञानी झालों आहों; हें खरें आहे. आतां आपले हात जरी सत्वरहित झाले आहेत, तरी जोंपर्यंत नियंत्याची इच्छा आहे, तोंपर्यंत ह्या राज्याच्या "शीतल" छत्राखालीं राहणें, हेंच परमसुखदायक होय

ईश्वराच्या इच्छेविरुद्ध बडबड करणें, ह्मणजे आपण होऊन आपलें अकल्याण करणें आहे.

तुह्मां सर्वांस ही मुनिवाणी माहीत असेल कीं, "ज्या वस्तूला आकार आहे, तिला सुखदु:खादि परिताप आहेतच. ज्याला यौवन आहे, त्याला जरावस्थाही आहेच. ज्याला उन्नति आहे, त्याला अवनति आहेच. जो चढेल, तो पडेल. ज्याच्या येथें अमिरी आहे, त्याच्या येथें फकीरी ठेवलेलीच. फार तर काय? प्रत्यक्ष **सूर्या**स देखील उदय आणि अस्त असतोच.,, ह्याच नियमा प्रमाणें जें राज्य सर्वोत्तम स्थितीस पोहोंचेल, त्याला क्षीणताही यावयाचीच. कारण, चढती आणि पडती, हे मुळीं सृष्टीचेच नियम आहेत. एतदर्थ अशा अगाधसमर्थकार्यांत, **आर्य**पुरुषांनीं कधींही अतिचंचल वृत्ति ठेवूं नये. नेहमीं असंतुष्ट वृत्तींत राहणें, आणि प्रमादी होणें ह्यांत लाभाहून हानीच जास्त आहे. आणि आर्य पुरुष तर निवृत्तीचे भोक्ते आहेत; ह्मणून काळाच्या अवधीपर्यंत जें होईल, तें पाहून ईश्वरी इच्छेच्या आधीन वागणें ह्यांतच भूषण आहे. ह्याच मोठ्या मर्माकडे लक्ष देऊन, जेव्हां या ग्रंथांतील मुख्य नायिका **हिंद, ब्रिटानिये**पासून स्वतंत्र होण्याची इच्छा दर्शवूं लागली, तेव्हां त्या शहाण्या आणि निपुण, नीतिमती **स्वतंत्रता**देवीनें तिला स्पष्ट सांगितलें कीं, असें करण्यांत तुझा फायदा नाहीं. **हिंदुस्थानां**त आज असे थोडेच राजनीतिज्ञ महापुरुष सांपडतील कीं, जे आपत्तिकालीं देशाचें संरक्षण करूं शकतील! **ब्रिटानिया** देश सोडून जाईल तर, तो सुरक्षित राहणार नाहीं. चौखंड पृथ्वींत, आपल्या भावी अपकीर्तीचा पोक्त विचार केल्यास; ह्या **भरतखंड**ांतील लोकांच्या प्रज्ञात दीर्घ दृष्टीकडे नजर फेंकिल्यास; व अर्वाचीन स्वसामर्थ्याची तुलना करून पाहिल्यास; अशी आशा करणें, ह्मणजे अपयशाचाच अंगिकार करणें होय. कोणत्या गोष्टींत देशाचें कल्याण आहे? ह्या विषयीं अनेक तर्कवितर्क करून, वादविवाद करून, ज्ञानि-

पुरुषांचे विचार ऐकून, व पाहून, आह्मांस **ब्रिटीश** छत्राखालीं राहणें भाग आहे; असा आमचा दृढविचार झाला आहे. आणि ज्या महात्म्यानें गेल्या पांच वर्षांत फारच चांगल्या व उदार नीतीनें आपल्या देशास आणि ह्या देशास यश यावें अशा रीतीनें राज्य केलें; त्यासच स्वदेशतारकाचें प्रथमपद प्राप्त व्हावें, अशी ही आमची वासना आहे.

महान् प्रतापि पुरुष **लार्डरीपन** ह्यानें, पांच वर्षेपर्यंत चंद्रबिंबानें रजनी जशी अलौकिक शोभायमान् होऊन सर्वांस परमसंतोषासह आनंद देते, तशा उत्तम रीतीनें राज्य चालविलें. आणि तोच पुरुषश्रेष्ठ **भरतखंडा**चा तारण कर्त्ता, ह्या पदास योग्य आहे. अशा पुरुषाचें राज्य, ह्या गगनतलाखालीं लटकणाऱ्या रविबिंबप्रकाशाप्रमाणें शोभा पावत आहे. त्या महात्म्या पुरुषाच्या प्रौढ, शोभिवंत, यशस्वी, आणि सर्व प्रकारच्या सौख्यदायक सामराज्यास हा ग्रंथ अर्पण केला आहे. ज्या पुरुषाची राजकीर्ति चिरंजीव आहे, त्याच पुरुषाच्या प्रतापाप्रमाणें हा ग्रंथही उपयुक्त होवो, अशी आमची मनःपूर्वक आशा आहे. त्या कीर्तिमान् पुरुषानें देशावर किती उपकार केले आहेत? त्यांचें पुनरावर्तन करणें, म्हणजे पुनरुक्ति दोष स्वीकारणेंच आहे.

ह्या ग्रंथांत जें मत प्रदर्शित केलें आहे, त्याच्या विरुद्ध किंवा भिन्न मत धारण करणारा कोणी नाहीं! असें आमच्यानें म्हणवणार नाहीं. परंतु ह्यांतील थोडें तरी कां होईना? पण कांहीं तरी देशीय व परदेशीय ह्या दोघांसही विचार करण्या योग्य आहे, असें जर होईल तर आह्मीं केलेल्या श्रमाचें सार्थक्य झालें, असें समजूं. अनेक ग्रंथांचा आधार घेऊन जरी ह्या पुस्तकाची रचना केली आहे, तरी विशेषतः "माऊन्टनटॉप" ह्या इंग्रजी विषयाच्या लेखकाचे आह्मीं आभार मानितों.

आतां ही प्रस्तावना समाप्त करण्यापूर्वी, जनस्थितिविषयीं आणि

राज्यक्रांतीच्या रूपांतरनियमांविषयीं, महाकवि **कालिदासानें** थोडक्यांत जें उत्तम आणि चटकदार वर्णन केलें आहे, तेंच येथें घेऊन पुढें होऊं.

श्लोक.

यात्येकतोऽस्तशिखरं पतिरोषधीनां ।
आविष्कृताऽरुणपुरःसर एकतोऽर्कः ॥
तेजोद्वयस्य युगपद्व्यसनोदयाभ्यां ।
लोको नियम्यत इवात्मदशांतरेषु ॥ १ ॥

ग्रंथ कर्त्ता.

तिसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना.

"हिंद" आणि "ब्रिटानिया" ही राजकीय कादंबरी प्रसिद्ध झाल्यास आज पांच वर्षें होऊन गेलीं. आह्मीं मूळप्रत मागविल्या नंतर ती येण्यास आणि तिचें भाषांतर होऊन प्रसिद्ध करण्यास आम्हांस पुष्कळ अवधि लागला हें जरी खरें तरी त्यास आमचाही सर्वांशीं नाइलाजच होता. असो. **जगदीश** ठेवील त्या स्थितींत राहणें भाग आहे. आह्मीं पहिल्या आवृत्तीवरून प्रत तयार केली होती. इतक्यांत त्याची दुसरी आवृत्ति बाहेर पडून खलास होतांच ही तिसरी आवृत्ति निघाली. तींत आणि पहिल्या आवृत्तींत जरी विशेष तफावत नव्हती, तरी विशेष महत्वाच्या स्थलीं आह्मीं बहुतेक ठिकाणीं तिसऱ्या आवृत्तीचेंच अनुकरण केलें आहे. एतदर्थ त्याही आवृत्तीची प्रस्तावना येथें देणें जरूर आहे असें वाटल्यावरून तसें केलें आहे.

"ह्या ग्रंथाची तिसरी आवृत्ति तुमच्यापुढें ठेवितांना मला चार शब्द विशेष आवश्यकतेनें तुम्हांला सांगणें भाग आहे; सन १८८९ त हा ग्रंथ प्रसिद्ध झाल्यानंतर वर्तमानपत्रांत आणि लोकसमाजांत "राजकीय" आणि "राजद्रोही" ह्या शब्दांवर अतिशयच विवाद चालला होता. ह्या ग्रंथाच्या तर्फेनें आणि विरुद्धतेनें पुष्कळ विचार बाहेर पडले. जगतांतील बहुतेक वर्तमानपत्रांनीं आपआपल्या मतास व बुद्धीस जसजशी योग्य दिसली तसतशी ह्या ग्रंथावर टीका केली आणि त्यावरून **यूरोपां**तील कित्येक नांवाजलेल्या वर्तमानपत्रांची टीका पाहून **अमेरीकेंतील** "नार्थ अमेरिकन रिव्हयु" नामक पत्रानेंही ह्या ग्रंथाविषयीं आपला अभिप्राय प्रकट केला होता. ह्या सर्व टीकांतील कित्येक टीका आमच्या मतास

चांगली बळकटी देणाऱ्या होत्या; कित्येक निव्वळ विरुद्ध; कित्येक शुद्ध अज्ञानतेनें प्रसिद्ध झालेल्या; आणि कित्येक राजभक्तीच्या निराळ्याच मार्गास अनुसरून होत्या. गुजराथी वर्तमानपत्रांत—बहुधा मुंबईत—नी टीका झाली तींत, सत्यांश नाहींच; परंतु केवळ द्वेषबुद्धि आणि नीचबुद्धि ह्यांचाच ओतप्रोत निवास होता—त्यानें वर्तमानपत्रांच्या पवित्रधंद्यास केवळ कलंकयुक्त मात्र केलें इतकेंच. तरी ह्या ग्रंथावर जितक्या विस्तारानें टीका झाली आहे, तितकी आजपर्यंत कोणत्याच ग्रंथाविषयीं झाली असेल असें वाटत नाहीं—आणि इतक्या टीकेस पात्र झालेला ग्रंथ किती महत्वाचा आहे, ह्याविषयीं ग्रंथकर्त्ता विशेष कांहीं सांगूं लागेल तर तें खरोखरच विवेकाच्या बाहेर होईल!

ह्या ग्रंथावर जिकडून तिकडून जो जबरदस्त आरोप लादण्यांत आला होता, तो मुख्यतः राजद्रोहकत्वाचा होय. त्यामुळें नामदार वैसराय **लार्ड डफरीन**च्या कौन्सिलांत ह्या ग्रंथाचा तपास झाला. आमचे विचार कित्येक अंशांनीं जरी **लार्डडफरीन** ह्यांच्या राजनीतिविरुद्ध होते तरी इतकें सांगणें हा आमचा मुख्य धर्म आहे कीं, त्या नामदारांच्या कौन्सिलानें राजभक्तिविषयीं बहु दीर्घ दृष्टि वापरून **ह्या ग्रंथास सदर दोषांतून मुक्त केलें.** त्याविषयीं नामदारांचे महत् उपकार मानणें भाग आहे. ही बाबत कौन्सिलांत दाखल होतांच, माझ्या एका इंग्रजमित्रानें तत्काल आम्हांकडे ह्या ग्रंथाच्या तर्जुम्याचें टांचण मागितलें. तेव्हां तें आम्ही आ. डा. **हंटर** ह्यांस दाखविलें. त्या विद्वान् डाक्तरांनीं ह्या ग्रंथांतील तक्रारीच्या भागाचें यथास्थित अवलोकन केलें आणि आमच्या तर्फेनें ते कौन्सिलांत पुष्कळ मांडले. सारांश, कौन्सिलांत आह्मांस जें यश मिळालें, तें ह्याच सद्गुणसंपन्न देशहितैषि विद्वान् डाक्तरांच्या प्रतापाचें फल होय. कौन्सिलांत निकाल झाल्यावर लौकरच डाक्तर **हंटर** ह्यानीं आमच्या एका मित्रामार्फत

आम्हांस एक अभिनंदन पत्र पाठविलें. (तारीख २३ आक्टोबर सन १८८९) ह्या पत्रांत "**हिंद आणि ब्रिटानिया**" ह्या ग्रंथाच्या संकलनाविषयीं, ऐतिहासिक अवलोकनाविषयीं, आणि त्यांतील पोक्त विचारांविषयीं त्यांनीं जें मत प्रदर्शित केलें त्या विषयीं आम्हीं डाक्तर **हंटर**चे जितके आभार प्रदर्शित करावे तितके थोडेच होतील! त्याप्रमाणेंच आन. सर. टी. सी. **होप.** नाईट. सी. एम. आय. हे गुजराथी भाषा जाणण्यांत फारच विद्वान् असून त्यांनींही हा ग्रंथ यथास्थित अथेति वाचून आपला जो अभिप्राय आम्हांकडे पाठविला आहे तोही सर्वत्रांस सांगणें योग्य आहे. ह्या दोन्हीं इंग्रज विद्वानांचा आम्हांविषयीं जो अभिप्राय आहे, त्याचा अभार आम्हीं फक्त शब्दांनींच मानून दाखविणें ह्यांत विशेष महत्व आहे असें नाहीं.

ही राजकीय कादंबरी महान् प्रतापि **लार्ड रीपन** ह्यांस अर्पण केली आहे. आणि हिजविषयीं विचित्र, अयोग्य, मदांध आणि अज्ञ जनांनीं जी टीका चालविली ती अवलोकनांत आली असूनही, **डाक्तर हंटर** आणि आन. सर. टी. सी. **होप** ह्या श्रेष्ठ विद्वानांच्या अभिप्राया नंतर त्यानीं आपला संतोष प्रदर्शित करणारें आम्हांस जें ता० ३ नोव्हेंबर सन १८८९चें* पत्र

---

* डाक्तर सर. डब्ल्यु. डब्ल्यु. **हंटर**; आन० सर. टी. सी. **होप.** नाईट. सी. एम. आय.; आणि परम पूज्य प्रतापि **लार्डरीपन** ह्या विद्वन्मुकुटमणिश्रेष्ठांचीं तिन्हीं पत्रें ह्याच प्रस्तावनेंत दाखल करावीं, अशी आमची इच्छा असून ती आम्ही पार पाडूं शकलों नाहीं; ह्यामुळें अत्यंत दिलगीर आहों. पूज्य मूर्ति **लार्डरीपन**चें पत्र खासगी असल्या कारणानें आम्हीं तसेंच ठेविलें आहे. परंतु **डाक्तर हंटर** आणि सर. **होप** ह्यांस आम्हीं पत्रें लिहून त्या उभयतांचींही पत्रें प्रसिद्ध करण्याची परवानगी मागविली आहे. ती अद्यापि मिळाली नाहीं. तरी त्यांची संमति मिळतांच दुसऱ्या एखाद्या प्रसंगीं तीं उत्तमोत्तम पत्रें आम्हीं मोठ्या उत्साहानें प्रसिद्ध करूं.

सर. टी. सी. **होप** ह्यांनीं आपले विचार प्रदर्शित करितांना असें सुचविलें होतें. कीं, ह्या ग्रंथांत जो ऐतिहासिक भाग दाखल कराल त्या विषयीं जितका ऐतिहासिक पुरावा असेल तितका अवश्य नमूद करा. त्या सूचनेचा आम्हीं अंःतकरणपूर्वक स्वीकार केला व ह्या तिसऱ्या आवृत्तींत जितकी सवड झाली, तितकी टीपांची विपुलता केली.

पाठविलें आहे. त्याविषयींहीं आम्हीं अंतःकरणपूर्वक त्या प्रतापि पुरुष-श्रेष्टाचे आभारी आहों!

ह्या राजकीय कादंबरीचें इंग्रजी भाषेंत भाषांतर करून तें इंग्लंडांतील प्रसिद्ध ग्रंथ प्रकाशकांकडे प्रासिद्ध करण्या करितां पाठविलें आहे. तें. ही इतक्यांतच प्रासिद्ध होईल. हिंदुस्थानी भाषेंत भाषांतर करून प्रकट करण्याचें काम **दिल्ली**चे आनररी माजिस्त्रेट **लाला श्रीनिवास**दास ह्यानीं आपल्या कडे घेतलें होतें. परंतु त्यांच्या अकाल मरणामुळें तें तसेंच पडलें आहे. बंगाली भाषेंत देखिल **हिंद** आणि **ब्रिटानिया** इतक्यांत प्रसिद्ध झाली असेल. पुष्कळांकडून ह्या ग्रंथास वारंवार मागणीं येत आहेत त्यांवरून निश्चयानें असें ह्मणण्यास फिकिर नाहीं कीं, हा ग्रंथ प्रजेस फारच प्रिय होत चालला आहे. आणि तो इतक्याचकारितां कीं, ह्यांत राजभक्ति ह्मणजे काय? हें मार्मिक वाणीनें दर्शविलें आहे. आणि तें मर्म रसज्ञ व देशहितैकानिष्ठ लोकांस चांगल्या रीतीनें स्वीकारितां येण्यासारखें आहे. कारण एका रसिक कवीची अशी उक्ति आहे कीं:—

दोहा

शक्कर खोरका शकर जीवन, खरका मान हरे
क्षार सिंधुका मत्स्य, मिठे जलमें मरे ॥ १ ॥"

इच्छाराम सु. देसाई.



भाषांतर कर्त्र्याची प्रस्तावना.

प्रत्येक वस्तूस उन्नति व अवनति असावयाचीच. हाच नियम आपल्या महाराष्ट्रभाषेसही चांगला लागू पडतो. कारण तिचा पूर्वीचा झोंक जाऊन तिनें नूतन स्वरूप स्वीकारण्याचें मनांत आणिलें आहे—स्वीकारिलें आहे असें झटलें तरी चालेल–ह्या स्थितींतही तींत उपयुक्त ग्रंथांचा भरणा वाढत चालला आहे, असें कोणीच झणणार नाहीं. हल्लीं जो संग्रह होत आहे, त्यांत अगदीं थोडा शिवायकरून बाकीचा इतका खराब आहे कीं, त्याविषयीं कितीही लिहिलें तरी तें व्यर्थ आहे! आपल्या सरकारचेंही असेंच मत दिसतें आणि त्याच्या सांवत्सरिकवृत्तांताकडे पाहिलें तर तें निर्विवाद शाबित होतें. तूर्तच्या आपल्या स्थितीचा विचार करून तींत सुधारणा होईल अशा कोणत्याच विषयाकडे कोणीच द्यावें तसें अथवा बिलकुल लक्ष देत नाहीं. ह्या शोचनीय गोष्टीचा परिहार करण्याकरितां गतवर्षींच विद्वन्मंडळ एकत्र झालें होतें, आणि त्याकडून कांहींनाकांहीं उपयोग होईल अशी आशा होती; परंतु आतां त्याची हालचाल देखील दिसत नाहीं!

आह्मां लोकांत स्वदेशाभिमान कसा उत्पन्न होईल? त्यांस स्वदेशहित कसें समजेल? त्यांची स्वधर्मश्रद्धा कशी दृढ होत जाईल? त्यांच्यांत बंधुभगिनीप्रीति कशी वृद्धिंगत होईल? त्यांना स्वधर्म आणि स्वकर्तव्यकर्म कसें समजेल? मी कोण आणि माझे हक्क काय? हें तत्त्व त्यांच्या मनांत कसें चांगलें ठसेल? परतंत्रता कशी असते? स्वतंत्रता झणजे काय? ती कशी प्राप्त होते? आपली उन्नतावस्था जाऊन अवनति कां आली? हे आणि अशा सारखेच कित्येक विचार माझ्या मनांत येत असतांना तूर्तच्या आपल्या स्थितीस अनुकूळ होईल अशी सद्ग्रंथावली **"सूर्यकिरणमाला"** अशा नांवानें प्रकाशित करण्याचा माझा दृढ विचार झाला.

ह्या अज्ञानांध:कारनाशक "सूर्यकिरणमालें" तं उपयुक्त पुस्तकांचा संग्रह केला आहे. व आणखीही करण्याचा प्रयत्न सुरू आहे. कित्येक ग्रंथ राजकीय, ऐतिहासिक, व्यावहारिक, उपदेशपर, व नीतिज्ञानदर्शक रसिक कादंबऱ्या आहेत. कितीएक शूर वीर पुरुष श्रेष्ठांचीं सुरस चरित्रें आहेत. कित्येक शौर्य, धैर्य व देशाभिमानोत्पन्नकरगद्यपद्यात्मकनाटकें आहेत. कित्येक महत्पुरुषांचीं जीवनचरितें आहेत. आणि कित्येक बोधप्रर व आबालवृद्ध स्त्रीपुरुषांस नि:शंक वाचण्यायोग्य व संग्रहार्ह आहेत. ह्यामुळें तूर्तच्या लोकाभिरुचीस आवडतील आणि त्यापासून माझा इष्ट हेतु सिद्धीस जाईल अशी मला मन:पूर्वक उमेद असून ती पूर्ण करणें मद्देशबांधवांकडे आहे. सूर्यकिरणमालेंतील कोणताही किरण क्रमाक्रमानें स्वतंत्र प्रकाशित होईल. आणि त्याचा उपयोग सर्वांस घेतां यावा अशी त्याची व्यवस्था राहील.

बरेच दिवसांपूर्वी "**हिंद** आणि **ब्रिटानिया**" हें राजकीय पुस्तक गुर्जर भाषेंत प्रसिद्ध झालें, तेव्हां त्याविषयीं शिक्षितसमाजांत, सरकारी अमलदारांत, आणि वर्तमानपत्रांत एकसारखी चर्चा चालली होती. मला साधारण गुर्जरभाषेचा सहवास असल्यामुळें त्या पुस्तकाची इतकी चर्चा कां चालली आहे, हेंच पाहण्याच्या इराद्यानें मीं तें पुस्तक मागविलें. "गुजराथी" वर्तमानपत्रकर्त्याकडे पुस्तकाची मागणी केल्यावर सुमारें एक वर्षानें तें मजकडे आलें. "**हिंद** आणि **ब्रिटानिया**" मीं वाचीत असतां त्यांतील विचार मला चांगले आवडले; आणि ज्यांना गुजराथी भाषेचें ज्ञान नाहीं, त्यांकरितां महाराष्ट्रभाषेंत तें पुस्तक प्रसिद्ध करून मराठी भाषा जाणणारांस त्याचा होईल तितका लाभ करून द्यावा; असें मनांत आणून मीं त्या स्वदेशहितचिंतक व स्वराजनिष्ठ विद्वान् ग्रंथ काराकडे पुस्तकाच्या भाषांतराची परवानगी मागितली; आणि ती त्या स्वदेशै कनिष्ठ इच्छारामानें दिली त्याजबद्दल मी, अंत:करणपूर्वक फारफार आभारी आहें.

"**हिंद** आणि **ब्रिटानिया**" ही राजकीय कथा गुर्जर भाषेंत चांगली

साधली आहे. आणि तिच्या एकंदर चांगुलपणाविषयीं "धी टाइम्स" "स्टांडर्ड" सेंट जेमसिस गेझेट, पालमाल गेझेट, टेलिग्राफ, स्काटस्मेन, धी क्वीन, सेटरडे रिव्यु इ० इंग्लंडांतील वर्तमानपत्रांनीं; रशियांतील "नोवोस्वरामिया" "मोस्को ग्याझेट" इ० फ्रान्सांतील "टेम्पेस;" अमेरिकेतील "नार्थ अमेरिकन रिव्यु;" आणि हिंदुस्थानांतील बहुतेक पत्रांनीं साधक बाधक टीका केली आहे. परंतु हें निव्वळ भाषांतरच आहे, तेव्हां तें मराठी वाचकांस वाटावें तसें चांगलें वाटेल किंवा नाहीं, हें माझ्यानें सांगवत नाहीं ! तरी हा दोष माझा आहे, मूळग्रंथकाराचा नाहीं; हें ही मला मोकळ्या मनानें कबूल केलें पाहिजे. ईश्वरकृपेनें जर तसा प्रसंग आला, तर मीं लौकरच तो दोष घालवीन; अशी मला उमेद आहे.

ही "सूर्यकिरणमाला" तुह्मां सर्वांच्या कृपेनें सदैव प्रकाशित राहून तिच्या किरणप्रकाश प्रभावानें, आमच्या देशांत जें आलस्य, शैथिल्य, स्वदेशविषयकानास्था व स्वधर्म ग्लानिरूप—तम जिकडे तिकडे फैलावलें आहे, तें नाश पावो. अशी जगन्नियंत्या सत्-चित्-आनंदकंद जगदीशाकडे माझी लीनतेनें प्रार्थना आहे.

मुंबई,
तारीख १ जानेवारी १८९१. } दिनकर गोविंद वझे.

टीकाकारांविषयीं अन्योक्ति

आर्या

हे कुक्कुट ! ऐक उगां, तव हित मित कथन सांगतों आज ॥
हो नच तत्पर सत्वर, रत्नपरीक्षा करावया काज ॥ १ ॥

हिंद आणि ब्रिटानिया.

नर्मदा नदीच्या पूर्वेकडील बाजूस, **विंध्याचलाच्या** पलीकडे एका खोऱ्यांत, प्रकाश आणि अंधकार ह्यांचें घोर युद्ध चाललें होतें. विंध्याचलाच्या शिखरावर प्रभात कालचीं चिन्हें दिसूं लागलीं. हळु हळु आममंतांतील खेड्यापाड्यांत प्रभात झाला. आणि लौकरच पर्वत शिखरापासून सपाट जमिनी पर्यंत सर्व स्थलीं प्रभात झाला, असें दिसूं लागलें. प्रभातकाल, जंगल, झाडें, व लहान सहान घरांच्या कोनाकोपऱ्यांतही, आपलं अम्मल चांगल्या जोमानें बसवूं लागला. ढगांनीं परिव्याप्त झालेलें आकाश स्वच्छ दिसूं लागलें. अंधकाराचा शत्रु आणि प्रकाशाची देवता जो सूर्य, त्याच्या दर्शनानें थंडी कमीकमी होत चालली. बर्फ वितळत जाऊं लागलें. स्वच्छ आणि शोभिवंत आकाशाची विस्तीर्णता पाहून प्रभुलीलाकृति मनांत येतांच, लोकांच्या अंतःकरणास अत्यानंद होऊं लागला. सूर्योदय होतांच, जो पहावा तो आपआपल्या कामास लागला. आकाशांतील स्वच्छ आणि तेजस्वी तारे—आपला अस्तसमय आल्या कारणानें असो, किंवा आपल्या तेजाहून महत्तरतेज परिप्रकाशित झाल्या कारणानें असो, त्या दैदीप्यमान् प्रखर तेजांत झांकले गेले. आणि **पार्वती** देवीचें दर्शन होतांच, **गंगा** जशी **श्रीशंकराच्या** जटाजूटांत अदृश्य होऊन राहिली त्याप्रमाणें—ते सर्व अदृश्य झाले. अशा समयीं पहाडाच्या

खोल आणि परम भयंकर दरींतून पक्षिसमुदायांचा येणारा गंभीर सुस्वरनाद आणि कुंजलतांतून वारंवार सारंगीसारखा येणारा मंजुल रम्य शब्द, इंद्रियांस अत्यंत तल्लीन करून सौख्य देऊं लागला.

शीतल वायूच्या मंद सुगंध लहरी शरीरास सुख देऊं लागल्या. रमणीय भूमीवरील शोभिवंत, सफेत, हिरवा, काळा, निळा आणि जांबळा अशा चित्रविचित्र रंगांचा गालिचा पाहून अंतःकरणास फारच आनंद होऊं लागला. पूर्वदिशेच्या महाराजानें आपली स्वारी पुढें चालविली. भयंकर आणि आरक्तवर्ण दिप दिवादांडीच्या शिखरावर राहूं शकला नाहीं. महाराजाच्या परम जाज्वल्य तरवारीच्या दराऱ्यानें, त्याचे शत्रु आपोआप पलायन करिते झाले.

सूर्याच्या समोरील दिशेस खोल अखातास मिळण्याकरितां **नर्मदा** नदी, आपल्या तारुण्याच्या तोऱ्यांत येऊन चालली होती. तींत मासे धरितांना कित्येक बगळे अवलोकनांत येत, आणि त्यांकडे पाहूं लागलें, ह्मणजे असें वाटे कीं, "आह्मीं पहिल्याच सपाट्यास जसा मत्स्यांचा आहार करितों; तसा एकाच तडाक्यास काळ तुमचा करील! एतदर्थ सावधानता धरा असें तर हे सुचवीत नसतीलना?" सूर्याच्या उजव्या बाजुकडून येणारा सुगंध शीतल वायु, भरतखंडाची स्वतंत्रता सुचवीत असे; आणि **विक्रम** व **भोज** राजांच्या शरणागत शहरांविषयीं सूचना देऊन ह्मणत होता, "ज्यांविषयीं आपल्या ध्यानीं, मनीं, किंवा स्वप्नींही नव्हतें; अशा, कधीं तरी एकदां—जंगली

मानिले जाणाऱ्या—लोकांचे आह्मीं दास झालों आहों. तसा प्रसंग आला तर आपण मुक्त देखील होऊं; आणि ज्यांचा संभव देखील नाहीं, त्यांच्याही हातीं सांपडूं." याचेंच नांव "दैवी विचित्र गतिः" प्राक्तन देवीच्या रहाटाच्या माळेंत सर्व सांपडतात, आणि मूर्खा शिवाय, आपल्यास चिरकाळ अमर मानण्यास कोणीही सामर्थ्यवान् नाहीं! साऱ्यांस नाश हा ठेविलेलाच आहे.

दक्षिणेकडील वैराण वियाबान जंगलाची स्थिति निराळ्याच प्रकारची दृष्टीस पडत होती. पृथ्वीवरील रंगीबेरंगी छांट **राम** आणि **परशराम** ह्यांच्या अलौकिक लीला दाखवीत होता. ज्या भूमीवर राजे आणि राणे आराम करीत, ती भूमि हीच. आणि निस्तेज, सत्त्वहीन, कंगाल तीही पण हीच. काल, आपलें कर्तव्य बजावीत चालला आहे. जो उन्नतींत जातो, तो अवनतींत येतो; आणि जो अवनतींत असतो, तो उन्नतींत येतो. ज्याचा उदय होतो, तो अस्त पावतो. जो चढतो, तो पडतो. ज्याला उन्नति व अवनति नाहीं, त्याला चांगल्या वाईटाचा अनुभवच नाहीं, असें झटलें पाहिजे. जगत्स्थिति दर्शनोत्सुक किंवा सृष्टीला अवलोकन करणारा प्राणी, परम समर्थ **जगदीश्वरा**ची अशी अलौकिक लीला अवलोकनकरून जो आनंद भोगितो, तो, तोच जाणण्यास समर्थ आहे. त्या आनंदापुढें इंद्राची रंभा किंवा महासागराचा अगाध खजिना, त्याच्या मनानें तुच्छ होय!

आकाशांत घटकेघटकेस ढगें येत, आणि घटकेघटकेस

फांकून जात. नंतर थोड्याच अवकाशानें तें निर्मळ झालें. इतक्यांत पर्वताच्या मध्यभागाकडून एकाएकीं एक आकृति दिसूं लागली. ती आकृति ईश्वरी देखाव्याचें प्रतिबिंबच असून सिंहासारख्या भिवयांच्या एका पुरुषाची होती. त्याचें नाक गरुडा सारखें अणकुचीदार, सुरेख, व चांगलें तेजस्वी होतें. तो आजानुबाहु होता. त्याचे खांदे भरदार होते ; परंतु दुःखातिशयभारानें वांकेडेतिकडे उतरलेले दिसत होते. डोळे विजेप्रमाणें पाणिदार आणि चकाकित होते ; त्यांतून जरी अश्रूंचा प्रवाह चालला होता, तरी ते, सौम्यतेनें आणि विनयानें भरलेले दिसत होते. गाल, जोमदार परंतु सुरकुतलेले ; कमलाप्रमाणें हास्यमुख, परंतु उदासीन ; आणि मिशा जाड्या असून कल्लेदार होत्या. सारांश, त्याच्या मुखारविंदांवर प्रौढता आणि गंभीरता, ह्यांचा मूर्तिमंत ठसा उमटला होता ; असें म्हणण्यास बिलकुल शंका नाहीं.

त्याचा पोषाखही वीर पुरुषास शोभण्यासारखा होता. त्याच्या मस्तकावर लोखंडाचा शानदार ग्रीसियन टोप असून त्यावर मोराच्या पिसांची कलगी लटकाविलेली होती. त्यांतील कित्येक पिसें अनास्थेनें गळून गेलेलीं होतीं ; आणि कित्येक जेथच्या तेथें मोडून राहिलेलीं वायूच्या लहरीनें फडफड हालत होतीं. परंतु त्याविषयीं जणों, त्या पुरुषश्रेष्ठानें बेपर्वाईच केली असावी ; असें भासे. त्यानें, त्या टोपाच्या खालीं म्हणजे गाल आणि हनुवटी यांवरून, एक काळी पट्टी बांधिली होती. आणि टोप कपाळावर झुकता असल्याकारणानें त्याचें

मुखकमल जरी दिसावें तसें स्पष्ट दिसत नव्हतें, तरी तें विशाल होतें. त्या पुरुषसिंहानें लहंग्यासारखी एक पाटलून पायांच्या घोंट्यांपर्यंत पुरेल अशी, घातली होती. तिच्या उभ्या जोडावर सोनेरी चांगल्या कलाबतूचें काम केलेलें असून पायचा (खालील उघडा भाग) उत्तमप्रकारच्या चित्रविचित्र जरतारी कामानें गुंफलेला होता. तो जरी पर्जन्यजलानें चिथडलेला होता, तरी त्यांतून उत्तमप्रकारची लकेर दृग्गोचर होत असे. त्या पाटलुनीच्या आंत, सफेत परंतु मळकट पायमोजे, आपल्या सुरेख कारागिरीनें शोभून राहिले होते. त्या मोजांच्या बंधनांत हिंदुस्थानांतील सर्वोत्कृष्ट प्रकारची कुशलता नजरेस पडे. त्या मोजांवर पाणिदार आणि चकाकित मोत्यांनीं गुंफलेला बूट चढविला होता. तो जरी चिखलानें भरलेला होता. तरी त्याच्या तेजस्वी कांतीस फारच शोभिवंत दिसे. त्यांतून उजव्या पायांतील बूट जरी वांकडातिकडा होता. तरी युक्तीनें चालतांना त्याची ऐब बिलकुल दिसत नसे. पाटलोनीचा कमरबंद हिरेजडित होता. पण तो कधींकाळीं साफ केला आहे, असेंही दिसत नव्हतें ! त्या कमरबंदाच्या उजव्या बाजूस थोडासा मोडलेला परंतु रत्नजडित एक जंबिया खुपसलेला होता. त्याकडे पाहूं लागल्यास तो जणों, "माझ्या उपयोगाचा समय केव्हां येईल?" अशा उत्साहानें मनांतल्या मनांत उड्या मारीत आहे ! असें भासे. चांगल्या मौल्यवान काळ्या साटीणचा डगला त्या वीर पुरुषाच्या पायांच्या ढोंपरापर्यंत रुळत होता. आणि तो त्याचें शरीर आच्छादनास बेतवार आहे, असें

वाटे. त्या डगल्यावरही चांगलें नकशीचें काम केलेलें असून त्यावर काश्मिरी तलम बनातीचा एक झगा घातला होता, त्यामुळें त्याच्या पायांची खोंट सुद्धां झांकून गेली होती. त्या झग्यावर बाह्या, खांदे, पाठ आणि अन्यस्थलीं जुन्या तऱ्हेचें जरतारी काम केलें होतें. ह्या कारणानें एकंदरींत तो पुरुष, विशेष दिव्य व अलौकिक दिसत होता.

सूर्यकिरणमालेच्या दैदिप्यमान प्रकाशामुळें त्या वीर पुरुषाच्या सकुमार आणि सुकोमल—प्रसंगोपात्त पहाडही डगमगावून सोडणाऱ्या—सामर्थ्यवानाच्या मुखकमलावर मौक्तिकबिंदुप्रमाणें घर्मबिंदु चमकूं लागले. तेव्हां त्यानें आपले मस्तकावरील टोप थोडासा वर केला, आणि खिशांतून सफेत रुमाल काढून आलेला घाम फुंशिला, आणि आपल्या हातांतील लांब काठी टेंकून खेददर्शक दीर्घ निश्वास सोडीत तो उभा राहिला. दुःखाच्या अतिशयामुळें जरी त्यास एकदेखील पाऊल पुढें टाकण्यास अवसान नव्हतें, तरी दूरच्या एका टेंकडीवर जाण्याकरितां तो हळुहळू चालूं लागला.

तीन चार पर्वतशिखरांवरून पुढें गेल्यावर ज्या टेंकडीवर त्यास जावयाचें होतें, तेथें तो येऊन पोंहोंचला. त्या टेंकडीवर एक लांब लचक शिळा, अधांत्रीं लटकत असून ती, आपल्या खालीं बसणाराचा ताप किंवा पर्जन्य, यांपासून बचाव करीत असे. त्या शिळेखालींच हा पुरुषश्रेष्ठ उत्तर दिशेकडे तोंड करून बसला.

"अरे ! ह्या देशांतील स्वदेशाभिमान कोठें आहे ?" असें

तो वीरश्रेष्ठ मोठ्या गंभीर शब्दानें म्हणत उठला :—" जिकडे दृष्टि फेंकावी तिकडे देशाभिमान आणि देशभक्तीच्या नांवानें शून्यता दिसते ! अहो ! **आर्य**जनहो ! तुमची पूर्वी कशी स्थिति होती ? आतां कशी दशा झाली आहे ? आणि पुढें कशी गति होईल ? ह्याचा क्षणभर एकाग्र चित्तानें विचार तरी करा ! स्वदेशाभिमानाशिवाय स्वतंत्रता नाहीं, स्वतंत्रतेवांचून अजरामर कीर्ति नाहीं. आणि कीर्तिशिवाय जीवितही व्यर्थ ! जर स्वदेशस्थ एकाही मानव प्राण्यांत स्वदेशाभिमान ही अजब चीज वास्तव्य करीत नाहीं, तर मी कोणाला बरें अमर करावें ? खुशामती आणि हांजी हांजी करणाऱ्यांस ? आणि आपस्वार्थ्यांस ? किंवा जे० आपल्या देशाचें हित जाणत नाहींत त्यांस ? केवळ **लौकिका**करितां मोठमोठ्या कार्यांत पैसा खर्च करणारे ; परंतु कोणत्याही प्रकारचें देशहित न करणाऱ्यांस ? अरे ! नाहीं ! अशांना अमर करावें, अशी माझी यत्किंचित्ही वासना नाहीं. महदेशबांधवहो ? तुम्ही विचार करा ! तुम्ही आपल्या विद्येस काळिमा लावूं नका. तिला सदोदित उज्वल ठेवा ! परंतु, हाय ! हायरे ! हा नेभळ्या, निर्वीर्य आणि निस्तेज शिक्षणाचा परिणाम होय ! तुम्हीं महदेशबांधव शिकूनसवरून अशा दुर्दशेस पोहोंचलां ; हें पाहून माझें हृदय विदीर्ण होतें. राजकीय सत्ता किती चंचल व चपल आहे ? आणि स्वदेशाच्या लाभाविषयीं तरी कोणाला भान राहिलें आहे ? कोणांत स्वदेश हिताचा अंकुर आहे ? स्वदेशकल्याणाची गोष्ट काढणाऱ्यांस कंगाल किंवा अज्ञान मानिलें जातें ! जो पहावा तो त्यांचा धिक्कार

करितो. जे लोक बहुधां स्वार्थी अथवा आपमतलबी असतात, तेच त्यांचा धिक्कार करितात. तरी अशा थोड्याच आपलपोट्यां पासून कां होईना? पण देशाचें सर्व प्रकारांनीं अनहित झालें आहे! निर्बल—बायकये—सत्यास्त्रानें युद्ध करण्यास भितात! कां त्यांनीं भ्यावें? स्वदेशाचें कल्याण कां करूं नये? निर्भय सत्यसाहस कां धरूं नये? योग्य दाद कां मागूं नये? परंतु ज्या ठिकाणीं हिंमतीचा बाजा वाजतो आहे; जेथें पहावीं तीं स्वार्थपर कर्में, तेथें देशोन्नति होणार कोठून? तेथें स्वदेशस्वतंत्रता राहते कशाला? स्वतंत्रतेचा लाभ मिळतो कसचा? अहो! माझे बांधव जनहो? हे! माझे प्राण मित्रहो? तुमच्या प्राक्तनीं स्वतंत्रतेचें सुख पहावयाचेंच नाहीं काय? तुमच्यासाठीं माझा अंतरात्मा कल्पांत करतो आहे! तुम्ही विचार करा. तुम्ही शुद्धीवर या. हाय! हायग!! **आर्य-भारतजननी!** तूं कोठें नाहींशी झालीस? तूं कोठें आहेस? माझें मन अतिशयच व्याकुळ झालें आहे! एतदर्थ तें, शांत होईल असें करून माझ्या बंधुजनांसही बोध कर."

भरतखंडाच्या इष्टदेवतेनें ह्या विनंतीकडे लक्ष्य दिलें. त्या पर्वतांत एकाएकीं भयंकर मेघगर्जनेप्रमाणें गर्जना झाली; आणि विद्युल्लतेसारखा एकदम प्रकाश पडला. त्या प्रचंड गर्जनेमुळें शेषाचीं मस्तकेंही परिकंपित झालीं असतील, असा भास होऊं लागला! **नर्मदा**नदीच्या पाण्याचा प्रवाह अतिशय वेगानें उच्छृंखल झाला. त्यांत मोठमोठे भोंवरे दिसूं लागले. त्यांतून फेंसाळलेल्या पाण्याच्या फेनाचे लहान-

मोठे गोळे हवेंत पसरूं लागले. तो पर्वत मध्यभागीं दुभागला. आणि त्यांतून एकदम जाज्वल्य प्रकाश निघून एक भलाथोरला धिप्पाड वाघ बाहेर आला! त्यावर स्वरूपसौंदर्ययुक्त, दिव्य कांतिमान् व अद्भुतशक्तिसंपन्न अशी एक देवी आरुढ झालेली होती. बाहेर येतांच, व्याघ्रानें जी एक गगनमंडलविदीर्ण करणारी, मेघवत् रणगंभीर गर्जना केली, तिच्या आघातप्रत्याघातानें सारें वन दणदणून गेलें!!!

ही दिव्यकांतिमती देवी बुद्धिमती असावी, असें तिच्या बाह्यस्वरुपावरूनच दिसत होतें; आणि त्याप्रमाणेंच ती होती. ती शरीरानें गोंडस आणि मध्यम बांध्याची, ह्मणजे फार स्थूलही नव्हे किंवा कृशही नव्हे, अशी असून मजबूत दिसे. तिच्या स्वरूपकांतीवरून शांततेंत तिनें पुष्कळ मौजमजा व ऐषआराम भोगिले असावेत, असें वाटे. युद्धकालीं रणसंग्रामांत झालेल्या भयंकर जखमांतील रक्तस्रावानें तिला आलेली निर्बलता, तिच्या त्या थाटानें मुखारविंदास अतिशय शोभादायक दिसे. तिचा चेहरा सुवर्णाप्रमाणें असून त्यांत कोमलता, नम्रता व जाज्वल्यमान सौंदर्य ह्यांची अलौकिक झांक दिसत होती. तिजमध्यें निराशा आणि क्रोध, संशय आणि दुःख, ईर्ष्या आणि शत्रुमैत्री, इत्यादि इतर साधारण विकार, अन्य प्राण्यांहून पुष्कळ निराळ्याच तऱ्हेचे दिसत होते. ते विकार, नम्र, मायाळु, मानमर्तबाचे आणि बुद्धिप्रकाशदायक होते. स्वधर्माभिमान तर तिच्या नखशिखांत ओतप्रोत जणूं भरूनच राहिला आहे काय? असें भासे! भविष्य-

कालच्या चिंतेनें मुखमुद्रा फार चिंतातुर झाली होती; आणि त्याच कारणानें ती अतिशय कावरीबावरी झाली नसेलना? असा स्पष्ट भास होई. तिचे काळे भोर, हरणा सारखे अष्ट-दिशांस चमकणारे नेत्र, वर्षानुवर्ष जेजे चमत्कार त्यांसमोर झालेले, त्यांचें स्मरण करून पुढें काय काय होणार? याविचारानें सकोप व आरक्त झाले होते; परंतु, त्यांवरही निराशेचीं स्पष्ट चिन्हें दिसत होतीं. त्या देवीच्या नेत्रातील दिव्य तेज, इतकें प्रखर होतें कीं, तें आतांच्याआतां मानवशत्रूंस भस्म करून टाकितें कीं काय? असें वाटे! मस्तकावरील कुरळ, लांब व कृष्ण-वर्ण मुक्त केश, पायांच्या खोंटेवर अव्यवस्थित विखुरलेले रुळत होते. आणि वैरज्वाला व दुःख दर्शविणारे बाष्पबिंदु, आणि कीर्तिरणांत झालेल्या क्षतांतून जे आरक्त रक्तबिंदु वहात होते, त्यांनीं तर ते बहुतेक भिजून चिब्ब झाले होते! तिनें सोनें, हिरे, माणिक व मोत्यें यांचे असंख्य अलंकार, शरीराच्या यथायोग्य भागीं धारण केले होते. तिच्या प्रख्यात शत्रूंनीं, तिच्या अलंकारांतून जें जें जवाहीर, ज्या ज्या भागांतून बलात्कारानें हिरावून नेलें होतें, तो तो भाग ऐनदार दिसे. तिचा झगा जवाहिरानें भरलेला असून त्याची कोर **चीन** व **मनार**च्या लोकप्रसिद्ध अखातांत उत्पन्न झालेल्या सुंदर, आणि मौल्यवान्, मौक्तिकांनीं गुंफिली होती. तो बहुतेक ठिकाणीं चिखलानें आणि रक्तानें चित्रित झालेला व भिजलेला दिसे. त्या झग्याला कितीएक ठिकाणीं लहान मोठीं छिद्रें पडलीं होतीं. त्यांतून, तिच्या शरीराच्या जखमी झालेल्या

भागांमधून रक्ताचें थिजकणें व प्रवाह चाललेला आहे, असें अवलोकनांत येई. तिच्या कंठांतील मौक्तिकहारांतून कांहीं सर घोररणप्रसंगांत भीषण शरप्रहारांनीं तुटले होते; व ते तसेच लटकत होते. त्यांकडे पहातांक्षणींच असें वाटे कीं, यांवर दुष्मन्चा हात नुक्ताच पडलेला असावा! तिनें सव्यकरीं रत्नखचित खड्ग धारण केला होता. डाव्या खांद्यावर बाणांच्या भात्यासह तिरकमठा अडकाविला होता. तोफेच्या गोळ्यांनीं तुटलेली, गेंड्याच्या कातड्याची ढाल, जिचा मोगरा अगदीं ढिला झाला होता, अशी तिच्या डाव्याखांद्याच्या बाजूस लटकत होती. मस्तकावर मोगरीच्या फुलांचा कोमेजलेला मुकुट अलगरजीपणानें धारण केला होता, आणि तोही केवळ थट्टा करण्याकरितांच असावा; असें दिसे!

त्या आर्यजनपरमवंद्य देवीचें वहान जो व्याघ्र, तो जंगली असल्या कारणानें **बंगाल**च्या तेजःपुंज व्याघ्राप्रमाणें परम उग्र दिसावा; परंतु, त्याची देखील स्वामिनीप्रमाणेंच दशा झाली होती. परम भयंकर समरांगणांतील आघातांनीं तो, पुष्कळ वेळ घायाळ झाल्यामुळें अगदीं सौम्य झाला होता. आणि त्यांतूनही त्याच्या मस्तकावरील गोळीची जखम, बरी न झाल्याकारणानें त्यास अतिशय पीडा होत असे.

अशा प्रकारच्या वाहनावर बसून ती **हिंद**नामक भरतखंडाची महाराणी, आपल्या पुत्राजवळ आली; तेव्हां समोरच्या स्वदेशहितनांवाच्या आकृतीनें त्या देवीला पहातांच, नम्रतेनें प्रणाम केला.

"अनपराधशापितदेविमाते! तुझीही काय दशा झाली

आहे? स्वदेशहित म्हणाला:—"दाशरथीराम, परशुराम आणि बलराम; व्यास, वाल्मीकि आणि गौतम; कृष्ण, अर्जुन आणि भीष्म यांस पूज्यप्रमाण देवी! तुझी ही स्थिति किती हृदयद्रावक आणि संतापजनक आहे! ज्या भूमीच्या दुर्भेद्य दुर्गांवर जयध्वज फडकत होते; ज्या भूमीच्या दर्शनार्थ देव दनुज वारंवार येत असत; ज्या भूमीवर भरत, युधिष्ठिर, विक्रम आणि शालिवाहनादिकांनीं एकचक्रि राज्य केलें; ज्या भूमीवर सदैव विजय-विजयाचा हर्ष नाद होई; आणि ज्या भूमीची अधिष्ठात्री व इतर सर्व देवतांची महाराणी म्हणून नांवाजलेली तूं, महादेवी अमून आज रक्तबंबाळ झालेली व निस्तेजवदन अशी भटकावीस? हें, किती हृदयद्रावक होय? तुझे पूर्वीचे रंग कोठें गेले? कोठें गेल्या त्या पूर्वीच्या ऋद्धि, सिद्धि आणि समृद्धि? कोठें गेलें तें प्रेमजन्यशौर्य? ते युद्धरंग कोठें आहेत? तो आनंदकाल कोठें गेला? ती व्यापाराची तेजी कोठें राहिली? ते सच्चिदानंदकंदपरमानंदांत निमग्न झालेले महर्षि आणि युद्धप्रवीण क्षत्रिय वीर काय झाले? राज्याचे राग रंग काय झाले? अरेरे! ती स्वतत्रता कोठें गेली? स्वतंत्रता, समानता आणि मित्रता ह्यांचे नियम कोठें गेले! सूर्य आणि चंद्र तर तेच प्रकाशत आहेत, वायूही तोच वाहत आहे, आणि रत्नाकरलहरीही तशाच येत आहेत."

"तें सर्व ब्रिटानियाकडे आहे." महाराणी हिंद ह्मणाली;—"माझे प्रिय पुत्र! माझे बांधव! तें सारें ब्रिटानियानें काढून घेतलें आहे! तिनें सर्वांला निराधार करून सर्वांचा

आशाभंग केला आहे. इतकें होऊनही ती आणखी अशी घमेंडी मिरविते कीं, " मीं हिंदपुत्रांला आभारी केलें आहे ! फार आभारी केलें आहे ! ! " तिनें कोणत्या रीतीचें शिक्षण देऊन तुम्हांस निर्वीर्य करून सर्वकाल असंतोषांत राहण्याची शिक्षा केली ? " मी तुमचें रक्षण करित्यें, मग शस्त्रांची तुह्मांला काय जरूर आहे ? " असें सांगून तिनें तीं, चेतलीं व सैन्यवर्गांत आर्यस्थानस्थ तर जणों लायकच नाहींत, असें समजून त्यांना ती. योग्य मोजीनाशी झाली ! व्हालंटियर कोर ह्मणजे. जिचें द्वार सर्वांस मुक्त असलेंच पाहिजे, त्यांत दाखल करण्यास. विशेष नियमाचा बाध आणिला. देशी राज्यें ठेविलीं, पण तीं आहेत आणि नाहींत सारखीं केलीं. **विलायतेहून** अग्यस्त्रें आणूं दिलीं ; आणि तीं येतांच, "तुह्मांला त्यांचा काय उपयोग व्हावयाचा आहे ? मी तुमचें रक्षण करणारी किती समर्थ आहें ?" असें समजावून सांगून कायद्याच्या निमित्तानें हिराऊन चेतलीं. ती पुन्हां दिलीं नाहींत. आणि इतर शस्त्रेंही कमी केलीं ! सत्य आणि यशस्वी कौलानें बांधिलें, परंतु त्यावरही जलांजलि सोडण्याची वासना धरून पाणी फिरविलें ! देशी राजांच्या सेनेचा नाश करण्याची गुप्त इच्छा धरिली. आपल्या पुत्रांचें कल्याण चिंतिलें. प्रिय **स्वदेशहित** ! अरे किति सांगूं ! मिव्हिल सर्व्हिसचे हक्क मिळविण्यास तुझे बांधव सर्वांशीं योग्य आहेत, हें तुला माहीत आहेना ? पण त्यांत दाखल होण्यास दोन्हीं बाजूंनीं त्राम व्हावा. असें उन्मार्गावलंबन केलें. त्यामुळें माझ्या मुलांस मात्र ते हक्क मिळेनातसे झाले, आणि **ब्रिटानियाचे** पुत्रच त्यांचे भोक्ते

गणिले जाऊं लागले ! माझ्या पुत्रांस मनुष्यप्राण्यांतूनही रद्द केलें, असें झटलें तरी चालेल; कारण, स्वतंत्र हक्कांशिवाय स्वदेशाभिमान नाहीं, आणि स्वदेशाभिमानाशिवाय मनुष्यच नव्हे ; असे हक्क मिळण्याकरितां तुझ्या बांधवांनीं चांगला व खुला रस्ता दाखवून दिला कीं, ती म्हणते, " ते भोगण्यास तुम्हीं नालायक आहां !" पोटभरू **माँचेस्टर**च्या कल्याणाकरितां कापडावर व कापसावर तिची कटु, वक्र आणि लोभी दृष्टि गेली. तेव्हां या देशाची पायमल्ली झाली असतां, आणखी दुर्दशा करण्याकरितां **माँचेस्टर**च्या आयात मालावरील जकात काढून व्यापाराच्या मुक्ततेचे बारा वाजविले ! ! प्रिय **देशहित** ! तूं रडूं नकोस. तिनें तुझ्या चट् साऱ्या हक्कांवर थप्पड मारिली आहे ! जीं स्वतंत्रतेनें सत्य फिर्यादी सांगाणारीं देशी वर्तमानपत्रें, त्यांस एखाददुसऱ्या नादानाच्या उच्छृंखल वर्तनामुळें जमीनदोस्त करून टाकिलें ! आबादीच्या बहाण्यानें व्यापार बरदाद केला ! देशी हुन्नर आणि देशी वस्तु, यांस रडत आणि ओरडत बसविलें ! "माझ्या बंधूंत देशाभिमान नाहीं, आणि ते केवळ आळ्यतेकरितां जीं कृत्यें करीत आहेत, त्यांनींच मोहून जात आहेत." असें जें तूं म्हणतोस, तें खरें. परंतु, त्यांचाही इलाज नाहीं. सारेच स्वार्थ जाणतात· परमार्थाकडे कोण लक्ष्य देतो ? **ब्रिटानिया**चे विजयी योद्धे, " आह्मांला पराजय नाहीं ! " अशी आळ्यता मिरवीतअसतील, अथवा त्यांच्या मनांत जर अमेंच असेल, तर अशी निंद्य गोष्ट, ती कशी खरी मानित्ये ? ती त्यांना कां बोध करीत नाहीं ? "

स्वदेशहित म्हणालाः— "पण, माझे बंधु कसे व किती जड आहेत, हें तूं जाणत असून, त्यांस कां शिक्षण देत नाहींस? **ब्रिटानियानें** आपली शक्ति फार वाढविली आहे, हें मीं सारें समजतों. परंतु तुझे पुत्र अक्कलशून्य पडले म्हणूनच ना? **ब्रिटानिया**चा प्रथमचा बोध आणि अभयवचनें कशीं व काय काय होतीं, ह्यांविषयीं तुझे पुत्र कां बोलत नाहींत?" "तुमचा देश दीनावस्थेंत आहे. आम्हीं त्याचें संरक्षण करूं. सत्य, न्यायी आणि अदल इनसाफ करूं; वाघ बकरीं एक जागीं पाणी पितील;' देशसमृद्धि, व्यापार आणि कलाकौशल्य फार वाढेल; शत्रूपासून रक्षण करूं; जुलूम गुजरूं देणार नाहीं; तूर्त ज्या करांच्या सपाट्यांत तुम्हीं सांपडला आहां, त्यांतून होईल तितक्या खटपटीनें सांभाळूं. इ०" तिचें बोलणें निष्फल झालें; तरीही तुझे पुत्र समजत नाहींत कसे? एखाद्या नव्या कामास आपली नाखुषी असेल, तर त्याविषयीं ओरड—कठिन-तर आकांत—केल्यास ती ऐकणार नाहीं काय? ते **ब्रिटानिया**स समक्ष कां विनंति करीत नाहींत? मला वाटतें कीं, ते आपलें भान भुलून गेले आहेत! त्यांची चित्तवृत्ति ताळ्यावर नाहीं! आतां ते तर कांहीं नवीन शिकणार नाहींतच; तरीही बरें. परंतु, **मॉंचेस्टर**चें उदाहरण घेऊन "चर्चा चालवावी आणि लाभ संपादावे" हेंही तत्त्व ते कसे विसरत चालले? अक्कल असून मूर्ख कां होतात? ते उच्च कुलांतील व पाणीदार असून देश-कल्याणांतच स्वकल्याण आहे, हें त्यांना समजत असतां; देश-कल्याणाची काळजी कां बाळगीत नाहींत? मातोश्री! "युरो-

पियन लोक जे उच्चसुखभोक्ते झाले आहेत, ते कांहीं त्यांच्या वज्राच्या अकलेनें नव्हत!" हें तूं तरी त्यांना सांग."

महादेवीनें गंभीरपणानें प्रत्युत्तर दिलें:—"बाळ! तुझ्या बांधवांचा दोष आहे, असें नकोच समजूं! ते, हें अवघें तत्त्व फार चांगल्या रीतीनें समजतात. ते बुद्धिहीन नाहींत. ते हेंही समजून आहेत कीं, **युरोपियनां**चीं मस्तकें वज्राचीं केलेलीं नाहींत! "एकाच प्रभूनें आपणांस व त्यांस उत्पन्न केलें आहे." पण ते वसुविरहित पशू आहेत; साधन नसल्यामुळें बलहीन झाले आहेत. साधनरहित शूर काय करील? अरे! साधनांशिवाय प्रत्यक्ष **अर्जुन** आला तरी त्याच्या हातून काय व्हायचें आहे? आणि साधनावांचून **वेलिंगटन**ला रडविणारा व **युरोपास** लटपटावून सोडणारा अत्यंत साहसी **नेपोलियन** तरी काय करणार? तूर्त आपल्यास त्यांची पंचाईत पाहिजे कशाला? **कृष्ण, अर्जुन** व **नेपोलियन** त्याकालीं परमयशस्वीकर्मे करून गेले आहेत, तशीं पराक्रमी कृत्यें करण्याचा हा समय नव्हे. तो समय फार दूर आहे. ज्या कालाच्या पंजाखालीं आर्यस्थानाचें नशीब दबून राहिलें आहे; तो काल बदलेलच. आणि तसा प्रसंग येईल तेव्हां माझे पुत्र कसा पराक्रम करून विजयश्रीरंग प्रदर्शवितील, तो मी पाहीन; आणि तूंही पहाशील! परंतु ते स्वतंत्रताविरहित असल्यामुळें पशुतुल्य झाले आहेत; त्यांना जर योग्य हक्क देण्यांत येतील, तर किती बरें चांगलें होईल? ते निमकहराम होतील, असें मनांत देखील आणावयास नको. अरे! जेव्हां इतर प्रजा. प्रसंगोपात्त राज्यकार्यांत प्रवेश करून

जय दर्शवित्ये, तेव्हां माझे पुत्र एकसमयावच्छेदेंकरून मेंढरां-सारखे हांकिले अथवा बांधिले जातात, किंवा कुतऱ्यांसारखे काव्यांचे सपाटे खातात. हायहाय!!! हें तरी "सरासरी सोळा टक्के" या नियमानें अवघ्या प्रजेचा सूड घेणें होय!!! आणि तोही इतक्याच करितां कीं, तिनें पुन्हां कधींही वर डोकें कर-ण्यास समर्थ होऊंच नये! किती बरें निंद्य कर्म हें! कदाचित् तिचा असा तर समज नसेलना? कीं, माझे पुत्र राजकार्यांत पुढारी झाल्यास, आपल्या हक्कास धोका पोहोंचेल! खरोखर **ब्रिटान्निया**चा जर असाच समज असेल, तर ही किती नादानी बरें? अशानें माझे पुत्र विशेष निमकहलाल का होणार आहेत? नाहीं! असें कधीं होणार नाहीं!!! परंतु उलट ते जास्त वैरमय दृष्टीनें पाहूं लागतील!!! जर आंग्लभौमजन, योग्य आर्यजनास चांगले अधिकार देतील; तर ते कधींही आपल्या वंश परंप-रेच्या अखंड कीर्तीस कालिमा लावणार नाहींत. माझ्या पुत्रांस स्वतंत्रता न देतां बायक्ये बनविण्यांत **ब्रिटानिया** कोणता पुरुषार्थ समजत आहे? हें मलाच कळत नाहीं. ह्यामुळें तिची अक्कल व शक्ति ह्यांविषयीं मात्र नीचता स्पष्ट होत्ये! स्वतंत्रता देऊन मग सर्व प्रकारांनीं सत्ता स्वाधीन ठेवावी, हीच सर्वोपरि सत्ता, तीच मर्दानगी आणि तोच विजय! राजकार्यांत प्रवीण होण्याकरितां स्वतंत्रतेचे सर्व हक्क निष्पक्षपातानें दिले पाहिजेत. कारण सर्व सारख्या प्रजेला आपल्या सारखे हक्क ह्मणजे देऊंच नयेत; असा कोणताही नीतिनियम नाहीं."

असें संभाषण चाललें असतां, सृष्टीच्या रंग एकाएकीं

बदलला. आकाश हळुहळु ढगांनीं जास्त व्याप्त होऊं लागलें. सूर्यदर्शन होईनासें झालें. चारही दिशा अंधकारानें व्यापिल्या. पर्वतापासून थोडयाच अंतरावर एखादा फिरस्ता मुरली वाजवीत असावा, असा मधुर ध्वनि वारंवार कर्णपथीं येऊं लागला. तसा ध्वनि, त्या स्थलीं पूर्वी कोणी कधींही ऐकिला नसेल! वाऱ्याच्या एका मागून एक जोरावर लहरी सुटल्या. आणि मेघराजाच्या आगमनाचीं सर्व चिन्हें स्पष्ट दृग्गोचर होऊं लागलीं. परंतु, एक देखील पर्जन्यबिंदु भूमीवर पडला नाहीं! हिंद आणि स्वदेशहित हीं दोघेंही टकमक टकमक इकडे तिकडे पाहूं लागलीं. त्यांनीं निर्भयमनानें आपआपलीं शस्त्रें सुसज्ज केलीं. इतक्यांत नदीच्या मध्यभागांतून विक्राळ गर्जना करीत एक भयंकर सिंह बाहेर आला! आणि लौकरच त्यावर स्वार झालेल्या देवी—शहानशाहजादी—सह मैदानांत दाखल झाला; व आपल्याच सारखा दूर एक अद्भुत प्राणी पाहून, त्याला आपली शक्तिसंपन्नता प्रदर्शविण्याकरितां तो एका मागून एक मेघवत् परम भयंकर गर्जना करूं लागला. पुन्हां आकाश स्वच्छ झालें आणि सूर्यही परिपूर्ण प्रकाशित झाला.

ही नवीन आकृति हिंद प्रमाणेंच होती. ह्या स्त्रिचा बांधा उंच व पौरुषसंपन्न दिसे. हिचे चांगले आरक्त वर्ण केश, ताम्रवर्णी मुखारविंदाच्या शोभिवंत बाजूला रुळत होते; आणि तोंडाची जी बाजू खुल्ली होती, तिचा वर्ण विटेच्या तांबुसपणाहून कांहींसा कमी तांबडा होता. एकंदरीत

हिचा चेहरा खुपसूरत, दिव्य आणि मर्दानी दिसे. नेत्र भुऱ्या रंगाचे, स्वच्छ, शांत व खोल विचारी दिसत; मुख चपटें, परंतु वांकडें फिरविलें ह्मणजे हंसतें दिसे. दाढा भयंकर व पश्चात्तापकारक होत्या. ह्यामुळें कंटाळा येण्या सारखा स्वभाव तिच्या अवध्या मुखावर प्रकट झाला होता. आणि सूक्ष्म नजरेनें अवलोकन केलें असतां, अशा आकृतींत अशीं चिन्हें सहज संभवनीय असावयाचीं व तीं मनावरही तसाच अंमल वसवावयाचीं! तिचें गडबडी तोंड व हस्तचांचल्य विशेष वाटे; आणि शांति व क्रोध तर साधारण कपाळ व मुख यांवर प्रकाशित झालाच होता.

ह्या स्वरूपसौंदर्यवान् आकृतिचा पोषाखही तिच्या अवलोकनीय मूर्ति प्रमाणेंच विचित्र होता! तिनें मस्तकावर ग्रीसियन टोप धारण केला होता, परंतु तो तिच्या शिरकमलास, बहुतांशीं द्यावी तशी शोभा देत नव्हता. शरिरावर रक्तवर्ण झगा होता, आणि तो छापी अक्षरांच्या चामड्याचे पट्ट्यानें बांधिला होता. लहानशी हातांत धरण्याजोगी रायफल बंदूक तिच्या कमरेस अडकाविली होती, ह्यामुळें तिला उठतां बसतां तिचा टेंकावा मिळत असे. तिच्या एका बाजूला हातानें उचलतां येण्याजोगें "स्टीम एंजिन" आणि धर्मपुस्तक (बायबल) "यमपाश"—टांगिलें होतें आणि त्याचें दोरखंडही जसें एखाद्या फांशीं देणाऱ्या मनुष्याचें असतें, तसें असून अंतःकरणास फारच तिरस्कार उत्पन्न करीत असे! डाव्या हाताच्या कांखेंत कापसाच्या पांच पंचवीस पक्या

गांसड्या आणि तितकेच वजनदार असे विडाचे वजनी तुकडे बांधिले होते. त्याच हातांत दृष्टि थक्क करून सोडणारी विशालवर्तुल, आणि बर्फासारख्या शुभ्र, भुऱ्या व लाल रंगाचा क्रूस काढिलेली ढाल, तिनें मोठ्या बहादुरीनें धरिली होती. तिच्या मुखांतून निघणारा श्वास "लीक" जातीच्या अतिशय घाणेऱ्या रोप्या प्रमाणें दुर्गंधयुक्त निघे. गालफडांत कांटेरी फड्या निवडुंगाच्या कांड्यांची एक डहाळी लटकाविली होती. तिच्या उजव्या हातांत एक त्रिशूळ असून, त्याच्या वायूंत मिसळून गेलेल्या दोरीच्या शेवटास अव्यवस्थितपणानें एक मुकुट आंदोलन करीत होता. तिचें वाहन एक विचित्र प्रकारचा प्राणी होता. त्याच्या खऱ्या स्वभावाचा निर्णय नशिबानें झाला तरच व्हावयाचा. कारण, त्याचें शरीर चित्त्या वाघाप्रमाणें आणि मस्तक नेपाळी कुत्र्याप्रमाणें होतें त्याच्या मानेवर सिंहासारखी आयाळ आलेली होती, आणि तीही ईश्वरानेंच, टक्कल पडलेल्या मस्तकास झांकण्याजोगी वसविली असावी अशी दिसे! तो प्राणी चालत, डुलत, मध्येंच उड्या मारीत, मध्येंच थांबत, मध्येंच परम भयंकर गर्जना करीत, आणि केव्हां केव्हां उंदिराशीं खेळतांना मांजर जसें जमिनीवरोवर वसतें, तसा बसत, आपल्या स्वामिनीच्या हातांतील लोंकरीच्या कपड्यानें झांकलेलें मोरचंग, क्षणोक्षणीं वाजविण्यास जाई. जेव्हां जेव्हां तो प्राणी वरील स्थितीप्रमाणें पडे आणि मोरचंगास झोंबे, तेव्हां तेव्हां त्याच्या विचित्र तारा पूर्वपरंपरेचे शोकदायक राग काढून ताना घेत. आणि जेव्हां केव्हां त्यांतील

एखादी तार तुटून किंवा सुटून त्याच्या थोबाडावर बसे तेव्हां तो प्राणी, त्या वाद्यास अतिशय क्रुद्ध होऊन मोठ्यात्वेषानें पंजे मारी व चावत असे.

हें पात्र कोण? तें प्रिय वाचकांस विशेष स्पष्ट करून सांगण्याची आवश्यकताच नाहीं. त्याच्या स्वरूपवर्णनावरूनच तें सहज समजण्यासारखें आहे.

तो सिंह मैदानांत येतांच, त्यानें त्या वाघास पाहिलें; व तो त्याकडे जाऊं लागला. वाघही तत्पर होताच. त्यानें त्यास पहातांच, तावडतोब शिकलेल्या कुशलबुद्धिनें ओळखिलें कीं, "हा प्रपंचवृत्ति बलिष्ठ सिंह, आपल्या अंगावर येत आहे! आतां त्याला यथोचित सन्मान देण्यास तयार झालें पाहिजे." युद्धांत तो पिछेहट होण्या जोगा नव्हताच. परंतु त्यानें आपल्या गर्विष्ट प्रतिस्पर्ध्यास पाहण्यावरोबर त्याच्या सारखीच भयंकर विक्राळ गर्जना करून, त्याचा आदरसत्कार केला; आणि मान खालीं वांकवून तो त्यापुढें गेला.

वाघाची स्वामिनी शांतकालांत जरी आळशी व निस्तेज होती, तरी युद्धसमय जवळ आला, असें जेव्हां तिला वाटलें; तेव्हां ती चतुरा, प्रचंड—विक्राळ—शौर्यभरित—अत्युत्साहानें परिप्रकाशित झाली. तिनें आपल्याकडील निरुपयोगी शस्त्रें एकीकडे झुगारून अंगावरील तुटलेलें बख्तर झट्कन काढून टाकलें. **ब्रिटानिया** (नूतन आलेल्या स्त्रिचें नांव) ची ढाल व त्रिशूळ फार भयंकर आणि बळकट असल्याकारणानें समरप्रसंगीं बहुधा तिलाच विजय मिळत असे,

तरीही हिंदमहादेवीची यावेळची कांति, समरोत्साहभरित-रूप-सौंदर्य, अतुल-पराक्रम-संपन्नता आणि "मरेन किंवा मारीन" असा अचल निश्चय पाहून, आतां कार्तिक स्वामी कोणाच्या गळ्यांत विजय माला समर्पितो? याविषयींच्या संशयानें मानस आंदोलित होऊं लागलें! परंतु, ह्यावेळीं ब्रिटानिया प्रौढ पुरुषाचा गर्व धारण करून शांत राहिली. तिनें प्रतिपक्षाची कुल-प्रतिष्ठा, शक्ति आणि कीर्तिमय कर्में ध्यानांत आणिलीं, ह्मणून ती अहंकाराला वश झाली नाहीं. तिनें प्रपंचविजय मिळविला. ती आपल्या मुखमुद्रेंत आपला अवघा रोष छपवून स्वस्थतेनें उभी राहिलीं. आणि तिनें जरी धरिलें तरी, स्वरक्षणार्थच ती शस्त्र धरील, असें विरुद्ध पक्षास दिसावें, अशा थाटानें तोंड मुरडलें; आणि ह्मणाली. "अपमान किंवा शस्त्राघात करिशील तर त्याचा बदला घेतल्याशिवाय राहणार नाहीं."

ब्रिटानिया थोडा वेळ तटस्थ उभी राहून, मनांत भीत भीत विचार करूं लागली, "न जाणों, ही महादेवी माझा अपमान करणार नाहीं कशावरून?" परंतु, हिंददेवीनें तिला आपला अंतरंग हेतु उघड करून दाखविला नाहीं.

"मी सांगत्यें कीं, महादेवी"—वाघ आणि सिंह समोरासमोर होऊन नेत्रचालना व गुरकागुरकी करीत होते. ते जर जसेच्या तसेच आणखी कांहीं वेळ उभे राहतील; आणि त्यांचा उद्योग तशाच जारीनें वृद्धि पावेल; तर गडबड केल्याशिवाय राहणार नाहींत; असें समजून ब्रिटानिया—एखादा

व्रात्य मुलगा थट्टा करण्याकरितां, आढ्यतेसाठीं किंवा गमती-खातर, दुसऱ्यास धमकावितो; तशा स्थितींत ह्मणूं लागली. "मी सांगत्यें कीं, महादेवी! माझ्या सिंहाच्या दृष्टिसमोरून तूं आपल्या वाघास दूर कर. नाहींतर आतां—" त्या सरसे तिनें आपल्या खुनशी भुऱ्या नेत्रांतील किरण तिच्या समोर फेंकून आपला त्रिशूळ डाव्या हातानें जोरानें उचलला. आणि महादेवीवर बुंदुकीचें निशाण मारण्याचा डौल आणिला.

"नाहींतर आतां काय करणार आहेस?" हिंदराणीनें निर्भयतेनें व डौलानें प्रत्युत्तर दिलें. "गर्विष्ट स्त्रिये! तूं सर्वांस एकाच काठीनें हांकूं पहात्येस काय? वाई? कोणी कसेंही असो. त्यानें राज्यमद आणि धनमद इतका बाळगूं नयेच! मला वाटतें तूं, खरोखरच बुद्धि-समृद्धि-मदातिशयानें निव्वळ फसली आहेस! अग? मोठ मोठ्यांचा गर्वातिशय कांहीं दिवस त्यांच्या सुंदर स्वरुपास शोभला! इतकेंच. पण फार थोड्या अवकाशांत तो, लयपंथासच गेला. मग तुझी पर्वा कसली? तुला हिंमत असेल तर चल, ये! आणि माझ्या हाताचा तडाका पाहून मग आपल्या शौर्यबुद्धिची आढ्यता मिरीव!!" असें बोलतां बोलतां हिंददेवीनें एकदम आपला भाला काढिला; आणि सपाट्या सरसा अशा चांगल्या कुशलतेनें **ब्रिटानिये**-वर मारिला कीं, त्यामुळें **ब्रिटानिया**चें चिलखत बरेंच फाटलें! तरी हिंदराणीची समाधानी झाली नाहीं. तिनें आडव्या वाटेस वळून रण चातुर्यानें **ब्रिटानियास** पुन्हा एक निसटता धक्का दिला. त्याबरोबर **ब्रिटानिया** जामिनदोस्त होण्याच्या बेतांत

आली. तेव्हा त्या पडत्या दशेंत **स्वदेशहितानें** जर तिस सांवरून धरिलीनसती तर ती, एकाक्षणांत काईमची जमीन दोस्तच झाली असती! इतकाप्रकार होतो न होतो, तोंच **हिंद**-देवीस काय वाटलें, कोणजाणें! तिनें तावडतोब आपल्याहातां-तील भाला दूर फेंकून दिला आणि **ब्रिटानियास** जवळ घेऊन झटलें:—"हेंच का तें तुझें शौर्य? आणि हीच का चपलता!" **हिंद**राणीनें द्वेषमय शस्त्र मारिलें नव्हतें. ह्यामुळें **ब्रिटानियेस** मुळींच इजा झाली नव्हती; हें जरी खरें, तरी **हिंद**राणीचें हस्तकौशल्य, चंचलता, चपलता आणि शौर्य पाहून ती मुग्ध होऊन स्तब्ध राहिली. बराचवेळ **ब्रिटानिया** कांहीं-एक बोलत नाहीं, असें पाहून **हिंद** झणाली "भित्रेपोरी? दुसऱ्याच्या बळावर माजून इतका फाजील गर्व? अग? तूं अशी कोणती सैन्यरचना करून विजय मिळविला आहेस? श्रीमान् झालीस झणून काय झालें? कपटविजय मिळविलास त्यांत तरी कसला अर्थ? तुला माझी युद्ध कुशलता पहाव-याची असेल तर दाखवीन केव्हांतरी माझा हात! पण आतां—"

"अग? हो पण **हिंद**!" एकदम चमकून **ब्रिटानिया** किनऱ्या शब्दानें झणाली. "त्या दोन्हीं मस्त प्राण्यांस मागें बोलाव. नाहींतर आतां—"

"मागें फीर, अरे? शूर वीरबहाद्दरा! मागें फीर? अप्रस-न्नवदन व ईश्वरेच्छाधीन शब्द दर्शवित महादेवी **हिंद** झणाली:—"मागें फीर. प्रिय बालका? व्यर्थ अशी गंडबड करूं नकोस! बावीस तेवीस वर्षांपूर्वी तुझी काय दशा झाली

होती, ती विसरलास वाटतें? हिच्या नरकास्त्रानें तुला किती खोल लोटून दिलें होतें? तें, तुझ्या ध्यानात नाहीं? तुला आधार देण्याकरितां—असत्य बहाण्यानें कां होईना—! मला किती दुःख सोसावें लागलें होतें? वत्सा! तूर्तच्या आपल्या स्थितिला ही दंगल निरर्थक आहे! शांत हो. प्रभूवर विश्वास ठेव! **जगदंबा**राणी तूर्त आपल्या विरुद्ध वागत आहे; आणि हिच्या ताऱ्याचा उदय समय आहे. हें तुला दिसत नाहीं काय?"

"हे! चतुरे? ताऱ्याच्या उदयाची आणि संग्राम देवीच्या विरुद्धतेची गोष्ट कशाला बोलत्येस?—" असें घाबरेपणानें बोलत बोलत **ब्रिटानिया**नें आपल्या हत्यारांस म्यान केलें. तिकडे वाघ आपल्या स्वामिनीची आज्ञा शिरसावंद्य करून दूर उभा राहिला होता. परंतु सिंहाच्या सपाट्यांतून आपलें संरक्षण कशा चपलतेनें करावें? ह्याच विचारांत त्याचें मन गर्क झालें होतें. "चतुरे? ताऱ्याच्या उदयाची आणि संग्राम देवीच्याविरुद्धतेची गोष्ट व्हावी कशाला? तूं आपल्या हातांनीं अपराध करित्येस आणि त्या घातकीपणासाठीं प्रभूला कां दोष देत्येस? मीं तुझा सर्वोपरी सरदार नाहीं; किंवा सत्तेंत वरिष्ठ नाहीं; असें ह्मणण्यास तुला शक्ति आहे काय? अग! तूंचना समरंगणांत माझ्या हातून पराजित होऊन पळालीस? आणि समरक्षेत्रांत माझा एक पुत्र पडला तेव्हां तुला, तुझ्या दहा किंवा वीस पोरांचा बळी द्यावा लागलाना? मीं ह्मणत्यें, तूं पाहिजे तेवढी शक्तिमंत आहेस. पण मी तुला

जर्जर करून माझें सर्वोपरी पदस्थापन केलेंना? तुला माझ्या पायांनीं चुरडून टाकिलें किंवा नाहीं? पहा! बरें, इतकेंही करून तुझ्या घोर संहारास कोणी प्रतिबंध केला? मींच ना!"

"अग? जेव्हां सिंह मरायाला पडले, तेव्हां सहजच कोल्हीं मस्तावलीं!" पूर्व वार्तांचें स्मरण करून गंभीरतेनें हिंददेवी ह्मणालीः—"जर बकरीं आणि हरणेंच रानांत राहिलीं तर लांडगाच त्यांचा राजा मानावयाचा! बाई? सर्वत्र जेव्हां अशीच स्थिती झाली, तेव्हांच ना तुझें सर्वोपरी पदस्थापन झालें? आणि घोर संहारास प्रतिबंध झाला, तो तरी तेव्हांच ना? व्यर्थ आढ्यता व्हावी कशाला! असो, चल, बहादुर वीरराज? चल. येथें आतां आह्मांस क्षणभर देखील रहाणें चांगलें नाहीं. ही बाई, आह्मांवर अपमानाचा, बेपर्वाईचा अथवा निमकहरामीचा आरोप लादण्यास बिलकुल विलंब लावणार नाहीं. तुला तर ही, सहज सत्य बोलूं जातां, बंडखोर ठरवील! स्वदेशहित? अरे! ही, शुद्ध स्वार्थ दृष्टि आहे!!!"

"आई?" स्वदेशहित वंदन करून ह्मणाला:—"तुला अशा गोष्टींची चिंता करायला नको! तुला, सत्य मार्गानें वागावयाचें आहे. मग कोणाचें भय आलें आहे? चांगलें करील त्याचें चांगलेंच होईल! तूं चांगुलपणानें वागत आहेस आणि सत्य मार्गावलंबन केलें आहेस. मग तुला भीति कसची? "प्रभू आणि आपले हक्क" ही नीति आपण स्मरणांत ठेविली ह्मणजे झालें!"

"प्रियपुत्र? अरे! तूं पहात नाहींस काय? ही सबल आहे ह्मणून आपण जी वाजवीदाद मागतों; ती, ही दंगल किंवा

बंडाळी मानित्ये! राजा आणि प्रजा या उभयतांचें हीत व्हावें अशी इची वासना कोठें आहे? चल, मीं तुला खरेंच सांगत्यें. येथें फार वेळ रहाणें बऱ्याचें लक्षण नव्हे. कांहीं तरी तुफान अंगावर येऊन धोका बसायचा!" असें म्हणत हिंद जावयास तयार झाली.

"थांब" **ब्रिटानिया** तिरस्कारानें म्हणाली:—"अग! तूं, वनराज कोणाला म्हणत्येस? त्या मनुजरक्ततृषित **म्हैसूरच्या हैदरअल्ली**ला? का त्याच्या धर्मांध **टिपूसुलतान** पोराला? अथवा°सेंट निकोलसच्या चेल्याला? किंवा तो चोरांचा राजा **यशवंतराव होळकर** त्याला? अठ्ठाशें सत्तावनांतील तुझी शक्ति, आणि नांवाच्या°सुधारलेल्या तुझ्या प्रजेस शोभिवंत(?!) करणारा नामजादा **नानासाहेब** त्याला? किंवा **तात्या टोपी? फिरोजशाह**? अथवा ती भित्री, नेभली, बंडखोर, अकल शुन्य **झांशीची राणी लक्ष्मीबाई** तिला? वाहःवा ग! तुझी शक्ति अत्यद्भुत खरी! तुझ्या प्रतापि वनपतींचीं कर्मेंही फार चांगलीं!! त्यांच्या बुद्धिशक्तीचा विजयही किती शोभिवंत!!! तो, तुला कसा ग आवडतो? त्याचीच ही शोभा पडली आहे!! धिःकार असो अशा वनपतींस!! आणि तुलाही! काय बटकीच्यांचीं भयंकर कृत्यें?"

"विश्रांत्यर्थ झोंपीं गेलेल्या शूर—वीर—नररत्नांस असे अयोग्य वाक्प्रहार करूं नकोस!. समजलीस?" आतां आपल्या शिरावर कोणाचाच अंकुश राहिला नाहीं; अशा समजानें **हिंद** महादेवी म्हणाली:—"अग? ते ज्या वंशांत अव-

तरले त्याप्रमाणें त्यांनीं आपलें कर्तव्य बजाविलें. तेव्हांचा काळ तसाच होता. तशा स्थितींत एखादा यःकश्चित निर्बल मनुष्य देखील हातपांय हालविल्या वांचून रहाता नसता! त्यांचा समय होता. शौर्यभरित उत्साह होता. सिकंडे पहावें, तिकडे जुलूम पसरलेला होता. मग त्यांनीं स्वच्छंद किंवा स्वेच्छ कां वरें वागूं नये? देशाभिमानी लोकांचा अभिमान प्रसंगोपात्त असा प्रकार दाखवायचाच! त्यांनीं असेंच करायचें. तेव्हां **भवानी** जर त्यांच्या पक्षास अनुकूल होती असती, तर आज त्यांविरुद्ध एक अवाक्षर बोलण्यास कोणाला तरी हिंमत झाली असती काय? प्रसंगानें त्यांस मदत दिली नाहीं; म्हणून ह्या गोष्टी! लुटारु लोक देश 'लुटितात; पण ते राजद्रोही मानिले जातात; परंतु विजयीराजा जिंकलेल्या देशास लुटितो किंवा लुटूं देतो, पण त्याचें तें दुष्ट कृत्य उघड करण्याला कोणाला हिय्या आहे? कोण मायचा पूत त्याला अपराधी म्हणूं शकेल? आपापल्या विजयानें सारे सर्वोपरी आहेत! बाकी **टिपुसुलताना**च्या अंगवला पुढें किंवा त्याच्या विक्राळ भयंकर नेत्रांसमोर चढाई करण्याची हिंमत धरूं शकेल, असा सबलयोद्धा त्या वेळीं अवघ्या **यूरोपांत** किंवा जगांत तरी कोण होता? त्या **म्हैसूर**च्या चित्त्याच्या शौर्य–संपन्न–बल–सामर्थ्यानें एका काळीं दोन वाघांची कशी हाबेलंडी उडविली, ती विसरलीस वाटतें! आज देखील त्याची हुबेहुब तसबीर **टिपुवाघ** या अमर नांवानें अवघ्या जगांत महशूर आहे!! अशा योद्ध्यांविरुद्ध निंदाद्योतक वाक्यें उच्चारणें तुला शोभतें?

बाई? शेवटचे तीन तुझे नमुने अहित; माझे नव्हत! बरें, इतकेंही होऊन मीं विचारित्यें. ते, असत्य मार्गानें वागले; असें कोणी शाबीद केलें आहे?* शक्तिमंत पुरुष कंगाल दशेंत आला; त्यांत त्याच्या वाजवी हक्कांवर गिधाडासारख्या खादाड **लार्ड डलहौसी**नें विनाकारण झडप घातली; आणि सारेंच गिळंकृत केलें! त्याला कोठेंच दाद मिळेनासें झालें!! तेव्हां त्याच्यानें स्वस्थ कसें बसवेल? माझ्या मुलाचें धैर्य आणि स्वतंत्रशौर्य, तूं जेव्हां युक्ति–प्रयुक्तिनें हरण करीत चाललीस, तेव्हां त्यांनीं दगलबाजीचें व द्वेषाचें फळ चाखिलें! एखादा गुलाम, शूर वीर पुरुष निपजला; आणि त्यानें आपल्या बल संपन्नतेनें विजय मिळविला; तर त्यालाच लोक खरा महत्पुरुष व चांगला असें म्हणूं लागतात! आतां हेंही खरें कीं, त्यावेळीं त्यांचा फांसा उलटा पडला. आणि——" असें म्हणत **हिंद** देवीनें जाण्याकरितां तोंड फिरविलें.

क्रोधगर्वातिशयानें, आश्चर्यानें आणि बारीक आवाजानें **ब्रिटानिया** म्हणाली:–"**हिंद** बाले! तूं वारंवार कोणाला ग "गुलाम" "गुलाम" म्हणत आहेस? तुझीं मुलें खरोखरच का गुलाम आहेत? कां बरें? जेव्हां पासून मीं त्यांनां माझ्या हाता खालीं घेतलें, तेव्हां पासून तीं, पूर्वीचे राजे, राणे, नबाब किंवा शाहनशाह ह्यां पेक्षां कमी स्वातंत्र्य भोगीत आहेत काय? काय जुलूम आहे पहा? तुमच्या कल्याणासाठीं म्हणा; किंवा सौख्य वृद्धिकरितां म्हणा; मीं अश्रांत श्रम घेत्यें. परंतु तूं आणि

* हेन्री इल्लेनीकृत शिपायांच्या बंडाचा इतिहास पहा.

तुझीं मुलें, मला खरोखर नेहमीं **रशिया** प्रमाणें जुलमी म्हणतां! आणि तुमचें **आर्यावर्त** म्हणजे दुसरें **पोलांड** असें समजतां! मी तुला खरेंच सांगत्यें. तुमच्या अशा वाग्बाणांनीं माझें हृदय दुभंग होतें. तुम्हांला इतकें सुख असून तुम्हीं, मला **रशिया** प्रमाणें जुलूमगार व घातकी मानणें, हें अत्याश्चर्य होय! तूं जायच्या पूर्वी अगोदर या विषयाचें स्पष्टीकरण करून मला सांग. आणि मग कोठें ती जा. कारण, ह्या प्रश्नाचा निकाल मला समजला नाहीं, तर माझें मन अतिशयच अस्वस्थ होणार आहे!"

"मला वाटतें कीं, तूं जें म्हणत्येस तें सत्य आहे." उतरलेल्या चेहेऱ्यानें परंतु तिरस्कारभरित शब्दांनीं हिंदराणी म्हणाली:—"मला वाटतें कीं, हें सर्व खरें! कारण, तुझ्या नेहमींच्या स्तोत्र पठनांनीं; तुझ्या शांततेच्या राज मेळ्यांनीं; तुझ्या मिशनरींच्या समाजांनीं, तुझ्या कापूस कातण्याच्या आणि विणण्याच्या यंत्रांनीं, तुझ्या शेरांच्या उन्मत्त वायूनें, तुझ्या अग्नि रथांच्या आणि विद्युद्यंत्रांच्या कीर्ति गर्वानें, बार्लिनट्रिटीच्या दिखाऊ लाभमदानें, तुझ्या राजसभा बंधनांनीं, तुझ्या औदार्यतेनें, परार्थ, परमार्थ आणि सुधारणेच्या गप्फा गोष्टींनीं; फार कशाला! तुझ्या एकोणिसाव्या शतकांतील चट्साऱ्या सांकेतिक, कुशल लुच्चेगिऱ्यांनीं आणि गडबडी व लटपटी ठग विद्यांनीं, तूं, चकित होऊन उपनेत्रानें अंध झाली आहेस!!! ह्या भानगडी पुढें किंवा धांगडधिंग्यापुढें, जवळ काय चाललें आहे? ह्याची तुला दाद ना फिर्याद! ह्या कर्मांनीं तुला मुळीं अवि-

चारीच केलें आहे!! तुला सुविचार सुचणार कोठून? जोंपर्यंत तुझें पोट परितृप्त झालें नव्हतें, तों पर्यंत तूं लक्ष्मी देवीची आराधना मोठ्या जारीनें चालविली होतीस. हर तऱ्हा करून पैसा कसा मिळेल? हाच तुझा मंत्रजप चालला होता. तुझ्या खादाड पणाचें किंवा तुझ्या आपलपोटेपणाचें धडधडीत वाजतें गाजतें उदाहरण किंवा वाजंत्र, तुझी **क्रिश्चानिटी**! तुझा मतलब तरी असाच आहे कीं, जों पर्यंत एखाद्या मनुष्याला खायला अन्न मिळतें आहें; अंगा खांद्यावर घ्यायला वस्त्र (तें कितीही फाटकें तुटकें चिंध्या झालेलें असलें तरी तुला चालतें! मग त्याची पर्वा नाहीं!) मिळतें आहे; आणि चोर व लुटारु यांच्या त्रासापासून रक्षण करण्यास पोलीस आहे; तर त्याला सर्व सौख्य प्राप्त झालें आहे; असें निःशंक समजावें! त्याला दुसऱ्या कशाचीच जरूर नाहीं? ह्यापेक्षां कांहीं जास्त मिळविण्याची जर तो इच्छा धरील, तर त्याला खालीं डोकें वर पाय करून गाडावा! आणखी मला वाटतें, तुझा असाही समज असेल कीं, जोंपर्यंत एखाद्याला खायला अन्न आहे; अब्रूरक्षणास वस्त्र आहे; रहाण्यास मोडकें तोडकें झोंपडें आहे; आणि रक्षण करण्यास पोलीसाची आवश्यकता आहे; तों पर्यंत केवळ पैशाकरितां ऐसाकाला जसा घाणेरड्या भुयारांत कोंबून ठेविला होता; मेलेल्या माणसांचे वेडेविद्रुप, भयानक, अस्थिपंजर दाखवून भयभीत केलें होतें; आणि फक्त पैशासाठींच असीम भीति दाखविली होती; तसा सारा प्रयत्न करून माझ्या मुलांकडून मिळेल त्या वाटेनें द्रव्य हरण करावें!!! बेवकुफ, रंक, सज्जन?

ही तुझी फारच मोठी भूल आहे! ही तुझी अज्ञानता असो; तुला मनुष्य प्राण्याच्या स्वभाववृत्तिचा अनुभव नसो; किंवा **आर्य** प्रजेच्या स्थितीची माहिती नसो. खरें काय असेल, तें तुझें तूंच पहा! आतां हेंही खरेंच. तूं जेव्हां नवें शिकशील, तेव्हां तुला यथार्थ ज्ञान व्हायचें! तेव्हांच तुला समजावयाचें कीं, राज्य–व्यवस्था–विधि कसा चालविला तर आबादानी होते! आणि कोणत्या मार्गांत रखडत राहिलें तर दुर्दशा प्राप्त होते? पहावें तेव्हां तुझ्या **रशिया**च्या गोष्टी! पृथ्विवरील कोणतेंही सरकार, जिंकिलेल्या प्रजेवर जाणून बुजून मुद्दाम जुलूम करीत असतें, अशी का तुझी समजूत आहे? नाहीं! अमर झऱ्या प्रमाणें एकसारखे तडाक्यानें जुलूम होऊं लागले; अमलदार स्वच्छंद वागूं लागले; त्यांच्या दुर्वर्तना कडे, वरिष्ट राजा बिलकुल ध्यान देईनासा झाला; म्हणजे कोणत्याही राष्ट्राची **रोमन** महाराज्याप्रमाणें तावडतोब अवस्था व्हायचीच! **पोल** लोक, **रशिया**चा किंवा **रशियन** अमलदारांचा प्रत्येक जुलूम सोशित आहेत; आणि उलटा बाहेरून तितका राजनिष्ठेचा डौल दाखवून त्यांच्या अनुसंधानानें वागत आहेत. पण हा थाटमाट कोठपर्यंत चालावयाचा समजलीस काय? जोंपर्यंत तसा आणीबाणीचा वेळ आला नाहीं, तोंपर्यंत! एकदां तसा प्रसंग आला, म्हणजे तेच **पोल** लोक, **रशियन** लोक जशी दंगामस्ती करितात, तशी किंवा त्याहून ही जास्त दंगल माजविल्या वांचून राहणारच नाहींत! असो. हे सर्व प्रकार, राज्य चालविणाऱ्या व चालवून घेणाऱ्या प्रजेच्या निरनिराळ्या मत-

भेदांवर अवलंबून आहेत. जुलूम करावा किंवा करूं नये? आणि जुलूम होऊं द्यावा किंवा देऊं नये? अथवा जुलूम होऊं लागला तर तो कोठपर्यंत सोसावा? हें काम, राजा आणि प्रजा यांच्या विचाराचें आहे. शत्रुत्व जोंपर्यंत प्राणांतावर येऊन बेतलें नाहीं, तोंपर्यंत पडती बाजू जयवंत व्हायची आशाच करायला नको! जेव्हां दुःखातिशयाची अगदीं शिकस्त होऊन जाते; दुःख भोगण्यापेक्षां प्राण गेले तरी कांहीं हरकत नाहीं, असें वाटतें; तेव्हांच कोणीही झाला तरी सौख्यसाधन शोधावयास निघावयाचा! तेव्हांच मरेन किंवा मारीन; जीव देईन किंवा घेईन; असा संकल्प ठरावयाचा. आणि तेव्हांच विजयाचा डंका वाजावयाचा!! पोलंडाप्रमाणेंच आर्यावर्ताची स्थिति आहे, किंवा नाहीं? आणि पोल लोक किती राजभक्त आहेत? व आर्य लोक किती राजनिष्ठ आहेत? हें तूंच आजुबाजूचा विचार करून पहा! आर्यप्रजा अशक्त झाली म्हणून राजभक्तीनें वागत्ये, असें मात्र तूं समजूं नकोस. ती सत्यमार्गानें चालणारी आहे, म्हणून अशी वागत्ये. समजलीस ना? सैबीरीयाच्या खाणींत पाठविलेल्या आपल्या बंधुजनांचा सूड उगवावयाचाच. हा मुद्दा पोल लोक विसरले नाहींत! ह्याचें प्रमाण त्यांचा पोषाखच दाखवितो! सुखानें पोट भरावें, आणि खुशाल झोंप घ्यायला सांपडावी; इतकाच मनुष्यजातीचा उत्तमोत्तम, सखोल व सार्थक करणारा हेतू असतो; असें नाहीं. तिला कांहींना कांहीं नवीन चीज पाहिजेच असत्ये! तिचें थोडें बहुत तरी स्वदेशाच्या कल्याणाकडे मन

असावयाचेंच !! मानवजाति जड नव्हे. ती, "पर राज्याची आण आणि जुलमानें मान!" असें कां करूं देईल? ब्रिटनदेवी? वेळ सारें करील! तूं प्राचिन इतिहासाकडे मन देऊन पहा? केवळ पोट भरण्यासाठींच कोट्यावधि प्राण्यांनीं आपले प्राण घालविले? घोर संहार झाले, तेही पोटाची खांच भरण्यासाठींच? अग! फार लांब कशाला? पण **पांडव कौरवांचें** महाभारत युद्ध; **ग्रीक** लोकांची **इराणां**तील धुमश्चक्री; **रोमन** महाराजाचा पृथ्विजिंय; **युरोपां**तील लोकांचें दक्षिणेकडे आगमन; **आरब**प्रजेचें रानींवनीं भटकणें; क्रुझेडर्सच्या शेंकडों टोळ्यांचें **जरुसालम**च्या भितीजवळ येणें; **महमदा**नें आपली तरवार मैदानांत पाठवून देणें; प्राटेस्टंट आणि क्याथलिक ह्यांत कित्येक दिवसपर्यंत एकसारखीं तंटेभांडणें सुरु असणें; सन १८१४—१५ त **युरोपां**तिल बहुतेक मोठमोठ्या राज्यांनीं मिलाफ करून **फ्रान्सा**च्या प्रजासत्ताक राज्यावर उठणें; आणि त्याचा पराजय होणें; पुराणप्रसिद्ध **इताली** आणि **ग्रीस** ह्यांनीं पुनः संजीवन होऊन माजणें; यःकश्चित् कारणामुळें **फ्रान्स** आणि **जर्मनी** या दोन्ही राज्यांत जंगी लढाई जुंपणें; धर्माच्या बहाण्यानें **रशिया** आणि **टर्की** या बड्या राज्यांचा हुमरी तुमरीवर प्रसंग येणें; तुझें ह्या देशांत येणें; सर्वोपरी पदस्थापन होणें; अग्निवर्षाव होणें; रक्ताचे पाट वाहणें; हीं आणि अशा सारखींच जीं असंख्य कृत्यें, आजपर्यंत झालीं तीं, केवळ भाकरतुकड्या करितां किंवा अंग झांकण वस्त्रप्रावर्णा साठींच काय? नाहीं! **अलेग्झांडर**,

सीझर व नेपोलियन; पिहर्स, हनिबाल व सिपियो; डरायस, लियोनिडास व पोरस; दुर्योधन, अर्जुन आणि राम ह्यांनीं भाकरीतुकड्यासाठींच पृथ्वि हालवून सोडिली होती? कोट्यावधी लोकांचे प्राण अकालीं यमालयास पाठविले ते अन्नवस्त्रासाठींच? छीः छीः!!! त्यांत राज्यलोभ, कीर्ति, धर्मांधपणा, वैषम्य, शत्रुत्व, स्वतंत्रता, प्रजामुक्ति, हक्कांचें संरक्षण, धर्मास तेजस्वी करणें, स्पर्धा, आणि गर्वातिशय अशीं अनेक लफडीं होतीं. त्यांचा अंतपार लागावयाचा नाहीं! बाई! हाच मनुष्यप्राण्याच्या सुकर्मांचा वसंत! असेंच झालें होतें; असेंच होत आहे; आणि असेंच व्हावयाचें. मीं तुला खात्रीनें सांगत्यें. आणखीं कांहीं कालांतर झालें, ह्मणजे तुझे अमिरी महाल, प्रार्थना मंदिरें, तत्वज्ञान आणि दुसरेंतिसरें चट्सारें लटरफटर तुला समूळ विसरावें लागेल! कालचक्र फेरे घालतें आहे. तें असेंच फिरत रहावयाचें! राम राम!! प्रियभगिनी? राम राम!!!"

"थांब! कुलवती हिंद?" ब्रिटानिया ह्मणाली :—"जें झालें तें झालें. आतां उगाच गेल्याचें दुःख करण्यांत हांसल कसलें? जगदीशाच्या इच्छेप्रमाणें सर्व घडत असतें! आपण विनाकारण भांडणाचें निमित्य उकरून काढून वैमनस्याला अचल व अमर कां करा? तुझ्याच ह्मणण्याप्रमाणें कां होईना! मी मारवाडी काव्यानें मिळविलें आणि तूं घालविलेंस. आतां तरी झालें? देशी राज्य विशोभित झालें. विदेशीयांनीं राजलक्ष्मी मिळविली! कांहीं केलें ह्मणून झालें तें परत तर येत

नाहीं? अग पण हिंद? मला तुझा असा चमत्कार वाटतो कीं, तूं चांगली ज्ञानी, समंजस, शहाणी व पोक्त विचारी ह्मणवित्येस आणि कांहींच्या बांहींच तर्क वितर्क करून जितके माझे दोष असतील तितके जगांत कसे नेमके फैलावत्येस! हें कृत्य तुझ्या सभ्यपणास व मौन्यतेस कशी शोभा देत असेल कोण-जाणें!!! काय आहे ह्या शुष्कवादांत? मीं तुझ्या मुलांबाळांस नवे नेत्र बक्षीस दिले; त्यांस चार नीतीच्या गोष्टी सांगितल्या; त्यांना नीतिमानांत लोटून मोहित केलें, हे माझे उपकार स्मरावे आणि वैमनस्याचा त्याग करून आपल्या पुत्रांवर राजनियमांचा (कायद्यांचा) चांगला अंमल बसविण्यास तूं मला मदत करावीस? तें राहिलें एकिकडेच! चल, ये. कसली शहाणी ती हिंद! आह्मीं प्रेमालिंगनानें भेटून ऐक्य करूं. आणि जगास आमचा परस्परांचा मधुर स्नेह दाखवून लाजवूं!!!"

"खरेंच तें! मी ऐक्य करूं?" हिंदमहाराणीनें नम्रतेनें व मंजूळ वाणीनें सांगितलें:—"तूं मित्रत्वानें ऐक्य करण्याची वार्ता देखील मजकडे काढूं नकोस! तुझ्या माझ्यांत खरें मित्रत्व व्हायला मार्ग कोठें आहे? तूं फुकटच्या तोंडानें ह्मणत्येस इतकेंच. परंतु परस्परांत सख्य करावें, असें तुझ्या मनांतच नाहीं. आणि तूं ह्मणत्येस ह्मणून असेल तर. माझीं शेंकडों मुलें रणांगणांत, कट्यार, बाण आणि अनिवार लोहमय हस्तांनीं शत्रूचा रस्ता स्वच्छ करीत होतीं; त्यांनीं बराच वेळ टिकाव धरिला होता; इतक्यांत तुझ्या उन्मत्त, मूर्ख, शूर वीरांनीं आपल्या पिशाचास्त्रानीं—तोफा बंदुकांनीं आगीचा पाऊस पाडून

जाळून पोळून त्यांची राख रांगोळी केली!! तीं माझीं लेंकरें मला परत दे—माझे शूर, मर्द, आणि जोमदार असे तलवार बहादर पुत्र, तुझ्या बेयोनेटाच्या अचल कोटापुढें खऱ्या दृढतेनें किंवा शिपायगिरीच्या बाण्यानें छाती ठोकून राहिले होते; परंतु त्यांवर तुझ्या काळस्वरूप शिपायांनीं काळपुरुषाप्रमाणें गोळ्यांचा पर्जन्य पाडून त्यांचा पाठारा उडविला. आणि युद्ध देवास त्यांच्या रक्तानें तृप्त केलें; ते माझे पुत्र परत दे. माझ्या भूमीवरील अमीर, उमराव, युवराज आणि शाहजादे केवळ पोटासाटीं उपाशीं मरत अन्य राज्यस्थानीं गयांवयां करीत भटकत आहेत—कित्येक मरूनही गेले! किंवा आपलें जीवित—आपले रास्त हक्क—गमावून दरिद्रावस्थेंत नजर कैद होऊन कसेबसे काळाचे दिवस लोटित आहेत!! ते मला परत दे. तुझ्या अव्यवस्थित राजनीतीमुळें आणि जुलमानें माझीं हजारों—कां लक्षावधी?—साधीं भोळीं बालकें पायमाल होऊन गेलीं आहेत! त्यांची स्थिती पूर्ववत् सुधार. **लार्डदलहौसीनें** स्वतःची आपलपोटी किंवा स्वार्थी, अग! तूं ह्मणत्येस तशीच मांसरक्ताहारी! राजनीति चालवून जीं राज्यें तुझ्या घशांत उतरवलीं आहेत; तीं परत दे. **निजामाचा** वऱ्हाडप्रांत शुद्ध गैर हक्कानें तूं आपल्या हाताखालीं घालून ठेविला आहेस; तो माघारा दे. तूं बाहेरून तितका न्यायाचा डौल घालून ज्यांस असत्य न्याय दिला आहेस, तो सत्य कर. **मल्हाररावाला** तूं अयोग्य कारणानें बंदिखान्यांत गाडिला आहेस; त्यांतून त्यास मुक्त कर! राजसूय यज्ञांत ज्या राजांस तूं, फक्त नांवाचे मेठे

थोरले बनाविले आहेस; त्यांना त्या त्या पदाधिकारावर स्थापन कर. माझ्या भरभराटीच्या वेळीं माझे कीर्तिप्रकाशानें थक्क होऊन व परमोज्वल, भव्य—धनाढ्य—शोभिवंत—झालेल्या नगरांतील आणि शहरांतील कलाकुशलता अवलोकन करून अवघी दुनिया चकित होत असे; व नेहमीं माझी प्रशंसा करी! माझ्या लौकिकानेंच—हाय! हायरे!! दैवा!!! तुझी दृष्टि ह्या देशाकडे खेंचिली.—अग! ज्या देशाच्या कीर्तीनें तुला काळोखी आली—ज्याला पाहून तूं शिक्षणीय झालीस. आणि आतां तूं ज्याला स्मशानासारखा उदास, भयाण व मौन-धारण केलेला पाहत्ये आहेस; ज्या सारखीं तुझीं **मांचेस्टर** आणि **बर्मिंगहाम** इत्याद्यनेक शहरें आबादीच्या*—उन्नतीच्या—शिखरास पोंचलीं आहेत. त्यांप्रमाणें माझीं नगरें मला दे. माझ्या मुलांच्या तोंडांतून **वारन हेस्तिंग्स** आणि **लार्डक्लैव** ह्यांनीं जी अपरंपार संपत्ति—हिरे, माणिक, मोतीं, सोनें आणि रुपें वगैरे—लुटून किंवा जबरदस्तीनें नेली आहे, ती परत दे. माझीं मुलें लेंकरें कारागिरी, हुन्नर व कलाकौशल्य ह्यांशिवाय रखडत आहेत; त्यांच्या पोषणाचीं साधनें माघारीं दे. **आर्यावर्ता**च्या पहाडांतून दौलत नामक नदीचा अमर झरा आज पन्नास पाऊणशें वर्षें एकसारखा पुराच्या

* सर जेम्स **केर्ड** आपल्या "भरतखंड, त्याची भूमि, आणि प्रजा" ह्या ग्रंथांत असें ह्मणतो कीं, "एतद्देशीय कारागिर व कोष्टी ह्यांस आमची ही चालू राजसत्ता जितकी कठीण जात आहे; तितकी इतर वर्गांतील लोकांस जात नसेल!

झपाट्याप्रमाणें धो धो वहात जाऊन इंग्लंड सागरांत पतन पावत आहे. बरें इतकेंही होऊन त्याचे धबधबे व पाट दिवसानुदिवस वाढत्या स्थितीनें तिकडेच वहात आहेत; काय चमत्कार पहा? ज्या द्रव्यानें ह्वैमूरच्या चित्त्या वाघाचा वध करणाऱ्याचा आणि वाटर्लूच्या* लढाईंत विजय मिळविणाराचा पुतळा हाइडपार्कच्या कोंपऱ्यांत उभा केला आहेस! समजलीस ना? त्या द्रव्याचा प्रवाह ह्या बाजूला वळीव!! आणि मग ऐक्य करण्याच्या गोष्टी बोल!!! काय ग? तूं पूर्वीचीं वचनें, कसकशा आणा वाहून व शपथी घेऊन दिलीं होतींस? त्यांचें स्मरण तरी कर! तीं एकदां तरी अमलांत आण!! आतां मीं सांगितलें इतकें, जेव्हां तुजकडून यथासांग शेवटास जाईल तेव्हां सख्यत्वाच्या आणि ऐक्यत्वाच्या नांवाचा उच्चार कर! उगाच्या उगीच अच्या वच्या वाटेल तें बाष्कळ बोललें ह्मणजे का स्नेह व ऐक्यता होते?"

"तेव्हां मी तर कांहीं सोशिलेंच नाहीं?" ब्रिटानिया कांहींच्या बाहींच टाळा टाळीचा जबाब देऊं लागली:—"तुझ्या मतें मी कांहीं तोटा सोशिलाच नाहीं? तुझ्यामुळें मला कांहींच नुकसान सोसावें लागलें नाहीं? तूं जें घालविलेंस त्यांतून माझी बाकी साकी कांहीं निघतच नाहीं? फिटंफाटच होत्ये वाटतें! बाई? कलकत्त्याच्या ब्लॉक होलांत; त्या घातकी सुराज उद्वलयानें अंतःकरण पारि कंपित व्हावें, अशा रीतीनें माझ्या

* ड्युक आफ वेलिंगटनचें जन्म चरित्र व सन १८५३ चें पार्लमेंटचें ब्ल्यु बुक पहा.

मुलांचे प्राण घेतले; तें कर्म किती बरें कळवळा उत्पन्न करणारें आहे! तुझ्या काशी नामक पवित्र क्षेत्रांत माझ्या पुत्रांस कापून काढिलें! अग! पाणी आणि रक्त एक केलें!! हें तुझें महदद्भुत कर्म असेल! लखनौ आणि मुलतानचा नातेवाईक मिलाफ होतांना, जो निरर्थक हृदय द्रावक संहार झाला; त्याचा बदला कोण देईल? कानपूरच्या कुव्यांत माझ्या शेंकडों एकुलत्या एक प्रिय बालकांचा, व कोमल, सकुमार, देवांगनास्वरूप दुहितांचा आणि त्यांच्या निर्दोष—निर्बल—निरपराधी लेंकरांचा, ठार मारून, कोणी कचकल केला! अबला आणि बालकें यांस असह्य रीतीनें चिरून टाकिलें!! स्त्रियांचे स्तन असहनीय स्थितींत कापून टाकिले!! शरणागतांशीं अघटित बलात्कार करून त्यांची लाज लुटली; बरें इतकेंही करून त्यांनां त्यांच्या प्रियपतीं समक्ष हलकें पाडिलें! कापून सोडिलें!! त्यांस यःकश्चित् कावळ्यां कुत्र्यांच्या भक्षस्थानीं घातलें!!! हें काय? हाय! हाय!! ह्या नीच कृत्यांची आठवण होतांच, माझें हृदय पेटतें!!! बरें हेंही फार लांबचें नव्हे. अवघें वीस वर्षांमागील! हें कांहींच नाहीं काय? हिंदराणी! या सर्वांचा मोबदला कसा मिळावा? टिपुराक्षसानें माझ्या कित्येक पुत्रांस फाडून; तोडून व चुफून खाल्लें, त्यांचा बदला तूं मला देण्यास सामर्थ्यवान् आहेस? तुला वाटतें, आर्य—कुल—भूषणवंतांचीं दूषण—युक्त—कर्में, विविध—प्रकारें दूषणीय आहेत, असें दिसत नसेल?"

हिंदराणीच्या दुःखाश्रु वाहणाऱ्या नेत्रांत मोहक प्रकाश

चमकुं लागला! ती ब्रिटानियाच्या उत्तरांनीं विशेष आवेशयुक्त झाली; ह्यावरून त्यांत तिला कांहींच हांसल वाटलें नाहीं! असें ह्मणण्यास हरकत नाहीं. हिंदराणी ह्मणाली:—

"तर मग आयर्लंडच्या जुलूमगारांवर विजय मिळविणारी, आणि जमेकाच्या बंडखोरांस ताबीन करणारांची मातोश्री! अशी उमेद राखीत असेल कीं, खऱ्या हक्कासाठीं खालींवर होणाऱ्या प्रजेनें सख्त राज्य करणारांविरुद्ध पवित्र व सत्य लढाई—नेहमीं चालूच राहील अशी प्रबळ लढाई—उठवावी? आणि अमेरिकेंतील युनैटेडस्टेट्सच्या लोकांनीं ज्याप्रमाणें स्वतंत्रता देवीचा बावटा फडकाविला! तसा फडकवावा? तूं काळजी करूं नकोंस. अशी इच्छा असेल तर तसेंही होईल*! परंतु हल्लींचे राज्यकर्त्यांची रुढी—युनैटेड स्टेट्स जसें स्वतंत्र झालें, आणि एक मोठें संग्राम होऊन त्याशीं तुमचा (ब्रिटीश लोकांचा) होता तो, राजकीय संबंध तुटला;—त्याहून विशेष चांगली नाहीं! ह्या रुढीनें तर आर्य स्थानांतील संबंध चांगलाच तुटला पाहिजे? परंतु तसें झालें नाहीं, आणि होणारही नाहीं! हें केवळ माझ्या कुलाचें मोठेपण होय; असें समज. ही प्रजा पाहिजे तसें निरंकुश कायदे (जे दृष्टोत्पत्तींत अंकुशित आहेत, पण† "कायदा बांधण्यांत प्रतिनिधीपणाचा हक्क जो रयतेला अमूल्य आहे, आणि जुलूमगारांस मात्र भिववणारा आहे" तसा प्रतिनिधी-

---

* सन १८६६ तील मि० ब्राइटचें भाषण पहा.

† जार्ज वाशिंग्टनच्या जन्म वृत्तांतील स्वतंत्र स्थानचा जाहिर-नामा पहा.

पणाचा हक्क न देतां, कायदा झटला झणजे प्रजेच्या संमत्तानें झाला पाहिजे; परंतु त्याच्या बदला तो स्वतंत्र रीतीनें यथेच्छ घडण्यांत येतो, तसे अंकुशित कायदे!) धैर्य धरून सोसण्यास कांकूं करील अशी नाहीं! त्यांनां ती योग्य मान देत्ये! तूं झटलेल्या कित्येक गोष्टी मी कबूल करित्यें; आणि तशीं नीच कर्में दया येण्या-जोगीं होत! परंतु त्यांत विशेष नवल तें कसलें? तूं तिप्पट रागानें आणि द्वेषानें "९७ चें बंड" झणून झणत्येस, परंतु माझ्या शेंकडों बालकांस अभय वचन दिल्यानंतर वैरज्वालांनीं होरपळावें लागलें. कित्येक लेंकरांस आकसानें व मानतृषेनें अंध झालेल्या तुझ्या अधिकाऱ्यांनीं झाडांस खालीं मस्तकें आणि वर पाय बांधून लटकाविलें; आणि कित्येकांस तोफेच्या गोळ्यांनीं हवेंत भिरकावून दिलें, किंवा त्यांच्या अवयवांचे तुकडे तुकडे करून कावळे, कुत्रे आणि गृध्र यांनीं खावे झणून हवेंत झुगारून दिलें!!! आपले पती मेले, यामुळें अनाथ झालेल्या अबला, घरांदारांशिवाय—ज्याचीं घरें, बंडाला मदत केली, अशा निमित्तानें तूं लुटून घेतलीं आहेस—ज्या प्रखर तापांत उघड्या पायांनीं पोळल्या व जळत आहेत. त्यांची कोणी तरी दाद घेत आहे काय? हजारों स्त्रिया रात्र-दिवस अन्न नाहीं झणून वळवळत आहेत, त्यांचीं नाजुक बालकें, क्षुधार्त होऊन त्या मातांच्या छातीवरच—स्तनाच्या निःसत्व चामड्या चोखून—मरताहेत; कित्येक स्वरुपवान् सुंदरी भुकेनें पीडित होऊन अनीति युक्त कर्में करीत आहेत. कितीएक प्रेतें रस्त्यांत अस्ताव्यस्त रखडत आहेत; ज्यांची कोणी

दाद सुद्धां घेत नाहीं!!! हा तुझा कोणत्या प्रकारचा बरें आश्रय? हा किती हृदय द्रावक देखावा! हें पाहून कोणा फत्तरहृदयाची छाती फाटून जाणार नाहीं? माझे महाल, देवालयें आणि मशिदी जमिन दोस्त केल्या, गांवचे गांव जाळून पोळून फस्त केले! हें काय? रण संग्रामांत तृषित झालेले घायाळ प्राणी, जेव्हां आपली तहान भागविण्याकरितां "पाणी" "पाणी" ह्मणून शंख करीत; तेव्हां त्यांनां कोणी बरें मृत्युदायक जालम पाणी पाजिलें? सदोष आणि निर्दोष अशा सर्वांची एकदम कोणी कत्तल केली! सारासार विचार केल्याशिवाय आणि कोणत्याही प्रकारचा भेद न ठेवितां; **वेयोनेटा**वर त्यांचीं शिरें कोणी लटकाविलीं? शरणागत शहाजाद्यांस कोणी तोफेच्या तोंडीं दिलें? हें वाटतें कांहींच नव्हे? खचित ह्या साऱ्या गोष्टी, तूं तुझ्या भूमीवर गेलीस ह्मणजे क्वचितच स्विकारशील! मला वाटतें; **ब्रिटानिया!** आह्मीं जें आतां बोलत आहों, त्यावरून असें स्पष्ट शाबीद होऊन चुकतें आहे कीं, मजहून तुजविषयीं बोलण्यास मला दुप्पट किंवा तिप्पट कारणें आहेत. तुझ्या रक्ताच्या एका बिंदूकरितां, माझ्या रक्ताचा महासागर भरला आहे!!! बाई? कांहीं तरी विचार करून बोल?"

ह्यावेळीं **ब्रिटानिया** फिक्की पडली! ती स्तब्ध उभी राहिली. तिनें प्रारंभापासून आजपर्यंतच्या राज बंधनाचें अथेति मनन केलें. ती मनच्या मनांत बडबडूं लागली. मत्सर भरित—वैर—बुद्धीनें **हिंद** देवीला एखादा जबर ठोमणा मारण्यास तिला कांहीं सुचेना. कारण, ती महाधीर आणि

प्रपंचवीर होती; ह्यामुळें तिनें उद्धत साहसिकपणा केला नाहीं. तरी स्पष्टवक्तृचाची आढ्यता आणून कपट विजय मिळविण्याचा तिनें प्रयत्न चालविला. ती कांहीं फसणारी नव्हती! असो, तेव्हांपासून तिनें हिंदचें मन दुखूं नये, अशा युक्तीनें आपलें आचरण ठेविलें.

याप्रमाणें त्यांचें संभाषण ऐकून स्वदेशाहित स्तब्ध झाला. आणि याचा शेवट कोणत्या प्रकारचा होतो? ह्या विचारांत त्याचें मन गर्क झालें! त्या दोघींचीही कोटी प्रतिकोटी लढविण्याची युक्ति, स्वभाव वृत्तीला संकोचित करणें; प्रसंगाप्रमाणें रंग बेरंग दर्शन होणें, अत्यंत साहसानें व निर्भय चित्तानें परस्परांच्या चुका दाखविणें, झणकाऱ्यानें जाणें, इच्छा नसतां प्रश्नाचीं उत्तरें देणें, त्यांतच आपला स्वार्थसाधिला पाहिजे, एतदर्थ संकोचित स्थितीनें मौन धरणें; इ० प्रकार पाहून आतां ह्यांत खरें काय निघतें? याचा विचार करीत तो, जडभरतासारखा जेथच्या तेथें तटस्थ उभा राहिला होता.

"हिंद भगिनी! मी तुझें कांहींच चांगलें केलें नाहीं?" नम्र परंतु मोठ्या आवाजानें ब्रिटानिया ह्मणाली:—"अग! काय ह्मणत्येस हें? लढाईच्या वादळांनीं जेव्हां अष्ट दिशा घेरिल्या होत्या, आणि आतां तीं पतन पावतील, इतक्यांत कोसळून पडतील! असें वाटत होतें; तेव्हां मी तुझ्याकरितां शांतिवाचक शब्दांनीं जिकडे तिकडे गाजवून सोडिलें नाहीं? तुझ्याबालकांस, मीं शेंकडों धर्मांतून वांटिल त्या धर्म मार्गानें चालण्याची मोकळीक दिली नाहीं? ज्या धर्माकरितां यूरोप,

आशिया, व अमेरिका, अशा मोठ मोठ्या खंडांत हजारों आणि लाखों लोक, अकालीं मारले गेले; कितीएक पीडित झाले; कितीएक देश बहिष्कृत झाले; अनेक प्रकारांनीं हानी झाली; राजमेध झाले; आणि राजांना राज पदाचा त्याग करून जेव्हां देशांतर करावें लागलें; तेव्हां कोठें धर्मस्वतंत्रता मिळाली! तो धर्म तुझे पुत्र यथेच्छ पाळीत आहेत. मी, तुझे राजे, राणे, आणि नबाब ह्यांस वचन दिल्याप्रमाणें (हाय! हाय!!! मी तें वचन कशा चांगल्या रीतीनें पाळीत आहें? आतां जरी त्यांतील एखाद दुसऱ्या बाबतींत मी त्यांच्या हक्कांवर थप्पड मारिली, तरी त्यांत काय आहे?) इमानानें त्यांचे वाजवी हक्क आणि मान मरातबं राखिला नाहीं काय? तुझे पुत्र विद्याहीन होते, त्यांना ज्ञानी करण्याकरितां शाळा, पाठशाळा, सर्व-विद्योत्तेजकालयें आणि कलाकौशल्य स्थानें, स्थापन केलींना? मी तुझ्या देशाचें कल्याण करण्याकरितां, राजबंधन आणि अदल धोरे दिले! ज्या जुलमी कायद्यानें आणि नष्ट राज-बंधनानें तूं निकृष्टावस्थेस पोहोंचली होतीस, त्या खाष्ट स्थितींतून काढून अतिश्रेष्ट पदवीस मी तुला पोहोंचवीली नाहीं? मी तुझ्या पुत्रांस वर्तमान पत्रांची मुक्तता—ज्या अमूल्य—अतुल्य हक्काकरितां प्रत्येक प्रजा अटाट श्रम करीत आहे, आणि हेंही तुला माहीत आहे कीं, त्याविषयीं ती नाउमेद झाली असून मी, ती स्वतंत्रता तुला दिली नाहीं? (आतां आलिकडे ती काढून घेतली आहे, ती म्हणजे शहाणपणानें घेतली आहे, असें नाहीं; परंतु केवळ अति अविवेक आणि अघटित कर्म

करून जरी घेतली आहे; तरी ती माझ्या ध्यानांतून गेली आहे, असें नाहीं!) माझ्या जय ध्वजाखालीं व्यापार आणि उद्योग ह्यांची वृद्धि झालीना? तुझे जे मोठे शाप—साप, ठग, सती, बाल-हत्या, गर्भपात आणि त्यांचेच भाउबंद इतर दुष्ट रिवाज होते; त्यांचा मी अटकाव केला नाहीं? एका प्रांतांतून दुसऱ्या प्रांतांत जातांना हजारों प्रकारचीं दुःखें नडत; संशय आणिं भय सर्वत्र ऑ पसरून रहात आणि जिंदगीच्या सलामतीची आशा क्वचितच राखिली जाई; त्या दुःखस्थितींतून मी तुला मुक्त नाहीं केलें? आतां माझ्या जय ध्वजा खालीं **बदरिकेदारा** पासून **सेतूबंधरामेश्वरा**पर्यंत वाटेल तर राज रस्त्यानें, किंवा जंगलांतून काठीस सोनें बांधून जावें! पंण त्याला कोणी विचारणारा आहे? यदाकदाचित् कोणी दंगे खोर, पेंढार किंवा वाटमारे, प्रजेला पिडा देतील तर त्यांचा एकदम बंदो-बस्त नाहीं होत? आणि त्यांना मीं योग्य शिक्षा नाहीं देत? पूर्वापार जुलूम सर्वांस कांपवीत होता; पण तो आतां कोठें आहे? **मोंगली** राज्यांत जो जुलूम गुजरे, जबरदस्तीनें जें दुःख भोगावें लागे आणि **मराठे** आज या गांवीं तर उद्यां त्या गांवीं, लूटफाट करीत; तें सारें आतां कोठें आहे? **हिंद** भगिनी! हे माझे उपकार लहान सहान नव्हत! अग! तूं शांतमनानें विचार कर! जेव्हां तूं शोक आणि भय ह्यांनीं थर थर परिकंपित होत होतीस; आणि वारंवार तुझ्या नशि-बास शाप देत होतीस; तेव्हां त्यांतून तुला कोणी मुक्त केलें? तुझे पुत्र ह्मणत नाहींत काय? कीं, "माझ्या राज्यांत आमची

खूप चैन आहे!" वाघ आणि बकरीं एक जागीं पाणी पितात ना? पण तूंच सांग? त्यांना कोणत्याही प्रकारचें कधीं तरी भय आहे काय? माझ्या राज्यांत जो जो पहावा, तो तो आपापल्या नशिबाप्रमाणें समृद्धिचा स्वेच्छ उपभोग घेऊन कसा खुल्ला विराजमान होत आहे?"

"वाई? हें तूं कोणत्या उद्देशानें केलेंस?" महादेवी हिंद फार आढ्यतेनें म्हणाली:—"तूं, जे हे सर्व उपकार केले म्हणून म्हणतेस, ते कोणत्या हेतूनें? आणि कोणत्या प्रकारांनीं केलेस? मला हे सारे ढंग समजतात! त्यांत तूं मला व्यर्थ भूल चारूं नकोस. अग? ह्या अवघ्या कर्मांत तुझा जसा कांहीं स्वार्थ नव्हताच; असें दाखविण्याकरितां किती लटपटपंची चालविली आहेस? ती मला समजणार नाहीं; किंवा समजत नाहीं असा का तुझा समज आहे? अशा ठग विद्येनें तुला कोणता लाभ होणार असेल, तो देव जाणें! माझ्या पुत्रांवर तूं जे विश्रांतिचे आशीर्वाद लोटिलेस ते इतक्याच करितां कीं, माझ्या मुलांच्या उद्योगाचीं मधुर फलें तुझ्या मुलांनीं स्वाहा करावींत! अग? संकल्प-विकल्पाचरण-विरहित ब्राह्मधर्म प्रवर्तवून तो आणखी सतेज होऊं दिलास; आणि त्याला तूंच स्वेच्छानुसार पाळिलास. त्यांत तुझ्या अंतरंग प्रीतिहून तुझी स्वार्थवृत्ति विशेष आहे. हें स्पष्ट दिसत नाहीं काय? नाहीं तर तूं प्रवृत्तिंत रहाणारी, निरंतर धर्मार्थ मथन करणारी, आणि धर्माभिमान दाखविणारी हें खरें. पण बाई? धर्मवृद्धिचे खरे उपाय न योजितां, माझ्या

मुलांलेंकरांस स्वच्छंद वागूं देण्यांत कुशल कौशल्य नाहीं! मीं तुला विचारित्यें ब्रिटानिया! तुझ्या स्वतःच्या धर्मावर तुझा विश्वास आहे? त्यावर तुझा मनःपूर्वक माव किंवा भरंवसा आहे का? नाहीं! ज्ञानाची वृद्धि नाहीं, आणि सज्ञान निवृत्तिच्या भोक्त्याला योग्य सत्वगुण प्रधान नाहीं!! तो निर्माल्य होय!!! अग? त्याची अंतरशुद्धि कोठें आहे? अशाच योग्य कारणांमुळें तूं संकोचित झालीस. आणि अंकुशित राहणें तुला भागच पडलें, तेथें तूं करशील काय? जेथें इलाज चालण्याजोगा नाहीं; तेथें असेंच व्हावयाचें! त्यांच्या धर्मा आड येण्याची तुला सवडच राहिली नाहीं. इतक्याच करितां तूं असें केलेंस! इतक्याच करितां तुझी भ्रम भरित सतेजता प्रकाशित होऊन राहिली आहे; असें लोकांस दिसतें! आणि तूं मोठेपणाचा मान मिळवित्ये आहेस, तो देखील इतक्याच कारणामुळें. नाहींतर तुला कोण विचारितें असतें? आतां तूं धर्मसंबंधांत आड आली नाहींस; ह्याचें दुसरें खरें कारण हें आहे. धर्मसंबंधांत हात घालण्याचा यथायोग्य परिणाम तुला चांगला माहीत आहे; आणि थोड्याच लोकांविरुद्ध कां होईना! पण त्यां विरुद्ध देखील तुझी अडग ढाल टिकावून धरण्यास तूं असमर्थ आहेस! ह्याच कारणानें वैमनस्याचे प्रखर भडके फार लौकर फैलावतात. एतदर्थ तूं मौनवृत्ति धरून राहिली आहेस. तूं वारंवार ह्मणत असत्येस "मीं धार, ह्मैसूर आणि ग्वालहेर हीं राज्यें परत दिलीं." परंतु तुला चांगलें माहीत होतें कीं, त्या पुत्रांचीं मनें त्यांच्या मातोश्री कडून कधींही ढळलीं नाहींत,

व ढळावयाचींही नाहींत! त्यांची आपल्या आर्यजननी वरील श्रद्धाभक्ति बिलकुल हालावयाची नाहीं!! नाहीं तर तूं, तीं राज्यें घशांत उतरण्यास एका क्षणाचा विलंब लाविला नसतास! तूं खरेंच सांग? अशीं राज्यें माघारीं दिलीं ह्मणजे इतर राजकुमारांस असें वाटावें कीं, "आपली जिंदगी सलामतींत व राज्य समाधानींत आहे" अशी तुझी समजूत होती कीं, नाहीं? परंतु सूक्ष्म विचारकरून जर पाहिलें तर हीं राज्यें केवळ तुझ्या शूरवीर शिपायांच्या बेयोनेटावर लटकत आहेत.! बाई! त्यांच्या बादशाहयतीची सलामती आळशीपणांत, असावधतेंत आणि अचंचल वृत्तींत गर्क झाली आहे. त्यांना जरासें हां कीं, चूं करूंदे; किंवा तुझा अनादर करूंदे; ह्मणजे त्यांची भाग्यदशा फिरलीच!! अथवा तुझ्या लहरी मनांत जर आलें कीं, 'हा राजकुमार राज्य कारभार हांकण्यास योग्य नाहीं; किंवा ह्या राजपुत्रास राजसिंहासनाभिषिक्त होऊं द्यायचेंच नाहीं, तर तुला तसें करण्यास बिलकुल विलंब लागायचा नाहीं! किंवा पूर्वी त्यांना काय काय वचनें दिलीं आहेत? त्यांच्या बाप आजांशीं आपल्या वाडवडिलांचे अथवा आपले, काय करार मदार झाले आहेत? हेंही तुझ्या मनांत यावयाचें नाहीं. आणि यदाकदाचित् आलें तर तूं इतकी कावेबाज आहेस कीं, त्यांतला लवलेश देखील बाहेर दाखवावयाची नाहींस!!! माझ्या मुलांत ज्ञानाची वृद्धि व्हावी ह्मणून तूं, शाळा आणि पाठशाळा स्थापन केल्यास हें खरें. पण त्यांत देखील तूं आपला गुप्त हेतु साधण्यास कमी केलें

नाहींस. प्रत्यक्ष माझ्या पोटचीं मुलें माझा स्नेह विसरून जावीं; तीं तुझ्यांत एकत्र व्हावीं; त्यांनीं तुझें ऐक्य स्वरूप धारण करावें; त्यांनीं तुलाच पूज्यप्रमाण मानावी; अग! तुझेंच स्तवन गान करावें; नेहमीं "विजयदेवी **ब्रिटानियेचें** राज्य अमर राहो!" असा त्यांचा घोष चाललेला असावा*

* ह्या ठिकाणीं आह्मांस विशेष पाल्हाळ करण्याचें जरी कारण नाहीं तरी मराठी भाषेंत सर्व प्रसिद्ध असलेली ब्रिटन राणीविषयीं "देवास प्रार्थना" देऊन पुढें व्हावें. ह्मणजे आपली स्वराजनिष्ठा सर्वांस उघड दिसून दोन्हीं कार्यभाग होतील!

अभंग.

इंग्लददेशांत लंदन राजधानी ॥ तेथील सिंहासनीं विराजीत ॥ १ ॥
तीच आहे आम्हां समस्तांची राणी ॥ महत्वाची खाणी **ब्रिटानिया** ॥ २ ॥
देवा त्वांच तिला दिलें सिंहासन ॥ त्याचा अभिमान तुला असे ॥ ३ ॥
देवराया तुझे धरितों चरण ॥ राणिचें रक्षण करीं सदा ॥ ४ ॥
माय बाप तूंचि आहेस सर्वांसी ॥ सांभाळीं राणिसीं कृपादृष्टी ॥ ५ ॥
दीर्घ काळ राहो आमची हे राणी ॥ आम्हांलाशिराणी हेच आहे ॥ ६ ॥
माता सुखी तरी बाळकासी सुख ॥ नाहींतरी दुःख सर्वकाळ ॥ ७ ॥
आमच्या राणीचें यश विस्तारावें ॥ विजयी करावें तिला देवा ॥ ८ ॥
आह्मांवर तिचें राज्य असो सदा ॥ तिच्या राज्य पदा ढळ नसो ॥ ९ ॥
पृथ्वीवरी तिचें राज्य चिरकाळ ॥ राहिल्या सकळ सुख आह्मां ॥ १० ॥
लोक सुखासाठीं जे केले कायदे ॥ रक्षितां फायदे होती आह्मां ॥ ११ ॥
तिनें ते आमचे कायदे रक्षावे ॥ जनां सुख द्यावें हेंच मागों ॥ १२ ॥
आम्हीं सर्व लोक तिचीं गाऊं गाणीं ॥ ऐशी आमुची राणी कीर्ति करो ॥ १३ ॥
देवा विश्वंभरा विनवितों तुला ॥ आमच्या राणीला सांभाळावें ॥ १४ ॥
शत्रूच्या सेनेची होवो दाणादाणी ॥ **ब्रिटानिया** राणी जय पावो ॥ १५ ॥
मोडावीं शत्रूचीं सर्व कारस्थानें ॥ राणीचीं संस्थानें सांभाळावीं ॥ १६ ॥
राणीच्या शत्रूचे मनांतील बेत ॥ कधीं न जाऊत सिद्धीस ते ॥ १७ ॥

त्यांनीं माझी निंदा करावी; सदैव माझ्या दोषवर्णनांत मग्न असावें; त्यांना माझें चांगलें असें कांहींच दिसूं नये. एक-सारखी त्यांनीं मला वाईट मानावी; असा तुझा मानसिक हेतू तर खराच? परंतु मलमय नेत्रांनीं पहातांच, ह्यांतील कांहींच प्रकार तुझ्या दृष्टीस पडेना! तुला उलटेंच दिसूं लागलें. त्यासरसें तुझें वस्तान बिघडलें! हां हां ह्मणतां ज्ञानवृद्धीचें द्वार खाडकन् बंद करून तूं रोष दाखवूं लागलीस!! बरें इत-केंच करून तूं थांबलीस? नाहीं! त्यांविषयीं हवींतशीं निंद्य वाक्यें उच्चारिलींस!!! असें खराब काम करायला तुला कसें

देवा आह्मां आहे तुझाचि भरंवसा ॥ तुजवरी आशा ठेवीतसों ॥ १८ ॥
हे प्रभो उशीर लावूं नको क्षण ॥ करीं संरक्षण आमचें तूं ॥ १९ ॥
सर्व शक्ति तूंच तूंच वा सर्वज्ञ ॥ तूजपुढें अज्ञ आह्मी सर्व ॥ २० ॥
आहेस दयाळू उदारांचा राणा ॥ करावी करुणा आह्मांवरी ॥ २१ ॥

॥ श्लोक ॥

सौख्याची पूर्ण खाणी चिरसमय असो आमची मुख्यराणी ॥
आह्मांला हे शिराणी ह्मणुनि निजमुखें लोक गाऊत गाणीं ॥
जीचीं सवत्र ठाणीं सबळहि बघुनी जोडिती शत्रु पाणी ॥
ब्रिटानीया निशाणी धरुनि चहुंकड चालती शुद्ध नाणीं ॥ १ ॥

इंग्लिश चालीवर कविता.

१ देवा भगवान्। **ब्रिटानिया** भाग्यवान्। राज्ञी असो!
तिची सन्मान्यता। आयुष्य व सत्ता। वाढुंदे सर्वदा। प्रभू देवा.
२ तूं उत्कृष्ट दान। व बहुत मान। राज्ञिला द.
सव शत्रूंवर। तिचा जय कर। आणि जन्मभर। तिला राख.
३ ब्रिटन राज्ञीला। दयाळू ईश्वरा। पाळीत जा.
तिला तूं भक्तींत। भयांत प्रीतींत। व सत्य ज्ञानांत। स्थिर कर.

पुरवलें? सत्य आणि प्रामाणिकपणा हे व्यापारवृद्धीचे मुख्य आधार स्तंभ आहेत—व्यापार तुझा अंतरात्माच—त्यामुळेंच तूं इतकी जगत्प्रसिद्धीस आलीस! (एरवीं तुझी गणना कोण करीत होतें!) आपला व्यापार चांगला चालावा; आपणास चार पैसे जास्त मिळावे आणि आपली चार चौघांत मानमान्यता व्हावी; इतक्याकरितां—मनांत नसलें तरी—न्यायाचा, प्रामाणिकपणाचा आणि सत्यतेचा डौल घातलाच पाहिजे. ह्यांतील एक देखील तूं मजकरितां ह्मणून कांहीं केलें नाहींस! आपल्या फायद्याकरितां साऱ्या गोष्टी करून माझ्या कल्याणाकरितां अमुक केलें, आणि तमुक केलें, असें जर तूं सांगूं लागलीस तर तें मी जुमानीन, असें तुला वाटतें? माझ्या मुलांचें तुला जर बरें करायचें होतें, तर मुळीं अशा नियमांची आवश्यकताच नव्हती! वर्तमानपत्रांस कोठें मुक्तता आहे? फुकटच्या तोंडानें अच्यावच्या बोलायला देखील तुला कशी शरम वाटत नाहीं, कोण जाणें! तुझ्या बेपर्वा, चिरडखोर, अवगुणी पुत्रांनीं तुला नाहीं नाहीं तें सांगितलें. आणि ती मोकळीक तूं माझ्या मुलांच्या हातून हिरावून घेतलीस! तुझ्या नांवाला शोभा देणारी वर्तमानपत्रांची स्वतंत्रता काढून घेतांना तुझ्या मनास कांहींच का ग वाटलें नाहीं? आणि नाक वर करून मीं यॅंव केलें, त्यॅंव केलें ह्मणून आणखीं बोलायला धांवत्येस? खरोखर जडत्व आपलें; आणि बोल लावूं पहात्येस दुसऱ्यास? ज्या सद्गुणानें **मेकॉले** व **मेटकॉफ** ह्यांची कीर्ति अमर होऊन राहिली आहे. जे आपली दिव्य लीला दाखवून गर्वानें

विश्रांति घेत पडले आहेत! त्यांनीं दिलेली अमूल्य—अतुल्य समृद्धि तूं आपल्या खराब मुलांच्या उपदेशामुळें केव्हांच निःसत्व बहाण्यानें काढून घेतलीस!! मला वाटतें, सत्य आणि वाजवी फिर्याद करणाऱ्या वर्तमातपत्रांस केवळ स्थिति-भ्रष्ट करण्यासाठीं अथवा स्वतंत्रतेचें नाम नष्ट करण्याकरितांच तूं, वर्तमानपत्रांच्या कपाळावर हा असह्य घाव घातला अस-शील!!! व्यापारवृद्धि, उद्योग व कलाकौशल्य ह्यांची अवा-दानी—समृद्धि—कुरणें, हें देखील तुझें स्पष्ट स्वार्थि कर्म आहे! कारण, स्वराज्य सबल करण्याकरितां आणि तें सतेज राखण्याकरितां व्यापार आणि व्यवस्था हीं ठेविलींच पाहिजेत. तीं अत्यावश्यक आहेतच. अग? हीं कर्में प्रत्येक प्रांताच्या राजा-चीं आहेत. ह्यामुळेंच वाणी लोक समृद्धिवृद्धि, मानमरातब, आणि विजय समजतात! पण बाई? एक महापराक्रमी योद्धा एका शतकांत जी प्राप्ति करील, ती वाण्याची औलाद एका दशकांत करूं शकेल!! मग तुझ्यासारख्या हुषार बायकोचे पुत्र काय करितील आणि काय नाहीं! हें कोणी सांगावें? स्वतःच्या समृद्धीचे व मोठेपणाच्या वृद्धीचे उपाय आस्थापूर्वक करण्यास कोणीच माघार घेणार नाहीं; हें उघडच आहे. मग तूंच मला सांग? सर्व चक्रवर्ती राजांत तूं जें समृद्धिसुखदर्शन अधिक घेत आहेस; आणि अति सुखकर वैभव प्राप्त करीत आहेस; तें कां? आणि कोणाच्या प्रतापानें? तुझ्या विनय वचनांची मी मुळींच स्पृहा बाळगीत नाहीं; मी विवकी आहें, आणि सत्य बोलण्यास विजय समजतें.

ह्मणून तुला विचारत्यें, व्यापारांत* सुखाचा विशेष लाभ कोण संपादन करीत आहे? याचा विचार कर! कोणत्या देशाच्या व्यापारास जास्त उत्तेजन मिळतें? आर्यावर्ताच्या कीं, इंग्लिश स्थानच्या? माझे पुत्र कशा दुर्दशेंत येत चालले आहेत?—प्रभु त्यांचें रक्षण करो!—त्यांचा विचार करण्यापूर्वी तुझे म्यांचेस्टरच्या प्रवृत्तींत राहणारे पुत्र, कशीं प्रतापि कर्में आदरून विजयी झाले आहेत? हें तूं कोठें पहात आहेस? बरें, इतकेंही असून ते सकल प्रजावर्गांत तिरस्कारी झाले असतांना त्यांना उत्तेजन देणारी जी तूं, ती तूंही तिरस्कारास पात्र ठरत नाहींस काय? तूं मांचस्टरचा लाभ करूं गेलीस, ह्मणून हा माझा देश निकृष्टावस्थेस पोहोंचला! कांहीं होवो, परंतु व्यापारांत माझ्या लाभाहून तुझ्या लाभाकडे विशेष पहाण्यांत येतें! हिंदुस्थानच्या कारागिरांच्या कल्याणाहून म्यांचेस्टरकरितां विशेष दया प्रदर्शित होते!! ठग, व फांसेखोर यांच्या नाशाविषयीं मी तुझी ऋणी आहें; परंतु दुसऱ्या तीन शापांविषयीं थोडक्यांत सागत्यें. तें चांगलें ध्यानांत ठेव. त्यांत कितीएक वाईट झालें आहे; आणि कितीएक भाग सुधारावयाचा आहे. बालहत्या हा, नव्या

* हिंदुस्थानांतून कापड इकडे यावयास लागल्यामुळें, आपल्या व्यापारास धक्का बसला; अशा समजुतीनें इंग्लंडांतील लोकांनीं तेथील सरकारास असा अर्ज केला कीं, "हिंदुस्थानांत गिरणींचीं यंत्र पाठवूं नयेत व तीं, त्या देशीं गेलीं तरी उपयोगांत आणूं देऊं नयेत! अशा प्रकारच्या मनाईचें एक कलम पार्लमेंटाच्या नव्या आक्टांत घुसडावें!"

आबर्स राइस अँड प्रोग्रेस आफ ब्री० पावर इन इंडिया. व्हा० २ पृष्ट १३६

उत्पन्न होणाऱ्या प्रजेला चुरडून टाकणारा आणि कितीएक विरला उत्पन्न करणाऱ्यांनीं उत्पन्न केलेल्यांचा नाश करणारा, असा अतीशय दुःखदायक गुन्हा अहे; परंतु त्या गुन्ह्यापासून कोणालाही आजवर अशी शिक्षा झाली नसेल कीं, ती पाहून अखिल प्रजेला धाक बसावा! आणि तिनें कांपत असावें!! कोना कोंपऱ्यांतून बालहत्याही होतच आहे! आपल्या कुळाचें महत्व सांभाळण्याकरितां राजे रजवाड्यांत फार सुकुमार लहान मुलींची "दूध-पिती*" करण्यांत येते! इतक्याकरितां तुझा जर' आपल्या मानाचें संरक्षण व्हावें, अशी आशा असेल तर तूं सक्त उपाय योजिले पाहिजेस. "गर्भपात प्रतिबंध केला" असें तूं ह्मणावेंस इतकेंच! पण तो होत नाहीं, अशी तुजकडे कोणत्याही प्रकारची शाबिदी आहे का? नाहीं! फार लहान लहान बालिका, माझ्या रुढीच्या कैदखान्यांत पडून आणि माझे अक्कलशून्य पुत्रांच्या अंध परंपरा मंडलबंधना-मुळें बालविधवा होत आहेत; कितीएक मदनाधीन होऊन अनीतिमार्गानें गर्भवती होत आहेत; पुढें स्वलज्जारक्षणार्थ घोर पातक करून पीडा पावत आहेत; तत्प्रतिबंधार्थ तूं कोणते कायदे ठरविले आहेस? कीं, ज्यांमुळें अशीं हृदयभेदक कर्में मूळासंह निघून जावींत! पुनर्लग्नाचा कायदा असता

* रजपूत लोकांत अशी चाल आहे कीं, मुलगी जन्मास आल्यानंतर पुढें तिला जीं दुःखें भोगावीं लागतात; आणि तत्प्रीत्यर्थ तिच्या नातलगांस जीं संकटें येण्याचा संभव असतो; तीं न यावीं, ह्मणून त्या अर्भक मुलीस दुधांत बुचकळून किंवा अन्यरीतीनें ठार मारितात! आणि त्या घोर कर्मास त्या प्रांतांत "दूध-पिती" असें ह्मणतात.

तर—बलात्कारानें स्त्रियांना नरकयातनामार्गांतून मुक्त करण्याचा कायदा असता तर—तो सुखकर, यशस्वी, आशीर्वादात्मक आणि स्तुतिपात्र मानिला जाता. पण तुझे काउन्सिलर पडले रिकामे! ते केवळ नवे नवे, निरर्थक, प्रजापीडक, प्रजास्वतंत्रताधिकार लुटणारे असे कायदे प्रवर्तवितात! ते, ह्या भानगडींतून मोकळे होऊन जेव्हां प्रजेच्या अब्रूचें संरक्षण करणारे, प्रजामंडलसुखदायी, प्रजामहत्त्ववृद्धिकर आणि अनीतिमार्गप्रतिबंधक कायदे घडून आशीर्वाद घेतील; तेव्हांना साऱ्या कथा? आतां तूं सतीविषयीं काय ह्मणत्येस? आर्य प्रजेचा बुलंद दर्जा आणि शौर्यता-संस्कार-विधि, जो आह्मांत वंशपरंपरेनें चालत आला आहे. तो सती होय! प्रिय **ब्रिटानिया!** सतीही प्रीतीच्या अमर झऱ्याची एक खरी खुबी आहे; आणि नाश पावलेली प्रीति स्वर्गद्वारपर्यंत किती महत्त्वासह जाते? ह्याची प्रौढतेला परिशोभित करणारी सन्मानदायक निशाणी होय! बाई? कालांतर झालें, त्यामुळें मूळ नियम सुटला; त्यांत फारच अंतर पडलें! आणि जुलमाचें मिश्रण होऊन सतीत्व निंदा पावलें! पूर्वापार खऱ्या प्रेमार्थ मनुष्यहोम होत असत! आहे का स्मरणांत? परंतु त्यांत तूं जसें पाहिलेंस, तसें जुलमाच्या आधीन व्हावें लागत नव्हतें! सतीचा अतीशय महिमा होता. तिला स्वर्गलोकीं दिव्यासन मिळतें, आणि प्रभु तिला आपल्या चरणारविंदासमीप ठेवितो; अशी लोकांची पक्की समजूत होती. आर्यांचा जेव्हां सतेज काल होता तेव्हां पवित्रपणानें सती, रागीविरागी होई. स्वशक्ति

दाखवून विवेकाचरणानें वागे. आणि स्वच्छ मनानें व परमोत्साहानें परमप्रिय स्वप्राणाचें बलिदान करीत असे! तुला काय सांगूं? किंचित् असत्य वहिमानें सतीत्वाला लांछन लागे! सती ही—लग्न समयीं पवित्र ग्रंथीनें जें दांपत्य जोडिलें असतें, तें खरें आहे; किंवा नाहीं?—एक आत्मा दुसऱ्या आत्म्याबरोबर जें ऐक्य करितो, तें खरें आहे; किंवा नाहीं?—ती कधीं मानानें कमी आहे; किंवा नाहीं?—अन्य अभिलाष मनांत धरणारी आहे; किंवा नाहीं?—ती त्रिकाळ वेगळी राहणारी आहे; किंवा नाहीं?—ह्यांच्या परीक्षेची एक अनुपम कसोटी आहे. सोन्याला जसें कसोटीवर घांसून तें किती नंबरी आहे? हें प्रमाण सिद्ध करितां येतें; तसें सतीस्वरूप दर्शनानें सर्व जगांत असें स्पष्ट होत असे कीं, ही बाह्यतः जरी भिन्नस्वरूप दिसत आहे, तरी हिनें एक स्वरूपानें संसारविलास भोगिले; आणि एक स्वरूपांतून वेगळें होण्याचें जरी महान भय होतें; तरी अखंड आनंद भोगून कधीं काळीं देखील ही निराळी राहिली नाहीं. शेवटीं प्रभुधामांतही एक स्वरूपानें आली! सारांश, ती विरक्त नव्हती; विरक्त झाली नाहीं आणि विरक्त होण्याच्या मिथ्या भयास तिनें दूर घालविलें!!! सती, सत्य प्रेम, आणि स्वच्छ निर्मल गुणकर्माचा स्पष्ट दृष्टांत होय! ज्या प्रियकराशिवाय खऱ्या सतीचें क्षणभर देखील चालत नाहीं. जो तिचा प्राणात्मा, सौभाग्यशृंगार, अंतरस्नेही, जो लोहचुंबकाप्रमाणें मन हरण करणारा, सुखानें सुखी, दुःखानें दुःखी, जो जन्मांतरचा साथी त्यासह ती, परम पूज्य स्वर्गारोहण करण्यास

कां कांकूं करील? **ब्रिटानिया,** विषयरंगांत मत्त झालेली, असत्य मायेंत मोह पावलेली, दुःखरूप दुनियेंत रहाणारी, कोण प्रेमळ साध्वी स्त्री, निराधार स्थितींत वास्तव्य करून अनिश्चित काळाचें क्षणभंगूर सुख भोगणें दुर्लभ समजेल? आणि आपल्या प्रियाचेरोबर विश्वलीला पाहून झाल्यावर मनुष्यसृष्टीचा त्याग करून, दैवी सृष्टींत जगत्पित्या, परमोद्धारक, परमप्रभु, विश्वेश्वरासमक्ष सत्कीर्तीनें जाण्यांत कां आनंद मानणार नाहीं? **सीता, अहिल्या, द्रौपदी,** अशा सतींनीं परम प्रेमांत लीन होऊन परम प्रियकराकरितां परमप्रीय स्वप्राण समर्पिले! आहा!!! सुखदुःखांत निराळें रूप असून, ज्यांनीं एक स्वरूप शोभा आणिली; त्या सती निर्गुणब्रह्मसदनांत निवास करूं जात असतां; आपल्या अर्धांगास मागें कां राहूं देतील? आणि त्या आपली योगप्राप्त झालेली सर्वज्ञ स्थिती,—जी ह्या सृष्टीचें थोड्या समयाचें स्वरूप आहे,—गमावून थोडा वेळ तरी कां विरह सोशितील! असें सगुण निर्गुण परम पवित्र सतीस्वरूप, पूजनीय होय! सतीसंस्कार, आर्यावर्ताची प्रौढी प्रगट करणारें आणि वीरतत्व दर्शविणारें, कीर्तिमंत व कीर्तनीय महदद्भुत कर्म होय!! अशा पवित्र व एक सत्य स्वरूपाला सदैव नमन असो!!! रु—कपड्याच्या राणीला ह्या सर्व गोष्टी निरर्थक आणि केवळ बडबडी प्रमाणें वाटतील; अशी मला भीति दिसते! ह्यामुळें सतीसंबंधानें इतर गोष्टींला आपण दुसरा वेळ घेऊं; आतां हा अत्यागत्याचा समय मी गमावूं इच्छित नाहीं. तूं द्रव्य, जमीन आणि जिंदगीची सलामती, ह्यांची मघां-

पासून काय गोष्ट लाविली आहेस*? माझ्या राज्यसुख-समयांत, जेव्हां प्रत्येक मनुष्याचा हात तलवारीच्या मुठीवर होता; जेव्हां प्रत्येक मनुष्यापाशीं त्याच्या मेंदूंत जशी अक्कल असेल, तशी दौलत असे; तेव्हां द्रव्याच्या नियमाप्रमाणें तें एकाच्या हातून दुसऱ्याच्या हातीं जात असे. हें तुला माहीत आहे? आतां तलवारीवर हात नाहीं, आणि कोणाकडे दौल-तही नाहीं! म्हणून त्याची सलामती!!! ओसाड घरावर कधीं दरवडा का पडला आहे? आणि ओसाड राज्यावर चढाई करून कोण येतें कशाला! परंतु आतां एका मगजांत जी सर्व दौलत भरली आहे, त्याविषयीं तुझें म्हणणें काय आहे! "दौलत आणि जिंदगीची सलामती आहे!" पण प्रजावर्ग कोठें सुखी आहे? तो तर काय खावें, काय प्यावें, काय हांतरावें, काय पांघरावें? ह्याची निरंतर ओरड करितो! **मोंगल** आणि **मराठे** ह्यांच्या जुलमाची गोष्ट त्वां बोलूं नयेस. त्यांची लहान सहान कत्तल आणि लुटालूट ह्यांची बिशाद कसली! अशा जुलमांतून पन्नास मैल दूर गेलें, म्हणजे जिंदगीच्या सलामतीची जामिनगिरी मिळावयास विलंब लागत नव्हता; पण जगतांचें राज्य करणाऱ्या "**शीतलछत्रा**" खालीं केवढा जुलूम आहे! तो **बदरिकेदार** आणि **रामनाथ** ह्यांत जसा आहे, तसाच **जगन्नाथ** आणि **जेकोबाबादेंत** सर्व व्यापक भून रखा पसरला

---

* दशसमृद्धि करून त्यांतूनच आपला फायदा करून घेण्याची उत्सुकता असल्यामुळें, गेल्या तेवीस वर्षांतील आमची कारकीर्द; 'फारच त्रासदायक व अतीशय नाशकारक होत आली आहे. **एच. एम. हिंदमन.**

आहे! मग **मराठे** आणि **मोंगल** ह्यांच्या कथा तुला काय करावयाच्या? त्यांनीं हरण केलेलें द्रव्य, कोठें दुसऱ्या प्रातांत का जात होतें? आतां तशी लुटालुट नाहीं, व तितकें दुःख नाहीं; परंतु आड मार्गानें किती पैसा विदेशीं जात आहे*? का कोठें कमी आहेत? असंख्य मार्गांनीं अनर्गल द्रव्य जात आहे! माझ्या पूर्व कालाचें स्मरण करून, त्याला मी स्तुतिपात्र किंवा चांगला असें जरी समजत नाहीं; तरी तुझ्या कारकीर्दीत किती कमीपणा आला आहे? विचार कर! फार प्राचिन काळीं किती सौख्य भोगावयास मिळत असे? आतां तुझ्या पुत्रांहून माझ्या पुत्रांची किती अधम दशा आहे? आणि तूं इतर कसकसे आशीर्वादायोग्य उपकार केले आहेस? त्यांचें स्मरण झालें म्हणजे, मला अनुकंपा येत्ये!!! तेव्हां पैशाचा उपभोग यथा-काळीं होत नव्हता, आणि आतांशा चहेल तशी चैन भोगा-वयास सांपडत्ये; परंतु तूर्त कितीसे धनाढ्य पुरुष आहेत? बिचारे थप्पड मारून घेऊन तोंड तांबडें लाल करितात; त्यांवरच तुझी नजर आहेना? पण अंतरंग स्थितींत त्यांचें कोणत्या प्रकारचें वर्तन आहे? हें कोण जाणतें! प्राचिन राजे आणि बादशहा जुलमानें द्रव्य काढून घेत, आणि हल्लीं जुलूम होत नाहींत;

---

* सन १८ अ सालीं म्हणजे बंडाच्या आदले सालीं सरकाराकरितां हिंदुस्थानाच्या ह्याऱ्हांकडून २३००००००० रु. घेण्यांत आले. व सन १८८० ह्मणजे, बरीं नंतर २४ वर्षांनीं ६८००००००० रु. हिंदुस्थाना-कडून सरकारनें घेतले!!! कारण?

एच. एम. हिंदमन.

असें म्हणणें म्हणजे, बहुतांशीं योग्यच होय!!! तुला बोलायला कोण प्रतिबंध करील! बलवानाच्या तोंडावर कोण बोलतें? परंतु बाई? कायद्याला मध्यस्थ ठेवून फार सक्तीनें कर वगैरे अनेक प्रकारांनीं एकसारखें द्रव्य हरण होत आहे, ही गोष्ट कांहीं लहान सहान नाहीं!—"

"गिझनीचा महमद आणि शहाबुद्दीन घोरी यांची आठवण कर" महादेवीला बोलत असतांना, मध्येंच थांबवून ब्रिटानिया एकदम जोरानें म्हणाली:—"त्यांनीं आणि नादिरशहानें अतोनात द्रव्य हरण करून घोर संहार केला आहे. त्याविषयीं विचार करून तरी बोल! वेळोवेळीं तुजवर जे महान महान समर्थ योद्धे तुटून पडले, त्यांनीं कोटींनीं नव्हे, पण अब्जांनीं किंवा खरोखरच असंख्य द्रव्य हरण केलें! तें तूं कसें विसरत्येस! तुझ्या अशा दीन हीन अस्वस्थेंत, मी केवळ समस्त प्रजेच्या लाभाकरितां, शक्ति प्रवर्तवून निर्भय केलेंना? आणि विशेष सत्ताप्रताप नाहीं दाखविला? नित्य युद्धदान, नित्य संहार, प्रत्यहीं देशांतील दौलतीचें जोरानें बाहेर जाणें, आणि नेहमीं परदेशियांकडून भीतीनें संकोचित असणें; ही स्थिति जाऊन माझ्या राज्यांत तूं अधिक सुख भोगित नाहींस काय? अशा आनंद स्थितींत प्रयासाशिवाय जें मिळेल, त्यावरच तूं तृप्त राहिलें पाहिजेस! तें सारें एकीकडे ठेवून दुःख करीत अतृप्त राहत्येस, ह्याला कोणाचा दोष समजावा! तुझ्या वडिलवार्ता आणि प्राचिन समय स्मरण करून तूं मला दूषित कर! पण तुझ्या प्राचिन प्रतापि राज्यांशीं तूलना करूं लागल्यास

माझें राज्य आणि व्यवस्थाबंधन केवळ "रामराज्या" सारखें सर्वोत्तम आहे! असें झटलें तरी चालेल!—"

"चूप्प, गप्प रहा; उगीच तोंडाची घाण दवडून अशी खोटी पतराज मिरवूं नकोस" **महादेवी** स्वमुखकमलाचा रंग बदलून क्रोधानें झणाली:—"तूं आतां तुझी चुक स्विकारीत नाहींस? खरें आहे! आतां तुला तुझे दोष दिसणार नाहींत; पण जेव्हां निरंतरचें दुःख भोगूं लागशील, तेव्हां माझी आठवण होईल कीं, **हिंद** असें सांगत होती खरें:—पण माझी अशी इच्छा नाहीं!—**महमद, घोरी,** आणि **नादीर** ह्यांची लूट आणि घोर संहार ह्यांविषयीं बडबड लावून आणि **शिवाजी**च्या व्रात्यपणाबद्दल मिथ्या भाषण करून, तुझी शौर्यवान् शक्ति व दीर्घदर्शीपणा ह्यांविषयीं व्यर्थ वल्गना कां करित्येस? त्यांचा जुलूम आणि संहार दर्शविणें, ह्यांनीं कांहीं तुझा बचाव होत नाहीं! त्यासंबंधें तूं स्थितिभ्रष्ट होऊन अधमच ठरशील! (मी तर तुला उंच कुलांतील, महत्कर्माची, सद्गुणी! अशी मोजित्यें!) तूं, **गिझनी** व **घोरी**ची गुणकर्मास्थिति दर्शवून असें सिद्ध करूं पहात्ये आहेस काय? कीं, "त्यांहून मी कमी जुलूमगार आहें, झणून माझे दोष उच्चारूं नका!" तुझा हा विचार शुद्ध अंतरापासून उत्पन्न झाला असेल, असें मला कांहीं वाटत नाहीं! परंतु असें पहा, तुझ्या एका **लार्ड चान्सेलर**सम्मक्ष एक बलवान् गृहस्थ—पण तेजहीन—फांस घालणारा, खुनी, लुटारू, शांततेचा भंग करणारा झणून उभा करण्यांत आला; आणि तो स्वरक्षणार्थ असें सांगूं

लागला कीं, "हेन्सलोहीथवर पुष्कळ लुटारु लोक लूट करितात, शांततेचा भंग करितात, हजारों खून करितात, आणि ते माझ्याहून दसपट जुलमी आहेत; ह्मणून त्यांना प्रथम योग्य शिक्षा झाली पाहिजे; आणि मी तर त्यांहून पुष्कळ कमी जुलमी व वाटपाड्या आहें; एतदर्थ जोंपर्यंत त्यांना शिक्षा होणार नाहीं; तोंपर्यंत कोर्टहुजूर मला उभा करण्याचा काय-द्यास हक्क नाहीं!" हें त्याचें ह्मणणें वाजवी मानिलें जाईल? आणि ही त्याची तक्रार मान्य होईल? नाहीं! कधीं होणार नाहीं!! त्याच नियमानें तुझेंही हें बोलणें, अप्रमाण ठरतें. **मोंगल** आणि **मराठे** जुलूम करीत. त्यांविषयीं जसा तिर-स्कार आहे, तसाच तूंही गैरवाजवी वर्तन करित्येस ह्मणून तुजाविषयींही आहे. जें जसें असतें, तें तसें सांगतें. अशा विषयीं दुसऱ्याचा दाखला सांगणें, हें बोलून चालून शुद्ध धाडस! एखाद्यानें जुलूमगाराच्या आधीनतेंतून एखादें मनुष्य मुक्त करावें, नंतर त्यावर आपण स्वतःच जुलूम करावा; आणि तें त्या विरुद्ध वागूं लागलें, मग त्याला चापून सांगावें कीं, "पूर्व स्थितीची आठवण कर. त्याच्यापेक्षां तर आपण पुष्कळ चांगले आहों, आह्मांला आशीर्वाद द्यावयाचे सोडून बेत्या हें काय?" हें सांगणें कोणी तरी वाजवी ह्मणेल का? सह-वासानें शिकून सवरून प्रौढपणा प्राप्त करण्याची इच्छा सर्व धरितात. **ईश्वरी** नियमच असा आहे कीं, जो तो आपआपली स्थिति सुधारण्याविषयीं निरंतर मथन करीत असतो! पुष्कळ राज्यें दुःखानें निकृष्टावस्थेस आलीं आहेत. ह्मणून तीं

राज्यसत्तेंत प्रबळ होण्यास व मोठंपणा मिळविण्यास योग्य नाहींत; असें तुझ्याशिवाय कोण ह्मणेल? कितीएक राज्यें सफाई बुडालीं, पुन्हा उन्नतींत आलीं. जयी झालीं आणि शोभलीं आहेत. वाताहात झाली किंवा अन्नान्न दशा आली, तरी हक्क—वाजवी हक्क—गमावून त्यांनीं सेवक भावांत आनंदानें रहावें, असा तुझा बेत आहे वाटतें? वाः! खरेंच. असें असेल तर किती सोदेगिरीही! माझे वत्स, उद्धत व महेच्छ असून तुजकडे ते, प्रेमानें व सहनशीलतेनें वागले; तुझे असह्य व उद्धत प्रपंचांविरुद्ध त्यांनीं स्वच्छ सुघडता दर्शविली. आणि तुझ्या शत्रूंशीं लढून—जरी अंतरांत जळत पोळत होते तरी—जयनाद केला. तरी तूं ह्मणून त्यांना त्यांचे वाजवी हक्क दिले नाहींसच. तरीही ते तुला वंदितात!! अशा निर्मळ मनाचे, मोठ्या कुळांतील उच्चेच्छावृत्तिमहत्पुरुषांच्या प्रत्यक्ष तोंडावरच हलके शब्द उच्चारण्यास तुला कांहींच शरम वाटत नाहीं कशी? अग! कांहीं तरी भीड धर! फार दिवसांपूर्वी नेहमींच दुःख होतें, असें मानिलें तर आतां काय कमी आहे? अंदाधुंदीचा समय गेला, आणि प्रकाशमय आला; आतांही अंधकारामध्यें पडून रहावें? **मुसलमान** आणि **मराठे** द्रव्य हरण करून गेले, आणि तुझ्या कारकीर्दींत जात नाहींत! **क्लैव** आणि वारन **हेस्तिंग्स.** यांनीं काय थोडे का जुलमी पराक्रम केले? तूर्तच्या जगास ते किती बरें तेजहीन दिसतात? क्लैवच्या राजनीतीनें किती राजकुटुंबें धुळधाण झालीं? आणि किती मृत्यून्मुख झालीं? **ईस्ट इंडिया** कंपनीला तारण्याकरितां

हेस्टिंग्सानें किती कृष्ण कारस्थानें केलीं? त्यांचें स्मरण नाहीं वाटतें? चेतसिंगाविषयींचीं कृत्रिमकर्में लपालींच? आणि अयोध्येच्या बेगमांवर खोटा आरोप ठेवून थोडें का द्रव्य मिळविलेंस? तुझे आणि त्यांचे पराक्रम सर्व सारखेच आहेत. एकाच्या अविवेकी, घाणेरड्या कृष्णकर्मांची तऱ्हा निराळी, आणि दुसऱ्याच्या प्रपंच–विवेक–छल–चातुर्य–कर्मांची तऱ्हा निराळी. इतकाच कायतो त्यांत भेद! त्यांच्यांत औद्धत्य मिसळलें, आणि तूं बलवान् होऊन प्रपंचविवेक केलास, व्यवस्था ठेविलीस, आणि शोभा पाडिलीस! दोघांचींही स्वरूपें अंतरंग मलमयच!! परंतु वागण्याच्या रीतींत फरक; त्यामुळें तूं सतेज दिसत्येस इतकेंच! तथापि "रामराज्य" गान तूं काय करित्येस? त्याच्या एका अंशा इतकेंही तुझें राज्य शोभत नाहीं. "रामराजा" चे सद्गुण आणि त्या काळच्या प्रजेचा संतोष, इतका अत्यद्भुत होता कीं, आज देखील चौखंड पृथ्वींतील सर्व प्रजा, सबल प्रतापी **श्रीरामाला** प्रेमानें प्रणमीत, स्तवीत व शांत, दांत, शूर, वीराग्रेसराचें मनापासून गुणगान करीत आहे. रामराज्यांतील सर्व प्रजा, सर्व प्रकारें सुखी होती. स्वतंत्रतेचें सुख घेणारी होती; राजाचे दोष राजाच्या तोंडावर बोलण्याला कोणास भीति नव्हती; खऱ्या प्रेमानें राजभक्ति करणारी होती; राज्यार्थ प्राण देणारी होतीं; स्वस्वातंत्र्याधिकार बहादुरीनें मागणारी होती; अशा जिला दुःखही काय वस्तु आहे! हें माहीत नसून "**जयजय महाराजा राम अमर असो**" !!! अशी आनंदमय स्वरानें गर्जना करीत विराजमान होत होती! तिची बलिहारी अलौ-

किक होती!! राजा **श्रीराम,** तोही तसाच प्रतापी!!! प्रजेच्या सुखानें सुखी, प्रजादुःखानें दुःखी, जनमत शुद्ध राखण्याविषयीं तत्पर. (दुष्ट धोब्याच्या भाषणावरून साध्वी **सीता**—वल्लभेचा ज्यानें त्याग केला. तिच्या अक्षय प्रेमाकडे न पहातां, ज्यानें प्रजाहित तपासलें कीं, माझा दाखला घेऊन प्रजा दुर्गुणी व लंपट न होवो!); तो करभार घेण्याविषयीं विचक्षण; प्रजेविषयीं कोमल व प्रेमळ; स्वलाभाकरितां प्रजेची स्वतंत्रता न बळकावितां, स्वतंत्रतेचें रक्षण करणारा; प्रजेच्या संमतानें राज्यव्यवस्था चालविणारा; त्याचें मंत्री मंडळ सर्वोत्तम; तो स्वतः धीर व चतुर; स्वप्रजेवर पितातुल्य आणि जिंकिलेल्या प्रजेवर पितामहतुल्य सुप्रेम ठेवणारा; निर्मल व उदार; पूर्णकलातेजस्वी; सर्वमान्य; आणि महापुरुष शोभत होता!!! त्याची तूंलना करणें कठीण नाहीं! तसें जेव्हां व्हावें, तेव्हां एक चक्रें पृथ्वींत महाराज्यपद भोगण्यास योग्य व्हावें. तूं रामराज्याची प्रौढी मिरवून काय करित्येस? सर्वापेक्षां तुझ्या मनांत समविषमभाव फार आहे! हा कोण? काळा! ऊँ:!!! तो कोण गोरा! असो. जवळ ओढा. हा भेद जेव्हां सफाई नाहींसारखा होईल. नेटिव आणि अंग्रेज ही आवडनिवड नाहींसारखी होऊन ह्या दोन्हीं प्रजा जेव्हां सलूखीनें वागतील; त्यांत जेव्हा ऐक्यता होईल; तेव्हां कोठें तुझ्या विजयाचें प्रथम दर्शन होणार! तें दूरच राहिलें आहे. राहो विचारें! तूं अगोदर सांप्रतकाळच्याच सर्व राज्यांत मानायोग्य हो, म्हणजे पुष्कळ मिळविलेंस! अगोदर तुझ्या अंधाराकडे पहा, आणि मग रामराजाच्या सामराज्याची तुलना कर.

प्याट्रीशियनें आणि **प्लीबियन** असे मतभेद राखण्यांत बिलकुल फायदा नाहीं. तुझे पुत्र प्रथम लाथ, आणि नंतर बात करणारे; आणि परदेशीयांशीं दूर दूर राहणारे आहेत. एवढ्यासाठीं रामराज्यसमयाची आणि रामराज्याची तूं, आपल्याशीं तुलना करणें; ह्मणजे केवळ आपलें अज्ञान प्रगट करणें होय."

"चल, फार बडबड करूं नकोस"—**ब्रिटानिया** म्लान वदनानें ह्मणाली. **हिंद** आपल्या उत्तम व खऱ्या वक्तृत्वानें तिच्या पोंकळ तक्रारीचें छेदन भेदन करून टाकीत होती; ह्यामुळें **ब्रिटानिया**च्या चेहऱ्यावर प्रस्वेदबिंदु येऊं लागले. आणि फार घाबरून जाऊन ती फार रागास चढली. "रामराज्याचा न्याय, विजय आणि स्वतंत्रता हें सारें मी जाणत्यें. माझा, हें सांगण्याचा हेतु इतकाच होता कीं, जर लहान वस्तूची तुलना मोठ्यांशीं होईल, तर चालू स्थितींत माझें राज्य, रामराज्यासारखें मानिलें जाईल! रामराज्य न्यायी, सत्य व प्रामाणिक होतें. पण त्या काळचा युगसमय स्मरणात आण. हें

---

* रोमच्या महा राज्यांत प्रजाजनांचे दोन भाग होते. रोमवासी ते प्याट्रीशियन आणि नगरजन नव्हेत, व जे जिंकिलेले ते, प्लीबियन. प्याट्रीशियनांस सर्व हक्क मिळत, परंतु प्लीबियनांस मिळत नव्हते. राज्यसभेचे जे पेट्रन, ते प्याट्रीशियन; आणि जिंकिलेले लाटिन लोक, ते प्लेबस, ह्मणजे प्लिबीयन. पहिल्या वर्गीतील लोक राजकाजांत भाग घेत; आणि दुसरा वर्ग निव्वळ कोरा राही! लग्नादिसंबंधानें जरी कोणी प्याट्रीशियन प्लिबियन झाला; तरी त्याचा धिःकार होई. आणि प्लीबियन, प्याट्रीशियनचा तिरस्कार करीत. सर्वियस टल्लियसानें 'जिंकिलेला' आणि 'जिंकणारा' हा भेद मोडून, सर्वांस सारखा अधिकार दिला; तेव्हांपासून या भेदाचें निर्मूल झालें!

सुवर्णयुग नव्हे, लोहयुग आहे. म्हणून रामराज्यासारखें सर्वोत्तम सुख भोगावयास मिळणें दुर्लभच समजलें पाहिजे! पण ज्या राज्यांत गुलामगिरी करावी लागे, विनाप्रयोजन बुडणूक व जुलूम होत, धर्मभ्रष्टता फारच बोकाळली होती! आणि श्रीमंत आहे इतकें समजलें कीं, बेधडक लुटीत; ह्यामुळें द्रव्याचा बरोबर उपभोग घेतां येत नव्हता, तशा राज्यांत तरी हें राज्य महाराज्य रूप शोभत आहे. स्वाधीनता, समानता आणि स्वतंत्रता हीं बहुतांशीं शंभर हिशानें सुखें पुरीं पाडणारीं आहेत! मनुष्याच्या सहवासानें अधम आणि उत्तम हें स्पष्ट समजतें. परंतु पूर्वीच्या राज्याशीं तुलना करून साफ दिल-दुनियेंत मी, असें शाबिद करूं इच्छित नाहीं कीं, "मी सर्वोत्तम आहें" असें मान्य झालेंच पाहिजे. परंतु लोक हिताकरितां मीं सुखकर व्यवस्था करण्याची किती तजवीज करीत आहें, तें वेळोवेळचे रंग दर्शवून सिद्ध करून देईन कीं, लोहयुगयुक्त रामराज्याची स्वाधीनता आणि स्वतंत्रता तूं आज उपभोगीत आहेस. तशांत निर्बल प्राण्याला त्याच्या शक्तीहून जास्त सत्ता देणें, अनुचित होय! जुन्या राजतंत्राप्रमाणें व्यवस्थाविधी योजण्याचा हा समय नाहीं. आतां नव्या नव्या राजतंत्राच्या नियमाधारें वर्तन ठेविलें पाहिजे. त्याविना यथास्थित व संपूर्ण सुख भोगावयास सांपडणें महत्कठीण आहे! बरें, सम विषम भावाची गोष्ट तूं काय सांगत्येस? सम विषभ भाव काढून टाकणें मुष्किलीचें नाहीं. परंतु तुझे पुत्र माझ्या पुत्रांशीं संबंध ठेवण्यास योग्य आहेत काय? तुझे पुत्र गर्विष्ट, विषदृष्टी आणि दुष्ट वासनेचे

असल्यामुळें व्यर्थ बढाई मारून, पुष्कळ वेळां माझ्या शूर वीरांचा अपमान करितात; हें कोण सोसूं शकेल? आपल्याला तर बाई! क्षणभर खपायचें नाहीं! बरें, जेव्हां उत्तम मनाच्या अधिकाऱ्यांची, तुझ्या मुलांस सर्व प्रकारें आश्रय देण्याची वासना होते; तेव्हां ते बोलूं लागतात कीं, "नशिबीं असेल तर सारें मिळेल!" "समय येईल तेव्हां सारीं सुखें सांपडतील" मग दुसऱ्याचा दोष बोलायला तुला शरम वाटत नाहीं कशी? तूं **प्लीवियन** आणि **.प्याट्रीशियन** कोणत्या आधारें ठरवित्येस? मला तर दोन्ही सारखेच वाटतात! मीं दोघांलाही योग्य बक्षिस देत्यें. आणि त्यांस राजीखुषींत ठेवण्याकरितां, होईल तितके श्रम करित्यें. तुझें ऐक्य केल्यावर मग मला काय रहाणार? ताज्या रक्ताच्या स्पर्ध्यांशीं कसें विवेकानें वागावें? हेंच तुझ्या मुलांस समजत नाहीं. तेव्हां पुढें व्हावयाचें काय? व्यवहार-ऐक्यतेचें दर्शन करण्याकरितां, माझें मथन जारीनें चाललेंच आहे. त्याकरितां तुझ्या आणि माझ्या पुत्रांस सदैव सदुपदेश करण्यास मी कधीं चुकत नाहीं. परंतु तुझे मूर्ख पुत्र कोरडेच राहिले! तर त्याला मीं काय करूं? माझे पुत्र नीतिज्ञ आणि संसार—व्यवहार—विवेक—कुशल आहेत. ते, तुझ्या मलिन अंतःकरणाच्या पोरांशीं संमत झाले नाहींत; आणि होणारही नाहींत! तुझे पुत्र माझे पुत्रांवरोवर मजलशींत जमतात; व माझ्या मुलींच्या स्वरूप सौंदर्यांस मोहित होऊन, त्यांच्या समक्ष अविवेकानें व असभ्यतेनें उभे रहातात; संसार व्यवहार—मंडलांत प्रवेश करितात; कुटुंबसुख पहातात; तरीही

आपली दानत साफ ठेवीत नाहींत! हें नवल नव्हे का? जन-समूहांत येऊन तेथें जमलेल्या स्त्रियांचा अपमान करावा;* असेल त्याहून दसपट जास्त भचका उडवून तुसडा स्वभाव आणि बेपर्वाई प्रगट करावी; आम्हीं **आर्य, श्रेष्ट** व सुधारलेली प्रजा आहों! अशी घमेंडी झोंकून माझ्या मुलांचा तिरस्कार करावा; स्वकुटुंबांत मिलाफ करण्यास नाखुषी दाखवावी; (कारण- कुटुंबें आमच्याहून फार हलकीं आहेत, असें दृष्टोत्पत्तींत आल्यास भ्रमाचा भोंपळा फुटेल!) आम्हांत सामील होऊन, अगदीं अनास्थेनें व निर्लज्जत्वानें वागावें; आणि वाईट शब्द उच्चारून माझ्या पुत्रांवर अंकुश ठेवण्याचें धाडस करावें; अशा हलकट स्वभावाचीं तुझीं मुलें आहेत! खरोखर अशा नीचांशीं माझे पुत्र संबंध ठेवण्यास लज्जायमान् झाल्याशिवाय रहाणारच नाहींत! आणि ऐक्य होण्यासही मुष्कीलच पडेल!!! जेव्हां तुझे पुत्र विवेकाचरणानें वागून माझे पुत्रांची मानमर्यादा ठेवण्यास शिकतील, तेव्हांच सुघड-सुघट्ट-ऐक्य-स्वरूप-सुंदर-दर्शन मिळेल! कारण, माझे पुत्र ऐक्यता प्रदर्शन करण्यास नेहमीं उत्सुक असतात. पण ते असे नम्र व विनययुक्त नाहींत कीं, गुलामगिरी करावी, आणि आपल्या कुटुंबांत प्रवेश करूं देऊन तुझे पुत्र बेभान होऊन निरंकुश व मदोन्मत उद्धताप्रमाणें वागत आहेत, तें पहावें! छीः!!! बरें, इतर सर्वांला ते कोणत्या प्रकारचा सन्मान देतात? त्यांच्या दासानुदासांप्रमाणें वागावें, आणि

* पहा. बॉम्बे ग्याझेट सन १८५८.

जें आपल्या सन्मुख येईल, त्याला विनम्र होऊन नम्रता दाखवावी! ते अहंकारी, उद्धत आणि पत्राजखोर नाहींत, हें जरी खरें, तरी पण अशा प्रकारचा मान कधींकाळीं कोणालाचं देणार नाहींत. आणि तोही पण कोणाला? तुझ्या तुसड्या, लज्जा व नीति-विषयीं निःसंशयी आणि मिथ्या गर्वधारणकरणाऱ्या पोरांस? छीः! तुझ्या मुलांतून कोणी कधींकाळीं इंग्लंडास आला तर समस्त प्रजा मोहित होते; थाटमाटानें आगतस्वागत करिते; प्रसंग राखते; सकल विलाससामग्रीचें दर्शन देते; विशेष ऐक्यानें राहते; मित्रबांधवांचें न्यून पाहून श्रमी होते; आणि सुख पाहून आनंद मानिते. सारांश, कोमळ आणि प्रेमळ स्वभावाचे माझे पुत्र आहेत. ते कोणी कधींही "**पेन्‌गो***" .ची, ग्रीस देशांत जसे सर्व लोक हंसून टर करीत होते! त्याप्रमाणें करतात का? नाहीं! ते नेहमीं तुझ्या पुत्रांशीं ऐक्य करण्याला प्रसंग शोधीत असतात; आणि प्रयोजन नसून मंडळ्या, लेवी आणि इव्हिनिंग पार्टी वगैरे भरून आनंदानें कल्लोळ करितात!!! पण तुझे पुत्र उलट त्यांच्या बांधवांविषयीं रोष धरून त्यांना धिःकारितात! आणि त्यांचा लाभ घेऊन घोर कर्मेंही करितात!! लॉर्ड **मेयो** आणि जस्टिस **नार्मन्** ह्या माझ्या प्राणात्म्यांचें रक्त वाहविणारे, ते अशा मालिकेंतील तुझ्या पुत्रांपैकींच कीं नाहीं? जर ते तुझ्या पुत्रांपासून फार दूर दूर रहाते असते, तर

* हा एक रोमन फिलॉसफर होता. रोम जेव्हां युनानी प्रजेच्या ताब्यांत होतें; तेव्हां हा तत्त्ववेत्ता तेथें गेला होता. आणि त्याचें भाषण ऐकून सर्व लोक त्याची टर करीत होते!!!

असा भयंकर परिणाम झालाच नसता. असें ह्मणजे माझें स्पष्ट ह्मणणें नाहीं; परंतु मीं जें हें एक कारण सांगितलें, तें निव्वळ खोटें आहे; असें तुझ्यानें ह्मणवेल, असें निदान मला तर खरोखर वाटत नाहीं! शुद्ध स्वभाव वृत्तीनें प्रफुल्लितपणा व समानता दाखवावयाची झाली तरी, ती मर्यादेबाहेर दाखवावी; हें सांप्रत स्थितीला प्रतिकुळ आहे! इतकें असून राजकाजांत पुष्कळ अंशांनीं मीं तुजवर विश्वास ठेविला आहे. योग्य स्वाधीनता दिली आहे. आणि सत्तावर्गांतही तुला दाखल केली आहे; ती कशाकरितां बरें? मला वाटतें, हीं सारीं धडधडीत ऐक्यतेचीं कारणें होत! ज्यामुळें परस्पर जुगल होऊन एक स्वरूप व्हावें, व परस्परांनीं एक जुटाचें होऊन चांगल्या आस्थेनें वागावें. किती सर्वोत्तम सुखाचें कारण आहे!! अग? उच्च प्रेमांत वास्तव्य करून अपूर्व दिव्यकृतीनें दर्शन दे!!!"

"तुझें ह्मणणें सत्य आहे" व्याघ्रदेवीनें गडबडून जाऊन दयाळु मुखानें जबाब दिलाः—तुझें बोलणें मी अमान्य करीत नाहीं. परंतु ह्या बोलण्यांत जितकी सत्यता आहे; तितकाच खोटेपणाचाही अंश आहे! आतां तो, तूं तुझ्या नेहमींच्या चपलतेनें व कुशलतेनें निस्तेज करून दाखवूं पहात्ये आहेस; इतकेंच! तें तुझ्या जहांबाजपणास शोभणारच!! परंतु तूं खात्रीनें असें सांगूं शकशील काय? कीं, ह्यांत आमचीच सारी गफलत आहे? तुझे पुत्र वर्षानुवर्ष माझ्या रंक बालकांवर जुलूम करीत आले आहेत, आणि करितात ही. ते नेहमीं अति तुच्छ मनानें बोलतात. माझ्या मुलांविषयीं त्यांनीं मस्तपणानें व प्रौढतेनें

आपल्या मनांत कायमचा असा ठसा वठविला आहे कीं, "हिंदु अचंचल वृत्तीचे, विश्वासघातक, रण-संग्रामाविषयीं बहुधा भित्रे, स्वदेशाभिमान-विरहित, ज्ञातिभेदबंधनानें बांधले गेलेले, अर्धवट सुधारलेले, धर्माविषयीं संशयी, आणि स्त्रियांवर असह्य दाब ठेवणारे आहेत." तूं आतां जें बोलत आहेस, तें, मीं जें सांगितलें, त्याविषयीं सत्य आहे काय? मला तर निःसंशय वाटतें कीं, ह्या तुमच्या म्हणण्याप्रमाणें बहुतांशीं माझे पुत्र नसावेत. परंतु जेव्हां त्यांविषयीं सुधारलेल्या वर्गांत निंदक वाक्यें उच्चारिलीं जात असतील, आणि त्यांना नीच मानण्याची प्रेरणा होतअसेल, तेव्हां माझे पुत्र रंगेल आणि अभिमानी पडल्यामुळें, तुमचीं कर्में सहन करण्यास असमर्थ होत असतील! तूं मुक्त मनानें विचार कर कीं, तुझ्या लेंकरांविषयीं माझ्या पुत्रांनीं जर अशीं हलकट वाक्यें उच्चारिलीं, तर तीं सोसून घेतील? नाहीं! आणि त्वांही अशा कृत्रिम उपायांनीं भव्य-शक्तिजय दर्शवावा; हें तुझ्या प्रौढतेला लांछन लावणारें होय! मोठमोठ्याचें रक्त प्रवाहित झालें, हें कर्म वाईटच; ही गोष्ट खरी. तरी त्याविषयीं सकल प्रजेनें, शोक–भरित–वदनानें आपलीं मतें प्रगट केलीं आहेत. आणि आपल्या बंधूंवर आलेल्या संकटांविषयीं ईश्वराकडे देखील याचना केली आहे; हें कांहीं थोडें केलें नाहीं! परंतु मानधन तृषार्त, वैमनस्यी व कपटी सत्ताधिकाऱ्यांनीं बंडानंतर विनाकारण माझ्या कितीएक लेंकरांस बांधून मारिलें, कितिएकांस झाडांस लटकाविलें; आणि कितिएकांस तोफेच्या तोंडीं दिलें! हीं कर्में अति अधम नाहींत

काय? साधनबलानें थोर आणि प्रबल प्रतापी ब्रिटनपुत्रांनीं कित्येकांस—ज्यांकडे हत्यारें नाहींत अशा हलक्या लोकांस—सत्तेच्या डौलानें किंवा जोरानें लाथा बुक्क्यांनीं मारून गतप्राण केलें; आणि त्याचें कारण कम्बख्त! "पाणथरी" हें पुढें आलें! अशा अधम, व नीच कर्मांविषयीं, कोणी कधीं तरी सत्य न्याय दर्शन दिलें का? तेव्हां संधी, करार आणि सुघड, सुघट, ऐक्यतेचीं उत्साहभरित प्रारंभ चिन्हें, कोठच्या कोठें राहिलीं! परंतु त्यांजबद्दल मजकडून कधीं तरी बेपर्वाईचें हलनचलन झालें? तुजविषयीं माझी असाधारण ममता असून, तुजमधून मजविषयींचा वैरभाव कोठें समूल नाहींसारखा झाला आहे? अग, प्रेमाच्या बदल्यास प्रेम पाहिजे! जर तूं अंतरोत्साहानें माझ्या पुत्रांस दृढालिंगन देतीस, तर ते पूर्वींचें सारें विसरून जाऊन प्रेमाचा बदला अधिक देते असते कीं नाहीं? पण असें होणार कोठून? मजलशींत एकदां आमंत्रण करून मोठे उपकार दाखवावे, गर्वानें उत्फुल्ल व्हावें, बाहेरून उलटा डौल घालून तिरस्कार करून त्रासावें व त्रासवावें, आणि नीच वर्गांत खपावें. हें माझे मुलांस सहन होण्यासारखें नव्हेच! माझीं मुलें उद्योगविरहित झालीं आहेत; न्यायानें पाहिलें तर तीं, अधमाधम दासानुदास होत; तीं शुद्ध जुलमांत गाडलीं गेलीं आहेत; तीं पराधीन आहेत; परदेशी व परधर्मी लोकांच्या तेजानें तीं, दिपावलीं आहेत; तीं स्वतंत्रताविरहित आहेत; हें तुझें म्हणणें खरें आहे. परंतु मीं तुला विचारित्यें ब्रिटानिये, उच्च कुलांतिल, सद्गुणी, तेजस्वी, विवेकी आणि मर्यादशील

असें कोणतेंही मनुष्य, तुमच्याकडून होत असलेला असा मानभंग प्रत्यक्ष व स्पष्ट कधींही पाहूं शकणार नाहीं! मग रणरंगी, महेच्छ, कुलीन आणि स्वतंत्र पुरुष प्रत्यक्ष जनसमूहांत आपल्या मानाचा असा पराभव पाहून अंतरंग खरोखरच अतिशय भाजतील; ह्यांत आश्चर्य तें कसलें? अग, हें सत्य ईश्वरी नियमास अनुसरतेंच आहे! आतां तूं ह्मणत्येस कीं, "राजकार्यांत विश्वास!" पण तो आहे कोठें? भ्रुकुटि वक्र करून हिंद ह्मणाली:—"कुठें आहे समानता? अग? ह्या ठकवाठकवीच्या गोष्टी तूं सोडून दे! हें तुला बिलकूल शोभत नाहीं!! आतां तूं कंटाळशील, आणि नंतर तुलना करून, आपलें खरें करून दाखविण्याची तुझ्या अंगीं शक्ति नाहीं ह्मणून क्रोधमय नेत्रांनीं पाहूं लागशील! हें मला पक्कें माहीत आहे. परंतु मला त्याची लवलेश पर्वा नाहीं! खरोखरच तुझा अविश्वास आहे. बिलकूल विश्वास नाहीं. स्वाधीनता, समानता व स्वतंत्रतेचें दर्शन तर दुर्लभच. तें नाहींच! असतें, तर तुझी स्पृहा कोण करितें? त्वां भ्रष्ट बुद्धीनें आह्मां सर्वांची स्वतंत्रता नाहींशी करून आह्मांस पायांखालीं चुरडून टाकिलेंस, त्याचें मला स्मरण झालें ह्मणजे, शोकदुःखातिशयानें आमचें रक्त गरम आणि वदन निस्तेज होतें! पण करायचें काय? बंडाच्या वेळीं—कंपनी बहादूराच्या काळापासून, तें आजपर्यंत—देशी लष्करास कर्ज्या नजरेनें पहाणें, नेहमीं आणि नेहमीं दाबांत आणि दाबांत ठेवणें, आणि देशी लष्करास जेर—नरम—करण्याकरितां जरी देशी लष्कर होतें, तरी देशी लष्करावर

पुरता विश्वास न ठेवणें; हा तुझा पहिला अविश्वास.—कायदे घडणाऱ्या मंडळीनें यथेच्छ, निर्भय व साहसिकपणानें वर्तून स्वच्छंद कायदे घडणें; आणि प्रजेची अरुची असतांही तिजकडून ते पाळविणें, आणि कायदे कौंसलांत प्रजामताचे प्रतिनिधी दाखल न करणें; हा दुसरा अविश्वास. देशी राज्यांत **रेसि-डेंट** ठेवणें—त्यांविषयीं तक्रार नसतां—तेथील राजधारा सत्तेला ! आपल्या कावूंत ठेवून, त्या राजांस पांयांखालीं दाबून टाकणें; आणि आपल्या इच्छेप्रमाणें वागविणें; तसेंच गारुड्याच्या बाहु-ल्यांप्रमाणें त्यांस खेळविणें; आणि त्यांच्याच प्रजेंत त्यांस हलकें पाडणें; हा तिसरा अविश्वास. हत्यारें बाळगूं नयेत, असा कायदा करणें—जो नियम कोणतेही पुरुषार्थी सरकारानें—प्राचिन व प्रसिद्ध **रोम** किंवा **ग्रीस** यांनींही—अमलांत आणिला नाहीं, असा पुरुषत्वाला शुद्ध लज्जा आणणारा कायदा कारणें; हा तुझा चौथा अविश्वास. देशी वर्तमान पत्रांस हाणून पाडणें; त्यांवर फितूरीचा व अतीशय उच्छृंखलपणाचा आळ आणणें;—हें खऱ्या विश्वासाचें काम नव्हे—आणि त्यांना निरंकुशितपणें अंकुशित ठेवणें; हा पांचवा अविश्वास. **हिंदुस्थानांतील** रयत निरर्थक करांच्या कहरानें बेदील होऊन बेफाम झाली आहे—(शत्रुत्वानें नव्हे, परंतु खऱ्या शौर्यानें) म्हणून तिजवर नेहमीं द्वेषी नजर ठेवून फितूरीची आळ आणणें, थोडचाशा अपात्र अंमलदारांनीं स्वतःलाच अपलक्षण करून जुलमा-मुळें चमकत राहणें; आणि त्यांस चमकावूं देणें; हा सहावा अविश्वास. न्यायाला दिव्यासनीं न चढवितां किंवा तो

ईश्वरी प्रसाद देत असतांना, कांहींच्या त्यांहींच वहाणा काढून मागें हटणें; हा सातवा अविश्वास. सैन्य वर्गांतील माझ्या वीर बहादूर मुलांस सेनापतीच्या श्रेष्ठ पदवीस न चढविणें आणि केवळ तुझ्या पुत्रांनीं त्या वीरत्व दर्शविणाऱ्या अलौकिक प्रसादाचा! लाभ घेऊन आड्यता मिरविणें; हा आठवा अविश्वास. तुझे गैरवाजवी विचारांच्या आणि प्रजासंरक्षणाच्या अविवेकी कायद्यांविरुद्ध "प्रोटेस्ट" न करूं देणें; व सार्वजनिक मंदीर वापरूं न देणें; हा नववा अविश्वास. देशी राजास—आणि तोही अति श्रेष्ठ पदवीचा—एखाद्या साधारण मनुष्याच्या अपराधाची जशी चौकशी करितात, त्याप्रमाणें करून केवळ असत्यतेचा गोंधळ माजवून फिक्का पाडणें; हा दहावा अविश्वास. किती एक राजकुमारांनीं यूरोपांतून मागविलेलीं शस्त्रें त्यांस बाळगूं न देणें; आणि परदेशी प्रचंड पराक्रमी वीरपुरुषांस आपल्या सैन्यांत ठेवण्याची मनाई करणें; हा अकरावा अविश्वास. तुझ्या स्वार्थी पुत्रांनीं उलथें पालथें पडून देशियांस "व्हालेंटियर कोर" च्या दरवाजावरून खेंचून काढणें; हा बारावा अविश्वास. देशी राजांस लग्नादि शुभ प्रसंगीं देखील आपल्या बरोबरीच्या राजबांधवांशीं स्नेहभाव ठेवूं न देणें; किंवा त्यांस सुसंबंधानें परिबद्ध होऊं न देणें; अथवा त्यांचा परस्परांतील संबंध तुला न आवडणें; आणि पत्रव्यवहारानें देखील त्यांना अंतर भाव जाणूं न देणें; हा तेरावा अविश्वास. हिंदु, मुसलमान, पार्शि, यांस उच्च प्रकारचें शिक्षण न देतां, त्यांस नीचत्वांत ठेवणें; हा चौदावा अविश्वास. कारण,

तुझी अंतरवृत्ति अशी शंकाशील झाली आहे कीं, त्यांना जर राजकीय संबंधाचा रस्ता दाखविला, तर ते सहज स्वतंत्रतेचे हक्क मागूं लागतील ! स्वदेशाभिमान धरावयास व स्वदेशप्रीति करावयास शिकतील; आणि त्यामुळें आपला गैर लाभ होईल !!! जेव्हां देशी राजे प्रवास करण्याकरितां परदेशीं जातात, तेव्हां त्यांचेबरोबर "एजंट,, किंवा "रेसिडेंट" पाहिजेच पाहिजे—जणों, त्यांवरील चौकी पहाराच तो.—ते, एकटे स्वच्छंद देशाबाहेर विहार करितील, तर कोणी त्यांना त्यांची, किंवा प्रजेची, अथवा इतर स्थिति, किती सुखकर किंवा दुःखकर आहे? ह्याची सूचना करितील ! ह्यामुळें तुला—कालांतरानें—धोका (?) लागेल ! एतदर्थ त्यांना स्वतंत्र न ठेवणें; आणि कोणत्याही विदेशी राजनीति-कुशल पुरुषाची मुलाखत तुझ्या परवानगीशिवाय घेऊं न देणें; हा पंधरावा अविश्वास. स्वेच्छिक साहस कर्में न व्हावीं, एतदर्थ प्रजेला प्रबळ करबंधनांनीं जखडणें,—ज्यामुळें प्रजा कधींही समृद्धीनें बलवान् होऊं नये; आणि ती राजकारभारांत प्रवेश करण्याचें भान विसरून जावी—आधीं अनाना आणि मग तनाना—पोटाच्या सांभाळाच्या फिकीरींतून जेव्हां ती मोकळी होणार, तेव्हां राज्यसांभाळांत शिरकाव करण्यास उत्सुक होणार ! पण तिला एकसारखी पोटाच्या पाठीस लावून ठेविली म्हणजे, बारा प्रहर आणि छत्तीस घड्या त्याच फिकीरींत कुचंबत पडली!! अशीं कपटी कर्में करणें; हा तुझा सोळावा अविश्वास. जणुं, ह्या अविश्वासाच्या फलटणीनें साऱ्या हिंदुस्थानच्या अष्टदिशा फिरून सर्वांला अती-

शयच घेरून टाकिलें आहे ! काय चमत्कार पहा? त्यांतून निवण्याचा प्रयत्न झाला तरी निघतां येत नाहीं ! आतां विशेष पाल्हाळ नको; थोड्यांत सांगत्यें. बाकीच्या प्रत्येक अविश्वासाविषयीं जर मीं बोलूं लागल्यें, तर तें व्याख्यान संपतां संपणार नाहीं. पुन्हां जेव्हां केव्हां प्रसंग येईल, तेव्हां सारें यथातथ्य विवेचन करीन. आतां दुनिया विचारील कीं, इतका अविश्वास आणि बेअब्रू झाली आहे; हें जर खरें मानावें, तर तें हिंद कसें सहन करित्ये? त्याचें थोड्यांत उत्तर. सत्य, प्रमाणिकता, आणि निमक हलाली हेंच होय ! जिनें स्वबांधवतुल्य यश देऊन जिला एकवार स्थापन केलें, तिला अंतर देणें उचित नव्हे. या दोहोंशिवाय अन्य कारण नाहीं. आपली हुरमत न जाऊं देण्या करितां, म्यानांतून तेजदार तरवार बाहेर काढून म्हण, किंवा चार हात दाखवून म्हण, पण आपला पराक्रम प्रगट करावा; इतकी हिंद सामर्थ्यवान् आहे. समजलीसना? त्याची तूं फिकीर बाळगूं नकोस. परंतु प्रभूचें भय मनांत आणून प्रतापि राजमंडलानें-लोकसमूहानें—हलकें म्हटलेलें ऐकण्याची ती इच्छा धरीत नाहीं. केवळ तुझा लाभ साधावा; एवढ्याकरितां जे जे लोक, तूं ठेविले आहेस; त्यांविषयींही सांगणें आतां राहिलेंच नाहीं. धान्याच्या पिकलेल्या शेतांत आपलें पोट जाळण्याकरितां जशा टोळांच्या झुंडीच्या झुंडी तुटून पडतात. तसे तुझे जुलूमगार सुपुत्र ! या देशांत पांय ठेवूं लागल्यापासून जुलुमांची पर्जन्याप्रमाणें वृष्टि वर्षावून, कहर करून सोडीत आहेत! इतकेंही असून मुसलमानांचा जुलूम आणि त्यांची तुटक तुटक लूट तुझ्या

विशाल व कोमल मनांत डाचत असेल ! तर ऐकः जें सांगावें अशी माझी इच्छा नव्हती, परंतु तुला तें ऐकावयाचेंच; तेव्हां माझा नाइलाज आहे ! ऐक तर. **वारन् हेस्तिंग्स*** यानें आम्हांस जें त्राहीं त्राहीं करून सोडिलें होतें, त्याविषयींच तुला थोडक्यांत सांगत्यें. ह्मणजे तुझे कान आणि डोळे, चांगले उघडतील ! अग ! ज्याचें वास्तविक वर्णन ऐकतांना त्वज्जातीय नम्र आणि मायाळू स्त्रिया मूर्च्छा पावल्या !!! इतका ज्यानें अतोनात जुलूम केला. त्याच्या जुलमाचें वर्णन मी सांगत आहें. ऐक ? ज्यापुढें मुसलमानांच्या जुलमाची आणि लुटीची तूं कसली प्रतिष्ठा घेऊन बसली आहेस ! एकदां तुझी मजवर कृपादृष्टी मात्र झाली, तोंच तूं, जसजशी संधी सांपडले; तसतशी द्रव्य उकळण्याच्या उद्योगास लागलीस ! तुझे खादाड पुत्र एकदम लांडग्यासारखे टोळ्या टोळ्यांनीं आम्हांवर तुटून पडून मोठ्या नारीनें जुलूम करूं लागले. आणि भीमहारी कंपनीनें निस्तेज **हेस्तिंग्स**स बोध वचनें सांगण्यास प्रारंभ केला कीं, "मला तृप्त करण्याकरितां द्रव्याचा भोग दे !" तेव्हां **हेस्तिंग्स** काय करील, आणि काय नाहीं ! जसें त्याच्या

---

* **वारन हेस्तिंग्स**च्या सरकारी नोकरांपैकीं **देवीसिंग** नांवाच्या चाकरानें जीं, अति घोर कर्मे केलीं आहेत; त्याविषयींचें हृदयद्रावक वर्णन फारच अनुपम आहे ! त्याविषयीं जेव्हां मि. **बर्क**चें भाषण चाललें होतें, तेव्हां तें फक्त ऐकूनच, श्रोते मंडळांतील कितीएक लेडीज (सभ्य स्त्रिया) मूर्च्छा येऊन पडल्या !!! मि. **बर्क**चें व्याख्यान.

डब्लनि एडिशन.

बापाचेंच घर ! त्यानें कधींही न ऐकलेला आणि कधींही ऐकण्यांत येणारा नव्हे, अशा जुलमास प्रारंभ केला. तुझा वीरश्रेष्ठ **वारन् हेस्तिंग्स**, त्यानें माझ्या देशांत जे मोठमोठे जहागीरदार होते; त्या दुःखी जहागीरदारांच्या बोटांस करकरावून दोरी गुंडाळिली, ती इतकी घट्ट कीं, तीं बोटें एक होऊन अगदीं बांधलीं गेलीं; आणि चुरडून पांच बोटांचें एक बोट दिसूं लागलें! नंतर त्या दुष्टानें त्या बोटांत लोखंडी पाचर लोखंडाच्या हातोडीनें ठोकून बसविलें!!! त्या दुःखानें ते जाहागिरदार कासाविस झाले होते, तरी त्यांच्या आरडा ओरडीकडे त्या जुलूमगार नरकाधिराज **वारन् हेस्तिंग्स**च्या **देवीसिंग** दूतानें बिलकूल मन दिलें नाहीं. त्यांच्या बोटांचे तुकडे तुकडे करून टाकिले! जे गरीब, प्रामाणिक, निरपराधी आणि उद्योगी होते तेही, केवळ आपल्या मेहनतीचीं फळें, आपल्या मुखीं अर्पण करण्यास असमर्थ झाले! जे आपल्या पोरांबाळांस देखील आपण उत्पन्न केलेलीं अमूल्य फळें, दुस्तर वेळीं देण्यास असमर्थ होते, त्या हातांचीं फळें, पंधरा वर्षांहून जास्त दिवस शुद्ध तुझ्या लाभाकरितां, **चिनांत** रवाना झालीं! बरें, त्यापासून कांहीं तरी मोबदला मिळावयाचा होता? पण कांहीं नाहीं! ज्या फळांच्या फळांवर तुझे पुत्र, त्या काळीं विलास भोगीत होते; आणि अंतर चुंफून आनंद मानीत होते; त्या उद्योगी हातांस विनाकारण असहनीय दुःख भोगावें लागावें? आणि त्याच्या मोबदल्यांत तुझ्या जुलुमगारांचें दोरखंड, लोखंडी पाचर, आणि निरुपयोगी दुष्ट मेहनत; ह्यांशिवाय तुझें कांहीं

नुकसान होऊं नये! ह्याचें नांव काय? ती शोकमय कथा ऐकून विचार करूं लागलें ह्मणजे, कोणाची पथ्थर छाती परिकंपित होणार नाहीं? मोठ मोठे मान मर्तब्याचे पुढारी देसाई, उद्योगी शेतकरी, विद्वान् ज्योतिषी, परगंण्याचे माजिस्त्रेट, आणि खेड्यां-पाड्यांचे पाटील व कुळकर्णी इत्यादिकांची जोड करून दोघां दोघांस पायांपासून मस्तकापर्यंत एकसारखें करकरावून एकत्र बांधिलें; त्या दुष्टांनीं—तुझ्या यमदूतांनीं—त्यांना तशा स्थितींत लोखंडी गजां-वर खालीं डोकें व वर पाय करून लोंबकळाविलें; आणि बोटांचीं नखें गळून पडे पर्यंत, वेताच्या छड्यांनीं सपाटून बडविलें! त्यांच्या उलट्या व उघड्या मस्तकांवर भयंकर लांकडी सपाटे मारिले!! त्या तुझ्या चांडाळ यमशस्त्रप्रहारकर्त्यांनीं मस्तक, नेत्र आणि नाक ह्यांतून रक्त प्रवाह चाले पर्यंत सैतानासारखी भयंकर व दुष्ट रीती आचरिली. ज्याचें नांव काढिलें असतां, अंगावर रोमांच उभे राहून अंतःकरणाची फार चमत्कारिक स्थिति होऊन राहते!! तुझ्या यमदूतांस जेव्हां ही पद्धति हलकी व भिकार वाटूं लागली, तेव्हां त्यांनीं नवी विलायती? कला शोधून काढिली! त्यांनीं त्या गरीब बिचाऱ्या थोर लोकांस उंच टांगून बेलाच्या झाडाच्या डहाळ्या—ज्याला अणकुचिदार तीक्ष्ण कांटे असतात, अग? ज्यांचे तडाके शरीराच्या चामडीला चिरून टाकितात; आणि मांस तोडून काढून त्याची खिम्या सारखी स्थिति करितात!—त्यांच्या चाबकांनीं माझ्या चांगल्या मोठ-मोठ्या थोर व लहान लेंकरांस प्राण जाईपर्यंत हैराण केलें!! आणि जीं, किती एक शरीरानें मजबूद, मनाचीं दृढ, धैर्यवान्

आणि कितीही जरी जुलुम झाला तरी असत्य कर्म करणारीं नव्हेत, अशीं मुलें होतीं ; त्यांकरितांही शोधक वैरानें उत्सुक होऊन व अतृप्त लुटालुटीनें प्रबलता आरंभून, तीं ज्याज्या कृतीनें विशेष हैराण होतील, अशीं अनेक प्रकारचीं यमास्त्रें शोधून काढिलीं—ज्यांत "बेचेटा*" नामक मांसदहनकर व विषमय अशा मारण्याच्या काळ्या मुख्य होत्या! त्यांनीं, जुलमानें अति पीडित झालेल्या माझ्या दीन बालकांचीं अवघीं शरीरें चिरून टाकिलीं!!! इतर क्रूर कर्मांतील हें किती बरें अतिक्रूरतम कर्म होय? **मोंगलां**चे आणि **मराठ्यां**चे जुलूम ह्या **विलायती**! जुलमांपेक्षां जास्त कीं कमी? काय केलेंस तूं माझें चांगलें? कसें तुझ्या माझ्यांत ऐक्य व्हावें? कायग? **ब्रिटन देवी!** ह्याला म्हणायचें तरी काय? जुलूम! कीं जुलमाचा बाप? कशी तूं लाज वाटून प्यालीस कोण जाणे! आपल्या राज्याची रामराज्याशीं तूलना करायला हींच का तीं योग्य कारणें? धिःकार असो तुला! आणि तुझ्या निंद्य कर्माला! आह्मांवर तूं विश्वास ठेविलास तो हाच ना? त्याचींच वाटतें हीं मधुर फलें? कसें ग तुझ्या मनास कांहींच वाटत नाहीं! काळ्या गोऱ्यांतील भेद तो हाच, का दुसरा आहे? माझ्या मुलांस "राजीखुषींत" ठेवण्यास हींच का तीं बक्षिसें? कीं, ह्या लेवी; इविनिंग पार्टी आणि सन्मान? जस्टिस **नार्मन** आणि **लॉर्ड मेयो** सारखीं किती ग माझीं

* Bechettea ह्या बेचेटा डहाळीचा जर शरीरावर मार बसे ल तर त्यानें मांस जळून जातें. आणि चामडीवर भयंकर डाग पडतात!

एकुलतीं एक मुलें, तुझ्या दुःखदायक शस्त्रांनीं मेलीं असतिल? ते मात्र तुझे "प्राणात्मे" आणि हीं माझीं लेंकरें मला अधीक झालीं म्हणून, तुझ्या संरक्षणांत दिलीं होतीं? त्यांचें हें तूं रक्षण कीं, भक्षण केलेंस? हाच वाटतें विश्वास, का ऐक्य करण्याचा मार्ग? तुझें प्रत्येक कृष्णकारस्थान मनांत आलें म्हणजे, अंगावर शहारे उठतात! आणि मनाची जी स्थिति होते, ती सांगण्यास मीं असमर्थ आहें! ब्रिटानिये? मीं तुला स्पष्ट सांगतें, माझ्या वीरशेखर स्वदेशाभिमानाबरोबर मीं सुखदुःखाच्या गोष्टी बोलत असतां, जर तूं इकडे येती नसतीस; तर फार बरें झालें असतें!" व्याघ्रदेवी संतापानें, दुःखानें आणि दीनपणानें सागूं लागली:—"बाई? ह्या तुझ्या मृत्युदायक मारानें माझ्या पुत्रांतील कित्येक पुत्रांचे घाय बरे झाले नाहींत. कितीएक रक्तबंबाळ झाले. कित्येकांचे घाय कुजून चिघळत पडले; आणि कित्येक ठार मेले!! परंतु तुमच्या दयालु मनास तीळभर देखील दया आली नाहीं! तुह्मीं कितीएकांच्या शरीरावर कुऱ्हाडीच्या घायाप्रमाणें परम भयंकर घाव घालून, त्यांचीं शरीरें विद्रूप केलींत; आणि त्या तडाक्यांत बहुतेक लोक यमसदनीं गेले! इतक्यावर तरी त्या चांडाळांची मनीषा थांबावी? पण नाहीं! याहूनही अत्यंत हृदयभेदक दुःखें भोगण्याचें आमच्या कपाळीं शिल्लक राहिलें होतेंच? अशा राक्षसी दुःखानें त्या यमदूतांचें मन तृप्त झालें नाहीं? रात्रीं त्या बिचाऱ्या निरपराधी प्राण्यांस लोभाचा व जुलमांचा अधिराज! होम शांतीच्या बलिदानाकरितां कारागृहांत घाली. आका? ज्यावेळीं निश्चित होऊन सर्व लोक आरामांत खुशाल

आनंदानें स्वस्थ असावयाचे, अशा वेळींही ते नीच, अधम, क्रूरकर्मे, पाषांड, सैतानाचे पुत्र, त्यांस तीन तीन वेळ बांधून मारीत ! ! कडक थंडींत बकऱ्या मेंढरांसारखे उघड्या शरीरानें मैदानांत फेंकीत !!! सूर्योदय होण्यापूर्वी पुन्हां या हेरिंतग्सच्या भोगांस बाहेर काढून तुझ्या यमदूतांच्या असह्य, प्राणहारक रात्रीच्या मारानें, शरीर सुजलें असतां—चुरडून चकाचूर झालें असतां–थंड पाण्यांत टाकीत! आणि ज्या शरीरांस एखादा लहानसा खडा देखील सोसण्याची शक्ति राहिली नसे, त्या निर्बल शरीरांवर पुन्हां पूर्ववत् माराचा तडाका चालू होई !!! चालण्यास अशक्त, उभें राहण्याची शक्ति नाहीं, पोटास भुकेनें वळी पडलेल्या, आणि मारानें शरीर सुजलेलें, अशा लोकांस, केवळ द्रव्य मिळविण्याकरितां, त्यांच्या गांवांत नेऊन सांगत कीं, "जर कांहीं द्याल तर सुटाल" पण त्या बापड्यांपाशीं कांहीं असेल तर ना ते देतील? बरें, अशा वेळीं कितीएक धर्मात्मे, त्या गरिबांस आश्रय देण्यास सिद्ध झाले, तर त्यांस तुझ्या लोकांकडून असें स्पष्ट सांगण्यांत येई कीं, "पहा? तुम्हीं विचार कर? ह्या लोकांस असा आश्रय देणें, म्हणजे तुम्हांकडे दौलत आहे, याच्या शाबिदीचा पुरावा करणें आहे ! ध्यानांत ठेवा. तुम्हीं काय समजलां आहां? तुमचे असेच हाल होतील!" ह्या सांगण्यानें ते बिचारे सत्पुरुष नाइलाज होऊन मागें येत. आणि बहुधां त्यांवरही सक्तीनें जुलूम चाले! ह्या तोंड धरून बुक्यांच्या माराचे विलाप आणि दुःखातिशयानें निघणारे हृदयभेदक आर्त शब्द ऐकून, तुजकडील दुष्टांस बिलकुल दया

आली नाहीं? दिवस आणि रात्र, त्यांस दुःख आणि जुलूम ह्यां-बरोबर एकसारखें युद्ध करावें लागे ! शारीरिक दुःखार्थ उपाय म्हटले म्हणजे, लोखंडी पाचर, पाण्याचे शिटकाव, दोऱ्या, बेड्या व यमदंडाचे सपाटे हेच होते? हे, त्यांकरितांच उत्पन्न झाले होते? आणि सृष्टींत जितके म्हणून दुःखसंग्रह आहेत, तितके सर्व एकत्र करून त्या सर्वांचा अंमल एकाच रात्रींत एकामागून एक त्यांस अनुभवावा लागे! त्या दुःखानें कितीएक लोक यमपुरीं गेले!!! आतां असेही कित्येक लोक असतात कीं, त्यांच्या हिमतीची आणि दुःखाची तक्रार पडलेली असते. कारण, ते आपणावर येणाऱ्या संकटातिशयानें कोडगे होतात. आणि दुःखाची बिलकुल पर्वा करीत नाहींत. जसजसा जास्त जुलूम होत जाईल, तसतसे ते सावध मनानें प्रबल व बेपर्वा होऊन जुलूम करणारांविरुद्ध निःशंक दृढतेनें जबरदस्त टक्कर देण्यास उभे राहतात. परंतु तशा लोकांनाही त्या तुझ्या अधमाधम यमदूतांपुढें हात टेंकावे लागले!!! ह्यावरून तुझे जुलमांचा व दुःखातिशयाचा विचार कर! असा जुलूम केवळ पुरुषांवरच गुदरला होता? नाहीं! बायका व मुलेंही त्या जुलम्यांच्या विक्राळ खादाड दाढेंत सांपडलीं होतीं!! बापाजवळ करकरा-ऊन मुलांस बांधून त्यांवर कोरड्यांचा मार सुरू होई. त्यामुळें बापाचा तडाका चुकला तर तो पुत्रांवर बसे, आणि मुलांचा चुकला तर नेमकी पित्यावर पाळी यावी? अशाच रीतीनें आणि अशाच उद्देशानें सद्गुणी कुमारिकांस—ज्यांचें सूर्यास देखील दर्शन होणें कठीण! त्यांना—त्यांच्या मंदिरांतील

पवित्र स्थलांतून ओढून आणिलें. त्यांच्या प्रियतमाच्या हस्तकमलांतून खेंचून आणून असह्य दुःखसागरांत डुबविलें ! त्यांची काळगृहाच्या काळ्या पाताळांत दुर्दशा केली !!! त्यांवर अतितर काठिण्यरीतीनें जो सक्त हल्ला केला, त्याचें वर्णन सांगण्यास कोण सामर्थ्यवान् आहे !!! आतां एका अर्थानें त्यांची अब्रू, स्वतंत्रता आणि मर्यादशीलता, हीं सर्व एकदम त्या कालगृहाच्या काळ्या पाताळांत झांकून राहिलीं, हेंही चांगलें च झालें, असें मानावयाचें ! कारण, त्यांचे मान गौरवाचा एकदम नाश झाला; आणि त्या धर्मभ्रष्ट व नीतिभ्रष्ट होऊन लौकिक परिस्फुटता न होतां, दुःखानें यमपुरी पहांत्या झाल्या !! जेरबंदाच्या कडक मारानें अवघा प्रांत नाखुष झाला; आणि त्यावर तूं आपला अधिकार बसवीत चाललीस ! पुष्कळ प्रदेश सोडून देसाई चालते झाले. शेतकरी आपलीं घरेंदारें आणि पिकलेलीं शेतें न कापितां, सोडून देऊन देशोथडीस लागले; तरी तुझे बागनेटवाले शिपाई, त्या अरण्यवत् प्रदेशांत फिरत होतेच ! आणि जें कोणी सांपडेल त्यास घेरून टाकीत होतेच ? जे लोक देश बहिष्कृत होण्यास राजी होते, त्यांस स्वभूमीच्या कारागृहांत जेरबंद आणि राजदंडाचे असहनीय तडाके कोंबून टाकलेल्या स्थितींत—सोसवि लागत. हाय ! हाय ! **ब्रिटानिया** !!! **वारन् हेस्तिंग्स**च्या राक्षशी जुलमांतून आपला बचाव करण्याहून त्यांस लांडगे, वाघ इ० हिंसक पशूंच्या भयंकर गुहांचा आश्रय करणें, बरें वाटूं लागलें होतें !!! ते वाघाच्या तोंडांत उडी टाकण्यास तयार होते. परंतु यम-

राजापेक्षांही **वारन् हेस्तिंग्स**चा मूर्तिमंत **जुलूम** त्यांच्यानें सहन करवेना ! तूं खरेंच सांग ? कीं, असा निरुपम व परम भयंकर जुलूम कोण सहन करूं शकेल ? **मराठ्यां**चा घोर संहार आणि **मुसलमानां**चा घोरतर भयंकर जुलूम, या तुमच्या जुलमाहून अधिक होता असें कोण म्हणेल ? कोण **नाना साहेबा**च्या अधम पापिष्ट कर्माहून हीं कृत्यें अधमाधम नाहींत असें मानील ? केवळ तुमच्या ह्या किंवा अशाच प्रकारच्या जुलमास त्रासून व अशाच वैरत्वानें उच्छृंखल होऊन **नानासाहेबा**नें प्रपंच करून स्वार्थानें तुझी खोड जिरविण्याचा इरादा राखिला असेल तर, त्यांत खोटें काय केलें ? या सर्वांचा जेव्हां विचार होतो, तेव्हां तुझीं अतीशय स्वार्थी कर्में, अत्याधम आणि पापी वाटल्यावांचून राहणार नाहींत ! पण मी थोर मनाची. सारें विसरून जाऊन तुला असाधारण मान दिला; तो कशाकरितां ? तूं तुझीं वचनें पाळशील. आणि माझ्या लेंकरांस स्वपराक्रम आणि स्वसामर्थ्य प्रदर्शित करण्यास जी अटक झाली आहे, त्यांतून त्यांस मुक्त करून उन्नतावस्थेंत जाऊं देशील, म्हणून. परंतु मनुष्याच्या लोभाला पारावारच्च नाहीं ! जसजसें अधिक प्राप्त होत जातें, तसतसें तें अधिक उन्मत्त होऊन सद्गुणाला जेथच्या तेथें दाबून टाकून बेधडक धडधडीत अधर्म कर्में करूं लागतें. परंतु असें होणें चांगलें नव्हे. हें बड्या राजसत्तेला मान्य–उत्साहानें मान्य–होणारच नाहीं ! आतां ही गोष्ट खरी आहे कीं, संप करून ऐक्यतेचें प्रदर्शन प्रत्यक्ष दर्शविलें, तर धरणी कंपायमान् होईल ! परंतु असा अनुपम कर्मजय देखील, सहज

श्रमानें दर्शन देईल असें माझें मत नाहीं. तुझी राजसत्ता स्थापन झाल्यानंतर **महाभारत** दुःखांतून कांहीं मोकळें होऊन, विचार करण्यास शिकलें. पण मदांध होऊन तूं असें म्हणत्येस कीं, माझ्या राज्यांत "वाघ आणि बकरीं एकाच स्थलीं पाणी पितात, त्यांला कोणाचेंही भय नाहीं!" हें फक्त युक्तीचें चांगलें बोलणें. दिसतें सुचक! परंतु तें आज सकल प्रजेंत सर्वमान्य व योग्य नव्हे! आणि असें बोलणारें तरी कोण आहे? ते श्रीमंत! अग, त्यांनीं आपल्याच लाभापुर्ता विचार करून आपलें पोट भरण्यासाँठीं तुला केवळ सर्वोत्तम ही कोरडी उपमा दिली आहे! तींत कांहीं अर्थ नाहीं. आतां मात्र ती समयीं खरीही असेल!! कारण वाघ आणि बकरीं एक जागीं पाणी कां पिणार नाहींत? जर वाघाचे दांत पडले, आणि पंजे—विषयुक्त आणि वैरसंपन्न पंजे—कापले गेले; तर बकरें सहज त्याबरोबर स्पर्धा करील! त्यांत नवल कसलें? जर एखादा मुरदाड कुत्रा वाघाच्या तोंडावर उड्या मारीत बोकाळतो, किंवा थुंकतो आहे; तर बकरेंही आपला पराक्रम सहज दाखवील! बेहेन! **ब्रिटानिया**? वाघ ते केव्हांच गेले! आतां राहिले आहेत, ते सारे **बोकडच**!!! अशा समयीं सर्व एकाच जागीं पाणी पितील, यांत आश्चर्य करण्यासारखें काय आहे? जेव्हां वाघ हयात होते, तेव्हां जर तूं आपला पराक्रम दाखविला असतास; तर कोणी तरी कबुल करतें. पण आतां जर तसा कोणींच राहिला नाहीं, तर तूंच सर्व मान्य महाराजपदाला योग्य व प्रबल होऊन सर्व श्रेष्ठ राज्यरक्षकपद धारण करून बसणार! जर का पूर्वींचे

वाघ जिवंत असते, तर "**महाराज**, पद धारण करण्याची वेळ दुर्लभच होती ! राहिले साहिले वाघ दुर्बळ होऊन (नखें, पंजे आणि दांत नाहींसे झाले, आणि शरीर अशक्त झालें.) कमजोर झाले, यामुळेंच तूं स्वच्छंद, यथेच्छ व निरंकुश, वाग-ण्यास सामर्थ्यवान् झालीस."

हिंदराणी बोलतां बोलतां थांबली. तेव्हां व्याघ्र भ्रष्ट-बुद्धीनें आपला विजय झाला, असें समजून मोठ्या डौलानें उन्मादभरित फारच मोठ्यानें गर्जना करूं लागला. तेव्हां **ब्रिटानिया**चें वहान जो सिंह, त्यानेंही चांगल्या जोमानें आणि वैरत्वानें उत्साही होऊन, त्याचें प्रत्युत्तर दिलें. ह्यामुळें त्या दोन्ही उन्मत्त प्राण्यांच्या ध्वनिप्रतिध्वनिनें अवघें जंगल आणि पर्वतश्रेष्ठ विंध्याचल गाजून राहिला.

"हें तुझ्या विचाराचें अज्ञान आहे **हिंद**!" **ब्रिटानिया** इतर समयाहून फार नम्रतेनें, शहाणपणानें आणि खजिल होऊन—जसें दुःख आजपर्यंत तिनें कोणत्याही प्रसंगीं दाखविलें नव्हतें, तशा दुःखानें—ह्मणालीः—"तुझ्या बोलण्यांत सत्यांश अतिशय आहे, ह्याचा मी स्वीकार करित्यें. पण हेच तुझे सारे विचार—मनस्वी नव्हे. परंतु खऱ्या मताचे आहेत. ह्मणून तूं, तुझी पायमल्ली फारच सत्वर करिशील! तुला फार भयंकर जखमा पडल्या, त्याही याच विचारानें! तुझ्या सुंदर मुखकम-लावर खणाखण तलवारी चमकून दुःखमय फाट पडली, तीही अशाच विचारानें!! ह्याच विचारलहरींत तूं गढून जाऊन, अन्योन्यांच्या हजारों लढाईंत तुझ्या पुत्रांचें रक्त वाहविलेंस;

पायमाल झालीस, आणि तुह्मीं सर्व दुःखानें मेलां!!! ह्या यःकश्चित कारणाकरितांच, तुझ्या महान् महान् योद्ध्यांचे आणि सुभट राजांचे प्राण गेले; तुह्मीं पीडित झालां आणि तुमची अत्यानर्थक हानी झाली. तुझी कर्मशक्ति असाधारण आहे. मानसशक्ति देखील अद्भुत, विचित्र व प्रतापि आहे. हें जरी खरें, तरी ती सतेज व दिव्य असून, ही तूं भ्रष्ट होऊन अशाच वाईट विचारानें अधम स्थितीस पोहोंचलीस; असें मला तर स्पष्ट वाटतें! जेव्हां मी माझी अद्भुत कांति, तुह्मां सर्वांस दाखविली. माझ्या अलौकिक पराक्रमी योद्ध्यांसह रणरंग उडविला. फार तर काय? पण प्रत्यक्ष तुला स्वाधीन करून घेण्यास आल्यें. तेव्हां तूं दिव्य पराक्रमी असून माझ्या विरुद्ध कांहीं तरी करण्यास बिलकूल शक्तिमंत कां झाली नाहींस? तुझ्या अशाच विचारामुळें! युद्धकला आणि राजनीतीच्या पूर्ण कुशलतेनें मीं अनेक प्रकारची व नाना तऱ्हेची उलथापालथ केली; पायमाल झालेल्या—अव्यवस्थित स्थितींत येऊन पडलेल्या—अनेक राज्यांच्या होणाऱ्या नाशास प्रतिबंध केला. चांगल्या पायावर पोक्त राज्यव्यवस्था स्थापन केली. अवघ्या जगास माझी समृद्धिमान् आणि बलसंपन्न शक्ति दाखविली. **भारत**-भूमीकरितां नवीन पद्धति चालविली. ह्या साऱ्या खटाटोपी मला कां कराव्या लागल्या? तुझ्या अज्ञ विचाराकरितां. तुझ्या धीट मनाच्या कर्मशक्तीचें हेंच नीतिवाक्य होतें. आणि तूं आपल्या तरवार-बहादुरांस अशाच प्रकारचें शिक्षण देत आली होतीस कीं, "जीवित अल्प आहे; म्हणून यशस्वी कर्में करा" अथवा "मानभंगाहून मरण बरें" असें तूं प्रफुल्लित आणि थोर मनानें जेथें तेथें बोलत

असस. ह्या निरर्थक जयानें—घमेंडीनें—तूं खुष झालीस, म्हणून तुझा स्वतःचा सर्व नाश झाला; संकटांत आलीस; आणि लष्करांतील प्रतापि महान् महान् योद्ध्यांचा संहार करविलास! राजखटपटी कशा कराव्या? कशा लटपटीनें आपला कार्यभाग साधावा? सल्ला मसलत करायची झाली, तर कशा हिकमतीनें करावी? शांतता कशी ठेवावी? हें फुकट्या तोंडानें सांगायला तूं वाचाळ व चपळ आहेस इतकेंच! पण तेंच काम हातानें कसें करून दाखवावें? ह्याविषयीं तुला काडीइतकें ज्ञान नाहीं! किंवा असेल तर तें, तूं आजपर्यंत कधींही दाखविलें नाहींस. कोणकोणत्या युक्ति प्रयुक्तीनीं जयी व्हावें? हें तुझ्या राजनीतिवेत्त्यांस मुळीं माहीतच नाहीं! त्यांचें जें एक कर्म चाललें आहे—मात्र पुस्तकद्वारें दर्शन—तें आहे. पण आपल्या हातानें त्यांच्याकडून धूळ देखील व्हायची नाहीं! कर्मजय संपादन करून अविचलित व अक्षय्य राजसत्ता कशी चालवावी? आणि स्वतंत्रता कशी उपभोगावी? हें एकालाही ठाऊकच नाहीं. अथवा तुझ्या मतानें असेल तर, त्यांनीं आजपर्यंत तसें कांहींच करून दाखविलें नाहीं! सोळाव्या सतराव्या शतकांत माझे देखिल विचार, ताई, तुझ्या सारखेच होते! जणूं, मीं पण—प्रतिज्ञाच—केली होती कीं, तरवारीची शक्ति दाखवून तरवारीच्याच जोरावर मनःपूत कर्में करावीं. आपसांतल्या आपसांतच युद्धध्वनी गाजवून सोडावा! मी जेथें तेथें नाचत, बागडत, भटकत फिरत होत्यें; आणि असे बालखेळ करून फार फार अभिमान मानीत असें. परंतु **मार्स्टन**-

मूर,* **नेसबी,**† **प्रेस्टन्पन्स,**‡ आणि **क्यालीडोन**च्या§ "सिव्हिल वार" (धर्मयुद्ध) पासून मी फार शहाणी होऊन बसल्यें. जर मीं माझ्या पूर्वींच्या विचारांस चिकटून राहिल्यें असत्यें, व त्यांचा अंमल मोठ्या जोमानें चालविला असता, तर काळांतरानेंच कां होईना? पण आज ज्या स्थितींत अवघें जग मला पहातें आहें; त्या स्थितींत तें मला कधींही पहातें नसतें! नाना प्रकारांनीं मी जेव्हां पायमाल होऊन पराभव पावल्यें, तेव्हांच माझे त्या काळचे अनर्थकारक विचार बदलले; आणि त्यानंतर नियमित व सयुक्तिक प्राचिन प्रसिद्ध—पंडित राजनीतिवेत्त्यांच्या (Philosopher Statesmen) नीतीच्या विचारानें वर्तण्याचा मीं निश्चय केला. आतां मी फार मजबूत राज्यव्यवस्था ठेवूं शकल्यें आहें. सर्वांवर सरदारी चालविण्यास शक्तिमान् झाल्यें आहें आणि मजबूत राज्यव्य-

---

***मार्स्टनमूरची** लढाई इ० स० १६४४ तारीख२जुलई रोजीं झाली. त्यांत राजपक्षाकडून **प्रिन्स रूपर्ट, मार्क्विस ऑफ न्युक्यासल** आणि पार्लमेंटरी सेनेकडून **अर्ल ऑफ लीवन** व **ऑमवेल** होता. त्यांत पहिल्या **चार्लस**चा पराभव झाला.

† **नेसबी**चें युद्ध पहिला **चार्लस** आणि **ऑमवेल**; व **फेरफॉक्स** आणि **ऐरीन** यांत झालें. त्यांत **चार्लस** पडून "सिव्हिल वार" चा शेवट झाला. सन १६४५ तारीख १४ जून.

‡ **जेकोबैन** टोळीवाल्यांनीं बंडावा करून युद्ध सुरू केलें. त्यांबरोबर पहिली लढाई सन १७४५ तारीख २१ सप्टंबर रोजीं **प्रेस्टन्पन्स** जवळ झाली.

§ **क्यालिडोन**च्या युद्धानंतर **इंग्लंडांत** "सिव्हिल वार" झाली नाहीं. त्यांतच राजपक्षाचा जय झाला. सन १७४६ तारिख १६ एप्रिल.

वस्था ठेवण्यास समर्थ आहें. तसें जर मी केलें नसतें, तर ज्या कीर्तीच्या सर्व श्रेष्ठ शिखरास आज मी पोहोंचल्यें आहें, तेथें कधींही पोहोंचल्यें नसत्यें. तुझीं आणि माझीं युद्धरंग कर्में एकसारखींच. माझ्या कर्मांप्रमाणें तूं आतां वर्तत आहेस; व मी तुझ्या विचाराप्रमाणें वर्तत होत्यें. परंतु मी तुला खात्रीनें सांगत्यें कीं, माझ्या प्राचिन प्रसिद्ध कर्मांप्रमाणें वागण्यापासून भविष्यकाळीं तूं कांहींएक विशेष पहाणार नाहींस ! आणि जें मिळविलें आहेस, तेंही गमावून आत्महत्यारी होशील!! फार दिवसांपासून तूं, तुझा हेतु काय? याचा विचार केल्याशिवाय अव्यवस्थित पणानें वागत आली आहेस. जेव्हां तुला तुझ्या आबादानीकरितां खऱ्या खुऱ्या लाभाची जरूर होती, तेव्हां मनस्वी तरंगांत तूं निमग्न राहिलीस. आणि जेव्हां द्रव्यसंपत्तिसंग्रहाची आवश्यकता होती, तेव्हां कीर्तीची कलगी आणि लौकिकाचे तुरे लटकावून आनंदानें नाचली बागडलीस—त्यापासून तुला काय प्राप्त झालें ? पुराणप्रसिद्ध **कथांनीं** मनांत मात्र बंड करण्याची स्फूर्ति आली ! अग ? जेव्हां **समयोपयोगी** वस्तु अत्यावश्यकतेची होती, तेव्हां **तात्कालिक फलदायक** वस्तु मिळविण्याकडे तूं लक्ष्य लाविलेंस ! परदेशी, परधर्मी, उच्छृंखल, क्रूर व निर्दय अशा **बलसंपन्न** लोकांसन्मुख खऱ्या भावानें, खऱ्या शौर्यानें, आणि स्वदेशाच्या खऱ्या लाभाकरितां, वज्राप्रमाणें दृढतर कोट करून, जेव्हां अचल व अढळ, छाती ठोकून उभें राहण्याची आवश्यकता होती; तेव्हां प्रांता प्रांतांत निरर्थक सुख,

मान व मोठेपणा मिळविण्यासाठीं आणि स्वरूपवती कांता वरण्याकरितां तुझे वीर व्यर्थ परस्परांत लढून मेले ! तुझ्यावर जेव्हां **शहाबुद्दीन घोरी** चाल करून आला, तेव्हां ज्या संपाची—ऐक्यतेची—जरूर होती, ती तूं तेव्हां, तुझ्या प्रजेंत कां बरें केली नाहींस ? फक्त क्षत्रियांसच युद्ध करायला पाठविण्यास कां तत्पर राहिलीस ? देशाची धुळधाण होणाऱ्या प्रसंगींही, दुसऱ्या शूर वीरांस समरंगणांत जाण्यास कां उत्तेजन दिलें नाहींस ? मला वाटतें, आपआपसांतील अनैक्यामुळें तुझ्या कपाळावर तूर्तचीं हीं दुःखें पडत आहेत ! त्यावेळीं जर तूं सावध राहिली असतीस, भावीस्थितीचा विचार मनांत आणिला असतास, आणि त्याप्रमाणें वागून एकाच्या सुखापेक्षां अनेकांच्या सुखाची इच्छा धरिली असतीस, तर हल्लीं जशी तुझी अवदशा झाली आहे; तशी कधींही झाली नसती ! तूं तुझ्या हातांनीं तुझा स्वतःचा नाश करून घेतलास—युद्धविजयगर्वांत तूं मिथ्या मदोन्मत्त होऊन राहिलीस—दुसऱ्या प्रजेकडून तुजवर जी सन्मानाची वृष्टि झाली, ती तुझ्यानें सहन करवली नाहीं—तूं त्यांतच गर्क होऊन तर्कविरहित राहिलीस.—देशांतील कला कौशल्यावर पूर्ण संतोष मानिलास; पण युद्धाचा समय कसा प्रबल यावयाचा आहे? आणि कशा शूर, वीर, प्रचंड, भव्य मूर्तीशीं टक्कर द्यावयाची आहे? याचा तूं बिलकूल विचार केला नाहींस! त्याचीं आतां हीं फळें भोगत्ये आहेस. बाई? मानाच्या मदांत गढून गेल्यामुळें तूं प्रसंगाला शहाणी झाली नाहींस. पुढें कोणत्या कला कौशल्याची आवश्यकता लागेल ? याचा तरी

विचार करावयाचा होतास ? पण नाहीं ! केवळ नवे नवे तरंग—रामायण भारतांतील ऐतिहासिक कथा, वार्ता आणि इतर कल्पित काहाण्या, यांच्या रंगांत दंग होऊन तुझें खरेंखुरें "**सामर्थ्य**" कशांत आहे?—ज्याचा विचार केलाच पाहिजे होता—तें तूं विसरलीस! तुझें खरें खुरें लष्करी "**सामर्थ्य**" कशांत आहें? याचा जर तूं प्रथम विचार करिती असतीस, तर आज तुझी अशी कीर्तिविहीन व खराब अवदशा होतीच नसती ! तुझें लष्करी "बळ" **कल्पित** होतें ! मग, माझ्या **खऱ्या** लष्करी "बळाशीं" तुझ्यानें कसा टिकाव धरवेल? माझें लष्करी "बळ" विद्यावर्धनांत, कलाकौशल्यशोधनांत, व्यापारवृद्धिनियमांत, निश्चय आणि नीतींत, समय आणिं शक्तींत, आणि राज्यबंधनांत ओतप्रोत भरून राहिलें आहे; त्याविरुद्ध तुझें मनस्वी "बळ" कधींही टिकाव धरण्यास किंवा टक्कर मारण्यास सामर्थ्यवान् होणार नाहीं ! हें माझें म्हणणें तूं खऱ्या मनानें स्विकारशील, अशी माझी बालंबाल खातरी आहे. तुझी युद्धनीति व रीति आणि व्यूहरचना व तरवारबहादरपणा, कांहीं निराळ्याच प्रकारचा होता; आणि तुझ्या रणसंग्रामनीतीच्या **पद्धति** आणि **युक्ति** अशा होत्या कीं, **पश्चिमे** कडील नव्या सुधारलेल्या शस्त्रांशीं त्यांचा कधीं टिकाव निघूंच नये ! तूं लाखों वर्षांपूर्वीं रचलेली युद्ध कर्मनीति—ज्याच्या सत्यतेविषयीं वर्षानुवर्ष तक्रार चालावयाची ती—जशीच्या तशी राखण्याचा स्वभाव ठेविलास. परंतु बाई ! **पश्चिमे**कडील गुणकर्में **पूर्वे**कडच्यासारखीं किंवा पूर्वीचीं नव्हत! हें त्वां

प्रथमच जाणलें पाहिजे होतें. तें तूं जाणिलें असतेंस, तर अग्न्यस्त्राचा मार कसा सहन करावा? आणि कसें वरुणास्त्र वापरावें? ह्याचा तुला सहज अंदाज करितां आला असता! परंतु महाभारत रामायणाच्या **काल्पनिक** युद्धनीति—ज्या कदाचित् खऱ्या असतील, तरीही या काळीं त्या निरुपयोगी झाल्या आहेत; हें तुझ्यानें नाकबूल करवणार नाहीं!— उडत्या रंगांतच, तूं तुझें खरें **तत्वबल** आणि **शौर्यबल** आहे; असें मानिलेंस. तूं विचार कर. **काल्पनिक** वस्तु कधीं सत्य होईल काय? अथवा गत कालांत जी युद्धनीति, पूर्ण तेजस्वी असें दृग्गोचर झालें होतें; ती सांप्रत काळांत तशीच निवडेल; याला कांहीं प्रमाण आहे? अशा पोरकट विचारानें तो **नेपोलियन** (हें नांव घेतांच, **ब्रिटानिया** परिकंपित झाली!) जर वागता, तर आज साधारण मनुष्यपुत्राच्या कीर्तीहून त्याचा लौकिक जास्त झालाच नसता. पण हे विचार त्यानें समूळ काढून टाकिले, आणि प्रत्यहीं नवी नवी व्यूह रचना, ऐकून, पाहून, शिकून, आणि अनुभवून, यश संपादन केलें. काय ग? ज्याविषयीं तूं घमेंडी बाळगून राहिली आहेस, ती तुझी मोठी थोरली **शस्त्रास्त्र** विद्या, **सोमनाथा**चा नाश करणारा, भित्रा, व धर्मांध, **गिझनी**चा **महमद** क्रोधावेषानें तुझ्या अचल कोटांचा आणि जबरदस्त किल्ल्यांचा चुराडा करीत आला; तेव्हां कोठें गेली होती? तेव्हां तुझीं तीं सर्पास्त्रें, गरुडास्त्रें, मोहास्त्रें व पाशुपतास्त्रें कोठें गेलीं होतीं? किंवा हीं तुमचीं गमतीचीं नांवेंच मात्र आहेत!

त्यांपासून उपयोग कांहींच नाहीं ? आणि त्यामुळेंच मला वाटतें, तूं जशीची तशीच कोरी राहिली आहेस ? फार लांब कशाला ? जेव्हां मी प्रवेश केला, तेव्हांही तूं अशाच कारणानें, भयानें कावरीबावरी होऊन नेभळ्यासारखी राहिलीस! नवें कांहींच केलें नाहींस. तेव्हां तुझे बांके राव आणि तरवार-बहादर वीर कोठें होते ? तुझें इकडे तिकडे विस्कळीत झालेलें, शेंदाड शिपायांचें सैन्य, झगझगीत पोषाख, शीरपेंच तुरे, कलग्या आणि अंगावर कड्यांचें चिलखत धारण करून, हातांत जडावाच्या मुठीच्या तलवारी घेऊन, पाणीदार, खिंका-ळणाऱ्या व रुमझुम चालणाऱ्या घोड्यांवर स्वार होऊन, माझ्या पायदळ तुकडी—(Infantry) जें लष्कर केवळ खाकी काळा पोषाख केलेलें, आणि श्रृंगार रहित, परंतु प्राणघातक "स्नायडर रायफल" घेतलेलें—समोर आलें ; तेव्हां रणक्षेत्रांत माझें सैन्य शंभर वार पुढें सरलें नाहीं तोंच, तुझ्या कलगी, तुरे, आणि बाहुभूषणांनीं शोभित झालेल्या सैन्यास धूळ चाटण्याचा प्रसंग आला ! तो कां ? लष्करी "बळ" तुझें "खरें" पण तें खरें नव्हे ! तर ? **खोटें** !! अग ? ज्या ज्या नियमांची, ज्या ज्या युक्तींची आणि ज्या ज्या कवायतीच्या पद्धतींची माहिती पाहिजे, त्या विषयींच तें अज्ञान ! मग तें माझा हल्ला कसा सहन करूं शकेल ? पुष्कळ वेळ आह्मीं दोघांनींही खऱ्या शर्यतींत घोडे दौडिले. पण त्यांत एकीचा घोडा नियमित व पाणीदार ; आणि एकीचा अनियमित व बलवान् ! ह्यामुळेंच तूं शर्यतींत हारलीस ; आणि मी जय मिळविला. "तूं घालविलेंस आणि मी मिळविलें !"

म्हणून जें मी म्हणत्यें, तें हेंच? अग! ज्या वेळीं साम दाम भेदाच्या युक्तीनें चालण्याची तुला जरूर होती, त्या वेळीं अविचारानें तूं दंडाचा मार्ग अवलंबून बसलीस! त्याच मूर्खपणानें तुझा नाश झाला; आणि पांच हजार मैल लांबीच्या परदेशी, परधर्मीयांची तूं ताबेदार होऊन बसली राहिलीस!"

"तुझें म्हणणें सत्य आहे" असें **महादेवी** शोकार्त शब्दानें म्हणाली. तिनें आपल्या ढालेखालीं स्वमुखारविंद झांकिलें. आणि तिच्या नेत्रांतून एकसारखा बाष्पबिंदूंचा ओघ सुरु होऊन तो, तिच्या चरणारविंदाचें प्रक्षालन करूं लागला.

तेथें जमलेलीं सर्व पात्रें स्तब्ध राहिलीं! दशदिशा शांततेनें परिव्याप्त झाल्या. तेव्हां **ब्रिटानियाला** आपली प्रतिस्पर्धी दिलगिरींत आहे असें दिसतांच, फार वाईट वाटलें! **हिंददेवीची** अशी दुःखार्त झालेली स्थिती पाहून, तिच्या मनास फारच लागलें! त्या वेळीं ती **हिंदराणीवर** जय मिळविण्यास समर्थ होती; पण तो कसा? पडल्यावर पाय दिल्याप्रमाणें! परंतु तोही तिच्या स्वभाववृत्तीच्या बाहेरच होता. असो, जी एक वेळची जगताची जननी, जिच्या नेत्रांतून ह्या वेळीं अश्रूंचा प्रवाह वाहत आहे, जिचें उष्ण रक्त शोकाच्या थंडाव्यानें थिजून गेलें आहे, अशी जी स्वरूप सौंदर्यवान् एकच मोहिनी. जिच्या प्राप्तीची दुनियेंतील दरएक महाराज्य इच्छा करितें. अशी जी महादेवी **हिंद**, तिच्या दुःखांत तिजवर आपण विजय मिळवून, त्याचा लाभ संपादन करावा! हें **ब्रिटन** देवीस बरें वाटेना! तरी **हिंददेवीची** अशी अवस्था पाहून **ब्रिटानिाय**

हिंद ग्रंथ संग्रहालय. १००

दुःखी झाली असा अर्थ नाहीं. तर जसा एखादा धर्मचुस्त मुसलमान एखाद्या हिंदूला आपल्या समक्ष मरतांना पहातो, अथवा एखादा रोमन क्याथोलिक धर्मातिल धर्मांध, एखाद्या "रिफॉर्मर" ला हिरव्या झाडाशीं जळतांना पहातो, आणि त्याला जितकी लटपटीत दिलगिरी वाटते, अथवा एखादा नदीतटावर उभा असलेला मनुष्य, दुसऱ्या एखाद्यास नदींत बुडतांना पाहून, त्याचा उद्धार करण्याची मुळीच खटपट न करितां, मनांतल्या मनांत हळहळत दिलगीर आहें, असें दाखवित असतो; तसाच हा ब्रिटानियाचा फुकट्या दिलगिरीचा प्रकार होता! कदाचित् ब्रिटानियेच्या मनांत असें तर आलें नसेलना! कीं, न जाणों, माझीही केव्हांतरी अशी स्थिती होणार नाहीं म्हणून कशावरून? असो, त्यामुळें तिच्या नेत्रांत माधुर्य उद्भवलें! इतकें सांगायला आपलें काय जातें?

ब्रिटानियाच्या शेवटील वाक्यामुळें हिंददेवीच्या मनास फारच भीति उत्पन्न झाली! तिचें, अतुलनीय सामर्थ्य एका क्षणांत लटपटून जाऊन क्षीण झालें. देशोन्नतीची अमोल्य संधी व्यर्थ गेली. थोड्यांचेंच सुख पाहून आणि स्वार्थभरित कर्में करून, आपण खरें बल घालविलें. आपसांतील अनैक्यास प्रतिबंध केला नाहीं. धर्माच्या अनेक मतभेदांमुळें प्रजेला शौर्यहीन होऊं दिलें. हे सर्व विचार एका मागून एक तिचे मनांत येऊं लागले. आपण कोण होत्यें? आणि काय झालें? ह्या विचार लहरींनीं तिच्या मानसांत फारच धांदल होऊन जाऊन तिला, बराच वेळ कांहींएक सुचेनासें झालें. व तिचीं

सर्व इंद्रियें स्तब्ध होऊन, ती जडभरतासारखी कांहींच न बोलतां तटस्थ उभी राहिली!

हिंददेवीनें चाऱ्ही दिशांस आपली सौम्य दृष्टि फेंकिली. तेव्हां तिला कांहींतरी हितकर, शानदार, व नवीन दूषण-प्रयुक्ति सुचली असावी; असें दिसूं लागलें. तरी तिनें ती सांगावी किंवा सांगूं नये? ह्या प्रश्नांचा बराच वेळ, आपल्या मनाशींच विचार केला. आणि शेवटीं, काय होणार असेल तें होवो; असा निश्चय ठरवून गांडिवधर **अर्जुना**च्या धनुष्यापासून जसे असंख्य बाण सुटत असत म्हणून सांगतात. त्याप्रमाणें उतरलेल्या चेहेऱ्यानेंच कां होईना?—शद्धशरवर्षावास प्रारंभ केला. अश्रांत वैरत्वाच्या खुमारींत मधुर व अस्खलित वाणीनें **हिंददेवी** म्हणाली:—

"फार झालें—पुरे कर. **ब्रिटानिया**!" इतकें म्हणतांच, तिच्या प्रतिस्पर्ध्याची शांतता एकदम भंग पावली! "बस्स कर. मी तुला तुझ्या लष्करी बलाच्या सामर्थ्यप्रतापांत सोडून देत्यें. जा, राज्य कर! जी भूमि तूं तुझे बाहुबलप्रतापानें संपादन केली आहेस, त्या परभूमीवर!! तूं जें म्हटलेंस, तें यथा-न्याय आणि सत्य आहे. माझे दुर्दशेचें बीज माझ्या छातींत उद्भवलें होतें, आणि आतां मी त्याला तेथेंच समाविष्ट करित्यें. परंतु एक वेळ मला इतकें तरी सांगूं दे कीं, तुझे पुत्र व **आफगाण, तातार** यांत बिलकूल तफावत नाहीं! त्यांच्या आणि तुझ्या गुणकर्माविषयीं मीं जें सांगावयाचें, तें पूर्वी सांगितलें आहेच. तरी फक्त इतकाच भेद आहे कीं, **आफगाण** आणि **मोंगल**

ह्यांनीं आपल्या बाहुबलसामर्थ्यानें जो देश मिळविला, त्याच्च देशांत ते निवासी झाले. माझी भूमि "माझ्या नाशाचें फल" आहे. असें पाहून त्यांनीं जरी जिंकिली; तरी माझ्या भूमीवर राहून माझेच किल्ले त्यांनीं शृंगारिले. आणि त्यांवर आपला जयध्वज फडकावून ते हमेशचे मद्देशनिवासी झाले. परंतु तूं इतकें समाधान मान कीं, तुझे पुत्र अद्यापि तुजविषयीं स्वामिभक्ति धरून राहिले आहेत! ते तुला चहातात, तुझीच पूजा करितात!! पण हे गर्विष्ट मुग्धे? खेदानमेदानचा अग्नि हिंदच्या या आरक्त झग्यांत चिरकाळचा धुमसत राहिला आहे. आणि एक दिवस—आणि तो एकाच दिवशीं—हिंदच्या कोमल पण फाटलेल्या छातींतून आपलें अलौकिक दिव्य तेज प्रगट करीलच करील! तेव्हां तूं पहाशील कीं, हिंदचा शोक व दुःख, अनिवार व अवर्णनीय होतीं!! जशी मनुष्याच्या जिंदगीची अवधी असत्ये, किंवा कोणत्याही वस्तूला झाली तरी सीमा म्हणून असत्येच; तशीच बादशाहीची पण अवधी असत्ये. अनियमित अशी कोणतीच चीज ह्या जगांत नाहीं. तूंग कोठें चिरकाळ येथें रहाणार आहेस? ब्रिटानिया? तूं काय समजली आहेस? अग! तुझीं स्वतःचीं मुलें लेंकरें हळुहळू ह्या माझ्या देशांत वसतीस्थानें करूं लागतील. माझ्या भूमीला आपल्या जन्मभूमीप्रमाणें सन्मान देऊं लागतील. हळुहळू त्यांचें लक्ष्य मजविषयीं आस्थापूर्वक उच्छृंखल होत जाईल. ज्या काळाच्या भयंकर पंजाखालीं भरतखंडाचें नशीब दबून राहिलें आहे, तो काळ जेव्हां आम्हांवर कृपा करील; तेव्हां जसें

अमेरिकेच्या युनैटेड स्टेट्समधील नव्या इंग्लंडच्या रहिवाशांनीं, तुझ्या विरुद्ध, स्वभूमीच्या रक्षणाकरितां हत्यार उचलिलें; त्याप्रमाणेंच तुझे पुत्रही शस्त्रास्त्रसज्ज होऊन माझ्याकरितां युद्धार्थ उद्युक्त होतील. तुझ्या नीतीची जी सुधारणा आहे, आणि ज्यामुळें तूं मेठेपणा मानीत आहेस, ती जेव्हां माझ्या पुत्रांत येईल; तुझ्या पुत्रांची उत्कृष्ठ, सर्वोत्तम, तीक्ष्ण बुद्धि, आह्मांत येऊन ते अनुपम कार्यें करितील—जेव्हां त्यांच्यांत दैहिक सामर्थ्य येईल; आणि ते आपलें राजबंधन तुझ्या बढाईखोर —गर्विष्ट—राजबंधनासारखें करितील; पश्चिमेस आणि उत्तरेस उदय पावलेले तारे, समुद्राच्या स्वामित्वाकरितां परस्परांत लढाई करितील; तेव्हां मी तुझ्या समोर येईन !!! ब्रिटानिया स्मरण ठेव. विसरूं नकोस. असा वेळ येईलच येईल. वाई ? असा समय येईपर्यंत माझीं भयंकर शस्त्रें—ज्यांना तुझ्या अनिवार शस्त्रांनीं खंडित केलें आहे, आणि तुझें प्राणघातक अग्न्यस्त्र केवळ माझ्या भुशुंडीचा नमुना आहे, तशीं शस्त्रें—धारण करून ते येतील; तोंपर्यंत माझ्या या शस्त्रांना माझ्या पट्टचांत मीं म्यान करित्यें. आणि जोंपर्यंत तसा प्रसंग येणार नाहीं, तोंपर्यंत त्यांचा उपयोग करणार नाहीं ; समजलीस ? जेव्हां माझे पुत्र, पूर्वीच्या महान् ऋषि राजनीतिवेत्त्यांसारखे होऊन उठतील, जेव्हां ते, माझ्या प्राचीन प्रसिद्ध योद्ध्यांसारखे गाजतील ! जेव्हां कालांतर झालें तरी फरक न पडणारें, असें तत्वज्ञान अवतरेल; जेव्हां विद्येचें भांडार आणि ज्ञानाचे पिते आगमन करितील; अग ! जेव्हां यांत्रिक कला

निपुण माझे पुत्र, देशोन्नतिप्रीत्यर्थ कांहीं तरी करितील; जेव्हां व्यापाराच्या कारखान्यांत अवाढव्य धमधोकार काम चालेल; जेव्हां राजबंधनानियमांत माझी प्रजा प्रवीण होईल; आणि जेव्हां तुझे सद्गुण (!)—ज्या कारणानें तूं तूर्त मगरूर झाली आहेस ते—माझ्या पुत्रांत येतील; तेव्हां मी तुझ्या समोर येऊन आलिंगन करीन. समजलीस ? तोंपर्यंत **जय श्रीरंग !**"

ब्रिटानियाला हीं कटाक्ष वचनें अनुकूल वाटलीं नाहींत. ह्यामुळें ती अतिशय त्वेषानें आणि वैमनस्यानें जबाब देऊं पहात होती. इतक्यांत, आकाशांतून गंभीर व सुंदर नाद ऐकूं येऊं लागला. त्यासरसें दोन्ही वीरात्म्या तक्रारी करणारांचें ध्यान, त्या दिशेकडे वळलें:—

विजय रंग ! विजय रंग !!!

पद. राग पिलु, ता०धुमाळी.

विजय रंग ! विजय रंग ! विजय विजय जाणा ॥

स्वतंत्रतेच्या सुरम्य मंजुळ, वाणीतें सन्माना ॥ धृ० ॥

स्वतंत्रतेची सुखद सुरसही, वाणी प्रेमभरानें ॥

पंडित कवि तें ग्रंथकार कीं, गाती आनंदानें ॥

जेथें जेथें झालें आहे, वास्तव्यहि तें जाणा ॥

स्वतंत्रतेचें, सौख्य विलासां, नाहीं तेथें गणना ॥

"सुदुःख हारक, भक्तजनांची, स्पष्टचि देवी आहें ॥

सेवा तीही शिरार्पणानें, फलद मर्म कीं, हो ! हें ॥

निज पुत्रांच्या रक्ता प्याली, भूमी जननी साच ॥

मत्प्रात्यर्थें, प्रेम सुममता, त्यागा कारण मींच ॥

प्रसन्न झाल्यें दिव्य धरुनियां, देहातें या स्थाना ॥
सुवर्णभूमीं प्रेमानंदें, वसती झाल्यें माना ॥
संकट वां सर्व घालवीं, क्लेशांतें संहारीं ॥
सद्गुण वृद्धि करुनी होत्यें, नित्य जना सुखकारी ॥
दासपणांतुनी देशालागीं, सत्वर मीं दवडीत्यें ॥
समृद्धिवैभव सकल स्थलांतचि, सहजहि वर्षावीत्यें ॥
एका ठायीं नित्य अचल हो, माझें राहणें नाहीं ॥
न्याय धर्मपथ नीती जेथें, तेथें वसणारी ही ॥
विवेक सेवीं. सेवेलागीं, सुफल सर्वही दे कीं ॥
कष्ट विघ्न ही दवडुनि करित्ये, जयजयकारा लोकीं ॥"

विजय रंग ! विजय रंग !!!

लगलाच हा गंभीर आनंदमय नाद—ज्यापासून कोणाही स्वदेशभक्ति जाणणाऱ्या, स्वतंत्र चित्त, देशप्रीतिकर व देशाभिमानी वीरपुरुषाचे अंतर्बाह्य शरीरांत आनंदशोणित सत्वर उत्साही व्हावें; असा, अति सुस्वर व मोहक शब्द—बंद झाला. आणि त्याबरोबरच एक अतीशय वेगवान् आकृति—अग्नीसारख्या जाज्वल्य, भव्य आणि धिप्पाड गोळ्यावर बसलेली—जिच्या गतीची कल्पनाही करणें, मुष्कील होय! अशी—महान् वेगानें धांवत येऊन जवळच्या खडकास एकदम दाणकन् आदळली! त्या सरसा, जो परम भयंकर आवाज झाला; त्या आवाजानें दशदिशा दणाणून गेल्या! त्या खडकाचे तुकडे होऊन जातात न जातात, तोंच, तिनें त्याच्या आसपास विजयाच्या आवेशानें बंदुकीचे चकचकित दणादण छरे सोडिले.

आणि ती वैरत्वानें समोरच्या पात्रांकडे धांवली. त्या खडकाला ती इतक्या जोरानें आणि वेगानें आदळली असून, आपल्या वाहनावरून बिलकूल ढळली नाहीं. किंवा यत्किंचित् देखील भ्याली नाहीं! केवळ निर्भय बेधडक धांवत येऊन,—युवावस्थेच्या नूतन तेज्यानें आणि प्रौढतेनें—ती त्या भयंकर वाहनावरून मोठ्या ऐटीनें उतरली. आणि चालू स्थितींतील दोन्ही प्रतिस्पर्धी करणाऱ्या—अंतरमित्र असून प्रसिद्धपणें दुस्मन दिसणाऱ्या—पात्रांसन्मुख, त्यांच्या झगड्याचा शेवट लावण्याकरितां गजगतीनें पुढें येऊं लागली.

ह्या नव्या पात्राविषयीं प्रिय वाचकांस इतकें सांगितलें पाहिजे कीं, आमच्या अत्यल्प शक्तिप्रमाणें त्याचें चित्रदर्शन तुह्मांपुढें ठेविलें आहे. आतां, चरित्रदर्शन अनुभवास येईलच.

ह्या नव्या आकृतीचा पोषाख विचित्र होता. जसा या भूमीवर कोणीही कधीं काळीं देखील पाहिला नसेल! तिला पहातांच, प्राचीन प्रसिद्ध **ग्रीक** लोकांच्या खूब सुरतींतून तिनें ही नक्कल तर करून घेतली नसेलना? असें वाटे! ती सुवर्ण सुंदरी होती. तिचा सुसौंदर्यसंपन्न चेहरा, **हिंद**च्या स्वरूपाशीं हुबेहुब मिळता होता. आणि **हिंद**पेक्षां ती विशेष युवावस्थेंत असल्यामुळें, तारुण्याच्या तेज्यानें विशेष दैदीप्यमान दिसे! ती आनंदानें प्रफुल्लित आणि सुखानें मस्त दिसे. ती औदार्यता आणि शौर्यता यांच्या पूर्ण भरांत आली होती. आणि राजकीय रक्त तिच्या नखशिखांत परिपूर्ण भरलेलें होतें. ह्यामुळें, ती नेहमीं नित्यानंदमयच असावी; असें वाटे. तिच्या मुखा-

रविंदावरील शिरा रक्तातिशयानें तरतरीत दिसत होत्या. तिचा वेग कधीं काळींही मंद पडणारा नव्हे. ती सदैव युवावस्थेंत रुळलेली; इच्छित गती गमन करणारी; व प्रमाणविरहित बलवान् होती. त्या अनुपम कांतीची छाती विजयानें उत्फुल्ल झालेली दिसे. तिचा प्रत्येक अवयव कोमल पण मजबूत; आणि फार चंचल होता. तो प्रत्येक काळच्या लालन पालनानें सौख्यदायक दिसत होता. तिच्या मस्तकावरील अतीशय दिव्य, काळ्या, भुर्‍या, व जांभळ्या रंगाच्या केशांची रचना देखील विचित्र होती. बदलणाऱ्या रंगाचें झगझगीत लुगडें, जें, त्या अजित देवीनें परिधान केलें होतें, त्याची इतकी सर्वोत्तम व्यवस्था होती कीं, तिज-विषयीं जरी कितीही लिहिलें, तरी मनाची खात्री व्हावयाचीच नाहीं. कधीं पराभव न पावलेल्या, व न पावणाऱ्या, परम सुशोभित सुहस्तांतील अनुपम सर्वोत्कृष्ट सर्पाकृती कंकणें पाहून, तिच्या पायांची चंचलता पाहून, गुलाबाच्या फुलासारखा हास्य-मुखकमलाचा आरक्त रक्तरंग पाहून, लंकेंत उत्पन्न झालेल्या हस्तिदंताच्या मुठीची चकचकीत, अतीशय धारदार, तीक्ष्ण पात्याची तरवार पाहून, आणि मस्तकाच्या एका भागावर घातलेला **क्रिजीया**चा विचित्र किरमेजी टोप पाहून, कोणाच्याही मनांत **श्रीराम** किंवा **युधिष्ठिर; झर्कसीस*** आणि **फिडियस†;**

---

* **इराण**चा राजा, **डरायस** हेस्टिसचा पुत्र २६५००० मनुष्यांचें सैन्य घेऊन **ग्रीस** देशावर चढाई करून आला आणि **लियोनिडासानें** त्यास मागें हटविला.

† **आथेन्स**चा शिल्पशास्त्री. हा मिनोऱ्याची दिव्य आकृति घडविण्याविषयीं प्रसिद्ध आहे.

हारमोडियस* आणि **प्रेग्झिटिल्स**†; किंवा **पेरिक्लिस**‡ आणि **डिमॉस्थेनीस**§; यांच्या समयाचें स्मरण झाल्याशिवाय राहिलेंच नसतें! त्या काळची **ग्रीक** लोकांची खुबी आणि स्वतंत्रता, ह्यांचाच ती हुबेहुब नमुना होती. तिचा प्रताप, सत्ता व गौरव पहातांच, मानसाचें अतीशयच समाधान होत असे. तिची प्रभावश्री व भव्यकांति ह्यांचें दर्शन होतांच. मिनोहिजहानचें स्मरण होई. तिजमध्यें गफलतीचा अंश यत्किंचित् देखील दृग्गोचर होत नव्हता. सारांश, ती जशी होती,° तशी **हिंद** आणि **ब्रिटानिया** यांपेक्षां शरीराकृतीनें भव्य, उंच आणि विशेष शोभिवंत दिसत होती!!!

तिचा लढाऊ पोषाखही निराळ्याच तऱ्हेचा दिसत होता. एका बाजूचा कंमरपट्टा **रायफल केनन, रिव्हाल्वर, बेयोनेट,** तक्षिण अणीदार भाला, खड्ग, आणि नव्या प्रकारची बुलेट पंप; ह्यांनीं सुशोभित झाला होता. आणि दुसरी बाजू तरवार–त्रिशूळ–फरश–गदा–हल–मुसल–पट्टीश–शतघ्नी व भुशुंडी ह्यांनीं परिशोभित झाली होती. ह्यामुळें तिजकडे पहातांक्षणींच, तिनें, ही तक्षिण कांच्यांची कटीमेखलाच परिधान केली नसेल ना? असा भास होई. टार्पिडो—मेट्रि-

---

* हा व याचा मित्र **एरिस्टोजिट** ह्यानें प्रेसिस्टेटिडि लोकांच्या जुलमांतून स्वदेश मुक्त केला होता.

† **ग्रीक**चा शिल्पशास्त्री.

‡ हा **आथेन्स**चा प्रसिद्ध वक्ता, राजपुरुष आणि सेनापति होता.

§ **ग्रीक** लोकांतील महान् वक्ता. ह्याच्या सारखा आजपर्यंत कोणीही झाला नाहीं. आणि पुढेंही होणें कठीणच!

लियर आणि नीडल गन, हीं तिच्या पाठीवर होतीं. त्यांवरोबरच वज्राची तयार केलेली एक ढाल (जिचा डाव्या बाजूचा भाग तुटला होता!) चैनीनें लटकत होती. इतक्या विजयी अस्त्रांतून तिनें केव्हां केव्हां आपल्या कितीएक मित्रांस, बरींच शस्त्रास्त्रें दिलीं होतीं; व त्यांस विजय मिळविण्यास चांगलें साह्य केलें होतें. जेव्हां तिला असा प्रसंग येई, तेव्हां ती आपला लहरी बावटा आनंदानें उडवून नाचत बागडत असे. तिचा बावटाही अतीशयच मोठा, रक्तवर्ण व त्रिकोणाकृति होता. (वस्तुतः विचार करून पाहूं लागल्यास, ती स्त्री ह्मणजे एक शिलेखानाच होय! त्याचा वजनदार बोजा तशा दिव्य देवीशिवाय मनुष्यसृष्टींतील प्राणी तर काय? पण दैवी भूमीचा प्राणी देखील उचलण्यास कधीं काळींही समर्थ होणार नाहीं!!) त्या बावल्याला मोठमोठ्या बंदुकींच्या गोळ्या आणि गर्भछाटाचे मोठे थोरले गोळे लागून जाडे धसाडे भस्के पडले होते. परंतु त्याकडे पहातांच, तो अगदीं नवा रसरसीत आहे; असें दिसे.

अशा विचित्र, भयंकर, शानदार पोषाखानें, थाटमाटानें, व विजयानंदानें आगमन करणाऱ्या महा देवीस पहातांच, त्यांना हें काय प्रकरण आहे हेंच समजेना! तीं तिन्ही पात्रें अत्यंत आश्चर्यभरित झालीं! जें तें एकमेकांच्या तोंडाकडे थक्क होऊन पहात राहिलें. तिच्या अंगस्थितीवरून, तिच्या मोहक स्वरूपगांभीर्यतेवरून, आणि तिच्या नेत्राची चपलता पाहून, स्पष्ट असें वाटत असे कीं, ही पव्वया अनुभवानें, अत्यंत उल्हासानें,

आणि पोक्त विचारानें, एखाद्या महाभारत कामास मदत करण्याकरितां आली असावी. तिची धिमेपणाची पण आपांआप जलद पावलें उचलण्याची गती पाहतांक्षणींच, ही भावी जयाच्या मोठ्या आशेमुळें इतकी गमतींत आली असावी! अशी सहज खात्री होत असे. तिचें चालणें, बोलणें, व हावभाव हीं इतकीं चमत्कारिक होतीं कीं, त्यांजविषयीं जरी कितीही लिहिलें तरी यथातथ्य वर्णन व्हावयाचेंच नाहीं!!!

अशा पोषाखानें विराजित होऊन आलेल्या राणी देवीला **स्वदेशहितानें** तावडतोब ओळखिलें. त्यानें तिला आलिंगन देऊन तिच्या चरणावर आपलें मस्तक ठेविलें. व **स्वतंत्रतेचे** विजयी शब्द—ज्या शब्दांनीं आकाश दणाणून गेलें होतें. ते शब्द—तो पुन्हा बोलूं लागला. आणि आनंदानें आपला लहानसा बावटा—सफेत रंगाचा आणि लाल टिपक्यांचा —उडवून मोठ्या गमतीनें नाचूं व बागडूं लागला!

हिंददेवी आश्चर्य चमत्कृति दर्शनानें गर्क झाली! तिला हें पात्र कोण आहे? हेंच समजेना! ती त्या देवीला ओळखूं शकली नाहीं. ह्यामुळें ती, कोणत्याही प्रकारच्या मानाचें कांहींच चिन्ह न दर्शवितां, एकसारखी टकमक दिङ्मूढ होऊन तिजकडे पाहूं लागली. ह्यावरून प्रियवाचकांस इतका अजमास करण्यास हरकत नाहीं कीं, तिला, ह्या देवीचें दर्शन प्रथमच झालें असावें; अथवा फार काळच्या विस्मृतीमुळें तिच्या स्मरणांतून तरी ही, नाहीं सारखी झाली असावी! ह्याप्रमाणें **हिंददेवीनें** तिला थोडा वेळ पाहिल्यावर आपल्या

कुळाचा मोठेपणा समजण्याकरितां किंवा दाखविण्याकरितां हीही कोणी कुलवती असावी, असें मानून निकृष्टावस्थेंतच कां होईना? पण आढ्यतेनें आणि आपल्या दर्जाप्रमाणें आदर-सत्कारानें **स्वतंत्रता** देवीला नमन केलें. तेव्हां तें फार मानानें व अतिशय प्रेमानें, नूतन आलेल्या सुहास्यमुखी **स्वतंत्रता** देवीनें स्वीकारिलें. आणि नेत्रसंकेतानें असें सुचविलें कीं, तुझें दर्शन अति दुर्लभ आहे; आणि माझाही तुला तसाच नमस्कार असो !

ह्या नव्या प्रवेशकाशीं **ब्रिटानिया**चें फारच मित्रत्व असावें, असें दिसलें. परंतु हिनें तिला पहातांच, हिचे पाय लटलटूं लागले. ही काण्या नजरेनें, विचक्षणतेनें, आणि संशयी दृष्टीनें तिची वर्तणूक तपासूं लागली. **ब्रिटानिया** मनांत म्हणाली कीं, हिचें येण्याचें कारण पूर्व पद्धतिप्रमाणें जसें संशयी असावयाचें, तसें आतांही नसेलना ? किंवा मला कोण-त्याही प्रकारानें भय उत्पन्न व्हावें, एतदर्थ तर ही आली नसेल? अथवा सहज देखील आली असेल? असो. **स्वतंत्र**-तेच्या वर्तनाची **ब्रिटानिया** पूर्ण अनुभवी होती. आणि तिच्या समागमानें हिला फारवेळ अतीशय दुःख, नुकसान आणि भय उत्पन्न झालें होतें. ह्यामुळें हिनें, तिचें दर्शन होतांच, आपलें हत्यार म्यानांतून काढून हवेंत झुगारिलें आणि **हिंददेवी**कडे येतांना ती जितकी सावध राहिली होती, त्याच्या दसपट सावधगिरीनें व चपलतेनें सुसिद्ध झाली. आणि आतां सलाम-तीचा हात भिडविण्यास विलंब लागणार नाहीं; असें दिसूं

लागलें. **ब्रिटानिया** एकदम वेगानें आणि जोमानें जाऊं लागली. त्या वेळीं जर का **स्वतंत्रता** बाजू सांभाळती नसती, तर दोघीही तत्क्षणींच मैदानांत येऊन थडकत्या. कारण, अजून-पर्यंत तिची पत्राज, शौक, आढ्यता आणि बढाई हे जे तिचे अंतरमित्र, ते तिचा त्याग करून गेले नव्हते!

"कसें काय?" प्रिय **ब्रिटानिया!** किरमिजी टोपाच्या राणीनें खणखणीत आवाजानें आणि मोठ्या शब्दानें म्हटलें:— "तूं येथें काय करीत आहेस? ह्या गरीब बापड़ीला विना प्रयोजन त्रास देत आहेस काय? जर तुला तुझ्या **इंग्लंडांत** चैन उडविली पाहिजे तर जा, जा. नादान! तिकडे फारच चमत्कारिक डाव खेळताहेत. प्रसंग येईल तेव्हां तुला दाखवीन!"

"तूं तेथें असशील, म्हणून मी आशा बाळगीत होत्यें कीं, माझ्या मोठमोठ्या वखारी सलामत असतील!" अतीशय उता-वीळ होऊन **ब्रिटानिया** रडव्या शब्दानें म्हणाली:—"मला वाटतें कीं, त्या उद्भट, उच्छृंखल—तुझे दोस्त आणि माझे पुत्र परंतु माझे दुष्मन **ग**—कीं—**ब्रा**नीं तुला घाईनें बोलाविली असेल! पार्लमेंटांत नवे फेरफार करण्याच्या इराद्यानें अथवा प्रधान मंडळानें शाहनशाही विचारांस व आलिकडीला **आफगाण** लढाईस नाखुष होऊन, कांहीं नवीन दंगल उठ-वून तुला मेजवानीचें आमंत्रण तर दिलें नाहींना? (बाकी **लिबरल**शिवाय अवघे तुझ्या पापिष्ठ विचारांविरुद्धच आहेत! आणि ते तुला सलामत राहूं देतील असें नाहींच!!!) तूं काय टावरगडांत धांदल माजविली आहेस? का विंडसर क्यासल-

मध्यें बंड उठविलें आहेस? किंवा पवित्र चार्टर व प्रतिज्ञेनें बांधिलें असतां, राजसत्ताधाऱ्यांनीं तें बंधन तोडण्याचा प्रयत्न करून, पार्लमेंटाशिवाय राज्य चालविण्याची इच्छा धरिली आहेस? किंवा त्यामुळें प्रजेनें शस्त्रें सज्जकरून हाणामारी चालविली आहे? किंवा रिजंटस्ट्रीटमध्यें नाकेबंदी करून उच्छृंखल पेंढारी व्हीगोनें राज्यास हानी पोंचविली आहे? का व्हाईट हालच्या महालाखालीं डायनामेटचे गोळे रचून चांडाळ उभे राहिले आहेत? अथवा हाइडपार्कमध्यें गेलोटाइ-नचा चौरंग उभा केला आहे? किंवा **आयर्लंडांत** माझ्या सत्तेचा उपमर्द झाला आहे? किंवा **इंग्लंडा**मध्यें भयंकर अव-रोध होऊन, अगदीं **फ्रान्स**च्या प्रजेप्रमाणें तुझा तेथें आदर-सत्कार झाला आहे? किंवा पार्लमेंटमध्यें परस्परांतच स्पर्धा चालली आहे? किंवा माझे प्रियदेवी—शाहनशाह जादी—वर प्रजेचा क्रोध खवळला आहे? किंवा माझ्याच रक्षक सैन्यानें तुझा पराभव केला? सांग, सांग. मला लौकर सांग? कीं, तुझ्या जाण्यानें तेथें काय काय नवीन झालें आहे? **स्वतंत्रते**! तूं तुझी प्राचीनप्रसिद्ध पद्धति आतां सोडून देऊन सर्वांस स्वस्थपणानें राहूं देस. आणि माझ्या मार्गांत अंतराय करूं नकोस!" **ब्रिटानियानें** आपल्या हातांतील लहानशी आर्म-स्ट्रांग पर्वतांत दाबून फार रागानें व घाई घाईनें प्रश्न विचारिले.

"आतां ही वटवट सोडून दे!" **स्वतंत्रता** राणी म्हणाली. "मी कांहीं **हिंद** सारखी नव्हे. समजलीस? मला तूं कोण

समजत्येस? मी परम भयंकर तोफेच्या मारा समोर—जसें तूं आपल्या प्रत्यक्ष दृष्टीनें लांबर्डीच्या मैदानांतील लोदीच्या पुलावरून **नेपोलियनास** पसार होतांना पाहिलें होतेंस, त्यापेक्षांही विशेष बलवेगानें—गमन करीन अशी आहें! आणि अत्यंत अचलतेनें टिकाव काढीन, हुलकावण्या दाखवीन, आणि पाहीन देखील; पण शेवटीं विरुद्ध पक्षाची पायमाल करीनच करीन! माझा शेवटील अनुभव, त्वां **वाटर्लू**च्या रणक्षेत्रांत पाहिलाच असशील! त्या वेळीं जशी मी चांगल्या तन्दुरुस्तींत होत्यें; तशीच आतांही मला तूं पाहत आहेस कीं, नाहीं? माझी नेहमीं एक-सारखी स्थिती असत्ये. ज्या ज्या ठिकाणीं मी वास्तव्य करित्यें, तेथें तेथें अशीच तन्दुरुस्त असावयाची! आणि माझे शरणांगतही अशाच तन्दुरुस्ती उपभोगीत असावयाचे. पहा? ते माझे **युनायटेड स्टेट्स**चे दत्तक? अग! मी तुझ्या कापूस कांतण्या विणण्याच्या कारखान्याचा भंग केला नाहीं. त्यांविषयीं तूं घाबरूं नकोस—-(तें काम वृद्ध आणि अशक्त म्हातारीचेंच होय!) तुझ्या कपाळीं रूं कांतणें व विणणेंच आहे. त्याचा कांटा सदैव तुझ्या हातांत धर. (सात पौंड वीस शेर—वीस शेर) हेंच तुझें काम! हें एकच काम तुझ्या कपाळीं आहे—टावर गडांत कोणत्याही प्रकारची धांदल झालेली नाहीं. विण्डसरच्या महालासही कोणी उन्मत्त केलें नाहीं. रिजंट स्ट्रीटमध्यें नाकेबंदी झाली नाहीं. राजसत्ताधाऱ्यांनींही पार्लमेंटावांचून राज्य चाल-

विण्याची इच्छा दर्शविली नाहीं. किंवा त्यामुळें कापाकापी अथवा खणाजंगीची मारामारी ही झालेली नाहीं. व्हाईट हालाखालीं डायनामेट रचला नाहीं. गेलोटाइनचा चौरंग हाइडपार्कांत उभा झाला नाहीं. तुझ्या शाहनशाह जादीवर कोणी हल्ला केला नाहीं. कोणी आपलपोट्या, स्वार्थी राजनीतिवेत्त्याचा कोणी दुष्टानें प्राण घेतला नाहीं. स्वस्थ रहा. गडबडूं नकोस! **ग्लाडस्टन** व **ब्राइट** हे तुझे सुपुत्र अशा वृद्धावस्थेंतही गर्जना करीत आहेत ! परंतु या **हिंददेवी**ला सोडून देण्याचा निश्चयही त्यांनीं अद्यापि केला नाहीं. या देशाला स्वतंत्र करण्याची त्यांची इच्छा असेल, पण त्यांनीं ती अजून सुप्रसिद्ध दाखविली नाहीं. पार्लमेंटांत खरी राढ लागली नाहीं. आणि तुझ्या सत्तेतून **आयर्लंड**ही अजून मुक्त झालें नाहीं. समजलीस? आतां मला तूंच सांगकीं, माझा पराभव करणारा कोण आहे ? अग? अशा लहान सहान गडबडी केवळ माझ्या गमती खातर, थोड्या वर्षांपूर्वी कराव्या असें मला वाटत होतें; पण आतां तें सारें सोडून देऊन मी स्वस्थ बसल्यें आहें. त्याविषयीं तूं निश्चिंत रहा. घाबरूं नकोस—पण कोठपर्यंत समजलीस का ? जोंपर्यंत भारी अव्यवस्था होणार नाहीं तोंपर्यंत—नाहींतर, कोठेंही अतीशय अव्यवस्था होऊंदे; म्हणजे ताबडतोब तेथें माझें आगमन अचूक तयार असावयाचेंच !—जेथें घोर अंधार आणि फार जुलूम होतात, तेथें मी सर्व मान्य आणि मोठी पदवी धारण करण्याचे हक्क धरीत असत्यें! पण जेथें अंदाधुंदी नाहीं, जेथें जुलूम नाहीं,

जेथें अन्याय नाहीं, व जेथील लोक कंटाळलेले नाहींत, तेथें माझा प्रवेश होणें; महा मुष्किलीचें काम!* आतां जेथें माझा प्रवेश होईल, तेथें जरी अस्ताव्यस्तता असली तरीही शांतता होऊन सकल प्रजा आनंदाचा गजर करील! माझ्या पराक्रमसंपन्न **अमेरिकनां**चें दर्शन घे! ते पहा. कसे? माझ्या शीतल छत्राखालीं राहून जगतितलावर परम शोभायमान् झाले आहेत! पूर्वी ओलिंप्स पर्वतावरून माझ्या परिवाराची सर्व श्रेष्ठ सत्ता अवलोकन करून, जशी मी परमोल्हासित होई; तशी अलीकडे **अमेरिकनां**स पाहून मी हर्षानें नाचत असत्यें!!! माझी, जे एकनिष्ठेनें सेवा करितात, त्यांचा ह्या भूलोकावर सर्वोत्तम लौकिक परिप्रसृत करून त्यांस एकचक्री, सर्व-मान्य, आणि प्रतिष्ठित राजे करण्याची, माझ्या अंगीं शक्ति आहे! समजलीसना?"

"तर मग कृपाकरून सांगा कीं, तिकडील काय वर्तमान आहे?" **ब्रिटानिया**नें अधीर मनानें विचारिलें.

"केवळ मी तुला मेहरबानी खातर सांगत्यें" हत्यार फिरवीत तांबूस टोपाच्या राणीनें क्षणभर विचार करून उत्तर दिलें:—"अग? तूं जेव्हां जेव्हां बाहेर इकडे तिकडे भटकत फिरत

---

*साम्युअल टेलर कोलरीज याचें असें ह्मणणें आहे कीं, "Revolution "राजक्रांती" तोंपर्यंत होत नाहीं कीं, जोंपर्यंत जनमंडलांत "भिक्षावृत्ति, कायदा हाच कर, समाज राज्य, कार्य संपादक सभा, साहचर्य, गुणावगुण विचार आणि वर्तमान पत्रें" हीं सारीं नसतात." आणि "जुलूम! जुलूम!! जुलूम!!! असें सर्वत्र न होईल, तोंपर्यंत स्वतंत्रता मिळणार नाहीं." हें खरें आहे.

असत्येस, आणि आमंत्रणाशिवाय जेथें तेथें घुसत असत्येस, तेव्हां तेव्हां तुझ्या पुत्रांस मी सर्वोत्कृष्ट सुबोध सांगून चंचल व सावध केलें आहे! त्यांना मी सांगितलें आहे कीं, "स्वतंत्रतेशिवाय तुम्हीं काय पडून राहिलां आहां? उठा, चला, तयार व्हा! अरे? मी तुम्हांला प्रसन्न होऊन कीर्तिमान् करीन! भ्याडांनों? दीन होऊन कां राहतां? इतर प्रजेची राज्यरुढी, तिचा आनंद, आणि तिचें सुख पाहून तुमच्या मनावर कांहींच ठसा वठत नाहीं कसा? काय निश्चित झोंप ताणण्यांत आणि एकच एक चक्रांत फिरण्यांत हांसल आहे? काय शोभा आहे? कसला लाभ आहे? नामर्दा सारखें टकमक पहात बसणें, किती शरमेचें होय? असे हात पाय पांघरून बसण्यांत तुम्हांला लाज कशी वाटत नाहीं? तुम्हीं असे कसे झालां? पूर्वजांचे पराक्रम कसे विसरून जातां? हीन भाग्यांत दिवस गमावून मनकामना पूर्ण न करणें, हें किती संतापजनक आहे? किती हृदयद्रावक आहे? किती हृदय भेदक आहे?" अशा माझ्या उत्साहभरित प्रेरणेनें ते उच्छृंखल, चपल, आणि चंचल झाले आहेत. आणखी जास्त होतील! माझ्या हुशारीनें पुष्कळ "**वाटले**" आहेत; आणि बहुतेक माझ्या पक्षाचा स्वीकार करून मला सन्मान देऊं लागले आहेत! यामुळें थोड्याच अवकाशांत उत्पन्न होणाऱ्या **विक्राळ कलह** देवीच्या सपाट्यांतून तूं बचाव पावशील, असें मला तर वाटत नाहींच!! त्या प्रसंगीं माझें अनिवार बळ, तूं अवलोकन करशील. तेव्हां तुला स्पष्टपणें वाटेल कीं, **स्वतंत्रतेचा** हात

केवढा प्रबल, भयंकर, आणि अजिंक्य आहे!!! फक्त माझ्याच दयेनें या वेळीं तूं सुरक्षित राहिली आहेस—नाहींतर मी माझ्या युद्धनिपुणतेनें आणि साहसचातुर्यानें केव्हांच तुझी पायमाल केली असती! मी जीं जीं बिकट कर्में हातीं धरिलीं होतीं, तीं तीं पार पाडिलीं आहेत; आणि पार पडत आहेत. तुझ्या देशांतून इकडे येतांना, मला वाटेंत जे जे शौर्यात्मे मिळाले; त्यांस मी माझ्या वाक्चातुर्यप्रभावानें वश करून सहायांत व दिमतींत ठेविलें आहेच. आणि आतां, केवळ तुला प्रेरणा करण्याकरितांच, मी येथें आल्यें आहें! मी (Coup de main) "बेसावध असतां अकस्मात् छापा घालणें" ह्या रीतीनें वर्तणारी नव्हे. तूं आजपर्यंत ह्या अति दीन **हिन्ददेवी**ला अश्रांत श्रम देऊन संतप्त केली आहेस. तिला आतां शांति देणें भाग होय. जेव्हां माझी पाळी येईल, तेव्हां तुझें **रु कांतण्या**चें राज्य कोठच्या कोठें नाहींसारखें होऊन जाईल; तें तुझ्या समजूतींत सुद्धां येणार नाहीं! मी त्याचा चुराडा करून टाकीन. तूं लौकरच पहाशील कीं, फार थोड्या अवधींत तुझ्या टापूंत **मानव अनुमती राजा** राज्य करील! अजून थोड्या समयाचा अवकाश आहे!! माझ्या गरीब टापूला शेवटीं न्याय मिळेल!!! आणि सकल प्रजेचे महावीर व सुभट, माझ्याशीं सामील होऊन मला महत् सन्मान देतील. तेव्हां मी एका उच्च दिव्यासनावर माझ्या आरक्तवर्णबावट्यासह विराजमान होईन. आणि माझा "स्वतंत्रता, समानता, आणि मित्रता"

नामक सुवर्णाक्षरांकित जयध्वज यात्प्रमाणें फडफड आकाशांत झुलवीन ! आनंदानें नाचेन ! ! वाः ! काय फक्कड गोष्ट ! ! ! ”

असें बोलतां बोलतां, तिनें आपला महाविजयध्वज हवेंत खुल्ला केला ; आणि उल्हासानें व आनंदानें ती नाचूं लागली. तेव्हां **स्वदेशहित** देखील, तो अत्यानंद प्रसंग अवलोकून न समजतांच, नाचूं बागडूं लागला !

ब्रिटानिया हें भाषण ऐकतांच, मनच्या मनांत जळून जळफळून खाक झाली ! तिनें, आपली आर्म्सस्ट्रांग खालीं फेंकून दिली. आणि ती विगलितासारखी जेथच्या तेथेंच बसकण मारून दीर्घ निश्वास सोडूं लागली. **स्वतंत्रते**च्या बढाईखोर वार्ता ऐकून **ब्रिटानिये**ची गाळण झाली. आणि आपला भावी नाश अटकाविण्याकरितां विचारांत गोंधळून जाऊन थोडा वेळ ती, मुखर्वत् अबोल राहिली !

“आणि इतक्याकरितांच” **ब्रिटानिया** फार विषारी व कुजक्या शब्दानें, परंतु म्लान मुखानें म्हणालीः—“दुनियेच्या प्रत्येक भागांत तुजबरोबर मी राहत्यें. **स्वतंत्रते** ? एवढ्याच साठीं. आणखी माझें दुसरें कांहींच कारण नाहीं. जेव्हां तूं मदोन्मत होऊन **फ्रान्सां**त अंमल गाजवीत होतीस ; तेव्हां मी उडावूपणें—वेतालपणें—पंचवीस वर्षेंपर्यंत रक्त वाहवून आणि द्रव्य खर्चून तुला बचाविली ? एवढ्या साठींच मी तुझे कट्टे शत्रू जे **रशियन** त्यांबरोबर लढत्यें ? एवढ्यासाठीं एकदांचा तुझा पक्का दुष्मन **आस्त्रिया** त्याविरूद्ध मीं तुला आश्रय दिला ? आणि इतक्याच करितां **हंगारी** व **पोलांड**

यांकडून मी तुझा बचाव केला ? माझ्या एका क्षणभरच्या गफतीचा लाभ संपादन करून तूं माझ्याशीं वैर बाळगावेंस; हें तुला अनुचित ! मीं तुजविषयीं नेहमीं सावधगिरी धरिली, त्याचें फळ तूं मला एकदम देण्यास तत्पर राहिली आहेस काय ? ठीक ! विचार कर. मी तुला किती आश्रय दिला आहे ? तुझ्या केवढ्या केवढ्या मोठाल्या शत्रूंविरुद्ध मी तुला सहाय झाल्यें आहें? आणि होतही आहें ! "इम्पेरिआलिझम ॲट लिबर्टी" "लोकसत्ताक राज्य" असें बोलणारांविरुद्ध मी किती रागानें उठत्यें ? हें तुला माहीत आहेच. पण मीं तुझी गय केली. ती आणखी तूं विसरून जात्येस ? तुझ्याकरितां मीं अत्याग्रह धरिला, त्याचें हेंच फल ना? तुझ्याकरितां मी माझ्या देशाच्या महात्म्यांचा वध नाहीं करविला? तुझ्या-विषयीं माझे उच्च व चांगले विचार आहेत. पण तूं मात्र, पूर्ण मुक्ततेनें वागत्येस हें माझ्या लाभाचा विचार केला ह्मणजे, तुला शरम आणणारें आहे ! स्वतंत्रतेच्या रक्षणा-करितां, मी जेंजें केलें आहे; तें तें तूं अगदीं अल्प समजूं नकोस ! एका राजकुलांतील महापुरुषाचा शिरच्छेद करविला ! दुस-ऱ्याला पदभ्रष्ट करून देश बहिष्कार घातला. अनेक प्रका-रचे फेरफार केले. परदेशीय राजा स्थापन करून त्याला राजमुकूट धारण करविला. सरदार मंडळी आणि लोक मंडळी-कडून धोरे चालविण्याची रीती ठेविली. ती कशाकरितां बरें ? तुझा मान राखावा, याशिवाय माझा दुसरा कोणतातरी हेतू आहे काय? निश्चय पूर्वक कोणतेंही कर्म करण्यापूर्वी अगोदर फार

फार विचार केला पाहिजे. उतावळीनें कोणतेंही कर्म केल्यास त्याचें फळ चांगलें मिळत नाहीं! सर्वत्र तुझ्या टापूप्रमाणें विजय मिळणें दुर्लभ आहे! तूं मजहून अतीशय प्रबल व प्रतापि आहेस, आणि मजहून अतीशय बलवान् आहेस. तथापि, विना प्रयोजन प्रयास भोगणें; हें उच्च सद्गुणी कर्माचें फळ नव्हे! आणि कदाचित् तुझ्या समक्ष माझी किंचित् गफलत झाली, म्हणून काय झालें? मनुष्य मात्र चुकीला पात्र आहेच. माझ्या थोड्याशा हयगईसाठीं तूं, माझ्या स्वभूमींत माझ्या अंगझांकण वस्त्राचे तुकडे तुकडे करावेस? हें तुला शोभतें?"

"हा! हा!! हा!!!" **स्वतंत्रता** खदूखदू हसूं लागली:— "तुला त्याकरितां इतकें चिंतातूर होण्याचें कारण नाहीं. **ब्रिटानिया!** तुला चांगल्या रीतीनें माहीत आहे कीं, मीं, लौकर किंवा उशीरानें, आतां किंवा मागाहून, विजयसंपन्न झालेली शोभेन? आणि माझ्या शीतलछत्राखालीं तुला ठेवून अतीशय आनंदांत राहीन! आतांशा तूं मजविषयीं जो हलका विचार धरीत आहेस, तो, मजकडून जेव्हां तुला लाभ होईल; आणि माझा तुला पक्का अनुभव येईल; तेव्हां तूं विसरशील! अग? **ब्राइट** आणि **ग्लाडस्टन** हे तुझे इतके सद्गुणी आणि शहाणे पुत्र आहेत कीं, त्यांचे विचार तुझा नाश करणारे नाहींत. तर? तुला सर्व श्रेष्ठ पदवींत स्थापन करणारे आहेत! जशीं हत्तीच्या पावलांखालीं इतरांचीं पावलें झांकून जातात, त्याप्रमाणें त्यांच्या विचारापुढें, इतर सर्वांचे विचार तुच्छ आहेत! हेच कधीं काळीं तरी तुझ्या

स्थितींत अद्भुत फेरफार करितील. तेव्हां तुला फत्तर आणि रत्न ह्यां मधील तफावत कळून येईल! पण हें सर्व कथानक ह्या वेळीं अत्यागत्याचें आहे, असें मला वाटत नाहीं. अगोदर मला, **हिन्द** आणि तूं, यांमधील तक्रारीची कैफियत समजून घेण्याची उमेद आहे!"

वरील सर्व बिना **हिंददेवी**ला फारशी प्रमाणेंच होती. ती यांतील भेद कांहींच समजली नाहीं! तिचा असाच समज झाला कीं, हीही, माझाच कोणी दुसरा शत्रु आहे. ती **स्वतंत्रते**ला स्वद्रोही असें समजत होती. पण ही तिची चुक होती. कारण, तिला ठाऊक नव्हतें कीं, ही आपल्यास किती चांगल्या प्रकारें सहाय होणारी आहे! थोड्याच वेळांत **स्वतंत्रतेनें हिंद**-कडे निर्मळ प्रेमदृष्टीनें पाहिलें. त्या बरोबर **हिंद**ची खात्री झाली कीं, ही मजविषयीं फारच मायाळू असून राजतेज संपन्न आणि उच्च कुळांतील आहे! ह्यामुळेंच ती नाउमेद झाली नाहीं. आणि पूर्वी जो तिचा समज झाला कीं, हें दुसरें कांहीं दुर्दैव, माझ्या नाशास प्रवृत्त होऊन आलें आहे; तो, बदलला. **स्वतंत्रतेनें** हर्षानें आणि मायाळुपणानें **हिंदराणी**ला आपला स्वाभाविक अभिमान व प्रौढपणा दाखविला!

"**लोमेश** * पुर्णायुषि **हिंद**?" **किन्नरा**च्या गायनासारखा

---

* **लोमेश** हा एक ऋषि होता, आणि त्याचें आयुष्य इतकें पुष्कळ होतें कीं, त्याच्या शरीरावर जितके केश होते, तितके **रामकृष्णा**दि अवतार त्यानें पाहिले होते; असें पुराणें म्हणतात. **स्वतंत्रते**नें **हिंद**ला तशीच आयुष्यमान् म्हटली आहे.

आलाफ चढवून **स्वतंत्रता** ह्मणाली:—"बहुधा मला तूं ओळखिलें नसशील परंतु मी तुला चांगल्या रीतीनें ओळखित्यें. दगलबाजी किंवा कापट्य प्रचुर कर्में करून एखाद्याला नुकसानींत आणावें, हा माझा बिलकुल धर्म नाहीं. तुझ्याशीं माझा फार निकटचा संबंध आहे; परंतु त्यावेळीं मी फार निराळ्याच पोषाखांत दिसत असें. तुझ्या प्रतापि काळांत मी तुला पुष्कळ आबादानीस चढविलें होतें. माझी तुलना—बूज किंवा गौरव करण्याची तुझ्या अंगीं शक्ति असेल, तर तुला मी स्पष्ट सांगत्यें कीं, जगतांतील कोणत्याही महाराज्याची **महाराज्यांत** गणना करण्यास कारणीभूत झालेली मीच ती, देवी **स्वतंत्रता** आहें! ज्या कोणाला अग? वाटेल त्याला ह्या—" असें बोलून तिनें आपल्या अजस्र कटिमेखलेवर दृष्टी पोहोंचविली:—"सुसज्ज शस्त्रांतून एखाद्या शस्त्राचा उपयोग करूं देऊन सर्व श्रेष्ठ पदवींत मींच स्थापन करित्यें! मजवर जर तुझा विश्वास बसत असेल, माझ्याविषयीं जर तुझी पक्की खात्री असेल तर मी, तुलाही माझ्या शस्त्रांकडून दिव्यासनीं बसवीन! वचन—विश्वास—तोडून अथवा छल किंवा कपट करून, दुसऱ्यास ठकविणें याचा मी फार धि:कार करित्यें."

हिंददेवीनें स्वदेशहिताकडे पाहिलें, तेव्हांच त्यानेंही नेत्र संकेतानें आपली मर्जी "होय" किंवा हिचें सांगणें खरें आहे; असें सुचविलें.

"कुलाची थोरवी जाणणाऱ्या देवी!" **हिंद** फार संतोषानें बोलली:—"जिचा विजय जगांतील सर्व प्रजा जाणत आहे,

अशा महादेवीच्या सद्बुद्धीची प्रशंसा करण्याच्या बदली, केवळ उद्धटपणानें हलके–नीच–शब्द उच्चारणें, याहून विशेष कनिष्ठ तें कर्म कोणतें? जिची जनदया आणि उदारबुद्धि, देवलोकीं देखील गाजत आहे. अशी देवरूप मानिलेली महादेवी! माझ्या शिरीं आहे! तूं रणोत्साही आहेस, परंतु माझा संहार करण्यापूर्वी सत्यासत्याचें संशोधन करून सत्याला जय दे! दुसरें माझें कांहींच मागणें नाहीं. कारण, तूं सर्वज्ञ आहेस!"

"बोल, सांग **हिंददेवी**! मला तूं; तुझी काय इच्छा आहे?" **स्वतंत्रता** फार आनंदानें म्हणाली.

"छलकपटानें आणि जुलमानें ही (**ब्रिटानिया**) ज्या भूमीची धनीन होऊन बसली आहे, त्या भूमीचा त्याग करून जाण्यास हिला सांग!" **हिंद** फार आवेशानें म्हणाली. कारण, आपल्या आर्जिक्य विरोध्यासमक्ष, पाहिजे तसें वागण्यास, आज जगताचा एक अपराजित मित्र, तिला मिळाल्यामुळें ती उन्मत्त झाली; आणि तिला एक प्रकारचें नवीन उत्तेजन आलें:—"जी भूमि, दग्या फटक्यानें, निःशंक बेपर्वाईनें, व कपटानें हिनें संपादन केली आहे; ती हिला सोडण्यास सांग! माझ्या संततीकडून हिनें जो **स्वतंत्रपणा** हिरावून घेतला आहे; त्यांतून मुक्त करून मला पूर्वपदीं स्थापन कर! माझ्या पुत्रांच्या हातून बलात्कारानें हिनें शस्त्रें लुबाडून घेऊन, त्यांस जें अगदीं अप्रतिष्ठित केलें आहे; त्यापासून त्यांचें रक्षण कर! ही, जें अगणित द्रव्य हरण करून घेऊन गेली आहे; जें रक्त

पिऊन ही तृप्त झाली आहे; जीं हजारों घरेंदारें हिनें ओसाड स्थितींत वसविलीं आहेत; माझ्या अंतःकरणाचा जो हिनें चकाचूर करून सोडिला आहे; फार काय? माझ्या स्वतंत्र शौर्याचा जो हिनें नाश केला आहे! त्याच्या मोबदल्यांत हिनें आजपर्यंत माझें कधींकाळीं देखील चांगलें केलें नाहीं. पण मला जरी पुष्कळ सांगावयाचें आहे, तरी मी थोडक्यांतच आटोपतें घेत्यें. कीं, हिच्या धुक्याच्या टापूंत हिचें पुष्ट होणारें दारिद्र्य, जें हिच्या शरीराला फाडून टाकीत आहे, आणि ज्यासाठीं ही परदेशी होऊन राहिली आहे; त्या हिच्या बरोबर मला खुस्ती खेळावयास सांग! आणि नंतर हिनें जीं राज्यें आपल्या सत्तेच्या जोरानें उद्ध्वस्त केलीं आहेत, तीं मी संस्थापून आबादीआबाद करीन. जीं नगरें हिनें वैराण, बियाबान व मृतवत् केलीं आहेत, तीं मी पुन्हां संजीवन करीन. जो शौर्योत्साह, केवळ गौरूप व निर्माल्यवत् झाला आहे. त्याला मी योग्य जीवन देऊन परिपुष्ट करीन! आणि मग मी खऱ्या बहारींत प्रकाशमान् होऊन शोभा पावेन."

"तूं बेवकूब आहेस, **हिंद!**" **स्वतंत्रतेनें**, फार कुशलतेनें आणि समय चातुरीनें उत्तर दिलें:—"पंधराव्या अथवा सोळाव्या शतकांतील स्थितीप्रमाणें, किंवा अशाच नियमित स्थितींत, तुला अजून ह्या चालू एकोणिसाव्या शतकाचा बराच काळ घालविला पाहिजे. ह्या शतकाचा शेषकाल, तुला शरणांगत स्थितींत गुदरणें निःसंशय भाग आहे. त्याशिवाय तुझी बाकीची सारी वटवट आहे! तूं देखील बाई! **ब्रिटानिया**सारखीच द्वेषी

आणि हट्टी आहेस! आतां जरी तुमचा दोघींचाही मार्ग अगदीं निरनिराळा आहे, तरी तुझा दीर्घ द्वेषभाव, अगदीं खोटा आहे. तूं, जी इच्छा **संपादन** करण्याचा हेतु धरित्ये आहेस; तो विचित्रता प्रगट करणारा दिसतो. दूरदर्शी नव्हे! आतां इतकें मात्र खरें कीं, तुझे विचार तुझ्या सांप्रतच्या संतति स्थितिला अनुकूल आहेत. तिचे विचार—त्यांचें धर्मबंधन—त्यांचें संसारी बंधन—त्यांचें राज्यव्यवस्थाबंधन—चारशें वर्षांपूर्वीं जसें **यूरोप**च्या प्रजेंत होतें तसेंच आहे. तूं तूर्त तशाच स्थितींत आहेस! तथापि, तुझे पुत्र तिच्या पुत्रांप्रमाणें कांहींच निष्पन्न करणारे नव्हत. अग **हिंद**! ही सृष्टी दहा हजार घोड्यांच्या बलाच्या वाफेच्या यंत्राप्रमाणें, एकदम पुढें धांवत जात आहे! सृष्टींतील दरएक राज्य, विद्या, कला आणि बळानें आपलें रूपांतर करीत आहे. अशा वेळीं तुझी स्थिती केवळ चैतन्यहीन जडरूप आहे. जर तूं मोठ्या जोमानें दौड करिशील, तर सहज त्यांपेक्षां पुढें जाशील; परंतु तुजमध्यें ती शक्ति कोठें आहे? जेव्हां कोणीही आपलें तत्व सामर्थ्य, जगतास दाखवून सर्वोत्तम दर्शन देत असतें; तेव्हां तूं तटस्थ जडभरतमूर्तिसारखी फक्त लोकांच्या तोंडाकडे पहात राहिलेली असत्येस! मग तूं कशी बरें कीर्तिमय कर्में आदरून राजसत्तेंत महापद धारण करून बसशील? तूं असें पहा कीं, तूर्तच्याच विचाराचें तूं दृढावलंबन करून राहिलीस, आणि **ब्रिटानिया**नें **भरत**खंड सोडून, स्वदेशीं गमन केलें, ह्मणजे ती स्वेच्छेनें स्वदेशीं निवास करूं लागली, तर तुझी दशा

कशी होईल? आणि काय काय विपरित भयंकर प्रकार नेत्रां-समोर घडतांनां दृष्टीस पडतील? अग! फार लांब जावयास नको. अवघ्या तीन महिन्यांतच, फार मोठी दंगल माजून जिकडे तिकडे अंदाधुंदी होईल! प्रत्येक हिंदू, प्रत्येक पार्शी, प्रत्येक मुसलमान, आणि दरएक अन्य वर्णाचे लोक, जे आज तुला **मातोश्री**प्रमाणें मानीत आहेत, ते अन्योन्य, परस्पर कंठाव-रोध करून बेशर्थ—अघोर—त्रासदायक संहार करून सोड-तील! राज्यासनाभिलाषबुद्धीनें— अवघे एक रक्ताचे असतां— निरानिराळ्या प्रकारांनीं सामान्यतः सर्वांच्या रक्ताची एक सारखी वृष्टि करून, त्यांत बुडून मरतील! अग? हे योद्धेच, गुणकर्मांत फार मोठा भेद——अंतराय—दाखवितील. आणि स्वहस्तें देश—राज्य—मनुष्य व आपलाही नाश करून अव्यवस्थित स्थितीस पोहोंचून, स्वाधीनतेशिवाय अनाचार विधीनें वागून, वंश परंपरेचे हक्क दवडून; आणि चालू सत्तेचा हक्क परित्यागून; अेरेरे!!! अतिशयच वाईट फळें भोगितील! बाई! सद्गुणाविना शौर्य शोभत नाहीं! आणि ऐक्याविना देशाभिमान प्रेमा, कधींकालींही उदय पावला नाहीं! पण मला निःसंशय ठाऊक आहे कीं, तुला मनुष्य प्राण्यांच्या प्राणांविषयीं फारच थोडी पर्वा आहे! परंतु तूं, आजपर्यंत जितका भयंकर संहार करूं शकली आहेस, त्यापेक्षां जास्ती करावा; अशी माझी बिलकूल इच्छा नाहीं! ह्या बाबतींत तूं मजकडून सुटशील असें नाहींच! ध्यानांत ठेव. ज्या पाठ-शाळेंत आपण दोघींही शिकलों आहों, त्याहून आपल्या ह्या

ब्रिटानिया सखीनें निराळ्याच प्रकारचें शिक्षण संपादिलें आहे! 'एग्झिटर हालचें, शिक्षणच असें आहे कीं, द्वंद्व युद्धांत थोडेसे पिस्तुलाचे आवाज, आतां हिच्या समोर मोठ्या कडाक्यानें करण्यांत येतील, तर ही पहा कशी घाबरी घुबरी होऊन लटपटून जाईल ती? परंतु शांतिकालांत दुसऱ्यास केव्हां केव्हां फांशीं देणें, जाळून टाकणें किंवा चाबकांचे सणासण सपाटे लगावणें, ह्याविषयीं ती कधीं पर्वा करणार नाहीं! बरें, तें काम ही लटपटीत करील का? नाहीं! अगदीं धिटाईनें आणि निःशंक बजावील! ह्याठिकाणीं तुला हेंही अवश्य ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं, चालू कालांत प्रजेची अचल आबादानी, आणि पूर्ण तेजस्वी कला, केवळ शस्त्रें आणि युद्धोत्साहांत नाहीं. तर, युद्धांत परम भयंकर योद्धे; बरें, ते आणखी अजीत. संख्येनें असंख्य पाहिजेत. विद्या, कला आणि शरीरबल पाहिजे. तेंही आणखी संयुक्त व संग्रामबलानें उभारलेलें पाहिजे. सर्व प्रकारच्या खऱ्या धैर्यानें घटलेलें पाहिजे. पूर्ण देशाभिमानानें उन्मादित झालेलें, आणि स्वदेशप्रीतीच्या उत्साहानें परमोत्साही झालेलें, युद्धनिपुण, चतुर, कलावान, बुद्धिमान आणि शक्तिमंत पुरुषांच्या चालनांतील; दक्षतेंतील; तत्परतेंतील; असें सकल गुणबल संपन्न पाहिजे. तें आहे कोठें? तुझें नशिब झोंपीं गेलें आहे! त्यावर काळानें आपला पंजा दाबिला आहे! तो, जोंपर्यंत उचलणार नाहीं; तोंपर्यंत तुझा उदय किंवा भरभराट होणार नाहीं. ह्यांतील एक तरी गुण तुर्त तुजमध्यें वसत आहे? नाहीं! तुला भ्रम असेल.

पण तुझे हे पुत्र, मूर्तिपूजक, अर्ध जंगली, हेवानासारखे आहेत! हे फक्त ज्ञातिबंधनानें, नगरमंडलानें, अथवा धर्मांधपणाच्या मूर्खत्वानें, खरा मार्ग सोडून खोट्या मार्गांत रखडत आहेत. त्यांशिवाय त्यांना दुसरें कांहीं दिसतच नाहीं. तुझे देश-रक्षक! देशमान्य राजपुरुष, अथवा राजे; आलस व्यसन वेश्याविलासांत दंग व निर्दय झाले आहेत. आणि कितीएक तर आपलें कर्तव्य कर्म व साहस एकीकडे झुगारून देऊन अद्भुत अज्ञत्वांतील कर्में करीत आहेत! त्यांना बाई! देशाच्या कळवळीहून किंवा स्वदेशाच्या आस्थेहून, स्वहित विशेष दिसतें. कित्येकांना तेंही दिसत नाहीं! आणि प्रजेच्या हितापेक्षां स्ववंश हिताधीन होऊन ते, देश, राज्य आणि आपला चट्सारा साहसयुक्त पराक्रम दूर फेंकून देतात! ते जोरावर होऊन बाहुबलसंपन्नतेनें, समरभूमि परि-कंपित करावयाचें कर्म सफाई सोडून देतात. देशाला आबादानींत पोहोंचविण्यापेक्षां, त्याची धुळधाण, सत्यानाश, राख रांगोळी कोणत्या प्रकारानें होईल? इकडेच लक्ष्य देण्यांत ते फार तत्पर आहेत. असें सर्वांस दिसलें आहे!!! कारण, ते विचार करू-नही राज्यव्यवस्था विधी नियम समजण्यास शक्तिमंत होत नाहींत! तेव्हां असें म्हणण्यास काय हरकत आहे? कीं, ते, हिंमत धरून प्रजेला दमविण्यांत निमग्न होऊन राहिले आहेत!! मग तूंच मला सांग? असे, आपलें अनहित करून प्रजेची धूळ-धाण करणारे **राजे**, ज्या लोकांत ऐक्य आहे; आणि जी प्रजा स्वदेशाभिमानी आहे; त्यांच्या वर्गांत अप्रीतिमान् झाल्यास

नवल कसलें! आणि खरोखरच ते तसे झालेही आहेत! ते हितही करीत नाहींत, आणि प्रजाहक्क व राजहक्क यांचेंही संरक्षण करीत नाहींत! उलटे स्वस्वार्थाच्या कैफांत धुंद व मस्त होऊन ते शरणांगतावर जुलूम करितात, स्वस्वातंत्र्याचा उच्छेद करितात; आणि निष्कारण आपसांत भांडणें व कुरापती माजवून प्राणघात करितात. हें आश्चर्य नव्हे का? माझ्या चिमुकल्या* टापूंत टैरंटो ज्याप्रमाणें प्रजेला एकसारखा पीडाच देत होता; त्याप्रमाणेंच ते अवघे टैरंटो झाले आहेत.!!! काय चमत्कार आहे? त्या अप्रिय टैरंटोला सुधारण्याकरितां, मी जे अश्रांत श्रम घेतले, त्याचा उच्छेद वगीनें, वशिल्यानें, सत्तेनें आणि शक्तीनें केला; त्याप्रमाणें तुझ्यांतील कोण वीर पुरुष, जंगी मैदानांत सुसज्ज होऊन तुझ्या दया आणणाऱ्या स्थितींतिल लोकांच्या कल्याणाकरितां दंड थोपटून तयार आहे? सुयोग साधून त्यांचा भोग घेईल असा कोण आहे? सांग! तुझे तत्ववेत्ते! (ज्या सर्व मान्य महापुरुषांचीं वाक्यें. अतितर उल्हासानें आणि गर्वोन्मादितपणानें त्वत्पुत्र वारंवार उच्चारितात. व कालांतर झालें तरी, तशाच रीतीनें त्या महात्म्यांस पूज्य मानितात; आणि ज्यांपैकीं कितीएकांचीं विजयी कर्में, जगतीतलाच्या प्रत्येक भागावर सतेज, प्रतापि व दर्शनीय होऊन राहिलीं आहेत ते) भ्रमित कालांत फांके मारितील, असे श्यामशोधक आहेत! तुझे

---

*ग्रीस देशास उद्देशून ही उक्ति आहे. पुराणप्रसिद्ध ग्रीस आणि रोम हे परतंत्र होते. परंतु चालू शतकांत ह्या दोन्ही देशांपैकीं पहिला टर्कीकडून आणि दुसरा आस्त्रियाकडून स्वतंत्र झाला आहे.

योद्धे (जर त्यांस योद्धे म्हटलें तर. एरवीं त्या नांवास कांहीं ते योग्य नाहींतच !) मिथ्यागर्वी, पत्राजखोर, शेंदाडशिपाई, कागदीज्वान, निरुत्साही, आणि तुंडाईखोर आहेत. ज्यांचा मुख्य आनंद म्हटला म्हणजे, राजाच्या दरबारांत वग वशिल्यानें बसावें, फुकटचा हुक्का गडगडावा, कुसुंब्रापाणी प्यावें, चकंचकित खोटा पोशाख पेहरावा, आणि तडाके मारीत शुष्क आढ्यतेनें भटकत असावें; हाच होय ! तुझ्या समजुतीकरितां जर त्यांस महायोद्धे म्हटलें, तर पायदळ सैन्या (इन्फंट्री)ची व्यूहरचना कशी करावी? आणि बेटरी—अग्न्यस्त्र—तोफांच्या मोर्च्यावर कसें चालवावें? यांतील लवलेश—भेद—विचार, त्यांस माहीत आहे का? नाहीं ! सैन्यांत "इन्फंट्री," "केवलरी" आणि "आर्टिलरी" ह्यांचा कसा उपयोग करावा, कशा प्रसंगीं कशी व्यूहरचना करावी, ह्याविषयींचे विचार त्यांच्या ध्यानांत, मनांत किंवा स्वप्नांत देखील येत नाहींत ! तुझे **भाट** आणि **कवी**, गर्वाच्या आवेशांत महाभारत रामायणादि जुन्या पुराण्या, कल्पना मिश्रित, सत्यासत्य कथा, व इतर कवींच्या मानसतरंगी तर्कबाज गप्पा सत्य मानून केवळ त्यांतच मस्त राहणारे झाले आहेत. तुझे सांप्रत काळचे **विद्वान्**, मनस्विन्, नेभळे, दीर्घशहाणे ; आणि तर्कशास्त्राच्या आधारानें मिथ्या वादविवाद करून कालाचा अपव्यय करणारे, अथवा रिकामीं, बिन जरूरीचीं, पोरकट, अनुपयोगी पुस्तकें प्रगट करून केवळ गाबाळी कचरा वाढविणारे आहेत ! तुझे **स्वदेशाभिमानी**, अक्कलशुन्य, राजनियमांचें निरर्थक उल्लंघन करून लोकांत व्यर्थ अप्रिय

होणारे व देशास नुकसानींत आणणारे आहेत. त्यांना देशाचा उदय कसा होईल? आपण अवनतींतून उन्नतींत कसें जावें? तेंच बिलकूल माहीत नाहीं. ते पूर्वपरंपरेचें गुणगान गाऊन (जें बोलण्यानें कोणतेंही विशेष हांसल कालांतरानें देखील होणार नाहीं!) राजकाजांत जशा विचारानें पिछे हट होईल, अशी कृति करणारे आहेत. वरें इतकेंही असून, आणखी कलाकुशलतेच्या वृद्धीचें निकंदन करणारे! पक्का विचार आणि पक्क्या पायाशिवाय उभारलेल्या कामांत विनाकारण भलता सलता आपलाच हट्ट घेऊन बसणारे; अथवा "आमचे बापजादे, असे असे प्रबल प्रतापसंपन्न होते; आणि त्यांच्या सारखे शस्त्रधर आज-पर्यंत कोणी झाले नाहींत; व पुढेंही पण होणार नाहींत!!!" अशा नस्त्या गर्वांतच आनंद मानून गौरव राखूं पहाणारे आहेत. कालांतरानें स्थिती बदलली. राजकाजांत कोणी घेत नाहीं. तरी परतंत्रपणांत राहूनच, तोंडानें पूर्वींचा डौल वाखाणावा आणि त्यांत सुख मानून राहावें, हेंच त्यांना महद्भूषण वाटतें. बाई! देश काल व जनस्थिति बदलली असून, त्यांची पूर्वींची शेखी अद्यापि गेली नाहीं! तेव्हां तूंच सांग बरें, अशा फुकट्या गर्वांत गर्क होऊन फटकळपणानें वागणें, हें काय बरें दाखवितें?—या सर्वांवरोवरच तुझे गर्विष्ट **धर्मप्रवर्तक,** अजून देखील कितीएक अति श्रेष्ठ सामान्य कर्में अथवा सांप्रत काळच्या युरोपियन विद्याप्रकाशाविषयीं अतीशय संशयित गोष्टी—ज्या गोष्टी कितीएक प्रकारांनीं जगांत हंशासारख्या होतात, आणि ज्यावर तुझ्या मोठ्या कीर्तीचा बहुतेक पाया,

हा वेळपर्यंत टिकून राहिला आहे—त्याविषयीं व्यर्थ वाचाळपणा जारी राखणारे आहेत. क्वचित् मूळपुरुषांशिवाय बाकीचे सारे "धर्म ह्मणजे काय?" आणि सत्य धर्म कशांत आहे? ह्याविषयींच आधीं अज्ञानी आहेत! धर्माधिकारी, आचार्य, साधु आणि विरागी, हे धर्मकर्माचे भेद समजण्यास अशक्तिमंत असून पूर्व आणि उत्तर काळांत कसें वर्त्तावें? याविषयींही विनअनुभवी आहेत! बरें; इतकें असूनही इतरांस धर्म समजाविण्यास किती, आणि कशा धर्मज्ञानाची अवश्यकता पाहिजे असते? ह्याविषयींही ज्ञान शुन्य! बलिष्ठ धर्माधिकाऱ्या सन्मुख कोणत्या पूर्ण ज्ञानानें जय मिळवावा? हें कोणा विचाऱ्याला माहित असेल तर शपथ!! आपल्या धर्मास सतेज प्रकाशांत नेण्याकरितां, काय काय केलें पाहिजे, हें तरी कोणाला समजतें आहे? केवळ शांतिकालपठण करून आळशी आणि निस्तेज!—"मात्र आपल्या ज्ञानास विवाद नको" असें सांगून स्वस्थ बसणारे! जर त्यांतिल फार थोड्यांत—दैवयोगानें असलें तर! धर्मसंबंधीं क्रिया करण्याचा उत्साह—आग्रह—मौन्य—मर्यादशीलता—आहारीं मितपणा, परस्पर स्नेह, बंधुभाव, व्यापक, अव्यापक, आत्मानात्माचा भेद; आणि पंच तत्वांचें—खरें ज्ञान असेल!!! त्या प्रमाणेंच भक्तिबोध निमित्तानें नेहमीं प्रपंचवृत्तींत आणि मोहपाशांत बद्ध होऊन राहणारे! तरी पण दाखीव मला तूं हिंद? कीं, **ब्रिटानिया** हा देश सोडून गेल्यानंतर, तिचें आसन पुरें पाडणारा कोण आहे? कोठें आहेत तुझे शक्तिमंत

आणि बुद्धिमंत देशाभिमानी शूर वीरपुरुष ? कोठें आहेत, तुझे राजनीतिवेत्ते ? जे या भूमीचें स्वतंत्र व प्रतापि राजनीतीनें संरक्षण करितील ? कोठें आहेत, राजव्यवस्थाविधी राखणारे ? जे महसुलासंबंधीं यथास्थित व्यवस्था ठेवितील ? कोठें आहेत ? महान योद्धे ; जे युद्धकालीं सैन्यास रणसंग्रामाच्या मैदानांत यथास्थित पद्धतीनें नेतील ? कोठें आहेत, प्रतापि वीरपुरुष ? जे सांप्रत कालाच्या स्थितिरीतिप्रमाणें सेना व्यूहरचना यथायोग्य करून परदेशीयांच्या हल्यापासून स्वदेशाचें रक्षण करण्यास शक्तिमान् होतील ? कोठें आहेत, देशरक्षक ? जन समूहाची सरदारी पतकरणारे योग्य पुरुष ? आणि कोठें आहेत, तसे शांतिप्रवर्तक ? जेव्हां आपल्या देशांतील सैन्य, संग्रामार्थ बाहेर जाईल, तेव्हां मागें देशांत अव्यवस्था न होऊं देणारे ? "

स्वतंत्रतादेवी, जेव्हां आपल्या पूर्ण अभिमानानें धमकावून हिंदच्या प्रबल विचारांस हाणून पाडून बोलत होती ; तेव्हां हिंदच्या नेत्रांत अतितर त्वेषाग्नि भडकला ! ती फारच संतापली, पण आपल्या समीप सर्व श्रेष्ठ व अपराजित महादेवी आहे ; तिच्या विरुद्ध होण्यानें, आजपर्यंत कोणाचेंच हित झालें नाहीं ; आणि पुढेंही होणार नाहीं. असें समजून ती गरिब बिचारी हिंद, कोणत्याही प्रकारची पिरपिर न लाविता, मनांतील संताप मनांतच सामाऊं लागली. तिच्या मनांतही हा रोष होताच. आणि त्याच्या दैदीप्यमान् कुंडांत

स्वतंत्रतादेवीनें असें तेल ओतिलांच, **हिंदराणी**नें आपल्या हातांत जी बरची होती, ती त्वेषानें सणकन् पर्वतांत खोचिली!

स्वदेशहितही रागास चढला होता; तो बोलण्यास देखील लुसलुसत होता. पण त्यानें मनांत असा विचार केला कीं, ह्यावेळीं येथें जर आपण कांहीं बोलावें, तर हें चिडीस गेलेलें प्रकरण, जास्त भडकून नवांच्या ठिकाणीं साडे तेरा व्हायचे! म्हणून तो मनच्या मनांत चुरमुरे भाजूं लागला! जेव्हां **स्वतंत्रते**नें **हिंददेवी**ला बोलतांना प्रत्यवाय केला, तेव्हां ही **ब्रिटानिया देवी**ची मुख्य साह्यकर्ती सखी असावी, आणि ही आमचें दरिद्र काय फेडणार? असें समजून त्यानें तेथून जाण्याचें मनांत आणून आपलें तोंडही फिरविलें! तें **हिंददेवी**नें पाहिलें, आणि **स्वदेशहिता**चीही चूक आहे; असें ती समजली. कारण, ती महात्मी व उत्तम शक्तिसंपन्न असून, भूत, भविष्य, आणि वर्तमान चांगल्या रीतीनें जाणणारी होती.

पुन्हा महाराणी**स्वतंत्रते**शीं आपण कांहीं बोलावें, असें मनांत आणून **हिंदराणी**नें पर्वतांतून आपला भाला खेंचून काढून आपणासच जय आहे असें दर्शविलें! आणि महत्तेज प्रदर्शित करून ती म्हणाली:—"देवी! हे सर्व महाराज सानुकूळ, परंतु मजवर कुपित; आणि माझ्या शत्रूंस श्रेष्ठासनीं विराजमान् करणाऱ्या **महादेवी**! तूं असें दर्शवीत आहेस काय? कीं, माझ्या भूमींत राजनीतिवेत्ते, सैन्याधिप, चक्रवर्ती महाराज, कोषाध्यक्ष आणि देश जेव्हां संग्रामास जाईल तेव्हां ऐक्यानें वागून समान बुद्धीनें वर्तणारे लोक नाहींत? अग? काळ महा

पुरुषांस प्रकाशांत आणील ! तो आपला वेळ कधीं चुकणार नाहीं? आणि कधीं चुकलाही नाहीं. जो **प्रसंग** आपल्या हाताचा पंजा काढून अनेक वीरात्मे आणि राजनीतिकुशल, अमोलिक—अमर—प्रतापि—पुरुषांस प्रकट करितो ; तो मजवर रागावेल काय ? गतकालीं होऊन गेलेल्यांचे शेंकडों दृष्टांत, जर आपणास उदाहरणार्थ मिळत आहेत ; आणि ज्या गुणकर्मांस सकल प्रजावर्ग जाणत आहे, तर ते तूंच पहात नाहींस काय? देवी! कोणत्या प्रजेला स्वस्वातंत्र्य मिळवितांना महा पुरुषांची टंचाई पडली होती ? मला कांहीं स्मरत नाहीं, तुला आठवत असेल तर सांग ! कारण, बाई? भुकेलेल्यांस भोजन आणि तृषितांस पाण्याची तूट नाहीं. हात जर तयार आहेत, तर तरवार दूर नाहीं ; तरवार हजर आहे, तर हातांस टंचाई नाहीं. समजलें? प्रसंग येतो तेव्हां चिलखतानें सजलेले लक्षावधी लोक मिळाले आहेतच. **स्पॉनिश** प्रजेनें आपला अनिवार जुलूम प्रकट केला, तेव्हां **मेक्सिकोंत, सैमन** आणि **बोलीवर** ह्यांस कोणी तयार करून ठेविलें होतें ? वेळ आला, त्याबरोबर ते निघाले किंवा नाहीं ? **चार्लसा**चा मदाभिमान जेव्हां फारच वाढला, तेव्हां त्याविरुद्ध होण्यास कोण तयार होतें ? कोण इतक्या मोठ्या जबर सत्तेनें **ब्रिटानिया**चें राज्य चालविण्यास शक्तिमंत होतें ? परंतु आपोआप **क्रामवेल** आणि **हॅम्पडन** निघाले ! आणि धुळधाण होणाऱ्या राज्याचा त्यांनीं बचाव केला ! ! जेव्हां नव्या नव्या करांनीं **जार्ज**चे प्रधान जर्जर झाले ; ते आपला हट्ट सोडीनात. आणि

स्वदेश सोडून परदेशनिवासी झालेल्या निर्मळ अंतःकरणाच्या लोकांवर देखील जुलमी कायदे व जुलमी कर, बसविण्यांत येऊं लागले; तेव्हां **वाशिंग्टनला ईश्वरानें** कांहीं गुप्त पाठविला नव्हता!!! फार कशाला? अगे? ज्याला तूं खरोखर नेहमीं धिःकारीत असत्येस, त्या जंगली उद्धटास तोडण्याकरितां; **कुशीउस्को, पोलंडांत** जन्मला आहे; असा केव्हां तूं अद्दमास केला होतास! जेव्हां "असेम्ब्लि" मिळाली; आणि राजाचा ठराव. धिःकारण्याचा किंवा झुगारून देण्याचा समय आला; तेव्हां **फ्रान्सच्या** राजसभेंत **मिरावो** आहे, आणि तोच धीटतेनें विरुद्ध होऊन भांडेल; असें कोणी अनुमान केलें होतें? लोकांच्या उठणाऱ्या लहान मोठ्या टोळ्यांस दाबून टाकण्यासाठीं, एकचक्री राज्य स्थापन करण्याकरितां, आणि अवघ्या यूरोपास परिकंपित करण्यास, बाई! या **ब्रिटानियाचा** गर्व नम्र करण्यास **नेपोलियन** अवतरेल, आणि त्यांचेंही तेज हरण करणारा **वेलिंगटन्**चा ठाकोर होईल; असा कोणी तर्क केला होता! आणि तेही प्रथमपासून सावधगिरीनें तयार राहिले होते? किंवा आयत्या वेळीं गुपचूप आले होते? **हेप्सबर्ग**च्या ठग कुटुंबाविरुद्ध **गारिबाल्डी** होईल, अशी धारणा थोड्यांनींच राखिली होती! याप्रमाणेंच जेव्हां समय येईल तेव्हां **भरतखंडांत** देखील राजनीतिवेत्ते, सैन्याधीश, कोपाधिकारी, चक्रवर्ती राज्य करणारे, महाराज, व्यूहरचना करणारे, आणि देशरक्षक आपोआप बाहेर निघतीलच निघतील! ज्या **प्रभूनें** इतक्या प्रजेस स्वातंत्र्य मिळविण्याच्या

कामीं मदत केली आहे, आणि जो **प्रभु** अनेक प्रजेला स्वच्छ हवेंत राहण्याकरितां उत्पन्न करितो, तो **प्रभु** कालानुकूल समयीं मला सानुकूल होणार नाहीं काय? प्रसंग आला म्हणजे कांहीं कमी पडत नसतें! अग, **ईश्वरा**सारखा दाता आहे?"

"लबाडी!" तांबड्या टोपाच्या राणीनें शांत शब्दानें थोड्यांत रस्ता कापण्याचा निश्चय केला; व थोड्या वेळानें आपणास काय बोलावयाचें आहे, याचें मनन करून त्याच कटाक्षांत ती आपलें भाषण पुढें चालू करून खूब जोम्यानें डाग देत व टोमणे मारीत म्हणाली:—"ही सारी तुझी मिथ्या बडबड आहे. बाई! या अशा लबाड गोष्टी आतां कोण ऐकतें? आणि ऐकिल्या तरी कोण जुमानितें? अग? **काळ** कोठून महापुरुषांला उत्पन्न करणार! त्याचें कांहीं चिन्ह तरी दाखविशील? आकाशांतून तो गुप्त रीतीनें उतरणार आहे? किंवा पाताळांतून गुपचूप येणार आहे! का अष्टदिशांत तो कोठें लपून छपून राहिला आहे! बाई, तुझ्या असाधारण बुद्धीची धन्य असो! ती तुझ्या मोठमोठ्या उत्कंठित इच्छेस जाड्या वेगानें बाहेर पाडित्ये! पण कांहीं तरी स्वभाव वृत्तीचा विचार करावयाचा होतास? प्राचीन आणि आर्वाचीन कालांत पुष्कळ मोठमोठे बनाव बनले असून, पुष्कळ बारिक प्रसंगही आले आहेत; तरीही तुझ्या बोलण्याचें कांहींच सार्थक्य तूं केलें नाहींस! आणि आतां तूं करशील अशीही मला लेशमात्र देखील आशा नाहीं! दुसऱ्या प्रजेंत केव्हां केव्हां महापुरुष उत्पन्न झाले आहेत, आणि मोठमोठे, अद्भुत फेरफारही

झाले आहेत; परंतु एक सहस्र वर्षेपर्यंत मी तर तुला जशाची तशी चैतन्यरहित व शुद्ध जडवत् पहात आहें! त्यांत तिळभर तरी तफावत पडावाची होती? कांहीं तरी अंतर दिसावयाचें होतें? पण नाहीं! आतां ज्या अर्थीं तूं म्हणत आहेस कीं, काळ, महा पुरुषांस उत्पन्न करील, आणि त्या प्रमाणें घडलेंही आहे. त्या अर्थीं तुझे महापुरुष, महात्मे, शूर, वीर, सैन्याधिप आणि सर्वोपरी राजाधिराज **सत्तावन साल**च्या बंडाच्या वेळीं कोठें झोंपीं गेले होते? त्या वेळीं कां जंगी मैदानांत आले नाहींत? त्यावेळीं जो धुरीणत्व पत्करिता, त्याला मी कीर्तीचा मुगुट घालून अमर केलें असतें! आणि इतिहासांतही तो देवस्वरूप महा पूज्य व विख्यात गणिला जाता असता. त्या प्रसंगीं त्या काळानें कोठें दडी दिली होती? बाई, त्या समयासारखा चांगला वेळ दुसऱ्या कोणत्या बरें प्रजेच्या हातीं लागला होता? पण इतर प्रजेहून, तुझ्या प्रजेंत कांहीं अद्भुत विचित्रता मी हमेशचीच पहात असतें. आणि ती हीच कीं, जेव्हां पुराणप्रसिद्ध नगरांत उलाढाली करणारांतील पुढाऱ्यांचा महोत्सव होत असतो, तेव्हां तुझे पुत्र आपल्यासच निंदून घेत असतात !!! सत्तावन सालच्या बंडांत ज्यांनीं पुढारीपणा स्वीकारून मोठ्या उलथा पालथीचें चिन्ह दर्शविलें, त्यांची आज सगळेच एका आवाजानें निंदा करीत आहेत; आणि त्याचीं कारणें पाहूं लागल्यास ते, त्याला पात्रही आहेत! जे, फेरफार करणारे होते, त्यांनीं विजयमाला घालण्याच्या बदला आणि देशांत कांहीं चांगला नावाजण्यासारखा फेरफार करण्याच्या

इच्छेविरुद्ध, आपली अशी वर्तणूक दाखविली कीं, त्यांचें भव्य-प्रतापि आणि प्रौढ कीर्तिमान् कर्म असूनही, तें अपयशयुक्त आणि कलंककारणीभूत झालें! त्यांचीं नांवें तुला शाप-रूपच आहेत. तेव्हां कोठें गेला होता तुझा स्वदेशाभिमान? जेव्हां प्रत्येक सुभेदार लष्कराचा सरदार होता, आणि प्रत्येक सरदार सैन्याधिप होता, आणि प्रत्येक सैन्याधिप अतिरथी होता, आणि प्रत्येक अतिरथी महारथी होता, आणि प्रत्येक शिलेदार आर्टिलरीचा कर्नल होता. परंतु जेव्हां हे सगळे आपल्या आसपासच्या प्रांतांत त्रास आणि जुलूम ह्यांची ओरड चालीत होते, बाई, तेव्हां तुझा स्वदेशाभिमान कोठें गेला होता? तेव्हां जनदया, सत्य आणि प्रामाणिकपणा कोठें लपून राहिला होता? जेव्हां **कानपूर**च्या मैदानांत आणि **लखनौर**च्या नदींत पाण्याबरोबर रक्तास मिळवून देऊन रक्ताचा प्रवाह वाहूं दिला! जेव्हां पुरभय्या, बांकेराव, आणि तुर्क मिरझा ह्यांनीं **बहादरशाह**—(कम्बख्त!)—ज्यांनीं त्याला **दिल्ली**चा बादशाह बनविलें होतें, त्याच्या छातीवर तरवार ठेऊन सांगितलें कीं, "ससूर! कुच नहीं समजता? जान की कसम, जिस्का शिरपर जूता रहेगा; ओ बादशाह बनेगा. अमेरा हुकूम सुन. अब अमेरी साथ ऊठ. नहीं तो शिर सलामत न रहेगा." तेव्हां तुझे व्यवस्था नियम कोठें झकमारायला गेले होते? तुम्हीं **ब्रिटीश** तोफेच्या मारासमोर फार मोठ्या मुष्किलीनें फक्त एकच लढाई लढलां? आणि त्यांतही व्हावी त्याहून अतीशय दुर्दशा झाली! शरम भरल्यासारखे हार

खावून मार खात मागें फिरलां, तेव्हां तुम्हांला कांहीं लज्जा वाटली नाहीं! तेव्हां तुझें सेनासामर्थ्य कोठें गेलें होतें? ज्या वेळीं समरंगणांत जाऊन देशाचें रक्षण करण्याचा प्रसंग होता, त्या वेळीं तुम्हांला काय झालें होतें? त्या वेळीं लोकांस राजी राखून, आपला बचाव करून, संरक्षणही करावयाचें होतें. तशींच परदेशियांस हांकून काढण्याची देखील संधी होती; तेव्हां तुझे राजनीतिज्ञ—**महापुरुष** कोठें लपले होते? लष्करी बळ फारच वाढलें होतें; आणि केवळ त्यालाच आपल्या नियमांत व आपल्या सत्तेंत राखण्याची सर्वांहून मोठी आवश्यकता होती. तेव्हां तूं जे मोठ्या डौलानें सांगत आहेस, ते, महारथी आणि भटराजे कोठें गेले होते? आणि ते मोठमोठे व्यूहरचना करणारे धमंडानंदन समरस्थलीं कां बरें आले नाहींत? **शीख** आणि **बंगाल**चे तुझे शूर पुत्र, आपल्याच देशच्या शत्रूंस व आपल्याच बांधवांची कत्तल करणारांच्या विजयध्वजास शरण जाऊन स्वबांधवांस पराजयास पोंचविते झाले! मोठा थोरला विजय मिळविण्याकरितां **गंगा** नदी उतरून धांवत गेले—जो वेळ स्वदेशास परदेशियांच्या हातांतून सोडवून, माझ्या स्वाधीन करण्याचा होता; तेव्हां तुझे कीर्तिमंत आणि विजयवंत पुत्र पांच हजार मैलांवरील परदेशी **म्लेंच्छ**—जे तुझ्या देशोन्नतीचा भंग करणारे आहेत; जे तुझ्या नाशास प्रवर्तक झाले आहेत. आणि **ब्रिटानिया**चे पुत्र खरोखर बादशाही करीत असतां, त्यांना शरण जाऊन तुझ्याविरुद्ध समशेर उचलून, तुझ्या छातींत बागनेट भोंसकून,

ह्या तुला गोळ्यांनीं घायाळ करून रक्तबंबाळ करिते झाले !! आणि तुझ्याच सामर्थ्यानें **ब्रिटानियास** कीर्तिवंत केलें. तेव्हां तुझीं ऐक्य, विश्वास आणि देशाची कळकळ हीं कोठें गेलीं होतीं ? कोठें गेली होती तुझी स्वात्मार्पण भोगभक्ति ? जेव्हां केवळ एक अमिरी गुणानें संपन्न राजतेज शोभित हिंमतदार स्त्री—"**आमेझोन**;" चें स्वरूप धारण करून सैन्याच्या तोंडावर उभी राहिली होती ! तेव्हां मोठमोठे लांबलचक नांव राखणारे, आणि गर्वानें मिशांवर ताव देणारे सरदार, मांडलिक, सामंत आणि ठाकोर एकसारखे कां पळत सुटले होते ? जो समय गोब्राम्हण—प्रतिपालन करावयाचा होता. ज्याविषयीं आज शेंकडों वर्षें होतिल, तूं एकसारखी बडबडत राहिली अहेस, अग ! ती बडबड खरी करण्याचा प्रसंग होता तेव्हां तुह्मांला काय झालें होतें ? एका सुंदरीच्या भोगाविषयीं प्रत्यक्ष होमाच्या वेळीं देखील त्यांना शरम वाटली नाहीं ? त्यांच्या मनांत कांहींच शंका—संशय—शरम—दिक्कत आली नाहीं ? आणि त्यांच्या परंपरेच्या धर्मास कलंक लागला नाहीं ? **हिंद** ! तूं जें बोलत आहेस, त्याचा सहज कां होईना ? पण कांहींतरी विचार केला आहेस खरा का ? आज जर तुझ्या प्रजेंत (Nationality) "देशोद्भवता" असती, आणि तुझी प्रजा, तूं जे महान् गुण सांगत आहेस, ते धारण करणारी असती ; तर याद राख **हिंद** ? आज तुझ्या नेत्रांतून अश्रुपात झालाच नसता ! आणि तूं व **ब्रिटानिया** यांत झगडा लागला आहे, असें समजून

मीही येथें आल्यें नसत्यें. तुझी प्रजा आणि तुझे पुत्र अशा उच्च प्रकृतीचे गुण धारणकर्ते असते, तर मी आणि तूं केव्हांच सखीपणाचा दावा बांधिला असता—कारण, जेथें तुझी अशी इच्छा झाली, तेथें माझ्याशिवाय तुझें चाललेंच नसतें. आणि **ब्रिटानिया**ही केव्हांच आपल्या देशांत खुशाल झोंप ताणावयास गेली असती! ही तुझें स्वप्नांत देखील नांव घेण्यास भीति!! कारण, हिला हांकून काढण्या-साठीं तुझे लाखों व कोट्यावधी पुत्र जमीनदोस्त झाले असते, आणि हिलाही पण तितकाच बदला द्यावा लागला असता; व त्यांच्या रक्तांत भरून चिथडलेले व बरबरलेले हिचे हात, ही रात्रदिवस पाहून खूप याद राखिती असती. व तुझ्याकडे कधींही नुस्ती वांकडी नजर करण्याचा विचार देखील मनांत आणिती नसती!!! पण अशा गोष्टी करण्या-विषयीं तुझ्यांत शक्ति च नाहीं. आणि तूं पाहिजे तितकी **कर्मभूमीत** बसणार समजत्येस. तरी अशा उत्तम प्रकारचें **कर्मजय**सुः घेण्यास तूं योग्य झाली नाहींस. जेव्हां इतर प्रजेची चढती रांगण्याच्या आणि पुष्कळ चांगल्या फेर-फारांचे व उलाढालींचे दृष्टांत देण्याच्या आवेशांत तूं येतेस; तेव्हां तुला तुझ्या खऱ्या स्वरूपाचें भान रहात नाहीं! तूं एकदम अंधत्व पावत्येस. बाई, ज्या ज्या महा पुरुषांचीं नांवें तूं आतांच्या आतां पटापट सांगून चुकलीस, त्यांतून कोणी तरी, कधीं काळीं कां होईना! तुजमध्यें झाला होता? **आस्ट्रिया**ची गोष्ट तुला ठाऊक आहे? त्याची काय अवस्था

होती? तो **हेप्सबर्ग** लुटारूंचा सरदार यमपती पेक्षांहीं श्रेष्ठ, सहा लक्ष बेयोनेट वाले शिपाई बाळगून होता; तरी किती वेळ **मेक्सिकोचें** संरक्षण करूं शकला? बरें, इतकेंही असून स्वतःचा आश्रय जवळ. दोन लक्ष सैन्य तर इकडून तिकडे आणि तिकडून इकडे घुमत होतें? मदतीसाठीं फक्त आल्प्स पर्वत उल्लंघन केला, ह्मणजे झालें. इतकें होतें तरी, **आस्ट्रिया इतालीला** कां ताब्यांत ठेवूं शकला नाहीं? तूं जें ह्मणत्येस, तशी तुझी शक्ति नाहीं. इतकेंही असून तुझें ह्मणणें कबूल करून खरें मानिलें तर, तुजमध्यें कोण असाधारण तीक्ष्ण—तीव्र—महान्—बुद्धीचा—महत्—पुरुष **सीझर, नेपोलियन क्रामवेल** किंवा **शिवाजी** अवतरला आहे? जो रणस्तंभ रोपून, मैदानांत येऊन, आपला विजयध्वज फडकावून सर्वांस आपल्याकडे आकर्षित करील! आणि अशी कोणती राजशक्ति त्याला आश्रय देईल? कोण त्याच्या विचारा प्रमाणें वागेल? कोण? ही **ब्रिटानिया**—जी तुझ्या ह्मणण्या-प्रमाणें—**भरतखंडाची** प्रकट शत्रू आहे, तिच्याशीं लढण्यास दंड थोपटून तयार होईल? तुझे पुत्र? तूं आशा धरीत असशील कीं, त्या महापुरुषाला ओळखून, त्याच्या इच्छेप्रमाणें वागतील? त्याचा विश्वास धरून त्याच्या मागून जातील? त्याच्या अनु-संधानानें वागतील? छिः! छिः!राम राम कर !!! हें होणार कोठून? सांप्रत काळचें तुझें राजबंधनच अशा तऱ्हेचें आहे कीं, एकाद्या राजवीर पुरुष—पुंगवाविषयीं पाहिजे तितकी खात्री असली, तरी त्याला आश्रय देतांच येऊं नये! आणि देण्या-

चीही कोणास हिंमत होणार नाहीं! कारण, तुझ्या बहु विचारशील, निपुण, तत्वशास्त्र–प्रवीण, राजनीति–वेत्त्यांनीं आपल्या अंगच्या फारच मोठ्या दुर्गुणानें **ब्रिटानियास** गुलामी खत लिहून दिलें आहे. असा दुर्गुण जोंपर्यंत तुझ्या प्रजेंत चालू राहील, तोंपर्यंत कधीं देखील तुझें बोलणें अमलांत येणार नाहीं! **ब्रिटानिया**च्या राजबंधनाचीं मूलतत्वें इतकीं चमत्कारिक आहेत कीं, केवढाही जबरा, **शस्त्रास्त्रसंपन्न**, वीरपुरुष असेना? तो अंधकारांतच पडून राहवयाचा! आणि यदा कदाचित् त्यानें कधीं वर डोकें काढण्याचा विचार केलाच, तर ताबडतोब त्याच्या नेत्रांसमोर हजारों अडचणींचा दुर्घट कोट उभा राहावयाचा!! त्यामुळें त्यास हूं किं, चूं करितां यावयाचेंच नाहीं!!! बरें, इतकेंही असून कोणी हातपाय हालवील, तर तुह्मां सर्वांत स्पर्धास्पर्धीचा व श्रेष्ठतेचा आग्रह सहड मूलांप्रमाणें असा खिळून गेला आहे कीं, बोलण्याची सोय नाहीं! त्याच्या मुळापुढें **कबीर बडा**च्या मुळांचीही पर्वाच नाहीं!! तसे पक्षकार अल्प स्वार्थाकरितां विरुद्ध होतात. ह्यामुळेंच क्वचित् कोणी बुद्धिबलानें समजूत करून, पराक्रम दर्शवून, दिव्यासन मिळविण्याची जरी इच्छा धरील; तरी वरील कारणामुळें त्याचें प्रत्येक कृत्य सहजच उलटें घडेल! शंकित राज्यें व मानाचे लोभी लोक, लगेच महाराज्याजवळ जाऊन मान मिळविण्याकरितां, किंवा आपल्या पोटांत कांहीं दुखत असलें तरी बाहेर कांहींच्या बाहींच दाखवून त्या समर्थाचे क्षणांत तुकडे करून टाकितील. अथवा हें

महाराज्य देखील त्याला राजद्रोही समजण्यास एका क्षणाचा विलंब लावणार नाहीं! यदा कदाचित् ईश्वरी इच्छा तुला अनुकूळ होऊन (**प्रभू**ची इच्छा कांहीं निराळीच आहे!) कोणी **क्रामवेल, औरंगजेब, शिवाजी** किंवा **वाशिंग्टन** ह्यांसारखा पराक्रमी वीरवर उदय पावावा; आणि त्यानें महदद्भुत कर्में करून सर्व शत्रूंचा पराभव करावा; व **आर्य**-ध्वजानें **हस्तनापूर** किंवा **उज्जनी** परिशोभित करावी तर!!! नाहीं तर तुझ्या ऐतिहासिक वर्तनावरून माझा तर असा स्पष्ट समज झाला आहे कीं, तो आपल्या आयुष्यांत असें सुदृढ राज्यबंधन संस्थापून तुझ्या पुत्रांस **युनैटेड स्टेट्स** प्रमाणें स्वतंत्र राजवीर करूं शकेल, ही गोष्ट होणेंच मुष्कील! समयीं झाली अशी कल्पना केली तरी त्या महापुरुषाच्या मरणानंतर त्याचें राज्य आणि तुझे पुत्र, यांवर तरवार आणि बागनेटांत गर्क होऊन, प्राचीन काळासारखी अवघी अंदाधुंदी येऊन पडेल!!! निदान इतकें तरी होणें अशक्यच आहे कीं, इतर देशांप्रमाणें तो महापराक्रम करून स्वदेशांत स्वस्थता राखील!! तुझा **शिवाजी** महान् पुरुष निपजला होताना? आणि त्यानें **औरंगजेबाला** त्राहीं त्राहीं करून सोडिलें होतेंना? तरी त्याच्या मागून त्याच्या वंशजांनीं काय प्रकाश पाडिला? तो तूंच पहा!! त्यांनीं कां आपलें मिळविलेलें राखिलें नाहीं? दीर्घायुषि **हिंद!** मी तुला खरेंच सांगत आहें कीं, **ब्रिटानियास** स्वदेशीं पाठविण्याचे तुझे शब्द, खरोखर तुला आत्मघातकी स्वघातक—आहेत. कोण मायचा पूत **वाशिंग्टन**सारखा

पराक्रमी निघून, स्वदेशाकरितां निःस्वार्थें लढून, मोठा पराक्रम प्रदर्शवून, अजित परदेशी शत्रूंस हांकून काढून, देशाला मुक्त करील? आणि निर्लोभता दर्शवून, रागी असतां विराग वृत्ति धारण करून, जीवनमुक्त समाधिनिष्ठ होत्साता, देशाचें कल्याण करील? असा समय अति दुर्लभ! **हिंद**? तूं समज कीं, फारच दुर्घट आहे!! तूं खात्री बाळग कीं, जोंपर्यंत असा वीर अवतरणार नाहीं; आणि तुझे पुत्र "मी आणि माझे हक्क" हें तत्व चांगलें समजणार नाहींत; तोंपर्यंत **ब्रिटानिया** देश सोडून जाणार नाहीं. तुझ्या प्रजेला हें जोंपर्यंत बरोबर रीतीनें समजणार नाहीं, तोंपर्यंत महासुभट राज्यं उद्भवण्याचा संभव नाहीं; आणि उद्भवल्यास त्याचा व्हावा तसा परिणामही होणार नाहीं. आणि उद्भवलेंच तर जीं दुःखें तूर्त तुजकडून दूर झालीं आहेत, तीं दुःखें, पुन्हा जारीनें सुरू होतील! जेथें तेथें लढाई, लुटालुट, चोर, पेंढाऱ्यांचें भय, आणि रात्रादिवस अशांतता चालत राहील! तुझे शिंग आणि खान, राव आणि उमराव, राजश्री आणि श्रीमंत, राजे आणि महाराज, अजम आणि मेहेरबान, सर्व परस्परांत सत्ता मिळविण्याच्या उत्कंठेनें स्वार्थी कर्में करूं लागतील. ते रणरंग माजवितील, आणि शेवटीं आपला व त्याबरोबरच तुझाही नाश करितील! याशिवाय दुसरें तुला काय वाटतें?"

"उभी रहा!" ज्याचें उत्तर देतां येणार नाहीं, अशी स्वतंत्रतेची सुंदर वाणी ऐकून, **हिंददेवी**च्यानें शांत राहवेना.

तेव्हां ती एकदम मध्येंच मर्यादातिक्रम करून ह्मणाली:— "तुझें वाक्पांडित्य, अजून पुरें ज्ञालें कीं नाहीं? तूं जी **ब्रिटानिया**कडून "ब्रीफ" घेऊन आली आहेस, व माझ्या तक्रारीचें छेदनभेदन करून टाकीत आहेस, त्यावरूनच मला तर स्पष्ट भासतें कीं, तूं, या चालू कज्जाचा निवाडा करावयाला आली नाहींस. केवळ तुझ्या सखीचा बचाव करण्यारितांच, आली आहेस! पण तूं, गर्वानें फुगून जाऊन असें समजूं नकोस कीं, तुझें ह्मणणें मी मान्य केलें आहे. काळा काळाची गति अति विलक्षण असत्ये. आणि त्यामुळें एका काळांत जें वर्तमान उलट वाटतें; तेंच दुसऱ्या काळांत सुलट बनलेलें तुझ्या समजण्यांत नाहीं काय? तूर्त मी स्थितिभ्रष्ट, बुद्धिभ्रष्ट, राज्यभ्रष्ट, आणि नीतिभ्रष्ट ज्ञालेंय आहें. अशा वेळीं तूं जी वस्तु मागत्येस, ती मजकडून कोठून बरें मिळावी? ह्याचा विचार तूंच पहा! **नेपोलियन** वर्सेलिसचे महालांत स्त्रीराज्य स्थापिलें तेव्हां नव्हता, असें कोणाच्यानेंही ह्मणवणार नाहीं! पण समय सानुकुळ नव्हता, हें तर मान्य करावेंच लागेल! त्याच्या हातांत लष्करी सत्ता आली, आणि त्याचें फावलें. तेव्हां त्यानें आपलें बुद्धिबळ अनुभवून पहाण्याचें मनांत आणिलें. आणि शेवटीं सर्वोपरी सत्ता स्थापून **यूरोपास** चाबरावून सोडिलें! पण इतका समय आला नसता व तो पाहिजे तितका पराक्रमी असता, तरी त्याच्या हातून काय होणार होतें? तूं जें ह्मणत्येस तें खरें आहे. कीं, हाच महापुरुष आहे; अशी

प्रथमच त्याचीं चिन्हें दिसत नाहींत. परंतु तूं अशी कशी चूक करित्येस? **युनैटेड स्टेट्स**वासी फार जुलमानें अतीशय घाबरे बुबरे होत असत. त्याच्या हातांत कसलीही काडी इतकी देखील सत्ता नव्हती. नाहीं कर बसविण्याचा अखत्यार. नाहीं लष्करी सामग्री. नाहीं अनुभवी सेनाधिपती. नाहीं शिकलेलें लष्कर. इतकेंही असून विरुद्ध पक्षीय सर्व गोष्टींनीं श्रेष्ठ होते! मग ते कसे वरें श्रेष्ठ झाले? त्याप्रमाणेंच प्रसंग आला तर हे माझे पुत्र कां न व्हावे? स. १८९७ च्या बंडाच्या वेळीं जे उच्च शक्तीचे गुण व भेद तूं दाखविलेस त्याप्रमाणें आह्मीं वागलों नाहीं; ह्मणूनच आमचा पराजय झाला. असें कांहीं माझ्यानें ह्मणवणार नाहीं. अग? लोकांची उमेद—लोकांचा कल—बंडखोरांकडे नव्हता. आणि बंड वाल्यांनींही क्रोधावेशांत चांगल्या संधीचा वाईट उपयोग केला. हें खरें. एरवीं तो वेळ जर का आज असता? तर याद राख कीं, आजचे हाल खराब झाले असते!! त्या काळीं पिवळें तितकें सोनें, असें दाखविण्यांत येत असे. लोकांचा मोह फार वाढला होता, आणि ते खऱ्या लाभाच्या वस्तूचा परित्याग करून मोहक वस्तूस लोभाऊन गेले होते; ह्मणून त्यांनीं ईश्वरोपासना करून **ब्रिटन**चा जय वांछिला. आतां तूं ह्मणत्येस तें खोटें नव्हे. कारण, जे बंडखोर होते; त्यांनींही अत्यंत विपरित कार्यें केलीं. परंतु हल्लींच्या प्रजेचे विचार अगदीं निराळे आहेत. ती आपला लाभ कशांत आहे? हें चांगल्या रीतीनें समजत

आहे. आणि **ब्रिटानिया** काय काय युक्ति प्रयुक्ति करून आपला कार्यभाग साधून घेत आहे? कसें मुसलयुद्ध करित्ये? कसकशा प्रपंचानें फसवीत चालली आहे? कशी कावेबाजपणा करित्ये? हें लहानांतील लहान बालकांपासून, मोठ्यांतील मोठ्या राजसूज्ञांपर्यंत, सर्व प्रजा चांगलें ओळखून आहे. लोकांत बिलकुल विश्वास राहिला नाहीं. त्यामुळें खऱ्या शूर वीर नरांच्या अंतःकरणांस फारच डाचतें. पण ते काय करितील? इलाज नसल्यामुळें मनांत जळफळत बसणें भाग आहे! पण समय येईल तेव्हां, इतक्या पंचवीस कोटी प्रजेंतून एक देखील वीरपुरुष निपजणार नाहीं? देशांत जर तूं पहाशील, तर रणोत्साही पुरुष जिकडे तिकडे नजरेस पडतील. त्यांना तोटा पडलेला नाहीं. आणि त्यांतूनच कोणी एखादें नावाजण्याजोगें रत्न निपजून सर्वांहून अद्भुत कर्म दर्शवून तुला आणि मला सानंदाश्चर्य देणार नाहीं काय? असा कांहीं नियमच नाहीं कीं, खाणींतच रत्न सांपडलें पाहिजे? तें केव्हां केव्हां भलत्याच एखाद्या ओसाड जाग्यांत देखील सांपडतें. त्याप्रमाणेंच समय आला म्हणजे, कोणत्याही एखाद्या स्थलांतून देशचालक अवतरेल! परंतु सवड पाहिजे आहे. इतकेंच. आतां असे विचार प्रदर्शवून जर कोणी मोठा पुरुष मैदानांत उभा राहिला तर त्याचे राई राई एवढे तुकडे तुकडे होतील! किंवा कोणी तरी तावडतोब त्याला महाराज्याच्या स्वाधीन करितील! आणि तेथें त्याचा शिरच्छेद होण्यास क्षणाचा देखील विलंब लागाव-

यात्रा नाहीं!!! पण आज इतकें जर समजलें कीं, पृथ्वी-राजाचा भीमदेवावर हटकून जय होणार आहे. तर ताबड-तोब भीमदेवाचा त्याग करून, सगळीं राज्यें पृथ्वीराजाच्या पक्षांत मिसळतील. 'परंतु तशी खात्री नाहीं, ह्यामुळें तशा वीर-श्रेष्ठांचा अनादार होत आहे. ज्याला मी स्वर्णयुग ह्मणत्यें, त्या काळांत नव्हते काय सेनाधिपती? कोषाधिकारी, देश-रक्षक आणि राजनीतिज्ञ? चीन आणि इराण यां विरुद्ध लढण्यास जेव्हां माझी प्रजा गेली होती; आणि आह्मीं जेव्हां *सेमीरामीस राणीला हांकून काढिली होती; तेव्हां देशांत कितिशी अव्यवस्था झाली होती? 'एकाची जागा दुसऱ्यानें भरून येत नाहीं!' ह्या तर शुद्ध सांगण्याच्या गोष्टी आहेत! पण महादेवी तुला मीं विचारित्यें कीं, कोणत्या राज्याचा गाडा, त्याचा सर्वांहून श्रेष्ठ राज्यनीतिवेत्ता किंवा शहानशाह

---

*सेमिरामीस राणीनें इ. स. पूर्वी २५००—२००० वर्षांपूर्वी आमच्या देशावर हल्ला केला, असें मानिलें आहे. सेमिरामीस ही निनसची पत्नी व आसिरियन गादीची अधिकारिणी होती. सिंधु नदी उल्लंघन करण्या-करितां तिनें गलबतें व हत्ती आणले होते. तिच्याकडे पायदळ ३०००००, हयदळ २००००, रथी १००००, उंटस्वार १००००० होते. तिचे हत्ती कृत्रिमी होते. सीताबोर आर्यराजा (जो सिंधु प्रदेशाचा राजा असावा.) तितक्याच सेनेसह तिच्याशीं लढावयास गेला होता. या युद्धांत सेमिरामीस राणीचा जय झाला. आणि ती सैन्यासह एका पुलावरून जात असतां, सीताबोरानें कपट युक्तीनें तिचा नाश केला. हें वर्णन हिंदु-स्थानच्या इतिहासांत कोठेंच सांपडत नाहीं! परंतु तें खरें असावें, असें वाटतें. कारण, लॉर्ड बायरन यानें लिहिलेल्या Sardanapalus नामक करुणारस प्रधान नाटकांत यांतील बहुतेक भाग आहे.

गेल्यामुळें थबकून पडला आहे? एखादें तरी असें उदाहरण तूं दाखवूं शकशील? नाहीं! तूं पाहिजे तितकी शहाणी आणि सर्व मान्य महात्मा देवी आहेस; हें मला मान्य आहे. तरी पण तुझ्यानें हें नाकबूल करवणार नाहीं कीं, ओशाळ्या अवतारांत कोणाच्यानें कोणतेंही तरंगी किंवा उत्साही काम करवणारच नाहीं! आणि तरंगी काम आरंभविल्यावांचून यश प्राप्ती होत नाहीं. महत्कर्म करण्याकरितां आवेशांतच लीन झालें पाहिजे. कारण, गरीबींत जर जय मिळाला, तरच तो पुरुषार्थ मान्य होतो. नाहीं तर, अपमान पावतो. हें तूं जाणत आहेसच. पण गरीबींतील त्वेष मनांत आणिल्यावांचून राहिलें, तर मनचे विचार मनांतच ठेवावे लागतात. आतां उत्तरोत्तर असें बंधन झालें आहे कीं,—जें तुझ्यानें नाकबूल करवेल असें नाहीं. जरी तूं आपल्या सखीच्या बाहेदारीनें आली आहेस, तरी ही—नवे विचार बाहेर पडतांच, त्यांना जेथच्या तेथें चुरडून टाकिलें जातें! तेव्हां पुढें त्यांचा प्रयोग करण्याची वार्ताच बोलावयास नको! मागितलेली वस्तु मिळत नाहीं, आणि वस्तु मिळत नाहीं म्हणून, स्वस्थ बसणें हें मूर्ख मनुष्याचें लक्षण होय! जर **इताली गारिबाल्डीला** आणि **ग्रीस** त्या चांभाराच्या पोरास शोधण्यास विलंब करिते, तर आज ते स्वतंत्र होऊन तुला प्राप्त करून घेते असते काय? सारें असेंच आहे! जोंपर्यंत **वाशिंगटन** निपजणार नाहींत, तोंपर्यंत आपल्या हातून युद्ध होईल कसें? प्रतिस्पर्धी प्रबळ आहे. तो सर्व गोष्टींनीं पूर्ण आहे. एका क्षणांत आपला

चुराडा करील. कितीही सुधारलेला असला, तरी प्राण नको नकोसा करून सोडील! असा मूर्खासारखा विचार करून जर **अमेरिकन** बसून राहते असते, तर कालांतरानें तरी चालु स्थितीस प्राप्त करिते काय? *फ्रेड्रिक जेव्हां जंगी मैदानांत खडा झाला, तेव्हां त्याला कोणाची साह्यता होती? त्यानें एकदां आपला जो पाय पुढें ठेविला, तो शत्रूस परिनम्र करून **जर्मनी**ची महा राज्यांत गणना होईपर्यंत, मागें घेतलाच नाहीं! बुद्धि तसें चातुर्य; अनुकूलता तसा अनुभव; हीं जर एकदां एखाद्या मर्द वीराच्या हातीं आलीं, तर तो, पाहिजे तितका समर्थ शत्रु कां असेना? त्याचा असा पराभव करील कीं, त्या असाधारण बुद्धीच्या पुरुषाचा गौरव सर्वत्र प्रकाशित होऊन महापुरुष देखील त्याच्या समक्ष उभा राहूं शकणार नाहीं."

"छीः! छीः!" अतीशय खिजलेल्या व विचित्र चेहऱ्यानें **स्वतंत्रता**, धीरवीरमानद सर्वश्रेष्ठ अशा **हिंद**राणीला फारच तिरस्कारानें म्हणालीः—"अग? भीरु! मला वाटतें, तुला तुझ्या स्थितीची बिलकूल दाद नाहीं. म्हणून तूं असें मनमुक्त बडबडत चालली आहेस. पण तूं असें ध्यानांत ठेव कीं, तुझ्या या वाक्पांडित्यास रतिभार तरी वजन द्यावें, असें मला कांहींच सप्रमाण कारण मिळत नाहीं! तूं देवासारखी या पृथ्वीवर मान पावली आहेस. ह्या मुळेंच तुजहून

* हा **जर्मनी**ला महा राज्यांत आणणारा असून ह्याचें शौर्य, पराक्रम, जय, विजय, हीं लक्षपूर्वक अभ्यास करण्यायोग्य आहेत.

गेल

जो मोठा देव, आज ह्या पृथ्वीवर अवतरला आहे, त्याला ओळखूं शकत नाहींस; आणि त्याच्या तेजानें तुला जें अंधत्व प्राप्त झालें आहे, त्यामुळें तुला कोणत्याही खऱ्या वस्तूचें खरें ज्ञान राहिलें नाहीं. तूं काय ह्मणतेस? सगळ्या प्रजेचें प्रताप प्रभावश्री व गुणश्रीचें दर्शन तुला हल्लींच झालें आहे; ह्मणून असें बेफाम, वहात, भरंगळल्यासारखें तूं, बोलत आहेस; तर ऐक? हे सखी! अशा वटवटींत तुझें तत्वबल बिलकूल दृग्गोचर होत नाहीं. पण तूं जाड्या बुद्धीची असें प्रसिद्धच आहे. असो. प्राचीन काळापासून तुझें ज्या प्रकारचें राज्यबंधन आहे, त्यांत तूं यत्किंचित् देखील सुधारणेची ह्मणून वृद्धि केली नाहींस. अग? तुझा असा समज झाला आहे कीं, जें आपलें आहे, तें संपूर्ण आहे! त्यांत फेरबदल करण्याची आवश्यकताच नाहीं. परंतु अशानें संपूर्णता येते काय? जेव्हां तुझें **रामराज्य** झालें, तेव्हांच तें तुला प्रिय झालें. कारण, तेव्हां तुझ्या सन्मुख दुसरा नमुनाच नव्हता. ह्मणून तुला तसें मानण्यास कारणही होतें. आणि मला हेंही कबूल केलें पाहिजे कीं, खरोखरच कोणत्याही कालांत तें सामराज्य सर्वांहून श्रेष्ठ गणिलें जाईल! कारण, तुझ्या **रामा**ची रीति सर्व प्रकारांनीं सर्वोपरी अभिवंद-नार्ह होती! पण तो काळ कोणता? आणि हा काळ कोणता? ह्याचा कांहीं तरी विचार पाहिजे! हा काळ कांहीं अजायब रीतीचा आहे! बाई? त्या काळांत संहार होणें, हें राजाच्या मर्जीवर अवलंबून असे. पण आतां प्रजाच स्वतः राज्यपद धारण करून बसली आहे! आणि जर असें आहे, तर त्या-

करितां नवी व्यवस्था, नवें राज्यबंधन आणि नवीन धर्मबंधन हीं पाहिजेच पाहिजे. ह्यांपैकीं तूं कांहीं केलें नाहीं! आतां मी ह्मणत्यें हेंही राहो; पण तूं एकाच गोष्टींत हित मानिलेंस कीं, "युद्धच करावें" मग त्यांत कांहींही होवो! परंतु त्या-विषयीं तूं कोणत्याही प्रकारचे नियम सुस्थापित केले नाहींस. तुझ्या **भारता**च्या युद्धाविषयींच विचार करून पहा! बलवंत **भीष्मा**नें जेव्हां पित्याच्या इच्छेस अनुसरण्याची प्रतिज्ञा केली, तेव्हांच तुझें जें प्राचीन बंधन होतें तें तुटलें! त्याच वेळीं तूं समजलें पाहिजे होतेंस कीं, आतां **आर्यतत्व** गेलें! अग, रीति राखिलीस प्राचीन. येणाऱ्या भीतीचा तपास किंवा शोध ठेविला नाहींस. आणि नीतीचा विचारच केला नाहींस! त्या **महाभारता**च्या युद्धप्रसंगापासूनच तूं पडत्या दशेंत येऊं लागलीस; आणि तुझें मुखकमल जें कोमजलेलें दिसतें, तेंही तेव्हांपासूनच. फार काळ गेला, व पुष्कळ दिवसांपासून तूं कितीएकांचा मार खात आली आहेस; आणि त्यांत तुझें सर्व शौर्य नाश पावलें आहे. जेव्हां **इराणी, दुराणी** आणि **मोंगल** ह्यांनीं चढाई केली, त्या वेळीं कोणत्याही प्रकारांनीं तूं आपला बचाव करावयाचें मनांतच आणिलें नाहींस. **शाहा-बुद्दीन** घोरी, **बाबर** व अगदीं आलिकडे **आफगाण**चे दुराणी व **नादिरशाह** आला. तेव्हांही तुला कसा वेळ मिळाला नाहीं? किंवा त्या वेळीं तुला समय सानुकूल नव्हता? नाहीं तर, तेव्हां तुझींच राज्यें होतीं. तुझ्या पुत्रांवर तुझा अंकुश विशेष होता. ते तुला पूज्य मानीत होते. सैन्याधिप आणि

कोषाधिकारीही होते. आणि थोड्या किंवा पुष्कळ गांवचा धनी सरदारी करण्यास सामर्थ्यवान् होता. तेव्हां तुला काय तो समय प्रतिकुळ झाला? किंवा प्रसंगानें हात नाहीं दिला? कीं झालें काय? आतां, जेव्हां नाहीं तुझें राज्य, नाहीं सैन्याधिप, किंवा नाहीं व्यवस्थाधिकारी. तेव्हां तुझ्या हातून काय बरें होईल? तशांत तुजविषयींची प्रीती समूल छिन्नभिन्न होऊन गेलेली; कितीएक तुझेच दिवटे पुत्र, तुझ्या ह्या नावाजलेल्या विपक्षियास सन्मानानें राजमुगूट घालीत आहेत! आणि त्यानें दिलेल्या दान दक्षणेनें आपला महान् सन्मान झाला, असें समजत आहेत!—ज्या पोकळ, ज्या शुष्क, ज्या रिकाम्या, ज्या निरर्थक मानानें त्यांचा कोणत्याही प्रकारचा फायदा नसून, मान मिळविणारांच्या पोरांबाळांस देखील लेशभर सुख होण्याचा संभव नाहीं. ते, अशा भिकार मानानें फुगून जाऊन आणखी तुझीच उलट निंदा करितात! त्यांना क्षुद्रत्व प्राप्त झालें आहे. आणि त्यांनीं सेवावृत्तिच जारीनें चालविली आहे. ते महत्वाच्या कामास प्रारंभ करण्याचा समय आला पुरे कीं, भित्रेपणा, दीनता आणि भय हीं अचुक पुढें आणितात! ते मातृद्रोही, धर्मद्रोही, आणि आत्मद्रोही बनले आहेत. त्यांना परदेशी राज्याचा आदर करणें, व त्या-विषयीं भक्तिभाव दाखविणें, यांतच समाधान वाटतें. सैन्याधिपाचें तर नांवच व्यावयास नको! पण साधारण तरवारीच्या कामास लायक, असे तुझ्या राजकुलांत देखील कोणी नाहींत. मग इतरांची काय कथा? मरमरून शिकलेले, शिक्षणाच्या

प्रतापानें शिक्षित झालेले, "सेंटिनल" स्वार्थी व आपमतलबी झाले आहेत. ते एखाद्या कुतऱ्याच्या भोंकण्यानें तीन कोस पळून जातील!. मग बरें विचार कर. तुला उन्नतींत आणण्यास कोण आणि कोणता समय आहे? कोणाचें झालें तरी असेंच आहे. जेव्हां सर्वच जातें, म्हणजे धनधान्य पुरुषार्थ जातात. अग? शरीराची शक्ति जाते. मनाचा उत्साह जातो. आणि राज्यांतील सत्व नाहींसें होतें. केवळ दीन हीन स्थिती प्राप्त होते. तेव्हां त्यांबरोबर बुद्धिही जाते! मग त्याची अक्कल ठिकाणीं रहात नाहीं. तशी तूं शोकाकुल झाल्यामुळें खरोखर तुझें काय आहे? हें तुलाच ठाऊक नाहीं असें झालें आहे! 'तूर्तची तुझी दशा किती अधमाधम स्थितींतील आहे? अवघ्या देशांत **पुरुष*** म्हणविणारा असा एकही नाहीं! ह्यापेक्षां अधमता ती आणखी काय व्हावयाची? जरी **ग्रीक** लोक पडले, तरी त्यांचें सत्व गेलें नव्हतें. **रोमन** लोकांत देखील **पुरुष** होते. आणि अजून देखील इतर परतंत्र नगरांत तेथील मालकाचा जुलूम असूनही स्त्रीराज्य झालें नाहीं!!! परंतु तुझ्या पोटीं अवतरलेल्यांनीं साधनबल

---

* "आमच्या देशांत इंग्रजांचें राज्य झाल्यापासून विद्यावृद्धि झाली. हें खरें. परंतु पौरुषत्व सर्वथैव नाश पावलें! ह्यांत बिलकूल शंका नाहीं. आह्मांला वाटत नाहीं कीं, आमच्या (असें म्हणण्यासहीं आह्मांस शंका वाटते!) या एवढ्या अवाढव्य देशांत, असा एकही, मनुष्य सांपडावयाचा नाहीं कीं, ज्याला **पुरुष** म्हणतां येईल!"

बाबु सुरेंद्रनाथ.

असतांना, पुरुषार्थाचा त्याग केला? बरें, इतकें होऊनही, त्यांना लाज–लज्जा–किंवा शरम वाटत नाहीं! हें तरी तुझें दैवच म्हणायचें!!! ग हिंद? तुझ्यांत जी इतकी फाजील व पोकळ पत्राज आली आहे कीं, नाहीं? हीच अतीशय खेदाची गोष्ट आहे!!! **वाशिंग्टन** ज्या प्रजेंत उत्पन्न झाला; आणि **नेपोलियननें** जो त्रास परिप्रसृत केला; ती प्रजाच निराळी. आणि **सैमन*** **वोलीवर** हाही निराळाच होता. **क्रामवेल** कसाही असो; पण अवघी प्रजा जर त्याच्या पक्षाचें अवलंबन करिती नसती तर त्याच्या उन्नतीचा वेळ कसा येंता? हें समजतेंच असतें. पण तुझ्या प्रजेच्या मुळांतच मीठ नाहीं. जनमंडलांत अजून देखील तुजविषयीं असावी तितकी प्रीति नाहीं. तसाच पुष्कळ भाग तर केवळ मिथ्या मानाकरितां वळवळत आणि तळमळत आहे!! प्रजा मतांत दोन भाग झाले आहेत. एक तुझा अगदीं धिःकार करितो. आणि दुसरा थोडासा चहातो; तरी तुझ्या छत्राखालीं राहण्यास खुपी नाहींच. जेथें अशी त्रेधा व भिन्नता आहे, तेथें चांगल्या रीतीनें राज्यव्यवस्था राहणार कशी? लोकच आज असें म्हणत आहेत कीं, **ब्रिटानियानें** स्वदेशीं गमन केल्यास एखादा

---

* **वोलिवियांत, स्पॅनिश** लुटाऱ्यांनीं जी लुटालुट चालविली होती, त्यांच्या विरुद्ध लढण्यांत, हा पुरुष प्रसिद्धीस आला होता. त्यानें स्वदेशियांस उच्छृंखल करून स. १८२१ त **स्पेन**च्या प्रजेकडून देशाची मुक्तता केली. **पेरु** व **कोलंबिया**सही यानेंच स्वतंत्र केलें. हा सन १८३० त मरण पावला.

वंगाली, शीख, गुरखा, नेपालीश, पुरभय्या, रजपूत, गुजराथी, मराठा, किंवा **मद्रासी** देश सांभाळण्यास लायक नाहीं!!! तर मग ह्या वरूनच सर्व तर्क होत नाहीं काय? बरें, हें तरी मनच्या मनांत का? नाहीं. साधारणतः **हिमालया**पासून **कन्याकुमारी**पर्यंत असाच ध्वनी ऐकण्यांत येतो. मग तुझ्याच म्हणण्याप्रमाणें कां होईना? समय आल्यास काय उजेड पडणार आहे? हें दिसतेंच! प्रथम घरांतून निघतांनाच लोक असें बोलत निघतात कीं, "देशी लोक राजकाजाविषयीं नालायक आहेत" तेव्हां मागाहून काय होईल? याचें अनुमान करणें, फारसें विकट नाहीं! कदाचित् आतां तूं जशी हट्ट घेऊन बसली आहेस, तशिच बसलीस; आणि ही **ब्रिटानिया** व हिचे पुत्र विश्वासघातकी होऊन, एकदां हुच्चभाई झाले आणि त्यांनीं तुझा त्याग केला, तर लगेच तुझे शिंग, खान, सिंह, राव आणि रावबहादर म्यानांतून खळखळ तरवारी बाहेर काढितील, आणि **निजामा**विरुद्ध **म्हैसूर, म्हैसुर**विरुद्ध **गायकवाड, गायकवाडा**विरुद्ध **रजपूत, रजपूतां**विरुद्ध **होळकर, होळकरां**विरुद्ध **शिंदे,** आणि **शिंद्या**विरुद्ध दुसरे कोणी **नेपाळी, नागा** किंवा **गुर्खा** तयार होऊन उभे राहतील!! आणि ह्या सर्वांच्या विरुद्ध लढण्यामुळें **दुराणी**च्या पुत्रांस, **हिंदुकुशा**कडून येण्यास कोणाचाही अटकाव होणार नाहीं!!! जेथें आपसांतच अशी स्थिति प्राप्त झाली. कापाकापी, मारामारी, आणि तरवारीचे तडाके सुरु झाले, तेथें मग त्यांना हरकत करावी

कोणी? एखाद्या महासागरांत भयंकर तुफानी मौजा सुरु झाला, म्हणजे जशी गलबतांची दशा होते; त्याप्रमाणें या महासागरांत उठणारा मौजा तुफानी झाला कीं, **रूस, फ्रेंच, इराणी, दुराणी,** किंवा **चांचे** ह्या गलबतावर तुटून पडून, लुटून घेऊन ह्या गलबतास समुद्राच्या तळाशीं वसवितील! आणि तूर्त तूं जी थोडीशी तरी मुक्तता मिळवून आहेस, ती आपल्याच भोगानें बंद पाडून **सैबिरिया**च्या खाणींत काम करणाऱ्या मजुरांस जशी मुक्तता असत्ये; तशा स्थितीस येऊन पोहोंचशील! एतदर्थ **हिंद** सखी? तुझ्या हिताकरितां, मी तुला सांगत्यें कीं, **ब्रिटानिया** जाण्याची गोष्टच तूं सोडून दे—जोंपर्यंत तुझ्या सर्व पुत्रांच्या मनांत **ब्रिटानिया**चा अभाव येणार नाहीं तोंपर्यंतः—अथवा देशरक्षक प्रपंच-वीरपुरुष उत्पन्न झाला नाहीं—तो जसा **सहस्रार्जुना**ला मारून निक्षत्री पृथ्वी करणारा **परशुराम,** मदाभिमानी **रावणा**ला मारणारा **राम,** किंवा **कंसा**दि बलिष्ठ वीरांना मारणारा प्रपंच वीर प्रेमी क्षत्रिय **कृष्ण**—तोंपर्यंत: आतां तुला जर दुसरें तिसरें कांहीं मागावयाचें असेल तर खुशाल माग. मी त्याची व्यवस्था करून देईन. बाकी, **राशियन, इराणी** किंवा **फ्रेंच** ह्यांच्या आधीनतेंतील जुंवाखालीं जाण्याची हौस तूं सोडूनच दे."

"चांगलें केलें प्रियसखी? तूं फार छानदार केलेंस. आणि या अज्ञानी **हिंदराणी**ला फक्कड सपाटा लगाविलास!" **ब्रिटानिया** गर्वानें फुगून आपल्या सहायतेला ही एक महान् शक्तीची,

अजिंक्य, व मोठी देवी आलेली पाहून ह्मणाली, "देवी! माझें सांगणेंही हेंच आहे. आणि मी, हिजवरोबर जी इतकी तक्रार चालवीत होत्यें; तीही याचकरितां. पण ही द्वेषी, हट्टी, गर्वाच्या आवेशांत आलेली मूर्ख पोरगी, आपल्या सामर्थ्याचा तिळभर देखील विचार करीत नाहीं. आणि कांहींच्या बाहींच भकत व बडबडत आहे. तिला कोणी बाई? अडथळा करावा? प्रिय भगिनी **स्वतंत्रते**? तूं, माझ्या विचाराशीं अगदीं एकमत झालीस; ह्यामुळें मी अत्यानंद पावून सहर्ष तुझा फार फार आभार मानित्यें! या वाचाळ **हिंद**ची समजूत करण्याकरितां, मी हमेश अतीशय आतुर असत्यें. कारण, ही आणि हिचे पुत्र कांहीं तरी शांतीची वासना धरून व्यर्थ चालून येणाऱ्या संकटापासून मागें फिरतील तर पहावें! पण तूं आतां पहात्ये आहेस कीं नाहीं? त्याप्रमाणेंच ही नेहमीं दिवाणी, जंगली, धर्मावेशांध, राज्य करण्यास अशक्त, विश्वासघातक, बेपर्वा, असहाय आणि दीन होऊन पश्चात्ताप करीत पडलेली असते! ही आपल्या पुत्रांसह खरा विचार करण्यास शिकेल, किंवा तें दूरच राहिलें. परंतु शिकण्याच्या तरी द्वारासमीप वास करील तर ह्यांची स्थिती किती उत्कर्षतापात्र व शिक्षणीय होईल? ह्याचा विचार मी आतां आणखी उघड करून सांगूं शकत नाहीं! किंवा सांगण्याची अवश्यकता नाहीं; असें ह्मटलें तरी चालेल. ही, हमेश अंधेर राज्य आणि रक्तबंबाळ स्थितींत राजी! हिला नेहमीं आवडतें जें काय? तें हेंच. खुन, लुटफाट, विश्वासघातकता, आणि शक्ति-

हीनत्व. केव्हांही पहा? ही दासपणांत राजी*, पश्चात्ताप-रहित, आणि परतंत्रतेंत चैन आराम मानणारी असते! आणि कांहींही करा. हिजवर किती कां उपकार कराना? ते सारे एकदम विसरून जाऊन, कृतज्ञ होण्याच्या ऐवजीं कृतघ्न होऊं पहात्ये? खरेंच बाई? ह्मणतातना? भल्याची ही दुनियाच नव्हे! नाहीं तर, ही दुःखांतून मोकळी होऊन सौख्य सागरांत पडली आहे. पण हिला तें आवडतें आहे कोठें? हिच्या मनांत **रासेलस**सारखी कांहीं भलतीच तरंगी राज्य-व्यवस्था भरली आहे. आणि जेव्हां समय होता, तेव्हां तरी ती लटपट कांहीं सुचावी? पण नाहीं! यावरूनच मला वाटतें कीं, हिच्या मनांत असें राज्य करावयाचें आहे कीं, युद्ध माजवावें, रक्तोत्सव करून होम करावा, दंगे उठवून स्वहस्तांनीं घोर संहार करावा,

*"धी टाइम्स" मध्यें स० १८५७।५८ च्या बंडासंबंधीं पत्रांत ह्या बहुतेक बाबतीविषयीं पुष्कळ लिहिण्यांत आलें आहे. एक इंग्रजी ग्रंथ-कार, (ज्याला देशियांचा फारच तिरस्कार होता!) लिहितो कीं, **देशी** "अप्रामाणिक, घातक, नपूंसक आणि कपटी आहेत." मि. **बर्क** म्हणतो कीं, "**हिंदु** लोक प्रामाणिक, सत्यवचनी, शूर, साहसी, परदेशस्थांवर प्रीति करणारे, आणि अतीशय ज्ञानी आहेत. त्यांचा, रीतिरिवाज चांगला व संतोषी आहे. ते पुरुषांपेक्षां स्त्रियांस विशेष मान देतात." कर्नल **मालिसन**चें म्हणणें ऐका. तो आपल्या रागीट वचनांनीं आम्हां **हिंदूं**विषयीं असें लिहितो कीं, "देशी लोकांचा विश्वास काय? कारण, ते वचनभंग करणारे. कपटी व क्रूर आहेत. एतदर्थ, देशी राजांवर विश्वास न ठेवितां, त्यांस नेहमीं आपल्या दाबांत ठेवणें, अत्यावश्यक आहे." हीं मतें पुढें ठेवून विचार केला तर मि. **बर्क**चें म्हणणें विशेष महत्वाचें आहे; असें सर्वांस कबूल करावें लागेल.

सुखविलाससामग्री मिळवावी; आणि त्या निमित्तानें अनाचार विधीनें वागून अधर्मनिष्ठ कर्में आचरावीं. खरें स्वतंत्र व्हावें! सारांश, देशांत भवानीला संतोषविण्याचें वीं, सदैव इच्या अत्यंत मलमय व खोल मनांत रुजलें आहे. तें एकदां सफाई जळून जातें, म्हणजे मी तरी सुटल्यें असतें! बरें, त्यापासून तरी हिनें आजपर्यंत काय लाभ मिळविले आहेत? आणि पुढें काय मिळविणार आहे? तें तो प्रभु जाणे! इच्या मगजांत इतका अपरंपार कचरा भरला आहे, ह्मणून ही वारंवार रुसून फुगून बसते; आणि केलेंल तहनामे विनादिकत मोडण्यास तत्पर होत्ये. विचाराच्या निशेंत ही आली कीं नाहीं? ह्मणजे इतकी मस्त होऊन जात असते कीं, तो भंगीचंगीचा वस्ताद देखील, आपली पत्नी जी पार्वती, तिजशीं इतका जात नसेल! आणि त्या भांगेची लहर इतकी मदोन्मत्त मस्त आहे कीं, माझी सापीण आणि बरांडी तिच्या तोंडापुढें पाणी भरायला देखील निभावणार नाहीं! ही कैफांत चकचूर झाली, ह्मणजे आपलें खरें भान आपणच विसरून जाऊन, नऊ मोजून आठ ह्मणून घाबरते! आणि आपण कोण? आहे काय? हेंच उतावळीनें बावरी बनून विसरून जात्ये! बाई, तूंच सांग बरें? हीं सर्व कर्में शोकातुर होऊन विचार करण्यायोग्य नव्हेत काय? प्रभु जाणे! असें सर्वांतच दुराग्रही होणें, ह्यांत ही काय बहादरी समजत असेल ती असो! खोटेपणा, नपूंसकत्व, दगलबाजी, रक्ततृषा, क्रोधभरित वचन, धनलोभ, मानलोभ, क्षणिक कीर्तिलोभ,

मूर्तिपूजा, धर्मनीति शून्यता, मलीन मानस, कच्चें धैर्य, काम करण्याविषयीं विश्वासघातकता, अप्रमाणिकता, अविश्वास, अब्रुरहित, आणि अक्कलशून्यता, ह्यांविषयीं हिच्यांत मी इतकी परिपूर्णता पहात्यें कीं, त्यांतच ही मेठेपणा मानित्ये! आतां हिला काय सांगावें? तरी मी बरी. ह्मणूनच इतकें सोसून राहिल्यें आहें! दुसरीशी असती तर, हिचे हौल कुत्रा खाता नसता! खरोखर, हें पाहून माझें मन कसें पण ह्मणत्येस जळफळतें? काय सांगूं! अशा कारणामुळेंच मला इचा कधींही विश्वास पटत नाहीं. ह्मणूनच मला साठ हजार मनुष्यांचें गोरें सैन्य आणि एक लक्ष वीस हजार लोकांचें काळें लष्कर बाळगावें लागलें आहे*. अवघ्या प्रांताला शस्त्ररहीत करावें लागलें आहे. व पोलिसांकडून सर्वांस दहशत घालून, कह्यांत ठेवावें लागलें आहे. एक का दोन कितीक ह्मणून सांगूं? लष्करी क्याम्प ठेवावी लागली आहे. स्थानिक आणि सार्वजनीक कायद्यांनीं व धाऱ्यांनीं सर्वांस दाबांत ठेवावें लागत आहे. आणि गुप्त दूत व हेर सर्वांस चमकाविण्यास लागतात ते लागतातच! खरोखर, याशिवायही मला पुष्कळ त्रास पडतात. आणि

---

*"**बॉम्बे** ग्याझेट"चा एक चर्चापत्रलेखक लिहितो कीं, **हिंदुस्थान**च्या प्रजेची व्यवस्था ठेवण्याकरितां, **ब्रिटिश** सरकारानें जितकें सैन्य ठेविलें आहे. तितक्या सैन्यानें तितक्या संख्येच्या यःकश्चित बकऱ्यांचेंही रक्षण व्हावयाचें नाहीं!!! यावरून **ब्रिटन**चा जय केवढा मोठा आहे? आणि **हिंदु** लोक किती भित्रे आणि हिजड्यासारखे झाले आहेत? हें स्पष्टच दिसतें! *** कां बरें? **मराठे** आपण राज्य करण्यास लायक आहों, असें समजतात?

पुढें किती सोसावे लागणार? हें ईश्वर जाणे! पण तुला ठाऊक नसेल ताई? मला यांकडून बिलकूल फायदा नाहीं! देवी? मी पुष्कळ स्तब्धता धरून त्यांच्या हिताकरितां, इतकें संकट सोसण्याचें स्वीकारिलें आहे. हें यांच्या केवळ रक्षार्थ व लाभार्थच आहे! हें कोण बरें नाहीं म्हणेल? आतांच तूं म्हणालीस त्याप्रमाणें जर या रागीट आणि बडबडणाऱ्या पोरीवरील माझें "शीतल छत्र" मीं काढून घेऊन, हिला स्वेच्छ वर्तू देईन; आणि हिच्या मनांत उठणाऱ्या नवीननवीन स्वप्नवत् आशेच्या लहरींत रमूं देईन; व जे लाभ मिळविण्याकरितां ही दृढीभूत इच्छा दर्शवित आहे, ते मिळविण्याकरितां एखाद्या बालकाप्रमाणें हिला स्वच्छंद सोडीन; तर ही "पायमल्ली" शिवाय दुसरें कांहीं मिळवूं शकणार नाहीं! ही जगत्प्रसिद्धच गोष्ट आहे. मीं सांगितली पाहिजे असा अर्थ नाहीं. तूंच पहा? माझ्या प्रांतापासून कितीक तरी दूर राहून या मुलखांत राज्य करण्यानें मला काय लाभ आहे*? हिची हवा इतकी दुःखकारक आहे कीं, माझे पुत्र आणि पुत्री निरंतर आजारीपणाची तक्रार काढून माझें कपाळ इतकें उठवितात कीं, तें सांगण्यास मी असमर्थ आहें! एका क्षणांत "ब्रेन्फीवर" आला कीं, दुसऱ्या क्षणांत बाई? सफाई होऊन जात्ये! हिचे पुत्र असे कृतघ्न आणि निरुपकारी आहेत कीं, बोलून सोय नाहीं!! केव्हांही पहा?

* "हिंदुस्थानांत राज्य चालविण्यापासून ब्रिटिश प्रजेचा कोणत्याही प्रकारचा लाभ नसून उलट नुकसान आहे!!!"

"धी टाइम्स्" लंडन स० १८८०

सकल स्थलांत "हिंग तोळु" "हिंग तोळु" ह्मणून माझी ते निंदा करून **नेपोलियनाप्रमाणें** बहकत असतात!!! अशा त्यांच्या मर्मवाक्यांनीं **यूरोपांत** माझ्या प्रतिष्ठेस हानी पोहोंचेल कीं नाहीं? तूंच सांग बाई? त्यामुळेंच अवघ्या **यूरोपांत** असें मानलें जात आहे कीं, मी युद्धाविषयीं खरोखर **आसक्त** नाहीं! तर? **अशक्त** आहें. तरवारबहादर नव्हे; तर? तरवारीप्रमाणें परिकंपित होणारी आहें! ही माझी किती वरें अपकीर्ति? ही कोणी सोसावी! किती अपमान? किती अप्रतिष्ठा? ह्याकरितांच तर माझ्या **वेलिंगटन** आणि **नेल्सन**सारख्या पराक्रमी पुत्रांचे प्राण गेले! कितीएक या देशांत मारले गेले! आणि एकंदरींत मला पुष्कळ श्रम सोसावे लागले!!! हें काय थोडें झालें? अक्का? तूंही कबूल करशील कीं, मीं ह्मणूनच हें सारें संकट सोसलें! दुसऱ्या तिसऱ्यानें सहन केलें नसतें!! माझ्या जागीं जर दुसरी कोणी असती, तर ती केव्हांच हिला सोडून गेली असती; परंतु केवळ मेहरबानींखातर दयालुपणानें मीं हिला माझ्या "शीतल छत्रा" खालीं धरिली आहे! आणि तें, हिनें खऱ्या भक्तिरूपानें व मनःपूर्वक, पवित्र **प्रभू**समक्ष स्वीकारिलेंच पाहिजे! आजपर्यंत हिनें मला मनापासून जीं वचनें दिलीं आहेत; त्यांवरून असें उघड दिसतें कीं, सचराचर प्रभूची इच्छा देखील, अधम गारेंत पडलेल्या या राणीला माझ्या छत्राखालीं अणण्याची होतीच. ह्मणूनच त्यानें फार शहाणपणानें हिला माझ्या चरणाखालीं

ठेविली आहे. हें कर्म उत्तम, तें तर झालेंच. पण अनुपम आहे! आणि हें सत्य कर्म स्तुत्य व विजयवंत देखील होय!!!"

ही छलभेदयुक्त कपट वाणी ऐकतांच, **स्वतंत्रतादेवी** फार क्रोधास चढली. आणि हातपाय आपटून **ब्रिटानिया**-कडे सक्रोधदृष्ट्यवलोकन करूं लागली. तिनें सकोपतेनें जे आपले दांत ओंठ चाविले, त्यांतून रक्त प्रवाह चालूं लागला! ह्यावरून तिला किती राग आला होता? हें उघड दिसत असून त्याची कल्पना करणें साहजिक आहे!

"हा तुझा मार्मिक छलभेद, माझ्या समोर चालवूं नकोस!" कर कर दांत चावत **स्वतंत्रतादेवी** ह्मणाली:—"भल्या पोरी! काय तूं इतकी उन्मत्त झाली आहेस? नाक वर करून लुसु-लुसु बोलायाला तुला शरम वाटत नाहीं? मी तुला चांगली ओळखत्यें. आणि तूं किती वुनियात कुळाची आहेस, हें दुनियाही चागलें जाणत्ये! समजलीस ना? तुला असें वाटत असेल कीं, हे तुझे कपटजाल कोणी पारखूं शकला नसेल? पण असें समजूं नकोस. तुझे प्रपंच, तुझें कपट, तुझे कावेडावे, सोदेशाई, लुच्चेगिरी, कला कुशलता, हीं सृष्टीं-तील सर्व मनुष्यें फारच चांगल्या रीतीनें ओळखितात. शिकार करणारा शिपाई आपल्या मनांत असें समजत असतो कीं, मीच कायतो एक बहादर शिपाई आहें. आणि फेंकलेला तीर अचूक मारून शब्दवेधी शिकार करितों. ती कोणाच्या पाहण्यांत किंवा समजुतींत देखील येत नाहीं! पण ही त्याची सर्वथैव चूक होय.

त्याच्या सारखे इतर संकेतिक पुरुष, त्याची शिकारबाजी चांगली ओळखितात. एतदर्थ, तूं आढ्यता सोड. कपट टाक. आणि गर्व त्यागून निरभिमानी हो. फार दिवसांपासून तुझ्याशीं पांच चार गोष्टी करण्याचें माझ्या मनांत असून, मी तुझी खोड जिरविण्याचाच प्रसंग पहात होत्यें. परंतु आजवर तो मिळाला नव्हता. आणि माझी इच्छाशक्तिही तुला दर्शवितां आली नव्हती. म्हणून, हेंच समजून उमजून मुद्दाम आज मीं तशी वेळ आणिली आहे. व ती, बहुतांशीं चांगल्याकरितांच आहे. हें जरी खरें, तरी तुझी या वेळची पक्की सोदेगिरी आणि स्वैच्छिक साहस कर्में, ह्यांचे दोष काढण्यास तूं होऊन मला पुरतें कारण केलें आहेस. आतां माझ्या कोमल व प्रेमल हृदयानें तुझी गेलेली शुद्धी व बुद्धी ताळ्यावर आणण्याकरितां; माझा चमत्कार तुला दाखवित्यें! जेव्हां तूं उन्मादित रक्तानें साधारण तन–मन–सामर्थ्य–कामीं लाविलेंस; अत्यंत उत्साहांत आणि आवेशांत आलीस; आणि इतर *प्रजेनें अन्य स्थलीं जीं विजयकर्मरूप कृत्यें केलेलीं तीं, ऐकिलींस किंवा पाहिलींस; तेव्हां तुलाही आपला लौकिक केला पाहिजे असें वाटून, तोंड घेऊन बाहेर पडलीस! आणि कांहीं वर्षां

---

* सोळाव्या आणि सतराव्या शतकांत **यूरोपां**तील प्रत्येक राज्यांत इतर प्रदेशांत जाण्याचा अतीशयच वायू भरला होता. **स्पॅनिश**प्रजा **अमेरिकेंत, डच** लोक **जावा—मलायांत, पोर्चुगीज, अमेरिका** आणि **इंडियांत** गेले. तेव्हां **इंग्रजां**सही वाटलें कीं, आपण देखील कोठें तरी जावें! आणि नशिबाची परीक्षा पहावी.

पूर्वीपासून परिपीडित असलेल्या ह्या हिंदकडे आलीस. हें तर खरें? येथें पाय देण्यास फुरसत!!! लगेच तूं हिला विपत्तींत पाडून ज्या ज्या रीतींनीं वागली आहेस; त्या त्या सर्व मला माहीत आहेत—तूं तुझा बचाव माझ्यापुढें कोणत्या रीतीचीं कारणें दाखवून करिशील? माझ्यासमोर तुझा पोषाख, परहेजगारी, फिरस्ताई, धार्मिक निष्ठा, किंवा या चालू काळची "पुराणप्रसिद्ध एकोणिसाव्या शतकाची फिलॉसफी" अगदीं उघड सांगायचें झालें तर, "दग्या फटक्याचा व्यापार!" व्यापाराचीं कृष्ण कारस्थानें, तुझे अन्याय, आणि क्रूरता, ह्यांचा बचाव करण्याकरितां आतां असाधारण कृत्रिमी आणि दिलगिरीचीं कारणें दाखविण्याचें अगत्य बिलकूल राहिलें नाहीं.* तुझी राजधर्मनीति, इतकी स्पष्ट काळिमा लावणारी आहे कीं, जसें हिऱ्यांत तेज, ध्रुवांत अचलता, आणि सूर्यांत प्रकाश!!! म्हणजे मी काय सांगत्यें तें समजलीस का? ती अगदीं स्पष्ट दिसत्ये आहे! म्हणून आतां कांहींही होवो. तूं खरें शौर्य व पराक्रम छपवून या टक्कल पडलेल्या मस्तकावर झांकण टाकून, एक

* "केवळ दरारा व दांडगाई यांवरच जर आमचे राज्याचा पाया घालावयाचा नसेल, तर योग्य **नेटिवांस** जास्त हक्क देण्याची व त्या योगें त्यांस आह्मांविषयीं सद्बुद्धि उत्पन्न होण्याची, व त्यांनीं पुढें कोणत्या मार्गानें जावें? ह्याची पद्धति दाखविली पाहिजे." मि. **फासेट** जो **भरतखंडा**च्या हितार्थ मथन करणारा होता, त्याचे हे विचार आहेत! आणि त्यांवरून असें होणार नाहीं तर, तसें करावें, पण तसेंच जर असेल, तर असें कसें होईल? इतकाच भावार्थ निघतो आहे!!!

मि. **फासेट**चें चरित्र पृष्ठ, ३४६.

आपणच काय ती खुब सूरत व सुगुणी आहें. असें मला दाखविण्याची मुळींच जरूर राहिली नाहीं! आणि तूं मजकडे कितीही लपंछपं केलेंस, म्हणून का मी तुझे गुण ओळखल्याशिवाय आणि स्पष्ट सांगितल्याशिवाय राहणार आहें? कारण, मला तुझे सर्व गुण माहीत आहेत. तूं लहान पोर होतीस, तेव्हांपासून मी तुला ओळखत्यें! काळांतर–युगांतर–झालें. तरी ह्या ब्रिटनराणीचीं सर्व कर्में माझ्या डोळ्यांसमोर घडताहेत; घडलीं आहेत; व पुढेंही घडतील. तेव्हां आतां मला सांग कीं, तूं रूप पालटून नटून फटून आलीस, ह्मणून मला ठकविण्यास सामर्थ्यवान् होशील? आतां मी तुला विचारित्यें, तें कृपा करून सांग. या आर्य वंशाच्या भारतभूमींत येण्याविषयीं तुला कोणी निमंत्रण केलें होतें? अथवा तूं इतकी शक्तिसंपन्न आहेस; अशी का तुला घमेंडी आहे? इसवी सन १६१२ पूर्वी आणि नंतरच्या एका शतकांत ह्या देशांत तुला कोणी तरी चहात होतेंका? अथवा भरतखंडाच्या एखाद्या तरी भागावर उभें राहण्याचा अग? नुस्ता पाय तरी देण्याचा तुला हक्क होता? अथवा या भूमीवर तुला कोणत्याही प्रकारची सत्ता तरीं देण्यांत आली होती? तूं घरांत घुसलीस. तखलदी—दिखाऊ–वस्तूंनीं सर्वांस मोह उत्पन्न केलास. ह्याशिवाय अगदीं प्रथम तूं कांहींतरी केलें होतेंस का? उदारबुद्धि, जनदया, रणोत्साह किंवा विवकमर्यादेचें कोणतेंही कर्म, तूं प्रथमिक कालीं केलें होतेंस काय? तूं स्वछंद अंतःकरणानें संकट सोसून क्रूर क्रोधाला वश न होतां–

जशी या वेळीं शांततेनें गोष्टी सांगत आहेस, तशी वागून—सावधपणा धरून एशियेंतील भूमीचा लाल रंगानें रक्त संहार केला नाहींस? आणि तें कर्म तुझी भूल, असावधता, अथवा समयोचित नव्हे; असें तुला मागाहून वाटलें असेल! तर मग अग! तूं कधींतरी पश्चात्ताप केलास खरा? कार्यपरत्वें तूं जीं जीं अधर्म कर्में केलीं आहेस, आणि अपमानानें सक्त कायद्यांची नीति स्थापून हिंद भूमी मिळविलीआहेस, त्याचें स्मरण झालें ह्मणजे, माझ्या अंगावर रोमांच थरारतात! माझ्या मतें हें तुझें करणें, अत्यंत खेदकारक, वीरत्वनाशक, आणि इतिहासाच्या पृष्ठावर काळोखी ओतणारें (नव्हे सर्वांहून श्रेष्ठांत श्रेष्ठ!) आहे! ह्यांत बिलकूल संशय नाहीं. स्वच्छ, पण खोट्या—कृत्रिमीव्यापारोत्तेजन निमित्तानें तूं प्रवेश केलास. केव्हां समजलीसना? जेव्हां हें **भरतखंड** तुझी "सिव्हील वॉर" आणि "वॉर्स ऑफ रोझीस" सारख्या स्थितींत होतें तेव्हां—जेव्हां **हिमालयापासून कन्याकुमारी**-पर्यंतची प्रजा, व्यवस्थाबंधनाच्या खराब स्थितींत होती तेव्हां. जेव्हां अप्रमाणिकपणा आणि स्पर्धास्पर्धीच्या चकामकींत, प्रत्येक राज्य वारंवार आपलें बळ अजमाऊन कीर्ति मिळविण्याच्या शोकांत निमग्न झालें होतें तेव्हां—जेव्हां दुर्दशेस पोहोंचलेल्या राज्यासमीप भयाचे भडके फैलावले होते—आणि पराभव पावलेले, परदेशी व स्वदेशी अथवा विजयी सरदार, आपल्या सामर्थ्यबळास सुदृढ करून स्वराज्याची सरहद्द वाढविण्यांत महत्व मानून गर्वांत निमग्न झाले होते; आणि परदेशी,

परधर्मी राजांस हांकून देऊन, आपल्या राज्याची वृद्धि करण्यांत गर्क होते तेव्हां—तशा खराब वेळीं तुझें पाऊल या देशांत पडलें. जर तो वारिक रणसंग्रामाचा समय नसता, तर जी भूमी हा कालपावेतों सर्वांकडून सुरक्षित राहिली होती, तींत तुझें येणेंच दुर्लभ! देशाभिमान विभागून गेला होता. देशजनता नव्हती. तूं, तुझा हेतू निराळाच दाखविलास. आणि त्या वेळीं तूं इतकी भिकार दशेनें आलेली दिसलीस कीं, तुझी त्या वेळीं कोणी पर्वा देखील केली नाहीं!!! तूं असें पहा; लांडगा कधीं मेंढीच्या वेषानें येऊन मेंढ्यांस ठकवील; तर त्यांत त्याचा कोणी मोठेपणा मानील काय? नाहीं! कारण, हें खऱ्या शूर वीराचें कर्मच नव्हे! पण तुला तरी काय? शूर वीर, राजबीज, किंवा अंशावतारी होण्याची किंवा लोकांकडून म्हणवून घेण्याची थोडीच पर्वा होती*! कोणत्याही निमित्तामें स्वार्थ साधून धन मिळवावें. असा तूं निश्चयच केला होतास. मग तें कसेंही मिळो! अथवा तुझा असा देखील विचार असेल कीं, धनानें सैन्य, सैन्यानें विजय, विजयानें देश, आणि देशानें कीर्ति मिळत असत्ये. प्रथमपासूनच तुजमध्यें सदाचार, सत्य, प्रामाणिकपणा व धर्मास्था ह्यांच्या नांवानें शून्याकार! तेव्हां त्या वेळची गोष्ट

---

* जगत्प्रसिद्ध ड्यूक ऑफ **वेलिंगटन**च्या **भरतखंड** युद्धाविषयीं मि. **काबडन** म्हणतो कीं, "ह्या अंगावर कांटा उभारण्याजोग्या वृत्तांतील एका पृष्ठाकरितां, **परमेश्वर** आह्मांपासून अगर आमच्या मुलां लेकरांपासून जाव घेतल्याशिवाय कधींही रहाणार नाहीं!"

मुलें **काबडन**चें चरित्र पुस्तक २ पृष्ठ १३३

काय सांगायची? सुरतेंत मुक्काम केल्यानंतर, त्वां हळुहळू इतर स्थळीं प्रवेश केलास. स्वार्थी कुभांडें रचूं लागलीस. हें तर खरें? अधर्म कर्म करण्याची तुला मुळींच भीति नव्हती. मला खरोखरच माहित नाहीं कीं, तूं कधींही राज्य प्राप्ती-करितां उजळ कपट केलेंनाहींस! उच्च गुणास व उच्च कुलास न शोभण्यासारिखीं कर्में जारीनें करूं लागलीस, आणि त्यांतच आपलें शहाणपण आहे, असें मानिलेंस. तूं, या देशांत जोजो नव्या नव्या तऱ्हेचा खेळ खेळलीस; आणि नवीन प्रकारचे फेरफार केलेस; ते तुझा स्वार्थ साधण्याकरितां व लाभ संपादनाकरितांच. ते शुद्ध देशी प्रजेची बहार करण्याकरितां नव्हे! तुझा उद्देश कधीं काळीं तसा असायाचाच नाहीं. व पुढें होईल असेंही निदान माझ्यानें तरी म्हणवणार नाहीं!!! प्रजेचा संपूर्ण विश्वास तुजवर बसावा, आणि तिचें चांगलें तें तुझें चांगलें; एवढ्याकरितां तूं मोह उपजवून नव्या नव्या वशीकरणानें तीस वश केलेंस. युरोपांत चालणारी उत्कृष्ट सुधारणा दाखल केलीस. परंतु त्याचें कारण इतकेंच कीं, तुझ्याच विश्वासावर आर्यजन, इमानानें व ऐक्य भावानें राहावे. हा अतीशय दीर्घ दृष्टीचा व तीव्र बुद्धीचा हेतु, बहुश्रुत राजनीतिवेत्ते जाणत होते; आणि जाणतही आहेत. तूं कसकसे खेळ, खेळत आहेस; हेंही त्यांस समजत होतें. परंतु ते आड आले नाहींत. ते तुला वश झाले. तेव्हां तूं सामदामभेदाची युक्ति प्रयुक्ति लढवून सर्वांस थंडगार केलेंस! ह्यामुळें तुझी बेधडक वृद्धि झाली. कितीएक

राजकुमारांस सनद दिलीस. जणों, ते सारे तुझे चाकरच असावेत कीं नाहीं? अशा प्रकारची!—जोंपर्यंत तूं संपूर्ण बलवान् होऊन या देशांतील कुलदीपकांस धरून, मारून, हिराऊन, शिक्षा करण्यासारख्या स्थितीस येऊन पोहोंचली नव्हतीस; तोंपर्यंत सर्वांना राजी खुषी राखून विलायती वस्तूंच्या भेटा देऊन नम्र होतीस. पण जेव्हां तूं पाहिलेंस कीं, आतां मी पाहिजे त्याबरोबर लढण्यास शक्तिमान् आहें. आतां पाहिजे तें करण्याची शक्ति आपल्या अंगांत आली आहे. तेव्हां हळु हळू सर्वांस एका काठीनें ठेंचूं लागलीस. कोणाला "नालायक" कोणाला "मूर्ख" कोणाला "राज्य चालविण्यास अशक्त" वगैरे विशेषणें (असल्या विशेषणांचा तुजजवळ तोटा नाहींच!) देऊन पदभ्रष्ट केलेंस. आणि जे तुला स्वर्गाच्या देवीप्रमाणें पूज्य मानण्यास तत्पर होते, व तुझ्या सैनातींत दासानुदासांप्रमाणें खडे राहिले होते; त्यांची तूं **शहानशाहाजादी** झालीस. पण त्या बिचाऱ्यांस तरी नांवचे राजे* राहूं दिलेंस! पहिला डाव जो तूं खेळलीस तो हाच कीं, "मी पुरुषार्थी आहें." असें दाखविण्याकरितां कितिएक राजांस लांच देऊन वश केलेंस. त्यांच्या शत्रूंशीं लढलीस. आणि ह्या देशांतील लष्करास या देशांतीलच धनानें संतोषवून (तेरा धरम तेराही द्वार!) त्यांच्या शत्रू राजांस जेर करून आपले शरणागत केलेंस.

---

* "राजा" हें विशेषण अक्कलहीन व मूर्ख पुरुषासही लाविताते. आणि तशाच अर्थाचे तर्तचे राजे झाले नाहींत! असें कोण म्हणेल? "अमृतसंचार पत्रिका."

ज्यांनीं तुझी पत नाहींशी केली होती, त्यांविरुद्ध होऊन त्यांना मारिलेंस. आणि तूं देखील मार खाल्लास. पण त्यांस तर दाखविलेंसच कीं, "मी भली आहें!" ह्या सर्व कमांत तूं तुझा भक्ष रांधिलास. दुसरें कांहींच केलें नाहींस. जेव्हां जिंकिलेल्या राज्यांचे तुकडे होऊन वांटणीचा प्रसंग येई, तेव्हां "नरदमशंभू*"—ज्यांत तत्व असे, तो चूडामणी माल तूं लाटिलास! पूर्वीचा तुझा निर्लोभ आश्रय—अतिउत्तम आश्रय-जो रंक झालेला व उपकारानें दबलेला कर्नाटकचा नबाब त्यानें, मोबदला देतांना तूं जें मागितलेंस, तें दिलें. पण मूर्ख आर्यांनीं असा विचार पाहिला नाहीं कीं. ही अधर्मनीतिसंपन्न! हिच्याशीं धर्मनीतियुद्ध किंवा नीति कर्म काय कामाचें? कारण, तूं जो आश्रय दिला अहेस, त्यांत "धन्याला म्हणायचें मार, आणि चोराला सांगायचें पळ." असेंच आहे. पहिला तुजजवळ आला, तर त्याला सांगायचें कीं "आमच्याकडून इतकी मदत मिळेल, पण इतका बदला दिलास तर! आणि दुसऱ्याकडे लपं छपंची पद्धति!"

---

* **म्हैसूर** जिंकिल्यानंतर वांटणीविषयीं लिहीत असतांनां एक इतिहासकार असें म्हणतो कीं, "त्या तिघांच्या तहांत असें ठरलें होतें कीं, आपल्या सामाईक परिश्रमानें जो प्रांत हस्तगत होईल, तो तिघांनीं सारखा वांटून घ्यावा. * * * ह्या तहाप्रमाणें अक्षरशः चालण्याचा लार्ड **कार्नवालीस** याचा निश्चय असून त्यानें, प्रत्येक सहायकर्त्या राजाला नुकसानीबद्दल १५००००० रु० व प्रांताचा $\frac{1}{3}$ दिला. आणि एकंदर चाळीस लक्ष उत्पन्नाचा प्रांत कंपनीच्या राज्यास जोडिला!!! ०००

मार्शमन्स हिस्टरी ऑफ

व्हा॰ पहा.

बरें, जे रोषानें अंध झालेले, त्यांस चांगलें वाईट, खरें खोटें, कपट सौजन्य हें, सुचणार तरी कोठून? ते तुझी मागणी कबुलच करीत. आणि अखेरीस ते राजे किंवा ठाकोर रडत बसत! त्यांत तुझें मात्र काम होई. आणि दुसरे फुकटच्या फुकट कापले जात! वाटणींत चांगला माल आपण घेऊन गदळ सदळ त्यांच्या हिशास. तेंही आणखी शरतीनेंचः—"प्रसंग येईल तेव्हां आम्हांस आश्रय द्यावा. आमच्या विरुद्ध पक्षास मिळूं नये." ह्याप्रमाणें तूं स्वतंत्र राजांस परतंत्र केलेंस!!! तेही भक्क्यानें विचारे दिपावले. आणि बराच काळपर्यंत तुझें कपट त्यांच्या समजुतींत देखील आलें नाहीं. आणि जेव्हां त्यांचे डोळे उघडले, तेव्हां अशी संधी नव्हती कीं, स्वतंत्र होण्याचा दावा करावा! अशा प्रकारच्या करारांनीं ताबीन झालेल्या राजांकडे सल्ला सांगण्याच्या निर्मळ निमित्तानें रेसिडेंट पाठविलेस—खरें पाहूं गेल्यास ते, तुझा हुकूम बजावण्याकरितां; किंवा त्या राजांस तुझ्या ताबीन राखण्याकरितां; अथवा ते कधीं तुझ्या आज्ञेचें उल्लंघन करितील तर एकदम अचानक सैन्य पाठवून त्यांना जेर करण्याकरितां; अथवा त्यांचा समूळ नाश करण्याकरितांच होते.—देशी राज्यांत सल्ला शांति रहावी; एतदर्थ, राज्याच्या खर्चानें लष्कर ठेविलेंस. आणि जगास सांगितलेंस कीं, हीं देशी राज्यें आबाद करण्याची माझी किती काळजी आहे

* "ग तूं खरेंच सांग, तुझी अशी इच्छा होती कीं नाहीं? तशाच अ[illegible]तांच, त्यांच्याच लष्करानें त्यांच्याच प्रांतांत प्रवेश बझार पत्रिके[illegible] त्यांचीं राज्यें गिळंकृत करून बसावें! तूं बापड्या

आश्रय रहित झालेल्या, बालक राजपुत्रांच्या तंट्यांत मध्यस्ती करण्याची मागणी केलीस. आणि बळजोरीनें तुझ्या लबाडीच्या इनामादाखल उत्तम व फलद्रुप देश काढून घेतलास.* जसजशी तूं हिंदुस्थानांत शौर्यानें व पराक्रमानें वृद्धिंगत होत चाललीस, तसतशी अगदींच दांडगट होत जाऊन, निर्लज्जपणांत पुढें सरसावलीस. हें सर्व मनांत आलें म्हणजे तुझ्यासारखी लबाड, कपटी आणि दगलबाज क्वचित्च आढळेल! आणि इतकें तूं तूर्तातूर्त शुक्रदर्शनीं दर्शविलें असून त्यांनीं तुला खुशाल पडून राहूं दिलें! ह्यापेक्षां मूर्ख राजांस काय आणखीं शिंगें असतात? तुझ्या परवानगीशिवाय कोणत्याही महाराज्यानें दुसऱ्यांशीं पत्रव्यवहार देखील ठेवूं नये. असा विडा तूं उचलविलास. आणि मित्रत्वानें म्हणून हा संदेश, संदेशहारकाबरोबर पाठविलास. पण त्याच्या पृष्टभागावर युद्धदुंदुभी वाजविणारा, आणि पाण्याच्या अक्षरानें लिहिलेला ढंढेरा (जाहीरनामा) होता कीं, "या हुकमाचा भंग कराल, तर एकदम राज्य काढून घेण्यांत येईल." "या पत्राचा अपमान केल्यास त्याचा बदला, तुमचें राज्य आणि जिंदगीचें जें साटें ठरलें आहेत, त्यांतून काढून घेतला जाईल!" हें जसें कोणालाही ठाऊक नाहीं!! अशी तुझी समजूत आहे वाटतें? राज्यवृद्धी झाल्यानंतर, देशी राजकुमारांस, त्यांच्या

* मि. **ब्राइट** म्हणतो कीं, "**वारन हेस्टिंग्स्**पासून अयोद्ध्या जोडिली जाईपर्यंत निरनिराळ्या बहाण्यानें कंपनीनें सुमारें ३२५००००० रु० हरण केले आहेत."

ब्राइटचें भाषण पृष्ट ७० पहा.

शरीरप्रकृतीचा विचार न करितां, चार पांच स्त्रियांशीं लग्न करण्याची परवानगी दिलीस! आणि ज्यांची इच्छा नव्हती, त्यांचें बलात्कारानें पुष्कळ स्त्रियांशीं लग्न लाविलेंस*!! पण जगास मात्र असें दाखविलेंस कीं, प्राचीन **आर्य** रीतीरिवाजांस मी मान देणारी आहें! त्यांची अवगणना करावी असें आपल्या मनांत देखील येत नाहीं! पण **ब्रिटानिया**? हें तसें नव्हे. राजकुल, एकदां जनानखान्यांत मशगुल होऊन राहिलें, ह्मणजे तूं काय करीत आहेस? ह्याची त्याला दाद देखील लागूं नये! व त्यानें "हां जी" "जी हां" करीत रहावें! आणि तुझे हुकुम कसे भेद भरीत आहेत, हेंही समजण्यास असमर्थ व्हावें. सारांश, जोंपर्यंत तसा वेळ आला नाहीं, तोंपर्यंत तूं सर्वोपरी आहेस, असें दाखविलें देखील नाहींस; पण जेव्हां समय प्राप्त झाला, तेव्हां त्याचा पट्टा करून एकदम बेधडक तूं सर्वोपरी चक्रवर्ती राजराजेश्वरी! होऊन बसलीस? जसा **नेपोलियना**नें **इतालीं**त केला होता, तसा एक देखील संग्राम तूं स्वतःच्या हिमतीवर केला नाहींस! सर्वोपरी राज राजेश्वरी झालीस, तरी गुलामाहून बेहत्तर गणना नाहीं! उकळण्याचें काम जारीनें चालविलेंस. ज्यांशीं तुझा कोणत्याही प्रकारचा संबंध नाहीं. अशा नातलगांच्या आणि सरदारांच्या कज्जांत तूं मुद्दाम हात घातलास? कोणा राजाला कमी मानास पात्र; व कोणाला कमी तोफांचा अधिकारी असें समजून हरतऱ्हेनें त्यांस खालीं पाडिलेंस? आणि तुझ्या

* अगदीं ताजा दाखला. **गोंडल** आणि **भावनगर**चे ठाकोर ह्यांविषयीं असेंच झालें आहे!

हातानेंच तूं सर्वोपरी झालीस ! ! ! इतकें होऊन त्यांस मात्र त्यांच्या प्रजेसमक्ष हलकें पाडिलेंस ? सर्वोपरी—चक्रवर्ती* म्हणवून घेण्यास काय काय गुण पाहिजेत ? हें तुला कशानें माहीत असणार ! बरें, जे सर्वोपरी झाले आहेत, त्यांचा इतिहासही तूं विसरून गेलीस ! किंवा तुला तो माहीत असेल, असेंही माझ्यानें म्हणवत नाहीं ! जर असता तर असें झालेंच नसतें. चक्रवर्ती पदधारण करण्यापूर्वी, प्रजेला संतोषित करणें अत्यावश्यक होतें. पण त्याची तुला पर्वा आहे कोठें ? तूं आपलें कुरूप दाखवून साऱ्यांचा थरकांप केलास ! प्रथम समाधानी करण्याच्या निमित्तानें, कितिएक राज्यांची लगाम तूं आपल्या हातीं घेऊन, त्या द्वारें आपलें पोट पुष्ट केलेंस ? त्या कारणानें तुला कधींतरी अजीर्ण देखील झालें असेल—जीं राज्यें तूं आपल्या हातीं घेतलींस त्यांचे युवराज आणि यशस्वी पुत्र, जेव्हां राज कार्य करण्यास योग्य झाले ; तेव्हां कांहींना—काहीं बहाण्यानें त्यांस हरकत घेतलीस. " आतां तुम्हीं वयांत आलां आहां हें खरें ; पण राज्य करण्यास अयोग्य आहां. "

---

* चक्रवर्ती पदाविषयीं "महाभारतांत" असें लिहिलें आहे कीं, देशोदेशींच्या राजांस निष्कपट जिंकावें, त्यांची सगळी सत्ता कायम ठेवावी. त्यांनीं स्वतंत्र रीतीनें आपलें राज्य चालवीत असावें. महाराज्यानीं त्यांत पडूं नये. त्यांनीं महाराजास स्वेच्छेनें सर्व प्रकारचा मान द्यावा. अश्वमेध, किंवा राजसुययज्ञादिक क्रियेच्या वेळीं चक्रवर्तीस सन्मान द्यावयास जावें. तेथें त्यांचें पूजन व्हावें. राजकोषांत व राजरचनेंत सर्व प्रकारचा हक्क त्यांस द्यावा. खंडणी देण्याशिवाय इतर कोणत्याही रीतीनें चक्रवर्ती राजानें मांडलिकांवर कसाही हुकूम चालवूं नये.

"इंग्रज अधिकाऱ्यांकडे शिक्षण घ्या. नंतर विचार पहातां येईल." "तुम्हीं कच्चे आहां, ह्यामुळें प्रजा त्रासेल; व तुम्हीं धोक्यांत पडाल; ह्मणून तुह्मांला मिळत आहे, तें वर्षासन खाऊन खुशाल पडून राहा." असें सांगून बहुतेक राज्यें आपल्या हाताखालीं घातलींस? अग? कितीएकांच्या वारसांविषयीं वांधे काढिलेस. कितीएकांस दोन गांव देऊन चांगले पांच बळकाविलेस! कोणाला कांहीं तर, कोणाला कांहीं. अशी चंचलता करून तूं ह्यां देशांत जय मिळविलास—तो राजकीय दरवड्याहून विशेष महत्वाचा आहे असें नाहींच!! तूं जितकी ढोंगी आहेस, तितकी कोणीही नसेल! जरी तूं अर्जिक्य, बलवान् आणि वेयोनेटावर नाचणारी आहेस; तरी देखील त्यांतही तुझा दांभिकपणा प्रत्यक्ष दिसून येतो. दोन राज्यें जर ऐक्यता करितील, तर तुला उडवून टाकण्यास विलंब नको. ह्मणूनच दोघांसही दूरच्या दूर ठेवण्याचा उद्योग त्वां आरंभिलास? कांहीं होवो. तुला विचारल्याशिवाय पाणी पिऊं नये, कोठें जाऊं नये, कोणाशीं बोलूं नये, मग त्या दोघांचा संप व्हावा कसा? पाणी पिणें, किंवा पान खाणें ह्यांत सुद्धां तुझा अंमल!!! ह्याप्रमाणें तूं आपली तऱ्हा कांहीं निराळ्या तऱ्हेची दाखविली आहेस. स्त्री किंवा सहोदर, आप्त किंवा इष्ट, स्नेही अथवा नातलग, यांस देखील भेटूं नये! विवाहकार्य देखील तुला विचारून व्हावें! कन्येला राज्य द्यावें; किंवा देऊं नये? ह्याचा विचार ही तुझ्याच मर्जीवर! ह्याप्रमाणें लहान किंवा मोठे, हजारांचे

आवकवाले किंवा कोटीचे; शंभर मनुष्यांचे धनी किंवा लाखांचे; हे सारे तुझ्या कपटयंत्रांत चिरडत अहेत! त्यांची कळ पडली तुझ्या हातांत! तूं जर थोडासा जोर करशील, तर त्यांच्या चिंधड्या चिंधड्या उडून धिंडवडे होऊन जातील! तुला तुझीच नीति प्रीय आहे. तूंच साऱ्यांस आपल्या हांकेनें मन मानेल तशी बोलावीत आहेस. बाकी, कोणी व्हावी तितकी खंडणी देवो; किंवा काय पाहिजे तें करो. त्याला त्याच्या राज्यावर ठेवणें, हें तुझ्या गमती मनाच्या मर्जीवर किंवा लहरीवर आहे! कोणी राजा, आज जर असें म्हणेल कीं, "आपला अमुक एक शत्रु आहे, त्याजकडून बचाव करण्याकरितां तूं आश्रय दे." तर तुझ्या मर्जीस आलें तर तूं देणार? त्यांचा तुजवर कोणत्याही प्रकारचा जोरा नाहीं. किंवा तुझी लहर फिरली आणि तुलाच असें वाटलें कीं, "ह्याचें राज्य आपणच घ्यावें;" तर तुला अटकाव करणारा तूर्त कोणी नाहीं! तूं त्याला "नालायक" किंवा "गैर वर्तणुकीचा" ठरवून ताबडतोब त्याचें राज्य तुझ्या रक्षणाखालीं टाकून देशील? बरें, यदाकदाचित् एखादें राज्य बलिष्ठ असून त्याविषयीं तुझ्या मनांत भीति उत्पन्न झाली; तर "मूले कुठाराः" हा हुन्नर तुला ठाऊक आहेच. त्या किल्यांतून गरजणारा "जाहिरनामा" काढून तूं प्रसिद्ध करिशील कीं, "हें राज्य दिवसेंदिवस सत्ताबलांत वृद्धि पावत आहे; आणि आपल्या शेजाऱ्यास तर विशेषच भयंकर आहे; किंवा यानंतर हें दुःखकारक होण्याचाही संभव आहे. एतदर्थ, असें मानण्यांत येत आहे कीं, तें ब्रिटीश महाराज्याचा

कट्टा शत्रु निपजेल; आणि आपल्या प्रतिज्ञेचा भंग करील. म्हणून प्रथमपासून कडक उपाय योजणें वाजवी होय. महाराणीचें सरकार आपल्या नियमाप्रमाणें, हें ब्रिटीश राज्याचें वैरी होणारें राज्य, नरम करण्याकरितां, तूर्त त्याचे सगळे हक्क काढून घेत आहे. आणि तत्पदाभिषिक्त राजास त्याच्या राज्यावरून दूर करण्यांतही येत आहे." हींच तूझीं खरोखर वाक्यें आहेत. हीच तुझी निरंतरची करणी, वर्तणूक व आचरण होय. ह्या म्हणण्यांत शपथेला देखील लेशमात्र असत्यता नाहीं. देशीयांच्या—असें म्हणण्यांत अलंकार नाहीं, आणि वैर भावही नाहीं—अशा बारा जणांत *चारावाटा लावून, किंवा युक्तिप्रयुक्तिनें त्यांचा ऱ्हासकरून शेवटीं "निरा-

*"आमच्या पद्धतींतील मुख्य दोष हा आहे कीं, आम्हीं नेटीवांस फारच हलकट स्थितींत ठेवितों; इतकेंच नव्हे. तर विश्वासाच्या आणि फायद्याच्या प्रत्येक अधिकारापासून त्यांस फारच दूर ठेवितों. त्यांचा फार कंजूसपणानें जेमतेम निर्वाह व्हावा; अशा हलक्या जागा त्यांस देतों. आणि त्याही केवळ आमचा निरुपाय होतो म्हणूनच देतों! कारण, त्या जागा यूरोपियनांच्या योग्यतेच्या नसतात! आम्हीं, त्यांस, ते नीच जातीचे प्राणी आहेत असेंच समजतों. देशी राज्यांत जे मनुष्य मोठमोठ्या हुद्यांचीं कामें करिते असते, आणि आम्हीं नसतों तर जे प्रांताचे गव्हरनरदेखील होते असते; तशा चांगल्या लोकांस आम्हीं हलक्या चाकरांच्या योग्यतेचे समजतों—क्वचित् त्याहून जास्त योग्यतेचे मानिले जात असतील तर नकळे !!! **** आम्हींच त्यांस अशा दुर्दशेस पोंचविण्यास कारण आहों. आणि ते मोठ्या हुद्यांच्या जागांस नालायक आहेत असें मानून आम्हीं नेहमीं त्यांचा उपमर्द व तिरस्कार करितों!"

लार्डमनरो.

धाराशीं आधार, पांडुरंग सर्वेश्वर" अशाच नियमाप्रमाणें तूं पुण्यश्लोक बनलीस! शुद्धकपटानें तूं भरतखंडांत घुसलीस. आणि कपटप्राचुर्यकर्मानेंच वागत अहेस. पुढें जसजशी तूं अपल्या कर्मांत प्रवीण होत चाललीस, तसतसा धारण केलेला "बकवेष" सोडून आपल्या खऱ्या स्वरूपानें चमकूं लागलीस!! तूं फार लांबची, एकांत, विकट आणि उजाड महासागराची मुषाफरी केलीस; तेव्हां तुझा फक्त इतकाच हेतु असावाकीं, ह्या माझ्या विशाल, नवीन, रसाळ, श्रीमान् आणि लक्ष्मीदेवीच्या निवासस्थानाशीं एकदां आपली संबंधशृंखला जडली; म्हणजे मिळविलें! फ्रेंच, वलंदेजी, आणि पोर्चुगिझलोकांशीं ह्यांचीं काय काय कर्में घडलीं आहेत? तीं तूं प्रथम समजून घेऊन अनुभवी झालीस. आणि केवळ व्यापाराच्या निमित्तानें म्हणून तुझे पुत्र ह्या देशांत येऊन वसावे; त्यांनीं आपल्या नशीबाची परीक्षाकरून जी संपत्ति मिळेल, तिनें तुला सजवावी; इतकाच तुझा पहिला हेतु होता. अशा मारवाडी काव्यानें आपण "राजाधिराज" होऊं, हें तुझ्या स्वप्नांत देखील आलें नसेल! सर्व लोकांस आणि मोंगल शहान शहासही तूं, आपला प्राथमिक उद्देश असाच सांगितला होतास? तेव्हां देशीराज्यें पुष्कळ होतीं, आणि तीं चांगलीं शक्तिसंपन्न होतीं. त्यांनीं मनापासून तुझ्या प्रजेला आपल्यांत घेतलें. तिचे, दिखाऊ व सुंदर विचारांचा स्वीकार केला. आणि तुमच्या वचनास मान दिला. तुझ्या देशांतून तुम्हीं ज्याज्या उमद्या वस्तु आणीत होतां, त्या सर्वांस बक्षिस देऊन त्यांचीं

मनें आपल्याकडे आकर्षित करूं लागलां. इतरांपेक्षां तुमचें बोलणें सत्य, स्पष्ट, निःसंशयी, फक्कड आणि प्रमाणिक असावें असें वाटे. पण **फ्रेंच** किंवा **डच** यांसारखें जर तुझें वचन असतें, तर ते तुला दारांत येऊं देते? आपल्या भूमीवर पाय ठेवूं देते? छीः! नांव कशाला हवें? ती आशाच नको होती. ते तुला केव्हांच लाथ मारून किंवा तंगडी धरून आकाशांत भिरकावून, शववत् करून, भूमीवर आपटून, तुझी आनंदानें उत्तरक्रिया करून ब्राह्मणांस संतोषविते असते! **पोर्चुगिसां**ची वग आणि सत्ता, तूं प्रथम कमी करून आपला उत्कर्ष करण्याचा हेतु धरिलास! फुटक्या हृदयाचे सोनें पाहून मोहित झाले! आणि त्यांनीं तुला मदत केली. त्यांना वाटलें कीं, ही साधू आहे. पण "जर पाहून मुनिवर चळतो." हें वाडवडिलांचें वाक्य ते विसरून गेले. आणि तूं प्रबळ होऊन **इराणी** व **दुराणी** यांपेक्षां जास्त श्रेष्ठ गणिली गेलीस! शहाणपणाच्या गोष्टी, आणि व्यापारी कावेबाजपणा दाखवून, तूं, सर्वोपरी शक्ति स्थापन केलीस. दीर्घदर्शी बनून सर्वांस मोह घातलास. जेथें भाग पडलें, तेथें हात जोडिलेस. दांतीं तृण धरिलेंस. केव्हां समय पाहून बाप-बेट्यांचा संबंध दाखविलास! हेंच तुझें बुद्धिचातुर्य चांगलें प्रकाशीत झालें आहे. प्रसंगीं भित्रेपणा दाखवून किंवा केव्हां धैर्य धरून धिरे धिरे राज्यांशीं स्पर्धा आरंभिलीस. जेथें स्पर्धा चालली, तेथें महत्वाला अवकाशच लागला नाहीं! राजे लोकांच्या परस्पर रणसंग्रामांत देशी प्रजेला गमतीचीं साहित्यें

पुरीं पाडून, तुझ्या तर्फेत ओढून घेतलेंस. सारांश, कोणालाच पर्वा राहिली नाहीं. तितक्यांत तूं मुग्धा नओढा सुंदरी वेश्येप्रमाणें नटून फटून नेत्रकटाक्ष मारूं लागलीस. त्यासरसे सगळेच मूर्च्छागत होऊन पडले! देशी प्रजेची प्रकृति पाहून तूं ज्या नकली वस्तु आणिल्या होत्यास, त्यांचा सढळ हातांनीं उपयोग केलास. तेव्हां लहानांतील लहान अधिकाऱ्यापासून मोठमोठ्या शाहन शाहपर्यंत नजराणा घेण्याचा मार्ग मोकळा होता—लांचाला लाज उत्पन्न करील! अग? लाचांला खालीं पहायला लावील! असा तो "नजराणा" असे. त्या वाटेनें तूं आपली इच्छा पुष्कळ तृप्त केलीस. मोराचीं पिसें लावून आणि बकवत् ध्यान करीत बसून, सुघड आदर केलास. आणि राजकीय बंधन तोडण्याकरितां; प्रपंच आदरिलास. देशियांविरुद्ध मुसलमान, मुसलमानांविरुद्ध मोंगल, मोंगलांशीं रजपूत, रजपूतांशीं मराठे, अशा आपआपसांतील विरोधामुळें ह्या देशांतील लोक, बहुतांशीं किंवा सर्वांशीं निरुद्योगी होते, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. त्यांनीं तुझ्या मुलांस नोकरीस ठेविलें. तुझे तरी होते थोडेच! पण पडले बावन बीर! चांगला डाव-पेंच खेळूं जाणत. ह्यामुळें अजून देखील लौकिक आहे कीं, "पूर्वीचे साहेब भले असत!" त्यांनीं निरुद्योग्यांस धंद्या उद्योगास लाविलें. आपल्या बरोबर बाळगिलें. आपल्या देशांतिल पुष्कळ माल त्यांस विकत दिला. त्या मालाचा दरबारांत चांगला दर निपजूं लागला. ह्यामुळें तुला पुष्कळ दौलत मिळून ते, हळू हळू तुझ्या ताबेदारींत आले. आणि तुलाही

उद्योग करावयास रस्ता सांपडला. तशांत, तूं नव्यानव्या श्रीमंतांस "**कंपनीचे तारे**" अशा किताबांनीं खुष केलेंस. आणि "तारा" इतक्याच मानामुळें जणों, त्यांचे प्राण स्वर्गास गेले असें त्यांस वाटून ते, "कंपनीचे तारे" इतक्या ह्मणण्यावरच मगरूर झाले. कित्येकांस तूं **यूरोपची** नवीन युद्धकला दाखविलीस. कित्येक देशी प्रजेला ती शिकवून पुष्कळ लष्करी शिपाई स्वाधीन केलेस. हिंदुस्थानांतील लोकांस तुझी पर्वाच नव्हती! तुझ्या हातून काय व्हावयाचें आहे? असाच त्यांचा समज! ह्यामुळें तुला कसलाही अटकाव झाला नाहीं. जे कितीएक राजे, आपली सत्ता बालवून अथवा रणसंग्रामांत शेजाऱ्याकडून पराभव पावून कलंकयुक्त झाले होते; त्यांनीं तुझी सेना पाहिली. आणि तुजकडे मदत मागितली. तेव्हां ती त्वां खुषीनें दिलीस. कारण, तुझाही तोच उद्देश होता. नामर्दीनें अथवा अज्ञानपणानें जे लोक मागें राहिले होते, त्यांस तूं इतरांहून श्रेष्ठ पदवीस चढविलेंस; आणि ज्यांची दाद देखील नाहीं, अशांस शूर, वीर व महा सुभट राजांत मोजिलेंस! ह्यामुळें राजांत आणि प्रजेंत तुझे पुत्र प्रिय झाले. मोबदल्यांत पुष्कळ भूमि मिळत गेली. आणि तेथें अढल न्याय व शांतिविवेकाचा वास झाला असावा, असें वाटून प्रजा सुखी झाली आहे; असें दिसूं लागलें. पण "अंदरकी बात राम जाने" शेतकरी राजी राहतील तसे प्रथम कर बसविलेस. तुझ्या सुपुत्रांनीं देखील देशियांस खुष ठेवण्यांत, त्यांचीच पुष्कळ नक्कल उतरली आहे. त्यांनीं किती-

एक जुन्या रिवाजांस मान देऊन धर्माच्या बाबतींत मन घालणें वर्जिलें. शेतकऱ्यांस अदल इनसाफ मिळूं लागला. आणि तूं हिंद रीतीभातीचें अनुकरण करून व गरीब परवर नांव धारण करून सर्वांस पोरांसारखी मोजूं लागलीस—"

"तेव्हां प्रजावर्गांत श्रेष्ठ आणि पूज्य मानिले जाणारे जे ब्राह्मण, त्यांनीं आपलें धर्मरक्षण होत आहे, असें मानून खऱ्या प्राणायामानें तुझ्या "राजाला" आशीर्वाद दिला. पण तो एवढ्यासाठींच कीं, त्यांची वाजवी दक्षणा देण्यास तूं कृपणपणा केला नाहींस. पण जेव्हां कृपणपणा केलास, तेव्हां त्याचें फळ भोगणें, तुझ्या नशिबीं आलेंच*. नवे आलेले इंग्रज धर्मांध नव्हते. किंवा त्यांची धर्मपंथावर आस्थाही नव्हती. दोन्ही सारखींच! म्हणून कोणास धर्माविषयीं शंकाशील व्हावें लागलें नाहीं. तालमेल पाहून सर्वांस राजी राखून, कंपनीनें आपला शिक्का सुरू केला. तरी त्याच्या एका बाजूस "शाहाआलम बादशाह गाझी" अशा नांवाचा छाप उठविला. तेव्हां अर्थांतच प्रजेला तुझा अनादर करण्याचें कारण आहे; असें वाटलें नाहीं. तशांत ते मानीतच होते कीं, तूं मलमय अंतःकरणाची नसून तुला सर्वोपरी होण्याचें

---

* सन १८५७ चें बंड "ब्राह्मण, फकीर व इतर पुष्कळांचें हक बळकावून घेऊन त्यांस भिक्षा मागण्याच्या स्थितींत आणिलें, तेव्हां त्यांनीं, लष्करी शिपायांस चिथाविलें; ह्यामुळें उद्भवलें. त्यांत मुसलमानही सामील झाले होते."

जान **मालकम** लाडला.

कोड नाहीं! ह्यामुळें "सरकार कंपनी बाहादूर" ह्या शब्दांचें, भरत वासी हिंदू जन, कांहींएक मर्म समजले नाहींत! ते, वारंवार कंपनी बहादरला शाबासकी देऊं लागले, कारणाशिवाय वाजंत्रें वाजवूं लागले! कंपनीस अदल (न्यायी) धाऱ्याकरितां—म्हणावयाचें मात्र! आशीर्वाद मिळूं लागले. आणि सहवासी, स्वदेशी, आपल्या भूमीचे नबाब, राजा, राणे व शाहन शाहांचा ते अंतरंग धिःकार करून,—प्रत्यक्ष अप्रीति दर्शवून प्रसिद्धपणें अपमान करूं लागले! पण ब्रिटानिया! तूं, ही खात्री बाळग कीं, तुझे उपकार, आशीर्वाद व पराक्रम यांहून तुझी अपकृति आणि अपहरणाचा इतिहास अगदीं निराळाच आहे!* केवळ प्रथम काळांतच बहुतांशीं सुखी करणारे तुझे पराक्रम होते. पण पुढें हळु हळु रंगभूमीचा पडदा उघडला. सुंदर रंग महालाचा देखावा बदलला, आणि आतां तर विक्राळ जंगल दिसूं लागलें!!! सगळाच समय बदलला. तुलाही तुझ्या सलामतीविषयीं चिंता उत्पन्न झाली. तूं जसजशी भरतखंडांत अचल होत गेलीस, तस तशी या स्वदेशी आर्यवासियांकडे कर्ज्या नजरेनें पाहूं लागलीस. सर्वांची वर्तणूक, चाल चलणूक व रीतिभाति, यांविषयीं तूं प्रथमपासून अरुचि दाखवीत होतीसच! ती पुढें पुढें नामर्जी—कटाक्ष—अनादर आणि शेवटीं धिःकार दाखविती झालीस! तुझे स्वतःचे अधिकारी

*हिंदुस्थानांतील ब्रिटिशांच्या कारकिर्दीचा जुना इतिहास, केवळ महसूलाच्या पैशाचीं कशी उधळपट्टी होतअसे? व लढाईमुळें ससारी सुधारणेस कशी हरकत येत असे? हेंच दाखविणारा आहे! सर जान के.

ज्यांस तूं हद्द बांधून देऊन स्वतंत्र सत्ता ओपिली होतीस, ते, तिरस्कार, कटाक्ष, आणि अतितर वैषम्यानें वागूं लागले. तेव्हां तर तुझा वैषम्यभाव फारच वाढत चालला. बाई? ऱ्हानसहान जुलमी कर्में कमी होत चाललीं खरीं. परंतु जुलूमरूपी प्रबल प्रज्वलित अग्नि उत्पन्न होऊं लागला. आणि तो आपल्या आंगच्याच उच्छृंखलतेनें सांपडेल त्याला खात जाऊं लागला!!! कारण, त्याचा उद्योग, अंतरंग यथेच्छ चाललाच होता! आणि तुझ्या इच्छेचा अंमल होण्यासही विलंब लागला नाहीं. कायदे कानु झाले. ते विदेशीय कर्त्यांनीं, आपल्या इच्छेस अनुकूल येतील तसे केले. जसे ब्राह्मणांनीं आपले हक्क राखून इतरांस लुटिलें; त्याप्रमाणेंच तूंही लूट चालविलीस. पण तो कायदा कोणावर आणि कसा अंमल बसविणार आहे? याचा विचार देखील केला नाहींस! प्रजास्थिती व व्यवस्थाबंधनाकडे लक्ष्य न देतां तूं केवळ स्वेच्छ सत्ता स्थापिलीस. जस जसा तुझा पाय घट्ट होत गेला, तस तशी त्वां दिलेली सत्ता हिरावून घेऊं लागलीस. आणि दौलत घेऊन स्वदेशीं जाण्याचा विचार आरंभिलास. दररोज युरोपचा व्यवहार वाढत चालला. तुझ्या नव्या बंधनानें अंमलदार अनिश्चित स्थितीचे होत चालले. केव्हां देश सोडावा लागेल? आणि केव्हां नाहीं! हें जेथें अनिश्चित झालें, तेथें द्रव्य हरणाचा लोभ वाढावयाचाच! त्यांनीं बेशर्थ जुलूम आरंभिला. आणि त्या द्वारानें तुझी सत्ता, व आपली दौलत वाढविण्यास एकदम सुरवात झाली!! जेव्हां तूं सर्वोपरी झालीस, तेव्हां राजांचे

कान, मन आणि डोळे चांगले उघडले. परंतु "दिवा गेल्यावर तेल" आणि "चोरांनीं लुटल्यानंतर सावधपणा" काय कामाचा? आतां तर स्वस्थ वसण्याची पाळी आली! हिंदुस्थानांतील अवघे बलवान् मेले,—ठार झाले.—व तूं श्रेष्ठासनावर पोहोंचलीस. इतर राजांवर श्रेष्ठता स्थापन करण्याचें तूं प्रथम केवळ ढोंग आरंभिलेंस! पण मूळचेच जे मूर्ख ते, तुझें कौशल्य अजूनही समजले नाहींत! ते, तेव्हां कायसमजणार? तूं नवे कोल करार मजबूत केलेस, स्वच्छंद किनाऱ्याचीही मालकीण झालीस, व देशी राज्यांशीं तुझा जो अन्योन्य संबंध होता; तो अगदीं तोडून टाकिलास. सारांश, जितके ह्मणून देशी होते, तितक्यांस तूं आपल्या दयेवर लोंबकळवीत ठेविलेंस. जसजशी तुझी सत्ता वृद्धिंगत व सुदृढ होत चालली; तसतशी तुझी उमेदही वाढत चालली. आणि दिवसें दिवस राज्यसत्तेचा उपभोग तूं निःशंकपणानें करूं लागलीस. पूर्ण गर्वविषाच्या प्रचंड क्रोधाविष्ट बलानें तुझ्या बलिदानाचे अवयव यज्ञकुंडांत अर्पिण्यास तूं प्रथम सुरवात केलीस—प्रांतामागून प्रांत, आणि परगण्यामागून परगणे झपाट्यानें घेत चाललीस. कोठपर्यंत समजलीस का? जोंपर्यंत तुझीं बलिदानें अशक्त, दुर्लंघ, सत्वरहित होत होतीं; तुझ्या विरुद्ध प्रतिरोध करण्यास बहुतेक लोक निर्बल होत चालले होते, तूं हिरावून घेतलेले प्रांत, ते, कधींही परत मागण्याची इच्छा स्वप्नांत देखील आणणार नाहींत, अशी तुझी चालंबाल खातरजमा होत चालली होती; आणि सर्वत्र भिकार स्थिती येऊन 'दैन्य, दैन्य'! अशी ओरड पडेपर्यंत-तूं एकसारखी त्यांस चोपीत गेलीस. आणि शेवटील अवस्थेंत तीच दैन्यावस्था जेव्हां शिखरावर पोहोंचली, तेव्हां त्यांचीं गज्यें काढून घेण्याची तूं कृपादृष्टि केलीस. ह्या तुझ्या "लहान लहान गमती" आणि तुझें हळु हळु वाढणें, इतक्या लांबवर

परिप्रसृत झालें कीं, **नागपूर***, **लखनौ**†, **पंजाब** आणि

*यासंबंधें मजहूनही विशेष बलवान् प्रमाण येथें घेतो. त्यावरून आपल्यास सहज यथार्थ विचार करितां येईल. कर्नल **मेडोज टेलर** हा महान् अधिकारी लिहितो कीं;—"हक्काच्या मुद्यावर नव्हे. तर आतां काय करणें योग्य आहे? अशा उपयोगीपणाच्या मुद्यावर या प्रश्नाचा निकाल करणे जेव्हां शिल्लक राहिलें होतें, तेव्हां **मि० मेनस्ले** प्रेसिडेंट ह्यानें दत्तक किंवा गादीस कोणी तरी दुसरा वारस कबूल करून संस्थान चालवावें. अशा विषयीं सुप्रिम कौन्सिलांत फारच तक्रार केली. आणि त्यास सर जॉन **लो** ह्यानें फार योग्य मिनीट लिहून पुष्टता दिली. त्यांत नेटिव संस्थानांत, **सिंध** व **पंजाब** खालसा केल्यामुळें काय भय पडलें आहे? हें दाखविलें होतें. व लोकांचा सरकाराविषयींचा विश्वास न उडूं देण्याची किती आवश्यकता आहे? आणि **नागपूर**च्या राजाच्या विधवा व तेथील मुख्य पुढारी गृहस्थ, ह्यांना वारस ठरवून घेऊं द्यावें, हा शहाणपणा होय; असें दर्शविलें होतें. परंतु ते विचार गव्हरनर जनरलच्या विचारांशीं फारच विरुद्ध होते."

भरत खंडाचा इतिहास पृष्ठ ७००।७०१

†**लखनौचें** राज्य संयोजन करण्याचें कांहीं कारण नव्हतें. हीबर जनरल मध्यें लिहिलें आहे कीं, शेतकऱ्यासंबंधें ब्रिटिशांनीं सबसीडियरी राजनीति आरंभिली. आणि त्यावरच ब्रिटीशांची भक्ति होती. ह्यामळें शेतकरी आणि जमीनदार नाखुष होऊन उच्छृंखल झाले. पण त्यांत, त्यांना यश आलें नाहीं. या राज्याच्या आबादी विषयीं **मि० शोर** असें लिहितो कीं;—"गरें, घोडे आणि सामान हेंही त्यांपाशीं आहे. व त्यांच्या घरांची चर्या, कपडे, घरें व लोक (**अयोद्ध्येचे**) हे कोणत्याही प्रकारें आमच्या ग्यतेहून कमी नाहींत. (कांहीं गोष्टींत अधिक बरे आहेत!) **लखनौ** येथील संपत्ति–केवळ कामदारांचीच नव्हे. सराफांची व सावकारांची भरभराट देखील **ब्रिटीश** अमलांतील दुसऱ्या शहरांपेक्षां (कदाचित् कलकत्ता शिवाय करून) पुष्कळ चांगली आहे! ह्यावरून जुलूम आणि पीडा ह्यांविषयीं जें हें, (**अयोद्धया**) सरकार प्रसिद्धीस आलें आहे; तें कसें जुळावें?

नोट्स ऑन **इंडियन अफेअर्स** व्हॉ० १ पृष्ठ १५६

वाय आनरे. एफ. आय. **शोर**.

सातारा* **ब्रिटीश** राज्यास जोडण्याच्या प्रयत्नास तूं लागलीस! आणि जेव्हां तूं अशी राजनीति आरंभिलीस, तेव्हांच तुझ्या अत्यंत लोभाचें चिगूल† वाजलें! **आर्यधर्मनिष्ठ** वीरपुरुष—आंधळ्या-

---

* **साताऱ्या**विषयीं सर ई० **कोलब्रुक** लिहितो कीं:—मला असें स्मरत नाहीं कीं, **सातारच**ें राज्य खालसा केल्यामुळें **मि० एल्फिन्स्टन** हे जितके कंटाळले व चकित झाले! तितके पूर्वी कधींच झालेले मीं पाहिले नाहींत!!! ज्या **सातार**च्या राज्यावर "मांडलिकपणापुर्ता" आमचा अधिकार होता; तें राज्य "जहागीर" असें म्हणणें, हें कृत्य, यांस राक्षसी असें दिसलें!!!

† लार्ड **डलहौसी**नें राज्य संयोजननीति स्वीकारून, अवघ्या देशांत आग पाखडली होती. आणि ही नीति त्याच्या पहिल्याच तडाक्यांत अमलांत आली होती. प्रथम तारीख २४ मार्च सन १८४९ त **पंजाब** संयोजन झालें.—**दिलीपसिंग** बालकाचे संरक्षक होऊन सन १८४८ तारिख १८ नोव्हेंबर रोजीं **इंग्रजां**नीं **पंजाबां**त जाऊन जाहिरनामा लाविला कीं, "आम्हीं बंडखोरांस व स्थायी अधिकाराविरुद्ध हत्यारबंद होऊन जे लोक अडथळा करितील; त्यांस शिक्षा करण्यास आलों आहों." परंतु अवघ्या सहा महिन्यांतच त्यांनीं या वचनाचा भंग केला! शरणागत बालकास पेनशन ठरविलें. आणि तो आज बाट्या होऊन **इंग्लंडां**त पडला आहे! आणि त्याचा **कोहिनूर** हिरा महाराणीच्या मस्तकावर शोभा देत आहे. जेव्हां लार्ड **लारेन्स**ला विचारिलें कीं, "सर्व **शिख** लोक आमच्यार्शी द्वेषभावानें व वैरपणानें विरुद्ध झाले होते काय? तेव्हां त्यानें "नाहीं" असा जवाब दिला. (पहा? लार्ड **लारेन्सचें** लाईफ) मि. **बेल** "रिट्रॉस्पेक्ट ॲंड प्रॉस्पेक्ट ऑफ इंडियन पॉलिसी" मध्यें लिहितो कीं, "**शीख** लोक एकत्र होऊन **ब्रिटीश** राज्याविरुद्ध उठले नाहींत" मग यापेक्षा अधर्म कृत्याचें उदाहरण दुसरें कोणतें पाहिजे? नंतर **सातारा**चा पाळी आली. **प्रतापसिंह** सन १८४७ त मरण पावला. आणि त्याचा बंधु स० १८४८ त मृत्यु पावला. स० १८३९ ता० ५ सप्टंबरच्या कोल

प्रमाणें—आपल्या स्वदेशीयांचा विनाश करण्याकरितां, तुझ्या बावट्याखालीं रखडूं लागले—तुझ्या शिक्यानें मोह पावलेले, खुशामती ज्यांना तूं त्यांच्याच देशांतील लुटीनें तृप्त करून संतोषित ठेविलें

कराराप्रमाणें ह्या राज्याला दत्तक घेण्याचा हक्क होता. आणि सर्व अधिकारी तो हक्क वाजवी आहे, असें मानीत होते. ही तक्रार फार मजबूद होती. तथापि गव्हर्नर जनरलनें ती रद्द करून ता० ३० आगष्ट स० १८४८ ची एक मिनीट लिहिली! आणि Heirs & Successors या दोन शब्दांविषयीं वाद विवाद चालून तें राज्य संयोजन झालें. **साताऱ्याची** राणी फार रडली! शेवटीं तिनें स० १८७५ त·पार्लमेंटाकडे जो अर्ज केला, तो वाचला असतां छाती फाटून जाते!!! याप्रमाणें **महाराष्ट्र** राज्य संस्थापक **शिवाजी**च्या राज्याचा अंत झाला!!!

सन १८५३ त **नागपूर** जोडलें. त्याविषयीं तारीख २ एप्रील स० १८५५ चें "इंडियन डेलीन्यूस" म्हणतें कीं, **नागपूर**च्या राजाचें खासगी जवाहीर सुमारें ७५०००० रु. चें होतें. परंतु तेही राजाची खासगी मिळकत म्हणून जप्त करून प्रसिद्ध बाजारांत विकून टाकिलें! व त्याच्या व्याजांतून राजाच्या चार राण्यांस सालीना ३०००० रु० पेनशन म्हणून देण्याचें ठरविलें!!! धन्य! धन्य!! धन्य!!!

शेवटील प्रतापि राज्य-संयोजन-कर्म **अयोध्ये**चें होय. सारींच राज्यें जोडून देण्यास लार्ड **डलहौसी** तयार होता. तो अशा नांवाच्या—निमित्ताच्या—राज्यास कां सोडील? **अयोध्ये**चा नबाब **मोगलशा**ही होता. ह्यामुळेंच त्याला पदभ्रष्ट करून (तारीख ७ फेब्रुवारी स० १८५६) त्याच्या तोफा, मनुष्यें आणि हत्यारें हिरावून घेतलीं. यामुळे तिजोरींत पंधरा कोटींची वृद्धि, राज्यांत दहाकोटींची आवक, आणि चोवीस हजार चौरस मैल जमीन मिळाली! याप्रमाणें रांगोळी करून लार्ड **डलहौसी** "The Idol of the Indian community" "हिंदुस्थानचा देव!" स्वदेशीं गेला. तो जातांना देशाच्या कळवळीविषयीं एक फार चांगली मिनीट लिहून गेला आहे. पण ती काय कामाची?

होतेंस ते—तुझ्या अनियमित, लोभी, स्वार्थीपणाला व तूं बेवचनी, विश्वासघातकी, असतांही, तुला जे कितिएक सहाय होते; तेही ह्यावेळीं विथरले* ! ज्या राजपुरुषांस तूं अभय वचनें दिलीं होतींस कीं," तुमच्या राज्यास जोंपर्यंत सूर्यचंद्र उदय पावत आहेत; तोंपर्यंत कोणत्याही प्रकारचें नुकसान पोंचणार नाहीं." त्यांच्याही विरुद्ध जेव्हां तुझी वारंवार मती फिरूं लागली ! आणि ज्या शूर शिपायांस तूं त्यांच्याच बळानें त्यांच्याच राजपतीला पदभ्रष्ट करण्यास योजून त्यांचीं राज्यें तुझ्या राज्यास जोडून देण्याच्या कामीं लाविलें होतेंस; ते जेव्हां आपल्या कामांतून सहजच मुक्त झाले ! तेव्हां त्यांच्या दृष्टीस तुझें चट्टसारें पाखांड स्पष्ट दिसूं लागलें; आणि त्यांस असेंही वाटलें कीं, आतां आपलें कांहींच काम शिल्लक राहिलें नाहीं. तोंवर तूं हळू हळू लहान तुकड्यांस शस्त्ररहित करूं लागली होतीस. तेव्हां त्या लोकांनीं "रिकामा न्हावी कुडास तुंबड्या लावी" असें कर्म आदरिलें†; पुष्कळ देशी शिपाई आपल्या देशाकरितां चटपटूं

---

* बिथरण्याचें मुख्य कारण राज्यसंयोजन विधीच होय. याविषयीं **एडवीन आर्नलड** असें ह्मणतो कीं, "इतिहास रूपानें इंग्रज राजनीतिवेत्त्यांच्या कृत्यांच वर्णन करण्यापेक्षां खालसा करण्याविषयींची जी त्यांची गोष्ट असते, ती निःसंशय बहुधा दरवडेखोरांनीं रानांत दरवडे घालून लूट आणून वांटीत बसण्याप्रमाणेंच असते !"

† याविषयीही **काबडन**पेक्षां विशेष चांगला आधार मिळाला नसल्यामुळें, त्यांतील महत्त्वाचा तितकाच भाग घेऊः—खरोखर ह्मणाल तर, हिंदुस्थानाच्या राज्यव्यवस्थेविषयीं सविस्तर वादविवाद करण्यास माझ्या अंगीं हिंमतच नाहीं ! कारण, तेथली राज्य पद्धतीची स्थिती मनांत आणिली,

लागले; आणि लोभावले. ते दुर्भाग्यवान् शिपाई, तुझ्या चांगल्यामुळें आपला धर्मही विसरून गेले. आणि "देख देखे व शिख शिखे" तसे मूर्ख बनले. तूंही धिमे धिमे पूर्ण विश्वासून अंध होत्साती त्यांच्या हातीं तीक्ष्ण धारदार चकाकित शस्त्रास्त्रें ("वानराच्या हातीं शस्त्रें") दिलींस! आतां हेंही खरें कीं, तसें विश्वासणें जरी तुला बिलकूल आवडलें नव्हतें, तरी लाचारीनें परक्याच्या पुत्रास स्वपुत्र मानून तूं काम चालविलें होतेंस. ते लोक आधींच बिथरलेले. तशांत, त्यांच्या हातीं शस्त्रें येतांच, त्यांनीं तुझींच शस्त्रें तुझ्याच विरुद्ध उपयोगांत आणण्याचा उद्योग निश्चित केला! तुझा धूर्त व पाखांडी मतलब ते समजलेच होते. ह्मणून त्यांस पुढें कोणत्याही प्रकारचा बाध आला नाहीं. आधींच बंडाचा पेला भरून तयार होता; आणि त्यांत फक्त एकच थेंब पडणें शिलक होतें. तूं प्रथम त्यांना काडतुसें वापरूं दिलींस.* त्यासरशीच त्या धर्मांध, परंतु मुर्खांनीं अशी गप्फ

ह्मणजे माझें मन फार उदास होतें! मग तुम्हीं डोळ्यांवर पडदा ओढा; आणि त्याला स्थानिक सैन्य ह्मणा; अथवा **लंडनां**तील व्यवस्थेशीं त्याची तुलना करा. तरीही अर्थ एकच. पार्लमेंटांत एकत्र झालेल्या इंग्रजांनीं **हिंदु**स्थानांतील पंधरा कोटी प्रजेवर जुलमानें राज्य करण्याची जोखमदारी ओढून घेतली आहे. आणि ते जुलमीपणाच्या धोरणास अनुसरत चालले आहेत. परंतु मला असें वाटतें कीं, ही पद्धति **इंग्लंडां**तील लोकांस खचित संकटकारक व नाश कारक होणार!!!

मोरलेकृत कावडनचें चरित्र व्हा० २ पृष्ट ३६०।६१.

* चरबी लावलेलीं काडतुसें आम्हांस वापरावयास देऊन जातिभ्रष्ट करण्याचा हेतु आहे, अशी शिपायांची खात्री झाली; हें कांहीं खोटें नव्हे. परंतु आपला प्रांत जो **अयोध्या**, तो खालसा केल्यानुळें राजकर्त्यांच्या

फैलाविली कीं, "काडतुसांच्या तोंडास गाई, डुकरांची चरबी लाविलेली आहे!" हाच थेंब त्या पेल्यांत पडून तो तंतोतंत भरून बंडाचा अग्नि परिप्रसृत झाला. याप्रमाणें, "केलें तुला तें झालें मला" असें होऊन **कानपूर, दिल्ली, लखनौ,** इकडेही त्याच्या ठिणग्या चमकूं लागल्या. आणि तेथें, जे स्वभाव-गुणानें शिक्षित नाहींत असे लोक होते, त्यांनीं प्रकाश पाडिला! सुरंग उडविण्याच्या कामीं एका रंजुकीची जरूर असून, त्याकरितां एखादा मुकरर केलेला साहसिक पुरुष असला; म्हणजे वस्स होतें! ज्यांचीं राज्यें तूं अधर्मनिष्ठ होऊन स्वाहा केलीं होतींस. त्यांचे वंश वारस जे *राजकुमार, या **भारतीच्या** हृदयावर लहानपणापासून लाडीगोडीनें पुष्कळ खेळ खेळून

अभिवचनावर त्यांचा विश्वास नाहींसा होऊन, **इंग्रजां**विरुद्ध पाहिजे ती गोष्ट खरी मानण्यास त्यांचीं मनें तयार झालीं होतीं. ह्याच कारणानें चरबीच्या काडतुसांची गोष्ट त्यांना खरी वाटली. विशेषेंकरून **अयोध्या** खालसा केल्यामुळें, व कांहीं अंशांनीं जनावरांच्या चरबीचा देखील खरोखर उपयोग केल्यामुळें, शिपायांचा विश्वास उडण्यास सबळ कारण झालें हें खरें.

कर्नल **म्यालेसन्स** केचा शिपायांच्या बंडाचा इतिहास व्हा० २ पृष्ट ३५१–२

* स० १८५९ त जॉन **ब्राइट**नें म्हटलें आहे कीं,–"जीं राजकुळें पूर्वी हिंदुस्थानांत राज्य करीत होतीं, त्यांना आतां घरदार नाहींसारखें होऊन भटकत फिरावें लागत आहे; किंवा ज्या परकीयांनीं त्यांचें द्रव्य हरण केलें आहे; त्यांच्या मर्जीप्रमाणें त्यांस पेनशन खाऊन बसणें भाग पडलें आहे. कितीएक पिढ्यांपर्यंत जीं घराणीं, प्रतिष्ठित व पूज्य मानिलीं जात होतीं, त्यांची स्थिती आतां बाकीचे साधारण लोकांच्या बरोबरीस आली आहे; किंवा त्यापेक्षांही नीच झाली आहे;" असें म्हणण्यास काय हरकत आहे?

आनंदानें सुखरूप राज्य करण्याची इच्छा बाळगून होते; त्यांना तूं लोटून देऊन फिक्के पाडितांच, एकदम त्यांच्या हृदयांत प्रचंड प्रहार झाला! आणि शेवटीं जमीनदार—साधारण मालकाहून ज्यांची स्थिती चांगली नव्हती. आणि ज्यांची अवस्था चांगली नाहीं ते—जे* राजत्व जाऊन जाहागिरदार झाले होते ते; जे जहागीरदारींतून मोकळे होऊन गांवढ्याचे शेतकरी झाले होते ते; शूर, वीर, साहसी, बलिष्ठ, प्रतापी पुरुष, ज्यांस तूं भय, अपमान, दाब आणि सक्तीनें तरवारींस म्यान करणें भाग पाडिलें होतेंस ते; धर्मगुरु आणि धर्माचार्य, साधु व संत—ज्यांचें सनातन धर्म—राज्य, तुझ्या भिन्नभिन्न विचारप्रकाशानें अस्त—जसे चंद्राच्या तेजांत तारे अस्त झालेले दिसतात तसे (तरी ही आर्य सूर्याच्या तेजा समीप तुझ्या चंद्रप्रकाशाची कितीशी पर्वा आहे? याचें तुला भान न राहून, तूं भ्रमानें भुलली होतीस!) झाले होते ते; सैनिकांनीं जेव्हां पाहिलें कीं, आतां आपली स्पृहा लेशमात्र राहणार नाहीं. ह्यामुळें तेव्हां जे मनच्या मनांत जळत जळफळत होते ते; आर्यप्रजा, जिला विजय गर्वावेषी व प्रपंची पुत्रांनीं सुधाऱ्याच्या गर्वमदानें प्रमत्त व राजसत्तेच्या जोमानें प्रमादी होऊन धडधडीत धिक्कारणें आरंभिलें होतें ते; युद्धासक्त भटराजे, जे आपल्या पुत्रवत् मानिलेल्या

---

* "हिंदुस्थानांत मांडलिक राजा म्हणून असूंच नये!"
सर चार्लस **नेपयर**चें जीवन चरित्र पु० ४ पृष्ट १८८
"फ्रेंड ऑफ् इंडिया" ह्मणतो कीं;—**हिंदुस्थानांत** जीं २५० राजाचीं पोरें— मांडलीक आहेत; तीं लौकरच निःशंक नाश पावलीं पाहिजेत!!!

धार्मिक प्रजेस केवळ पतित झालेली पहात होते ते; आणि ह्यामुळें ज्यांचीं अंतःकरणें रात्रदिवस पोळत होतीं ते; स्वमताभिमानी—जे तुझ्या पुत्रांस "नास्तिक, काफर, यवन, परदेशी, व म्लेंच्छ देश निवासी" अथवा "अपवित्र" मानून नेहमीं त्यांस धिक्कार दृष्टीनें पहात असत ते; राजप्रपंची, जे आपल्या प्राचीन अखंड कीर्तीवर परिप्रकाशून आनंद मानीत, आणि आपलें तेंच चांगलें! असा ज्यांचा निश्चय झाला होता ते; जे तुझ्याशीं मोहबत, एखलास, किंवा प्रेम मैत्री करण्यास प्रारंभीं बिलकूल राजी नव्हते. परंतु तुझ्या मोहक वाणीनें लोभाविष्ट होऊन दुःखांतून सुखांत येण्याविषयीं जें तृपातूर चातकाप्रमाणें मार्गप्रतीक्षा करीत होते. आणि शेवटी तूं जेव्हां त्यांच्या, सर्व प्रकारच्या उत्तम आशेचें निकंदन करून समानतेच्या मागणीस रोषानें झिडकारिलें होतेंस ते; ज्यांनीं तुझ्या प्रत्येक वाईट कर्मामुळें पुष्कळ हाल सोशिले होते ते; ज्यांच्या मनांत केव्हां लाग सांपडतो; व तुला भुसासारखी उडवितों; असें आलें होतें ते; जे तुझ्या वृद्धि पावणाऱ्या बळास भीत होते, परंतु निकडे तिकडे तुझे अवगुण बोलून तितका समय संतोष मानून बसले होते ते; जे फक्त बडबडून तोंड सुख घेणारे होते ते; खादाड आणि लुटारु—ज्यांना कांहीं तरी पाहिजे होतें ते; सैन्य संग्रामासक्त आणि राज्य करण्याविषयीं लोभी आणि यांशिवायही दुसरे कितिएक, जे तुजकडून दुःखित झालेले, पीडलेले, हिणावलेले, दुणावलेले, पायमाल झालेले, आणि ज्यांस ज्यांस तुझ्याकडून कोणताच न्याय, किंवा कोणत्याही प्रका-

रच्या चांगल्याची म्हणून आशा बाळगण्याचें कशाच प्रकारचें कारण दिसलें नाहीं. ते चट्टसारे भरत खंडांत जो, सत्व सामर्थ्याचा त्वेष राहिला होता, तो बाहेर काढून त्या काळांत तसें कांहीं आहे, असें दिसत होतें म्हणून, संयुक्त बलानें बलवान् होत्साते जय वांछून भवानीला भोग देऊन (मात्र मुहूर्त पाहिल्या शिवाय) एक संपानें तुझा चकाचूर करण्याकरितां, अग ! तुला मुळासह उपटून टाकून तुझा सत्यनास करण्याकरितां पूर्ण उत्साह बलानें ह्या बंडरूप जबरदस्त सुरंगाची रंजूक पेटविण्यास निघाले ! तो भयंकर कालरूप बनाव तुला आतांही थर्रथर्र कांपवितो आहे ! ते सगळे बलवान् शूर, वीर, जसे निघाले तसेच पहिल्या सपाट्यास एखाद्या अदृश शवावर गीध पक्षी एकाएकीं जसे तुटून पडतात ; तसे तुझ्यावर पडले ! आणि त्याच सपाट्यांत तुला हा जीव नको नकोसा झाला ! ! ते लोक, आधींच सत्ता मिळविण्याविषयीं उत्कंठित झाले होते. तशांत, त्यांना मोठ्या जयाची आशा ; लष्करीबंधन त्यांच्या हातीं येतांच, स्वभाववृत्तिसंकोचाशिवाय आपल्या अंगांत असाधारण शक्ति आली आहे, असें समजून ते, बुद्धीच्या वळणानें वळले ! परंतु त्यांचें झालें कसें ? समजलीस ? त्यांनीं शानदार समय प्राप्त केला होता. पण जय संपादनाची जी उज्वल कर्मशक्ति, तीच त्यांना योजितां आली नाहीं ! अग ? मला माहीत आहे. माहाराज्य मिळविण्यास महाशक्ति पाहिजे. आणि महाशक्तीकरितां महापुरुषांत गणना करून घेण्यासाठीं तशीं कर्में दाखवून तसे खेळ खेळले पाहिजेत.

मराठा ग्रंथ संग्रहालय

परंतु ह्यांतील कांहींच त्या काळच्या योद्ध्यांत नव्हतें. परिपक्व योजना नाहीं. किंवा चांगला बंदोबस्तही नाहीं. तेव्हां किती अव्यवस्था व्हायची? हें सांगायलाच नको! बंडाचा एकदम अकस्मात् उद्भव, त्याचा फैलाव आणि त्याचा परिणाम. ह्या सर्वांचा मूळव्यवस्थाबंधनावरूनच अजमास करितां येतो!!! थोड्याशा अवकाशांत उठणें, आणि स्नायुबलाची जितक्यास तितकी हालचाल करून दौड करणें, हें तुला सफाई निर्बल करण्यास बस्स नव्हतें. जरी उत्तर हिंदुस्थानांतील पुरभय्या, शीख, गुरखे, व मुसलमान तुला व तुझ्या साऱ्या कामाला, तुझ्या पुत्रांसह उडवून टाकण्यास--जशी वावटळ सर्व वस्तूंला फेंकीत नेते तसे--तत्पर होते, तरी तेव्हां त्यांना तूं भयानें परिकंपित व कावरी बावरी झालेली आणि नुस्तें उभें राहण्याचीही तुला शक्ति नाहीं; अशी गरीब दिसलीस!! ही पृथ्वीही तेव्हां इतकी भयंकर दिसूं लागली होती कीं, हिच्या फार दिवसांच्या धन्याचीं प्रेतें राखण्यास ही नाकबूल भासली! तेव्हां स्वदेशाच्या पित्याप्रमाणें प्रसिद्धीस आलेले पुराण प्रसिद्ध महापुरुष नव्हते. आणि ह्या भारतीचें बल--सामर्थ्यही कमी होत आलें होतें--ह्मणूनच इतर प्रजेस स्वातंत्र्य मिळत असे--तें बळ, मनुष्यांचा उत्साह व शस्त्रबल--ह्यांच्या टंचाईमुळें निर्बलच होतें! मिळून तें होतें आणि नाहीं सारखेंच. बरें, त्या वेळीं न्याशनल् ऑर्गेनिझेशन्" नव्हता--किंवा बंडखोरांस विपुल द्रव्य व शानदार शस्त्रें पुरीं पाडणारें कोणी फक्कड नररत्न नव्हतें. अथवा त्या सर्वांस ऐक्यतेनें वागवून धरणी प्रकंपन करण्याकरितां तयार

झालेल्या लोकांकडून यश संपादन करील, असाही कोणी साहस-संपन्न व स्तुतिपात्र पुरुष नव्हता. दिल्लीचा शहानशहा अशक्त –निराश्रित–ईश्वरी कृपेनें तुच्छ गणिलेला–केवळ निराधार खेळणें होता! त्याची पायमल्ली त्याच्या समक्षच होती! जेव्हां या दैवी दुःखाचा प्रवाह मोठ्या जोरानें त्यापुढें वहात गेला; तेव्हां त्यानें आक्रंद केला!! त्यानें हें झालेलें वादळ पडतें पडतें पाहिलें, परंतु त्याचा अटकाव करण्याची शक्ति त्याच्या आंगीं होती कोठें? तो मुळींच निर्बल! मग व्हावयाचें काय? कवितेच्या भाषेनें–अलंकारानें–व अतिशयोक्तीनें सांगूं लागलें तर इतकें उघड म्हणण्यास हरकत नाहीं कीं, त्याच्या दुःखावर अर्ध्या **हिंदुस्थाना**च्या नेत्रांतील अश्रु वाहिले!!! ह्या बंडाच्या वेळीं मध्य व दक्षिण **हिंदुस्थाना**च्या प्रजेनें उत्तर **हिंदुस्थानां**तील बंडखोरांस सहाय करणें फार अगत्याचें होतें. पण ती मुळीं तुझ्या मोहांत गर्क होउन गेलेली. ती तुलाच तन, मन व धनवान् गणून पूज्य मानीत होती! तेव्हां तिला हा विचार सुचणार कोठून? उलटी ती आपल्या देशाच्या हितकर्त्या विरुद्ध वर्तन करण्यांत, आपला पराक्रम दाखवूं लागली! तिला दुस्मान आवडले! आणि ती इतकें हट्टास पेटल्यासारखें करून आपल्याच लोकांशीं मोठ्या बाहादुरीनें लढण्यास तयार झाली. आतां इतकें स्पष्ट होतें कीं, जे तुझे धडधडीत प्रतिस्पर्धी म्हणून मैदानांत लढण्यास उघड पुढें आले होते, तेच जर मिळून मिसळून काम करिते असते; आणि अवघें **भरत**खंड एका जुटीनें वागण्यास तत्पर असतें, तर तुला पळतां

पळतां पुरी वाट झाली असती ! पण प्रसंगाची कृपा गा! बाई ? तो तुझ्या शत्रूंस प्रतिकूळ आणि तुला अनुकूळ होता. नाहीं तर, शेंकडों बंडखोरांच्या टोळ्या, तयार होऊन जय मिळविण्याकरितां मोठ्या जोमानें पुढें सरल्या होत्या ; पण त्यांना कसें रक्षण आणि भक्षण करावें ? शत्रूशीं कोणत्या योजनेनें, कशा युक्तिप्रयुक्तीनें काम चालवावें ? हांकवावें कसें, आणि हटवावें कसें, पिटाळावें कसें, आणि धांवावें कसें ? याची व्यवस्था बरोबर माहितच नव्हती ! आणि ह्याचें कारण इतकेंच कीं, कोणीही हुशार अधिपति त्यांत नव्हता. त्या वेळीं जर कोणी निपुण व शानदार चालक मिळता असता, तर अशा अव्यवस्थित स्थितींत समरांगणांत जाण्याचा मुद्दल विचारच करिता नसता. "इरेग्युलर" लष्कर तरी बरें ! पण बंड खोरांचें लष्कर त्यापेक्षांही खराब होतें ! इष्कमस्त, लुटीची इच्छा, निर्दयता, अविचार हीं त्यांच्या पहिल्या प्रथमच्या लढाईंतच दिसून आलीं ! बरें, जें अवसान दाखवावयाचें होतें, त्याच्या नांवानेंच आधीं शून्याकार !! खोराकी पोपागीचा कसा तो बंदोबस्तच नव्हता. तशांत आणखीं सर्वांचीच इच्छा निरनिराळी !! ह्यामुळें बंडखोर लष्कर मनास मानेल तसें, टोळ्या टोळ्यांनीं केवळ लुटारु बनलें. आणि या गांवाहून त्या गांवास, आणि पलीकडच्या गांवाहून कोठें तिसऱ्याच ठिकाणीं भटकूं लागलें. तें मनःपूत अंदाधुंदी करूं लागलें. व आपसांत स्वजातीयांसच हवीतशी पीडा देऊं लागलें !! पण ह्या उन्मत्त होणारांस असें सुचलें नाहीं कीं, आपणांस पुढें काय काय अडचणी भोगाव्या लागतील ?—

तिकडे त्यांचें प्रथम लक्षच गेलें नव्हतें! आणि जाणार तरी कोणाचें?—ज्या लष्करांत भिन्न भिन्न विचार आणि अव्यवस्था. ज्यांत खोराकीची टंचाई. त्यांत अखेरचा उपाय एक काय तो लूटच राहिला होता! बंडवाल्यांनीं तुझ्या सैन्याशीं चकामकी खणाजंगी, झपाझपी, मारामारी किंवा कापाकापी करावयाचें सोडून देऊन, त्यांचे जे हितचिंतक होते; त्यांवरच आपला शूरपणा गाजविण्याचें मनांत आणिलें! आपल्याकडे लढण्याच्या सरंजामाची पंचाईत आहे, हें ज्यांस सुचलें नाहीं; त्यांस ब्रिटीश आणि इंडियन सोल्जरांसमोर जाण्यापासून लाभकारक परिणाम होईल किंवा नाहीं? हें तरी कोठून सुचावयाचें! तोफखाना नाहीं. लढण्यास शानदार तरवारी किंवा भयंकर बंदुकाही नाहींत. ब्रिटीश सोल्जरांस पिटाळण्यास किंवा घेरा घालण्यास अत्यावश्यक जें लढाऊ सामान, तें सुद्धां नाहीं. सेनेला हुशार सरदार नाहीं. योजना करणारे पुरुष नाहींत. व्यूहरचना करणारे नाहींत. संप नाहीं. नियम नाहीं. निश्चय नाहीं. नीति नाहीं. शेवट पोहोंचवून यथार्थ रीतीनें काम करण्याची आवड नाहीं. कामाचें ज्ञान नाहीं. चांचल्यवृत्ति पण निराळ्याच तऱ्हेची! नाणें धिरणारा कोणी नाहीं. शहाणपणाचे विचार नाहींत. आणि सुधारणेवर नजर नाहीं. तेव्हां अशा प्रकारें प्रारंभापासून नन्नाचा पाढा वाचीत बाहेर निघालेलें सैन्य, कोणत्या प्रकारचा जय मिळविणार बरें? तें आपल्या अघटित योजनेनेंच मेलें! त्यांच्या कर्माला कोणी लढाई म्हणणार नाहीं, बंड म्हणणार नाहीं आणि कांहीं नाहीं! त्यांत

तुझा कांहीं पराक्रम गाजला आहे, असें मला तर बिलकूल वाटत नाहीं ! शेवटीं लुटफाट व एकंदर धांदल होऊन जुलमानें बहुतेक प्रजा परिपीडित झाली. व बंडखोरांचा मात्र धिक्कार करूं लागली. त्यांस जे कोणी अन्य रीतीनें आश्रय देते असते, तेही विरुद्ध झाले. आणि तुझ्याविषयीं त्यांस दया उपजली. ते, तुला ममत्वानें मानूं लागले. ईश्वर प्रार्थना झाली. आणि तूं, "अदल राज" या नांवानें ओळखली जाऊं लागलीस. बंडखोर सेनेचा कोणताही राजकीय विचारच नव्हता. तुझ्याच शब्दांत बोलूं लागलें तर India नव्हता. लढाईंत कसा हल्ला करून घुसावें? केव्हां व कशी दौड करावी? शत्रूला कसा अडवून शह लावावा? कसें मारावें? कसा निकाल करावा? याचाच जेथें हिशोब, पत्ता किंवा पर्वा नाहीं; तेथें जयाची आशा कसली? या बंडांत जें काय झालें, तें इतकेंच कीं, कितिएक **मोंगल**राजाकरितां उठले; कितिएक **पेशवाई** करितां उठले—कोणी कोणी **रजपूती**साठीं लढले. आणि बहुतेक तर आपले हात व शस्त्र यांस कांहींएक काम नाहीं !! ह्मणून उठले होते !!! ह्यामुळें त्या धांगडधिंग्यांत लष्कराची शक्ति—सेनापतीची बहादरी असणार कोठून? **हिंदुस्थान**चे मुख्य मुख्य सरदार त्यांत शहाजादे आणि राजपुत्र—अमीर आणि उमराव—राजा आणि महाराज, हे बालपणापासूनच ऐष आराम, मौज मजा, व्यसन विलास व सुस्तींत परिगर्क गहणारे—जन्मले तेच बिचारे अक्कलशून्य, अक्षरशून्य, आणि वीरत्वशून्य—इतका सर्वच शून्यकार असून आणखीं

जनानखान्यांतच पडून राहणारे !! नेजाबदार, तरवारिये, गोलंदाज हे तर विरळाच ! त्यांचें नांव देखील व्यावयास नको. बरें, जे होते, ते आपल्या मनःकल्पित शिपाई बहादुरीचा गुण गाणारे आणि पत्राजखोर. सुभेदार, रेसालेदार व शिलेदार, असे घोडेस्वारांची तुकडी चालविणारे व तोफखान्याच्या बटेरीची सुव्यवस्थित रचना जाणणारे थोडे थोडके होते; पण ते पडले प्राचीन रीतीचे ! तशांत अलीकडील युद्धाच्या निपुणतेकरितां ऐतिहासिक वृत्तांत, शस्त्रविद्येचें सूक्ष्मज्ञान आणि शत्रु राजद्वारीं कपट कला इत्यादि ज्या ज्ञानाचें सर्वांहून प्रथम अगत्य होतें; त्याविषयीं मुळींच अकलशून्य !!! व समर्थ सैन्याधिपतीशीं कोणत्या रीतीच्या आधिपत्यानें वर्तन करावें? ह्याविषयीं अनभिज्ञ.—ब्रिगेडचे मुख्य म्हटले तर, आपल्या शिरावर कसचें आणि किती जोखीम आहे? ह्याचा विचार असून व्यर्थ ख्यालीखुशालीकरितां, इकडे तिकडे घिरट्या घालणारे; आपली वृद्धि कशी करावी? ह्यांविषयीं बेफिकिर बैलांसारखे झालेले ! किंवा त्या विषयींची माहिती स्वतःच्या हुशारीनें समजण्यास अशक्त ! बरें, मिळत्या समाचारावरून होणारा लाभालाभ ह्यांचा विचार करून, समयसूचकता बाळगण्यांत तरी शहाणे असावेत? नाहींत ! शुद्ध बेसमज आणि अज्ञान. मनास वाटेल तिकडे फिरावें कोणत्याही गांवांतून जातांना त्या गांवांत आपल्या निर्वाहाकरितां कर बसवावे—लोकांना त्रास द्यावा, जुलूम करावा, लुटावें, स्त्रियांची लज्जा हरण करावी—पांच वाल सोन्यासाठीं नाक, कान

किंवा हातपाय कापावे—गांवांच्या गांवांस आग लावावी; शेतांतील धान्यें खराब करावीं—लुटावीं. सुष्टास दुष्ट समजावें. मित्रास शत्रु समजून दुःख द्यावें—ह्यामुळें ते बंडवालेच तुझा मार्ग निर्विघ्न करून देण्यास साधन झाले. आणि त्या बंडाव्यांत परिपीडित झालेले लोक तुझ्या राज्याला आशीर्वाद देऊं लागले. सारांश, बंडखोरांच्या मूर्खत्वानेंच त्यांची भट्टी बिघडली.—त्यांची जयाची आशा दूर गेली. बरें, लुट फाट अथवा माराकूट करून जवळ जो पैसा आला होता; त्याचा तरी बेत्यांनीं चांगला उपयोग करावा? पण तेंही त्या बापड्यांकडून झालें नाहीं! लुटालूट करून जो पैसा त्यांनीं मिळविला होता, तोच जर ते आपल्या सैनेच्या उपयोगास खर्च करिते असते, तरी पुष्कळ उपयोग झाला असता. पण त्या बंडखोरांनीं (आतां त्यांना असेंच ह्मटलें पाहिजे. जर यश मिळविते तर त्यांची मोठ्या प्रतापी योद्ध्यांत गणना झाली असती!) तो अनुल पैसा, मनसोक्त रागरंगांत उधळून फस्त करून टाकिला! त्यांच्या ह्या जमवाजमवीमुळें, किंवा भांडवलामुळेंच, त्यांचे शूर शिपाई त्यांचा त्याग करून चालते झाले! आणि त्यांचा हेतु सिद्धीस जाण्याच्या साधनास व्यत्यय आला. धर्म व जात्याचार ह्या संबंधानें जरी पूर्वापर विरोध होता, तरी तो त्यावेळीं नरम पडला होता.—अर्थ मळमळीत कां? मूळींच नाश पावला होता! अर्थ ह्मणेनास! कारण, जे हिंदु व मुसलमान गतवर्षीं आपसांत भांडत होते; जे एकमेकांच्या नरडीचा घोट घेण्यास

तयार झाले होते; ते त्या वेळीं बंधुत्व दर्शवून काम करीत होते; आणि आतां तर अगदींच मोकळे झाल्यासारखे होते! ऐक्यतेचा नाश झाला. जेथील काम तेथें पडून राहिलें. आणि आपआपसांत भांडण्यासच ते तयार झाले! आतां त्यांना काय करणार सांग? त्यांचा वेळ कांहीं शिकंदर—भाग्याचा—होता, ह्मणून त्या प्रलयांतून ते बचावले! जेव्हां अंकुशित—राज—बल—सत्तेची गैर हजेरी अथवा स्वदेशाभिमान व स्वदेश प्रीती यांविषयीं उत्साह, ह्यांचा शून्याकारच पडला; तेव्हां सहजच जिकडे तिकडे घातकीपणा; बेपर्वाई, लुच्चेगिरी, कपट, अंदाधुंदी आणि अव्यवस्था बोकाळली! इंग्रज कैदी जे निर्दोष आणि घाबरे घुबरे झालेले होते; ते शरण आले. व कितिएक निर्दयतेनें—जणों, उगवलेल्या शेतांतील घांस कापतात कीं नाहीं? त्याप्रमाणें कापले गेले! किंवा निर्दोष मेंढरें, बकरीं कापणारे असे ते खाटिकच निपजले; असें ह्मटलें तरी चालेल! ह्या अतिघोर व त्रासदायक कर्माचा दोष, तूं तुझ्याच **नानाराव** आणि **बहादुरशाह** या जंगींवर ठेवित्येस पण तूं आणि तुझे बेटे, सकारण पुरा तपास करून एका मतानें आणि एका जमावानें त्यांचा धिक्कार करण्यास शक्तिमान् झालां नाहीं! हा संतापकारक बनाव इतिहासाच्या अविचल पृष्ठावर जरी काळा डाग दाखवीत आहे; ह्यानें "**भरतखंड**" ह्या उत्तम नांवास लज्जित केलें आहे;—ह्यामुळें कोणताही प्रजा—तूर्तची सुधारलेली ह्मणतात, ती सुद्धां—फार हलका विचार दर्शवील; आणि तो दुसऱ्याच्या मनांत चांगला ठसण्यासारखाही आहे—

ह्या दुष्ट कर्माविषयीं विचार करूं लागलें तर जोंपर्यंत कोणी शानदार, अविचल, विजयवंत पराक्रम करणार नाहीं; तोंपर्यंत हा काळा डाग धुतला जाणार नाहीं, असें जरी आहे; तरी त्वत्पक्षीय इतिहासांत तूं मुक्त मानसानें हा काळा डाग एका देखील पक्षाला लावूं शकली नाहींस! हाच त्या बंडखोरांचा महान् विजय होय! असें मीं समजत्यें.*

---

* सम्जान **मालकम**चे विचार पहा. सन १८५० पूर्वी अति दुष्ट रीतीनें राज्य चालविण्यांत येत होतें. "**मुसलमानां**च्या व **मराठ्यां**च्या दुःखानें सर्व लोक फार घाबरले होते. कंपनीच्या नोकरांपेकीं पुष्कळांनीं पैसा मिळविण्याकरितां, इतकी दुष्टता आचरिली होती कीं, त्यामुळेंच **ब्रिटीश** न्यायी राज्याविषयीं सर्व लोकांचे फार खराब विचार झाले होते. यापेक्षांही विशेष बोलण्याचें कारण लोकांस असें झालें कीं, ते स्त्रियांशीं घरसंसार व्यवहार संबधांत फार पडत. पुष्कळ सुंदर स्त्रियांस **ओरिसा, अलिगड,** व **पंजाबांत ब्रिटीश** सोल्जर बलात्कारानें बिघडितात. असें जेव्हां मी माझ्या एका मित्राकडून ऐकिलें, तेव्हां मला अत्याश्चर्यसहसकोप झालेला, माझ्या मित्रानें पाहिला! **हिंदुस्थानां**तील देशी लोक निर्बल आहेत; असें समजून सर्व लोक त्यांस त्रास दत आले आहेत; पण हें फार वाईट आहे. ह्याचें फळ फार खराब निपजलं पाहिजे; आणि निपजेल." थोड्याच वर्षांत हा भविष्य (क) वाणी खरी झाली. परंतु इंग्रज त्यापासून सावध न होतां, देशीयांसच दूषित करूं लागले. तरी त्यांतही कांहीं अर्थनिष्पत्ति झाली नाहीं. पार्लमेंटांत तक्रारी होऊन त्यांत मि. **ब्राईट**नें जें सांगितलें, तें अत्युत्तम होतें. "**कंपनी**ची पैशाविषयींची मुख्य व्यवस्था उधळपट्टीची व जुलमाची होती. व तिचें अवघें धोरण, राज्यें खालसा करावींत; आणि जुलूम करावे; अशा प्रकारचें होतें. वस्तुतः तेथील राज्यकर्ते कोणासच जबाबदार नव्हते. पार्लमेंटांत **हिंदुस्थान**च्या कामाकडे कोणींच लक्ष देत नव्हता. फक्त दुफळीच्या संबंधानें अगर दुसऱ्या फारच थोड्या प्रसंगीं मात्र लक्ष जाई. गव्हर्नर जनरलच्या मनास वाटेल तसें त्यानें करावें. बोर्ड ऑफ कंट्रोलचा

आतां ही देखील एक संशयाचीच गोष्ट आहे कीं, बंडांत जे पुढारी होते, त्यांच्या हातीं तीं घातक कर्में अटकाविण्याची कांहींतरी शक्ति होती, कीं काय? हा विचार पाहिला

प्रेसिडेंटही मनःपूत वागे. **हिंदुस्थान**च्या अंतर्गत स्थितीविषयीं अगदीं दुर्लक्ष्य झालें. अशा कारणांनीं सगळी व्यवस्था खराब झाली होती. **ब्राईट** आणखीं विशेष असें म्हणतो कीं, **स्पेन**नें आटलांटिकच्या पलीकडे जी वर्तणूक चालविली होती, त्यांत आणि ह्यांत फारच थोडा फरक आहे. अशीं बंड होण्याविषयीं कितिएक कारणें साधनभूत होतीं. मिशनरी लोकांनीं धर्मनिमित्त दाखविलें आहे. आणि कितिएकांनीं राजकीय बाबद दाखविली आहे. पण ही गोष्ट खरी आहे कीं, "त्यावेळीं सत्ताधिकाऱ्यांत स्वच्छंदपणा, लहरी स्वभाव, दुष्टता, द्रव्यलोभ, गर्विष्ठता, धर्मलोभ, राज्यलोभ, लोकांच्या स्थितीविषयीं अनास्था, प्रजेच्या सुखाविषयीं नवे विचार न योजणें, आणि लोकांनींही ते बहिमामुळें ग्रहण न करणें. इत्याद्यनेक कारणें आहेत. जमीनदार आणि जनरल ह्यांचा अभिमानानें त्यांनीं तिरस्कार केला. हक्क काढून घेतले, कंपनी खादाड झाली, उद्योग कमी होत गेला, देशांत विलायती मालाचें महत्त्व, लष्कर लढाईशिवाय स्वस्थ, आणि सर्वांचे हात चळवळत होते. त्यांत आणखीं पार्लमेंट अंध झालें— तें न सोसल्यामुळें जनमत उच्छृंखल झालें. आणि चमकतां चमकतां अति मोठा त्रास सुरू झाला. तरी महा भाग्याची गोष्ट ही होय कीं, त्यावेळीं कोणी चांगला सरदार पुढें सरला नाहीं. **शिंद्या**ला साधण्यासारखें होतें, आणि तो मोठा समर्थ योद्धा होता; पण क्षणांत डाव फिरला. आणि सर्व जेथच्या तेथें थबकून राहिलें. जर आणखीं कांहीं वेळ मिळता, तर फार दुःख सोसावें लागलें असतें." "आतां इग्रजांस इतकें तरी शिकावयाचें आहे काय? कीं, राजसत्तेचा उद्देश काय? लोकांना आवडेल असा अमल करणें, समस्त देशी जनांच्या लाभाकरितां असें चालें पाहिजे आहे कीं, सर्व सारखे आहेत." सौभाग्याची गोष्ट होय कीं, ह्या कादंबरीचे नायक **लार्ड रीपन** महाराज ह्यांनीं **हिंदु**तील बहुतेक गोष्टींकडे चांगलें लक्ष्य दिलें आहे.

असतां मला तर असें वाटतें कीं, त्या वंडखोरांचे अव्यवस्थित आणि जंगली रीतीनें वागणारे सोबती, विजयानें व्याकुळ—मूर्ख व गांडू झाले होते. ते परदेशी व परधर्मी लोकांचा धिक्कार करीत. आणि थोडा काळ स्वतंत्रतेच्या सुखमय स्वादानें ते लोक, इतके मदोन्मत्त झाले होते कीं, ते, कधींही कोणत्याच पुढाऱ्यांच्या आज्ञेची बिलकुल पर्वा करिते नसते! ते एक शब्द तरी ऐकण्याचें मनावर घेते कशास? ते उन्मत्त झालेले मूर्ख, उलट असें सांगणारांचाच सपाट्यासरसा शिरच्छेद करण्यास तत्पर होते! सन १७९२ त **फ्रान्स** देश जसा गांडूपणानें व्यापिला होता, त्यापेक्षांही विशेष या अर्धवट जंगल्यांनीं अव्यवस्था माजविली होती. जर **रोबीस पियर मिराबो** आणि **व्हॉल्टेर** यांस मारतांना त्या उच्छृंखल **फ्रेंचां**नीं विचार केला असेल, तर ह्या वेळीं **भारत** भूमींतील गांडू ह्या विषयीं विचार करणार! वस्तुतः **नानासाहेब** आणि **बाहादुरशाह** ह्यांस तरी कोण मानीत होतें? खऱ्या रीतीनें त्यांच्या हातांत सत्ताच नव्हती—आणि जी होती तीही नांवाचीच! सूक्ष्म विचार करून पाहिलें तर त्यांचें नांव पुढें करण्यांत आलें होतें इतकेंच! जरी हे *नामजादे पुरुष समर भूमीवर आले नसते, तरी केव्हांना केव्हां बंड तें झाल्या वांचून

* नांव चांगलें किंवा वाईट पण आहे तर खरें? इंग्रज **नानासाहेबास** वाईट म्हणतात, पण एका कवीची उक्ति अशी आहे. "राजवंशी ते खरो खटपटीयो न्हानो ॥ गुप्त रहीनें करया, जीव सट्टाना कामो ॥ रणशूरो नही केइ वळी वहु दुष्ट लखायो ॥ हूं नामानूं वात घणे वेशे देखायो!" ॥ १ ॥ सारांश, ज्याला जसें वाटतें तसें तो म्हणतो! किंवा ज्याचें मन जसें असतें तसें तो म्हणतो.

राहिलेंच नसतें! कारण लॉर्ड डलहौसी आणि त्या पूर्वीच्या गव्हरनर जनरलांनीं अशी राज्यव्यवस्था आरंभिली होती कीं, देशाचा सुमारें $\frac{1}{3}$ भाग नाराजी झाला होता. आणि त्यामुळें बंडाच्या दोन्ही पुढाऱ्यांच्या हातांत कोणत्याही प्रकारचें सूत्र राहिलेंच नव्हतें. . तें जर ह्या वीरपुरुषांत—ते तसे तर नव्हतेच—असतें, तर, ते शस्त्राघातानें मरते असते, पण पकडले जाते नसते. त्यांचे अंगीं निर्भयता, धीटता, निःस्वार्थीपणा, मोठेपणा, गंभीरता, प्रौढता आणि जें चांगलें धैर्य पाहिजे होतें, तें होतें कोठें? त्यानेंच ते कमनशीब होते—अग? त्याचा एखादा अंश देखील नव्हता! जर असता, तर ते अशा अप्रतिष्ठित कर्मातून अगणित जोखम सांभाळून, अश्रांत श्रम सोसून, शानदार लढाई करून, शत्रूचें चागलें करून, आपलेही प्राण बचाविते असते. **वाशिंगटनला** जसे लोक अनकूल होते, तसे अनुमत लोक नाहींत. आणि राजसत्ता ही नाहीं. तशांत कमजोर आणि स्वार्थी! ते काय करावयास शक्तिमंत होणार? कैद्यांची, स्त्रियांची, आणि बालकांचीं कत्तल करण्यांत आली. आणि लष्करांतून उधळलेले व दाही दिशा भटकणारे जे सोल्जर होते; त्यांचाच त्या निर्दयांनीं घात करून त्यांस क्रूरतेनें कापून टाकिलें—कारण, त्यांस दयेची आतां तीळभर देखील आशाच उरली नव्हती. **यूरोपियन** सैनेची कवाईत, राजकीय कावे डावे, डाव, पेंच, बळ; आणि **ब्रिटीश** सैन्य; संख्या, शस्त्रें व शूरता ह्या तिहींतही बलिष्ठ, निपुण व कलावान्! तेव्हां त्या सैन्याचा जर जय होईल तर फार संहार होण्यास अवधी

लागणार नाहीं, ह्या भीतीनें जे भडकलेले; जे योग्य रीतीच्या विचारानें आणि खरा सल्ला नाहीं म्हणून निराधार झालेले; फार दिवस घेरा घालून अनेक संकटें सोसलेले; समय गेल्यामुळें कापाकापींत जयाची आशा थोडी, परंतु मनुष्यसंहार फार झालेला; शूरपणा नरम होत गेलेला, आणि आंधळ्या सरदारांनीं एका बाजूनीं एकत्र होतांना अटकावून दुसऱ्या रीतीनें घेरून ठेविलेले; अशा सुटलेल्या जंगी वाघांनीं तुझ्या घांलकांस चिरून टाकिलें. माझ्या मतें त्यांत नांवाच्या पुढारी सरदारांस दोष देण्यास बिलकुल कारण नाहीं. हा झगडा व लढाई यांच्या अंदाधुंदींत देशाची मात्र धुळधाण झाली! तो, कांहींच काम करीत नव्हता. बंडखोर आपआपसांत मारामारी करीत होते. रयत बंडखोरांस अतिशय कंटाळली होती. आणि दरएक प्रांत, दरएक नगर, फार कशाला? दरएक व्यक्ति आपआपल्या मंडळीच्या रक्षणाकरितां, अत्यातुरतेनें परिगके झाली आहे; अशी दिसत होती. सर्वच लोक सत्तालोभी, स्वतंत्रतेचे लहरी, पुरे योद्धे, स्वदेशाभिमानी, महाबल—वीरश्रेष्ठ बनून आपआपलें लहान सहान स्वराज्य स्थापण्याच्या विचारांत होते. उत्तर हिंदुस्थानांतील पुरभय्या कठिणहृदय झाले होते. तेव्हां इतर ठिकाणीं आतां मी वरती जशी सांगितली, तशी स्थिती झाली होती. आपल्या उत्साहाच्या पूर्ण वेगांत आलेल्या बंडखोरांनीं आपलें अजितबल, जर धाडपाडूं प्रमाणें बिनजरूरीचे व अफलदायी किल्ल्या कोटांस घेरा घालून निरर्थक श्रमांत उडविलें नसतें; ते अनु-

भवसिद्ध उद्योगी, परोपकारी आणि न्यायी सेनापतीच्या वशवर्ती होऊन राहते असते. आपल्या लोकांचा विश्वास मिळविते असते; ताम्रमुख्यांचाच विनाश इच्छिते असते; देशी राजांस संधीनें आपलेसे करून घेते असते; तर त्यांनीं ज्या जाग्यांत उच्छृंखलपणा आरंभिला होता; त्याचे तेव्हांच मालक होऊन राहिले असते! परंतु तुझ्या सुदैवानें तसें घडलें नाहीं; किंवा सरदारांच्या सक्त सेवेचा परित्याग करून योद्धेच दूर राहिले असावे! लष्करी बंधनांत ढिलाई, सुस्ती, मुहूर्त, तजविजींत कच्चेपणा, धर्मांत तक्रारी, आणि लुटीच्या वाटणींत लटालटी, व आपसांतच हाणामारीच्या तक्रारी होऊन त्यांच्यांत आधींच नाउमेद उत्पन्न झाली होती. तितक्यांतच तुझें शिकलेलें, निपुण, निमक हलाल, देशी व यूरोपियन लष्कर रणस्थलांत येऊन उभें राहिलें. तुझे अंमलदार इलाख्याचे आणि समुद्राचे होते, तुझे पुत्र पुष्कळ होते. ते पश्चिमेकडील प्रजा. मग काय? बोलायलाच नको! सारांश, तुझ्याकडे जें होतें तें हिंदच्या पुढाऱ्यांकडेस नव्हतें. तशांत, तुझे पुत्र पुष्कळ दिवसपर्यंत मोंगलांचा व मराठ्यांचा जुलुम सोसून कसले होते. त आपलें निरंतरचें आत्मबल रोधून स्वस्थानीं निश्चित बसले होते—जणों, आपलें कांहीं जाणारच नाहीं; अशा समजूतीनें ते स्वस्थ होते! गाजराची पुंगी वाजली तर वाजली नाहीं तर चावून खाल्ली. येथील नागरिक आणि व्यापारी अति दुर्बळ झाले होते. पुष्कळ भाग न्यात्याचार, जात्याचार, कुलाचार, देशाचार, धर्माचार ह्याविषयीं व्यर्थ अज्ञानभरित तक्रारी लढवून

काळ घालवीत होता. त्यावर तुझ्या बहु दीर्घदृष्टिं सत्तावाल्यांनीं सामदाम, भेद, दंड चालवून आपली जरब कायम ठेविली. तेव्हां सहजच तुझा मूळ पाया स्थिर—अचल व न डगमगणारा झाला! ह्यांत आश्चर्य मानण्यासारखें तें काय आहे? तुला ह्याच शांततेच्या स्थलांतून आश्रय मिळाला. तशांत, तूं जात्याच बहु प्रपंची-जिनें **एजिन्कोर्ट** आणि **वाटर्लू**च्या रणक्षेत्रांत "प्रपंचवीर" अशी पदवी मिळविलेली. व त्याबद्दल जी आढ्यता बाळगणारी आहे; त्या तुला युद्धनीतीविषयीं विचारावयासच नको! तूं एकाच ठिकाणीं लढाई करण्याचें सोडून देऊन, "दौडादौडीनें लढणें विशेष पसंत केलेंस—त्या दौडणाऱ्या तुकडींतील योद्धचांची तारीफ करावी तितकी थोडी. ते चांगल्या प्रकारची तालीम घेतलेले, उत्तमप्रकारच्या शस्त्रांनीं सुसज्ज—उत्तमप्रकारच्या अस्त्रांनीं आणि सरंजामांनीं भरलेले; त्यांना मागें **इंग्लंड**चे साहकारी. ते एक भाषा बोलणारे, त्यांतच थोडें बहुत साहाय्य करणारे देशी राजे व योद्धे. यदाकदाचित् रूपांतर झाल्यास किंवा अवसान गळण्याचा प्रसंग आल्यास **यूरोपांतील** देशांचा आश्रय. ते पूर्वीच्या **कीर्त्ती**नें आणि **वैरा**नें उच्छृंखल झालेले, ते शत्रूच्या अशक्ततेविषयीं माहितगार, ते अनेक खटपटीविषयीं धोरणी, ते आपल्या बलाविषयीं वाकबगार, ते दृढ आणि सावध, ते संयुक्तबलाच्या लाभाविषयीं अतिशय जाणते, ते घटींव, उत्साही व न डगमगणारे, ते धाडसी, धीर, वीर, आणि पाणीदार घोड्यावर स्वार होऊन बसलेले! **ब्रिटन**बाई? अशा प्रकारें तुम्हीं सुसज्ज असून अव्यवस्थित बंडखोरांच्या लष्करावर

जय मिळविण्याविषयीं दृढतर मजबूत होतां; म्हणून विजयी झालां. त्यांत आश्चर्य मानण्याजोगें कांहींच नाहीं!!! **तात्या टोपे, नानाराव,** जंगी **बहादुर** व **लक्ष्मीबाई** यश-वीर-धीर-नारी* केवळ स्त्री असून तिनें तुमच्या युद्धगुण परिपूर्ण, सर्व बलसंपन्न सुशिक्षित, आणि चांगल्या वाकबगार सेनापतीच्या दक्षतेंतील सेनेचा पराभव केला!!! पहा बरें? तुझ्या सैनेंत रायफल क्यानन आणि त्यांकडे बंदुका—फटाकड्या—म्हटल्या तरी चालतील! या दोहोंत तुमुल युद्ध होणार तें काय? परंतु बंडखोर मैदानांत आले मात्र. तों पहिल्या सपाट्यासच त्यांनीं तुला हटविलें! पण जेथें त्यांचीं शस्त्रेंच लटपटीत, तेथें मुळीं उपायच हरला!! त्यांच्या सैन्यांत जरी **वाशिंग्टन** सारखा विरळा वीर असता, तरीही हटकून पराभव पावता! सैन्यांत घुसतांना जेव्हां तुझ्या केनन, थेट शत्रूच्या छातींत घुसूं लागल्या, तेव्हां शत्रूंच्या बंदुका पुढें होण्यापूर्वींच धुळींत पडल्यां, तशांत ती युद्धकौशल्यरहित—निराधार—सेना; जिला द्रव्य

* एक **ब्रिटीश** ग्रंथकार म्हणतो कीं:—"ती फार निपुण. घोड्यावर बसण्यांत चपळ, स्वारी करण्यायोग्य, आणि शत्रूचा पल्ला पोहोंचविणारी असून तीर मारण्याच्या कामांत फार हुशार होती! **इलिझाबेथ**सारखी तिची कांति, उठाव छाती व चलनवलन चपल असे. लढाऊ सोल्जर तिची अशी बहादरी पाहून मोहित होऊन दिपाऊन जात. प्रत्यक्ष सर ह्यू रोझ म्हणतो कीं:—"**हिंदुस्तांना**तील बंडखोरांत खरोखर **पुरुष** असा मानण्यास एकच होता. आणि तो कोण हें सांगूं लागलें तर फक्त **झांशीची राणी लक्ष्मीबाई**! म्हणजे **स्त्री**!!! असें म्हणणें भाग पडतें.

साधन सामग्री नाहीं, शस्त्रेंही नाहींत, जी भिन्न भिन्न विचारी लोकांनीं एकवटलेली. ह्यामुळें तुझें सहज फावलें! ह्यांत कांहींच नवल नाहीं. काय चमत्कार पहा? अग? त्यांच्या भूमीचे राजे, अमीर आणि शाहाजादे त्यांचाच अविश्वास करूं लागले. त्यांनाच मिऊन दूर राहूं लागले. इतकेंच नव्हे, तर त्यांचीच दुर्दशा करण्याकरितां त्यांनीं तुला आणखीं आश्रय दिला! मग सांगायचें काय? इतकें असल्यावर विचारावयालाच नको. जय विजय सारे हातजोडून तयार! बाकी तुझ्या एकटीच्या हिंमतीनें तूं कोठेंही यश मिळवून आली आहेस, असें इतिहासाच्या कोणत्याही एखाद्या लहान सहान पृष्ठावरून शाबीत होत असेल तर दाखीव? **वाटर्लू, एजिन्कोर्ट, क्रिमिया, माल्टा, अबिसीनिया** ह्यांतील कोणत्याही स्थळीं तूं स्वबल संपन्नतेनें लढली आहेस काय? बंडाव्यांतील सगळे सरदार उद्धस्त झाले, तरीही तुझ्याशीं पृथक् पृथक् लढले; आणि जेव्हां ते पराभव पावले, पळाले, लज्जित झाले, दुर्दशेस पोहोंचले, त्यांचा कांहींच उपाय चालेनासा झाला. तेव्हां कोठें तुझ्या जयाचा प्रकाश पडला! **यूरोपियन** सेना जेव्हां **दिल्ली** आणि **लखनौ** येथें जाऊन पोहोंचली, तेव्हां तिनें सर्वांस विस्काळित केलें—त्या वेळीं बंडखोरांस जर दुसरी सहायता मिळाली पाहिजे होती, ती मिळती; किंवा मिळण्याचा संभव होता ती मिळती असती; प्रतिकूळ शत्रु अनुकूळ होते असते; कितिएक क्रम रहित आणि तुफानी झपाझपी झाली नसती; धांदल खोरांस दाबून

पाहिल्या सपाट्यासच कापून काढून लष्करास वश केलें असतें. तर वाई? निराळाच रंग खुलला असता!!! परंतु प्रथमपासून तें व्यर्थ कापलें गेलें! आणि नंतर शहाणें लष्कर मोठ्या शौर्यानें येऊन त्यानें त्यास जिंकिलें! बंडखोरांच्या ताब्यांत आलेलीं दोन नगरेंही गेलीं! तेव्हां तर त्या बिचाऱ्याकडे कांहींच राहिलें नाहीं!!! अर्थात् गुरिलाच्या लढाईनंतर—**लखनौ**च्या मुक्ततेनंतर—**पानिपत**च्या मैदानांत जेव्हां सर **ह्यूरोझ** गेला, तेव्हां तें पुन्हां जसें होतें तसें होऊन तूं म्हणतेस त्या तुझ्या "शीतल छत्रा" खालीं पुन्हां भरतखंड आलें! आणि तूं आयत्या पिठावर रेघा ओढूं लागलीस."

"पुरे कर. फार झालें!" **ब्रिटानिया** चिडीस जाऊन बोलूं लागली. "माझें म्हणणें थोडें तरी ऐकशील? का तुझें तेंच खरें? काय एकसारखी वटवट लाविली आहेस?"

"आतां नाहीं." मोठ्या त्वेषांत आलेली **स्वतंत्रता**देवी फारच रागानें म्हणालीः—"माझ्या भाषणांत तुझ्या पुराव्याची आणि तुझ्या अनुमताची मला काय जरूर आहे? किंवा तूं मला इतकी संमति देण्याचा तुला काय अधिकार आहे? जें यथार्थ आहे, तें तुझी इच्छा संपूर्ण ऐकावयाचें आहे म्हणून; तुला ऐकवून तुझ्या अपकृतीचा, अपहरणाचा आणि दुर्बलतेचा इतिहास सुस्पष्ट मला दाखविलाच पाहिजे. ज्या अर्थीं सुसमय प्राप्त झाला आहे; त्याअर्थीं मी कां शाबीद करूं नको? —कीं, तुझें राज्य ह्या देशाच्या सहायतेशिवाय प्राप्त झालेलें नसून, केवळ प्रपंचप्रेमी आहे! तुझी इच्छा जर माझ्या

कार्यांत हरकत घालण्याची असेल, तरीही ठीकच. ही मी निघाल्यें! मलाग काय? दोष देऊं नकोस मला?— योग्य वाटेल तें करीन बरें! पण ध्यानांत ठेव कीं, आज पासून ह्या **हिंददेवी**ला माझी प्रिय सखी मानून सगळा आश्रय देईन! बोल? आतां तूं काय ह्मणत्येस? बोलूं का नको सांग? विचार कर हाँ? नीट शुद्धीवर ये!"

"ठीक आहे! तुझ्या इच्छेस येईल त्याप्रमाणें करण्यास तूं स्वतंत्र आहेस **देवी**!" कडू गोळी **ब्रिटानिया**नें निरुपायानें गळ्याखालीं उतरत नव्हती तरी एकदांची घेतली.

"ठीक, तूं आतां शहाणपणा शिकलीस खरी!" **ग्रिसियन राणी**नें सांगितलें. "जेव्हां तूं ह्मणत्येस त्या "शीतल छत्रा" खालीं सगळा देश आला, तेव्हां तूं काय केलेंस? त्याची तुला स्मृति आहे? नाहीं असें व्हावयाचेंच नाहीं! पण तूं मोठी घीटता धरून बसली आहेस! तर ऐक: अझून तुझ्या, माझ्या, आणि या **हिंददेवी**च्या कर्माची पुष्कळ कहाणी सांगावयाची शिल्लक आहे. तुझ्या हातीं **भरतखंड** आल्यामुळें तूं गर्वानें अतिशयच फुगून निष्ठुर झाली आहेस? कायग? त्या बंडाच्या वैरत्वांत रक्तबंबाळ झालेले प्राणी आसपास पडले होते, त्यांच्या मरणसमयींच्या हृदयद्रावक, दुःखार्त किंकाळ्या ऐकून व धर्माकरितां जे जुलूम झाले असें ह्मणतात; त्या बोलण्यास टेंका देऊन कांहीं तरी उपाय त्वां केले खरे? अथवा राज्यसंयोजनरीतीमुळें जेव्हां लाखों प्राण्यांच्या संहाराचा वेळ आला; आणि त्या तुझ्या चुकीच्या विचारानें तुला पुष्कळ सोसावें लागून त्याविषयीं तूं

आपली भूल* समजलीस खरी? अथवा मोड्या स्थिर—मजबूत आणि शहाणपणाच्या पायावर राज्यरचना करण्याचें तुला सुचलें खरें? प्रजेला कशी अनुकूळ ठेवावी? राज्यसंस्थापनांत किती आणि कसकसा परिश्रम सोसावा लागतो? आर्यावर्ताचा दैवी गुण, रीति, विवेक, मर्यादा, चाल चलणूक, ह्यांस कसा मान द्यावा लागतो? देशी राजांस कसें तपासावें? देशी उमराव, अमीरवर्ग कसा राजी राखिला पाहिजे? तुझ्या विजयवंत पुत्रांनीं कशा प्रकारें अमलाच्या कैफाशिवाय अंमल केला पाहिजे? अमलाच्या कैफांत धुंद राहून अधिकार चालविला तर काय घोर परिणाम होतो? आर्यांच्या स्वार्थास हानी पोहोंचविली तर—आणखी त्यांच्याच भूमींत—कसकसे हाल होतात? त्यांची कीर्ति, त्यांची आबादानी, त्यांची झाहोजलाली—भरभराट—त्यांची सरळता, त्यांची संसारी व धार्मिक स्थिती, त्यांचें सुख, ह्यांविषयीं तूं आज तेवीस वर्षांत कांहीं जास्त शिकलीस? मुळींच नाहीं! तूं आपल्या मतानें पुष्कळ पाहिलें असशील, पुष्कळ जाणिलें असशील, पुष्कळ भोगिलें असशील, परंतु शंख विद्यार्थ्यासारखी अजून देखील जशीच्या तशीच कोरी ठंणठणीत राहिली आहेस! तुझ्या स्वतःच्या राज्याविषयीं नाहीं तुला खबर कीं, अंतर; नाहीं तुला लेशमात्र चिंता; आणि नाहा तुला तिळभर दरकार; मात्र उजळ

* लॉर्ड **मेयो भरत**खडाचा चौथा व्हाईसराय जो खरोखर ह्मणतो तें असें आहे. "ह्या लोकांशीं जें आमचें कर्तव्य आहे, तें आह्मीं मुळींच बजाविलेलें नाहीं; असें मला स्पष्ट दिसतें." इत्यादि. **लोर्ड मेयो.**

तितकें दूध. मग तें तेल, तूप किंवा चॉक कालवलेलें पाणी असो, तुला चालतें? तुला गर्वानेंच परिव्याप्त केलें आहे. ह्मणून तूं पर्वाच्च वाळगीत नाहींशी झालीस? पहिल्याच झपाट्यांत मागील स्थिती तूं मनांत आणून जुलूमजास्तीचा धंदा जारी आरंभिलास? तुझें पहिलेंच पाऊल **मेक्सिकोंत** दाखल झालेल्या **पिझारो** व **कोर्टिस** ह्यांची नक्कल होय?* ह्यामुळेंच तूं त्या **आर्य** राजद्रोह्यांस दूत, जासूद, हेर व इतर कपटाच्या धंद्यास लाविलेंस? ते प्रथम तुझ्या उपयोगीं पडले, आणि बंडाची परिसमाप्ती झाल्यावरोवर तूं त्यांसच पुढें केलेंस? त्या धंद्यांतील जे मुळचेच वाकवगार. ते, कांहीं कमी पराक्रम दाखविणार नाहींत! त्यांनीं चांगले चांगले कुलीन, अमीर, राजे, ठाकोर, सत्ताधिकारी ह्यांच्या जिंदगीवर डिमोक्लीसची तरवार लटकावीत ठेविली? **ब्रिटानिये!** तूं अब्रूदारांचा त्यावेळीं केवळ मरण प्रसंगच आणिला असें ह्मटलें पाहिजे. जिकडे तिकडे फांस, तोफा, लहान सहान बंदुका आणि सोट्यांचा उपयोग होऊं लागला. जेव्हां नगरें व गांवें एकामागून एक तुझ्या ताब्यांत येऊं लागलीं, तेव्हां तीं तुला अर्धवट वैराण दिसलीं असतील! अवघ्या **भरतखंडांत** हाहाःकार उडाला! जेथें जेथें, तुझे पुत्र क्रोधाविष्ट नेत्रांनीं फिरत होते;† तेथें तेथें

---

* जान **ब्राईट**च्या भाषणाची प्रस्तावना पान ७ पहा.

† "**भरतखंड** बंडापूर्वी आणि नंतर" ह्या पुस्तकाचा कर्त्ता लिहितो कीं, ड्रायडन कवीच्या खालील ओळी इंग्रजांच्या त्यावेळच्या वर्तनास अगदीं बराबर लागू पडतात. टिमोथियस ह्मणतोः—सुड! सुड!! क्रोधाची देव-

लोकांची पळापळ सुरू होती—जणूं एखादा महामारीचा रोग यावा आणि लोकांनीं जसें पळत असावें कीं नाहीं? तशी स्थिती प्राप्त केलीस! कोणत्याही स्त्रिचें संरक्षण होणें मुष्किलीचें झालें होतें.*

ताही खवळली आहे, पहा.? आणि तिचे सेवक हे सर्पही पहा? ते कसे फुसफुसतात. आणि त्यांच्या डोळ्यांतून अग्नीच्या कशा ठिंणग्या निघताहेत त्या पहा!!!

* बंडाविषयीं अद्यापि अनेक वार्ता चालू आहेत. ह्मणून बंडानंतरच्या स्थितीचें थोडें तरीं वर्णन येथें करणें भाग आहे. **बंगाल**च्या एका रेजमिटचा शिपाई (ज्याच्या नांवाची आतां जरूरच नाहीं.) सुमारें दीड वर्षापूर्वी बेंडस्टांडवर आम्हांस भेटला होता. त्यानें जी हकीगत सांगितली होती, ती फारच हृदयद्रावक होती. तो म्हणाला "गांडू माणसासारखे होऊन सोल्जर शहरांत घुसत. त्यांस व इतर सोल्जरांस जेव्हां समजलें कीं, इंग्रजांच्या स्त्री, पुरुष, बाल बालिकांस बंडखोरांनीं कापून काढिलें. त्यांच्या स्त्रियांची पतिसमक्ष लज्जा हरण करून स्तन, नाक, कान, हात, पाय, जिभ इ० शरिराचे अवयव छेदन करून, मग त्यांस मारूनही टाकिलें! त्यामुळें जिकडे तिकडे फारच क्रूरता माजली होती; हें ह्मणणें खरें आहे. परंतु असे प्रकार फार थोडे घडले आहेत. फक्त वर्तमान पत्रकारांनीं त्याला अत्यंत महत्व आणिलें आहे. कानपुरांत घडलेला प्रकार जरा भयंकर आहे. परंतु इंग्रज लोक तेथेंच प्रथम लढूं लागले होते. आणि ते आपल्याच धुंदींत होते. बंडखोरांचा जोम फार होता. ह्मणून त्यांनीं त्यांची पर्वा केली नाहीं. एका इंग्रजास एका बंडवाल्यानें काठीचा तडाका मारला. व तें प्रकरण फारच चिडीस गेलें. परतु बंडावा शमल्या नंतरही इंग्रज बहादुरांनीं लेश मात्र कमी केलें नाहीं. त्यांना मुळीं दयाच नाहींशी झाली. गांडू सोल्जरांच्या मगजांत एकदां जी धुंदी भरली होती, तीस अनुसरून ते वागत. स्त्रियांवर फारच जुलूम झाले. त्यांना रक्तबंबाळ केलें. किती एकींस ठार मारिलें. आणि जे कितिएक लोक मेले, ते बंडखोरांच्या हातून मेले असें मानिलें! गोगल गाईसारखे नरम झालेले लोक, ह्या राक्षसांचें

सगळे सेनापति जाज्वल्य अग्नि प्रमाणें प्रबळ होते. आणि ते ह्या देशांतील लोकांस प्रबळ शत्रु मानून वारंवार त्यांचा धिःक्कार* करीत! धनवान् असो, निर्धन असो; सबल असो,

---

काय करणार? आमची पलटण तेथें होती, पण तिजमुळें लोक फार भीत असत. व त्यांना फार त्रास होई. **लखनौ**मध्यें अवघ्या बारा बारा वर्षांच्या अतिशय रूपवान् सुंदर तीन **मुसलमानां**च्या आणि एक **हिंदू**ची अशा मुली, सोल्जरांनीं आपल्या बंगल्यांत रात्रीच्या अडकावून ठेविल्या; आणि दुसरे दिवशीं त्या मेलेल्या सांपडल्या! पण त्या अबलांची कोणालाही दया आली नाहीं. स्त्रियांचे तर हालच आले होते. शुद्ध मरण प्रसंगच तो! एखादें पोर रस्त्यांत मिळालें कीं, तंगडीस धरून फेंकून देण्यांत येई!! लुटीची तर शिकस्तच झाली होती. एखाद्याच्या पेटींवर पैसा आहे, इतकें दिसलें किंवा समजलें पुरे. कीं, हे सोल्जर बेधडकं जाऊन लुटीत. आणि कमांडरांसह सर्वांत वांटणी करून घेत. फार कशाला? ही पृथ्वी आपली नाहीं! तेव्हां कोणाचा काय विश्वास सांगावा?" इतकें बोलून तो म्हातारा इतक्या त्वरेनें तेथून चालता झाला कीं, आह्मांला त्यास एकही प्रश्न विचारण्यास सवड झाली नाहीं.

* बंडाच्या वेळीं कशा प्रकारची जंगली रीत, सुधारलेल्या **इंग्रजां**नीं आरंभिली होती? त्याविषयीं दोन उतारे खालीं देतोः—"परंतु शिपायांच्या टोळ्या तोफेच्या तोंडीं देऊन मारणें व ते सारे सारखे मेले नाहीत ह्मणून त्यांचा ढीग करून त्या जमावास विस्तव लावून देणें, ह्यासारखें दुसरें अघोर कृत्य आम्हीं **हिंदुस्थानां**त केलेलें नाहीं!!!"

हार्बर्ट स्पेन्सरच्या स्टडी आफ् सोसिआलजीचे प्रस्तावनेचें पृष्ठ २०८

मुंबईचा गव्हरनर लार्ड **एल्फिन्स्टन** हा, सर जान **लारेन्स** ह्यास लिहितांना ह्मणतो कीं:—" **दिल्ली** घेतल्यानंतर **ब्रिटीश** विजयींनीं साधारण रानटी परसियन राजा जो **नादिरशाह**, ज्यानें सन १७३८ **दिल्ली** शहर लुटून फस्त केलें; त्यापेक्षांही अधिक क्रूरपणाचीं कर्में केलीं!!!"

निर्बल असो; सर्व लोक ह्या वेळीं फार भिऊन गेले होते! जेव्हां पार्लमेंटांत ह्या प्रश्नाविषयीं चर्चा चालली होती, तेव्हां तुझे विचार राहिलीं साहिलीं देशी राज्यें, बळकावून बसावें; असे होते. परंतु ते जगविख्यात तुझे सुतनुज **ग्लाडस्टन** व **ब्राईट** ह्यांनीं अतितर श्रम सोशिले. व तुझे मनोरथ पार पडूं दिले नाहींत. ते इतके वेशर्थ भांडले कीं, तुला त्यांनीं पुरे पुरे संसार करून सोडिला! ह्या तुझ्या दोन्ही पुत्रांच्या हिंमतीमुळें तूं मागें हटून अखेरीस **क्षमा पत्रा**सह "राणीचा जाहिरनामा" बाहेर पाडिलास. **व्हिक्टोरिया**च्या त्या जाहिरनाम्यांत पुष्कळ चांगल्या चांगल्या **अभयवचनां**चा समावेश केला होता; आणि त्याचा अंमल दीर्घ दृष्टीनें, यथार्थ, मूळचा हेतू कायम धरून करण्यांत येता असता तर माझ्या इच्छेच्या बाहेर चांगलें व्हावयाचें असें फारच थोडें राहिलें असतें! त्या जाहिरनाम्यांत देशीराज्यांच्या आबादी-विषयीं, त्यांच्या भलेपणा विषयीं, त्यांच्या आश्रया विषयीं, पुष्कळ चांगलीं वचनें दिलेलीं होतीं. सगळ्या प्रकारची मुक्तता, उपभोग, प्राचीन वंशपरंपरेचे हक्क, दत्तक विधान— यांविषयीं सर्वांस सारखी मुक्तता दिली होती. आणि त्यांत असेंही स्वीकारिलें होतें कीं, **भारत**वासी प्रजाजन **ब्रिटीश** राज्याच्या दुसऱ्या प्रजेप्रमाणें मानिले जाऊन, त्यानां त्यांच्या सगळ्या हक्कांचे धनी समजण्यांत येईल. ह्मणजे, जे राज्य हक्क व प्रजा हक्क आहेत, त्याप्रमाणें इंग्लंडची राणी नामदार **व्हिक्टोरिया** ही **भरत**खंडाची शहा-

नशंहाजादी गणिली होती.* त्यादिवशीं **हिंद**ला अत्यानंद झाला होता! जिकडे तिकडे जय विजयाचा मोठा नाद गजबजून राहिला होता! सर्वांनीं आनंदोत्सव दर्शवून नव्या राणीचा सन्मान केला होता. घरोघर दिपवाळी सारखा सण मानिला होता. व लग्ना सारखा आनंद केला होता. नाहीं तर त्या समयीं मध्य आणि उत्तर **हिंदुस्थानांत** जिकडे तिकडे अस्ताव्यस्त प्रेतें पडलीं होती!! अग्निकोपही नुकताच झाला होता. रक्ताची नदी अजून वाळली देखील नव्हती! कोल्हीं व कुत्रीं, आनंदानें **हिंद**च्या पुत्रांस फाडून खाऊन आपलीं पोटें भरीत होतीं. ताम्रमुखकेश सोल्जर, खुल्या बेयोनेटानें भर बाजारांत सेंटिनलचें (पहारेकऱ्यांचें) काम करीत होते; आणि ते पहावे तेव्हां घाण पडलेल्या तोंडानें ब्रांडी आणि सांपीण पिऊन तर्र झालेले असत. ते भरलेली बंदूक खांद्यावर टाकून "छाकट्या सोल्जर बावा" प्रमाणें शांत, सरळ,

---

* हेंच खरें. "ज्यावेळीं राणीचा जाहिरनामा बाहेर पडला, तेव्हांच देशी राजांचे हक्क लटपटत चालले! इतके दिवस त्यांचे राज्याचे जे मजबूत खिळे बसले होते, ते ढिले होत गेले. आणि ते तावेदार समजले जाऊं लागले. त्यांना ज्या सनदा आणि हक्क देण्यांत येऊं लागले, ते, ते मान्य करीत जाऊं लागले. तेव्हां त्यांना 'महाराजा' आणि 'राजा' या पदवींतील भेद स्पष्ट समजला. परंतु त्यावेळीं देखील **ब्रिटीश** राणीस तें नवीन पद घेण्याचा स्पष्ट "जाहिरनामा" प्रसिद्ध करण्यास हिंमत झाली नाहीं. तें काम आज एकोणिस वर्षांनीं मि० **डिझरायली**नें शिरावर घेतलें." परंतु रीतीप्रमाणें राणीला **महाराणी** समजावी, असा जाहिरनामा सन १८७७ च्या जानेवारींत बाहेर पडला असें झटलें पाहिजे.

नम्र, मायाळू, विनयवंत, आर्जवी, दीन व दयाळू देशी-लोकांच्या प्रत्यक्ष तोंडावर शांप देण्यास आणि अनेक प्रकारच्या निर्लज्ज शिव्या देण्यास बिलकुल शरमत नव्हते* तरीही तशा वारीक व आणीबाणीच्या प्रसंगीं त्यांनीं तुझें उणें पडूं दिलें नाहीं. त्यांनीं तुजवर पुष्पवृष्टि केली. पाद प्रक्षालन केलें.

---

* हा दोष सर्वांवर सारखा ठेवणें रास्त नाहीं. देशीयांतही दोष आहे. बंडखोरांचींही कर्में धिक्कारण्याजोगीं आहेत. परंतु पूर्वी झालेलीं कर्मेंही धिक्कारण्याजोगीं नाहींत काय? केचा शिपायांच्या बंडाच्या इतिहासाचा तिसरा व्हा० पहा. या सर्व गोष्टींचा सर्व आधार "बंडाच्या निरनिराळ्या सहा इतिहासांवर अवलंबून आहे. कितीएक लार्ड **कयानिंग**ची पाठ थोपटीत आहेत. परंतु शिपायांच्या जुलमी वर्तनानें कान फाटून जातात!" "इंडियन म्युटिनी" हें पुस्तक एका मिशनरीनेंच लिहिलें आहे. तरी त्यांत तो, जें म्हणतो, त्यावरून शिपायांची वर्तणूक कांहींशी ध्यानांत येईल." "बंडाची शांतता झाल्यानंतर **कानपूर, लखनोर** आणि **दिल्ली**तील रक्तारक्त स्थलांवरून **इंग्रज** सोल्जर आपल्या आरक्त नेत्रांनीं फिरत असत! कोणीही देशी मिळाला कीं, त्यांची सूरत फिरलीच! ते त्यावर बेशक हात टाकीत. व बेधडक लुटून घेत!!!" "कित्येक वेळीं देशीयांचें नाकच चावून खात" "एकदां या मस्त झालेल्या शिपायांच्या घराकी जवळून एक हलक्या वर्णाची स्त्री जात होती, तिचे त्यांनीं हाल हाल करून टाकिले! (लाज लुटली!!!) तिचा धनी फिर्यादीस आला, तेव्हां त्यालाच उलट मार दिला! आणि कोणत्याही **यूरोपियन** माजिस्त्रेटानें त्यांची दाद घेतली नाहीं!!! कारण तो भयानें पुढें जातो कशाला?" * * * आपल्या शिपायांत धर्म ज्ञान कांहींच नाहीं; म्हणून ते देशीयांस, म्हणजे जे धर्म ज्ञान जाणतात त्यांस ही धिक्कारितात. दोन कनव्हर्ट स्त्रियांनीं आह्मांकडे फिर्याद केली कीं, "**लखनोर** मध्यें आह्मांवर फार जुलूम गुदराविला. आणि आमचा बिघाड केला!!!"

अभिवंदन झालें. मुबारकबादी दिली. "युगानुयुग राणीचें राज्य राहो" असें ते सहर्ष ललकारले. व्याख्यानें झालीं. कविता केल्या. प्रार्थनेनें तुला सन्मान दिला—आनंदाचा दिवस समजून रोषनाई केली. आणि तूं **भरतखंडा**ची अति प्रिय "**शाहजादी**" होऊन वसलीस! तेव्हां कोणी म्हणाले "**हिंदुस्ताना!** तूं आतां हर्ष मान" कोणी गाइलें "वहु वहु उपमेनें शोभते काय राणी" कोणी वंदन केलें. आणि लोभी, कृतघ्न, आपमतलबी, पाषाणहृदयी, बेपर्वा, व लक्ष्मीपूजक **आनरबल कुंपनी बहादुरचें** राज्य नाश पावलें! हिंदु, मुसलमान—आणि ख्रिस्ती हे एकाच सभेंत, एकाच स्थलांत, एका दिलानें—**फिरोज, तघलख, शिरशाह, अकबर,** किंवा **शहाजहान,** ह्याच्या राज्यात, त्यांची प्रजा त्यांनां गरीब निवाज; पितातुल्य मानीत होती, त्याप्रमाणें—तुझे अभिवंदनयुक्त दुधानें पाय धुऊन घरांत पावन करण्या करितां एकत्र मिळून कल्लोळ करूं लागले. पण हे कठिणहृदय **ब्रिटानिया!** हे गर्विष्ट स्त्रिये! हे समयानभिज्ञ कावेबाज पोरी! आफसोस!!! आफसोस!!! हाय हाय!!! त्यावेळीं देखील तुझ्या मनांतून वैमनस्य गेलें नव्हतें! तूं त्याचवेळीं—जेव्हां **क्यानिंग** अभिवचन देऊन* शांतता करीत होता, तेव्हांच आकूसी व गढूळ मनाची होतीस. मनुष्यप्राणिमात्र समान आहे, स्वतंत्र आहे, व बंधु आहे, हें मत पूर्व

* "लाईफ आफ् धी प्रिन्स **कन्सार्ट**" नामक ग्रंथाचा चौथा भाग पहा.

कालापासून आजपर्यंत वर्षांचीं वर्षें लोटलीं तरी, स्वीकारण्यांत आलें आहे. आणि त्याच मतानें टचुटॉनिक जातीच्या जंगली पणानें दुनियेंच्या सुधारणेचे तुकडे तुकडे करून टाकिले आहेत! त्यांतही तूं जें चांगलें व्यवस्थित होतें, त्याचें गर्व आणि वहीम ह्यां मुळें छेदन भेदन करण्यास तत्पर झाली होतीस? शेंकडों वर्षां पूर्वीचे आर्यजन मंडळीचे रिवाज, जे जेम तेम टिकाव धरून राहिले होते; त्याविषयीं तुला माहितीच नाहीं? ह्मणून तूं त्यांचा नाश करण्या करितां चडफडून **हिंदचा** जो पवित्र जीवात्मा, त्याचीच धूळधाण करण्याची इच्छा धरिलीस! अजून देखील तुझ्या पुत्रांत **साक्सन** आणि **नार्मन** हा द्वेष व्यापून राहिला होता! **हिंदु** ह्मटले ह्मणजे, जसे नार्मनच्या मनानें जुने **ब्रिटनी** व **साक्सनी** होते तसे होते? पूर्वेकडील विजयांचे मनांत असेंच असतें! जो मनुष्य आपलें भांडार भरील, आणि आपल्या राजगादीचें संरक्षण करील, तोच त्यांना प्रिय होतो! त्या प्रमाणेंच वागून तूं तूर्तच्या प्रजेस स्वाधीन केलें आहेस! जरी **आर्य**लोकांनीं आपल्या खऱ्या हक्कासाठीं लढून आपणांस जिंकणाऱ्याच्या ताबीन होतांना फारसें कांकूं केलें नाहीं. आणि त्यांच्या जातींत ते जोडले गेले नाहींत—तरी या देशाच्या जिंकिलेल्या भागातील आपले मात्र हक्क त्यांनीं गमाविले आहेत—इतक्या साठींच ते स्वतः हरले आहेत. ह्या मुळें जुलम्यांच्या मताप्रमाणें त्यांस धिक्कारिलें, चिरडून टाकिलें व तुच्छकारिलें पाहिजे! एवढाच मूळचा हेतु तूं धरिला होतास? जेव्हां जाहिरनामा बाहेर पाडिलास तेव्हां तुझ्या

सरकारचा इरादा कदापि दुष्ट अथवा विपरीत तरी नसावा. किंवा तसें मानण्यास मला कांहीं कारणही दिसत नाहीं. आणि त्याच प्रमाणें अंमल करणें मोकळ्या मनानें तुला आवडलेंही असल. परंतु जात्याभिमान, विजयाभिमान, आणि ते ह्मणतात त्याप्रमाणें "बुद्धीच्या श्रेष्ठते मुळें" तुमच्या मनांत पुष्कळ गर्व भरला होता. लौकिक अंमलदाराचा इच्छाच नव्हती.—ही अंमलदारी तुझ्या जमिनीच्या श्रापामुळें, व अमलदारांच्या खुद्द अव्यवस्थित नियमांमुळें, मूळा पासून सडतच येत होती. एतदर्थ ज्या मार्गानें जातांना एकवार ठोकर खाल्ली आहे, किंवा धक्का बसला आहे; तो मार्ग सुधारल्या शिवाय "आंधळें भित" हाऊन जाण्याची जी तुझी वाईट चाल तीच तूं अमलांत आणिलीस? मतवैचित्र्यानें अविश्वास केलास? आणि त्यांतही आपला लोभीस्वभाव व दांभिकपणा, पुढें केलास? ज मिळेल तें स्वाहा करण्याची निरंकुश स्वभाव वृत्ति "लेनेकु-लाला और देनेकु चतुर्भुज" अशा शंखनाथ वृत्तीनें तूं व्यापिल्या मुळें सर्वांस हडधुत् व हातशुत करूं लागलीस? केवळ हजारोंच्या सुखाहुन एका शिलिंगाची किंमत तुला जास्त वाटली? अथवा तो प्राप्त करण्यांतच त्वां मजा मानिलीस? दिल्ली आणि लखनौच्या नाशा बरोबरच अमीर उमरावांचा तूं जेव्हां नाश केलास, तेव्हांच तुझें खरें लक्षण, अप्रमाण आहे, असें प्रसिद्धपणें पारखलें गेलें! अग? ही तुझी खराब खोड तुझ्या अवयां चांगल्याआशेचा भंग करणारी आहे! आणि तूर्तची तुझी विपरित वर्तणूक पाहिली ह्मणजे, तूं

अष्टावन्नांत दिलेल्या **वचनांवर** जलांजली सोडीत आहेस, असें उघड होत आहे. तुला त्याची जशी बिलकुल पर्वाच नाहीं, असें तूं स्पष्ट दाखवित्येस ! ही माझी कटुवाणी तुला क्रोधाविष्ट करील, ह्यांत शंकाच नको. पण माझा नाइलाज आहे ! तूं ग माझें काय करणार आहेस ? तुझ्यांत मुळीं रामच नाहीं. हें मला माहीत आहे. तो असता तर तूं माझा चकाचूर व राखरांगोळी करायला कधींही कमी केलें नसतेंस ! मीं तुझा जो हा आतां प्राचीन-प्रपंच-प्रबंध सांगितला, त्यापासून तुला कांहीं जास्त समजावयाचें आहे; असें खरें कीं नाहीं ? होय ! असलेंच पाहिजे. अजून माझें पुष्कळ सांगावयाचें शिल्लक आहे, आणि तें तुला ऐकिलेंच पाहिजे. नाहीं म्हणून रागाच्या झणकाऱ्यानें कोठें जाशील ? काय ग ? बंडाचा प्रचंड अग्नि शांत झाला न झाला, तोंच **जाहिरनामा —भारत**-भूमीच्या "मात्रा चार्टा" चीं **वचनें,** पाण्याच्या बुडबुड्या प्रमाणें विलीन होऊन गेलीं ! त्यांवर तूंच विश्वास दृष्टि ठेविली नाहींस. त्यांला तूंच तुझ्या मनानें केवळ कसूपटा प्रमाणें हास्यास्पद मानूं लागलीस ? हें मीं प्रथम सांगितलेंच आहे. तो पाण्याचा बुडबुडा फुटून जातांच, त्याचें महत्त्व थोड्याच वेळांत तूं कमी करून **हिंददेवी**ला अविश्वास युक्त केलीस ? तिला तुझ्यावर विश्वास ठेवण्यास जागाच ठेविली नाहींस ? अग ! जो **जाहिरनामा**—अर्धवट उच्छृंखल, धर्मांध, उन्मत्त आणि काळरूप विक्राळ झालेल्या **हिंदराणीय** पुत्रांस केवळ असंतोषांतून संतोष वृत्तींत नेण्यासाठीं परार्थ बुद्धि—उदार वृत्तीनें

परंतु अलंकारिक शब्दानें सांकेतिक असा बाहेर पाडण्यांत आला होता. जो, हें तुझें सर्वांहून श्रेष्ठ व स्तुतिपात्र कर्म असें मानला गेला होता. जो, सत्यानें आणि विश्वासानें भरला होता. ज्याचें मर्म आणि रचना अगाध. त्या जाहिर नाम्यांतून जेव्हां तुला फावतें, जेव्हां तूं रिकामटवळी असत्येस, जेव्हां तुला आपला मतलब साधावयाचा असतो, तेव्हां अनियमित, असंभाव्य किंवा मतलबी राजरचने करितां बारिक मामल्याच्या प्रसंगीं सूक्ष्म नेत्रांनीं शोधण्यास अशक्त आणि कधीं सूक्ष्म दर्शक यंत्र सुद्धां जशी बारीक बीना शोधून काढूं शकणार नाहीं, तसें तत्व तूं खेंचून काढित्येस ! त्याविषयीं तूं केवळ निर्भय आणि बेपर्वाच काग झाली आहेस! त्या सर्व-, प्रसिद्ध, सर्वमान्य व अष्टावन्नांत स्पष्ट समजलेल्या शब्दांचा पाहिजे तसा भलताच अर्थ निष्पन्न करण्यांत तूं धटिता व निर्भयता दाखविण्यास तिळभर देखील संकोच पावली नाहींस! किंवा पावत नाहींस !!! हा तुझा निर्लज्जपणा–खरोखर माझें वचन सत्य मान. मीं खरेंच सांगत्यें—अतिशयच निंद्य होय!! अजून पर्यंत तूं तुझ्या राज्याचें खरें लक्षण कोठें कोणाला दर्शविलें आहेस ! सर्वांस आपल्या धाकानें दाबीत जावें; आणि कोणी हां किं चूं करून डोकें वर काढूं नये; अशी योजना करावयास तुला कोणत्याही प्रकारचें भय राहिलें नाहीं ! तूं पहिल्याच सपाट्यास सन १८९७—९८ सालीं वर्तमान पत्रांचें स्वातंत्र्य हरण केलेंस? आतां इतकेंच मात्र खरें कीं, तो अटकाव तूं थोड्याच अवकाशांत कमी केलास. पण तुझ्या

ह्याच एका कृत्यावरून इतकें निर्विवाद सिद्ध झालें नाहीं काय! कीं, वर्तमानपत्रें स्वतंत्र नाहींत! आणि तीं स्वतंत्र असणें किंवा नसणें, हें तुझ्या इच्छे वर अवलंबून आहे! एका केंसावर अधांतरीं लटकाविलेली डिमोक्लीसची नग्न तरवार, वर्तमान पत्रें लिहिणारे व छापणारे ह्यांच्या मानेवर ठेविली आहेस. "वर्तमानपत्रांची स्वतंत्रता!" "वर्तमान पत्रें स्वतंत्रच पाहिजेत" "**मिल्टन** कवीचा हा एक मोठा हक्क आहे"!!! हीं तुझींच मगरुरीचीं वाक्यें? हीं त्यावेळीं कोठेंग गेलीं होतीं? तुला कांहीं तरी विचार वाटावयाचा होता! अेरर! आपण असें खराब काम केलें तर आपल्या स्वतःच्याच कुळास कलंक लागेल, असें तरी तुझ्या मनांत यावयाचें होतें? पण छीः! तुला हें कर्म करतांना लज्जा-नीतीचें भयच नडलें नाहीं! पण हे पत्राज खोर मुग्धे! त्याहून तुझीं हल्लींचीं कर्में कोठें उजेड पाडताहेत! तीं दाखीव! अनुक्रमानें तुझ्या कृष्णकारस्थानकृत्याच्या कुळाची वंशावळ वाचत्यें! ऐक! ती तुला काळासारखी विक्राळ, व भयंकर वाटून शोकभयानें थरथराऊन सोडील! ह्यांत संशयच नाहीं. ती तुला सांगावीच. असा जर मी निश्चय केला आहे, तर मग पंचाईत हवी कशाला! वर्तमान पत्रांची मुक्तता तुला प्रिय नाहीं; किंवा त्यांचें स्वातंत्र्य तुला आवडत नाहीं; हें दाखविण्यासाठीं तूं त्याला क्रिमिनल कोडांत घुसडून दिलेंस! बाई! तितक्यावरच तूं थोपलीस का! नाहीं! तुझ्या स्वतःच्याच वाईट कर्माच्या भयानें ह्मण; किंवा जेव्हां तुझी इच्छा **भारत**भूमीवर जुलमांची वृष्टि करावी अशी होईल, तेव्हां झटपट उपाय चालून

सर्वांचीं तोंडें बंद करितां यावीं ह्मणून पुन्हां सपाटा लगा-
विलास? तुझी खरी इच्छा इतकीच होती कीं, सत्य व वाजवी
तक्रार जरी असली, तरी ही जर ती, तुझ्या लाक्षणिक उद्देशा-
विरुद्ध असेल; तर तिचा तावडतोब अटकाव करितां यावा!
आणि तूं असत्य मार्गानें पाहिजेल तशी वागलीस, व कोणी
स्वच्छंदी तुला न भितां धीरतेनें अडविण्यास तयार झाला; तर
त्याचा खळगा भरितां यावा! हाच तुझा अगदीं बेंबीच्या
मूळांतील मुख्य उद्देश कीं नाहीं? भलेशाबास **ब्रिटानिया!**
तूं फार चांगलें केलेंस. तुझी दृष्टी फार लांब खरी! पण
याद राख. असें लाळ घोंटून पोट भरतु नसतें! ह्या कार-
णानें काय व्हायचें आहे? तूं **आर्यपुत्रांस** हत्यार रहित
केलेंस? हें खरेंका? **ब्रिटानिया?** या देशांतील रहिवाशांस
—खऱ्यारीतीनें पाहूं लागल्यास अवघ्या चौखंड पृथ्वीच्या
महा समर्थ राज्यांत देखील हत्यार कबजा हा स्वरक्षणार्थ अत्या-
वश्यक आहे, असें मानिलें आहे. अग? प्रत्येक देशाचे
परगणे दूरदूर असतात. कितीएक मोठ मोठ्या जंगलांत अस-
तात. त्यांत लुटारू, पेंढारी, खुनी, फांसेखोर, चोर व भिल्ल
लोकांसारखे लोक, आपला वंशपरंपरेचा चांगला मानिलेला
धंदा, स्वेच्छेनें व साहसपणानें येथून तेथें एक सारखा चाल-
वीत असतात—जंगलें ह्मटलीं ह्मणजे तीं खिचोखिच झाडीनें
आणि फाडून खाणाऱ्या पशूंनीं संपूर्ण भरलेलीं असावयाचींच!
अशा रानावनांत गरिबां गुरिबांस आपआपल्या निर्वाहा करितां
काम करावयास जाण्याची आवश्यकता असतेना? मग

त्यांचीं शस्त्रें जबरीनें—कायद्याच्या निमत्तानें काढून घेणें, हें कोणत्याही रीतीनें शहाण्या राज्याच्या शहाण्या मालकास शोभेल काय? नाहीं! ह्यांतही तूं प्रपंच तर खेळलीस खराच! रशियानें जशीं टर्कोमन लोकांचीं शस्त्रें काढून घेतलीं, त्याप्रमाणें तूं ह्यांचीं शस्त्रें घेतलीं नाहींस! परवान्यानें बाळगण्यास होकार दिला होतास! इतकेंच. पण त्यांत कांहीं तरी अर्थ? कांहीं तरी नियम? जीं शस्त्रें अंग रक्षणाकरितां अत्यावश्यक; जीं स्वतंत्रतेची गर्विष्ट निशाणी म्हणून अमीर उमराव नेहमीं आपल्या छातीसरशीं बाळगीत असत, आणि ज्या वीरांचा मर्दानगी भरलेला व पौरुषसंपन्न हात वारंवार त्यांच्या तरवारींच्या मुठींवर रुळत असावयाचा; अशीं जी ही भव्य ऐटबाज व शूरत्वाची निशाणी, ती तूं "बिल आफ् राइट्स्" च्या संभावित निमित्तानें आर्य लोकांची निव्वळ गुलामगिरी दाखविण्यासाठीं हिराऊन घेतलीस? हें अंतःकरणांत नेहमीं सलत राहणारें, आणि उमेदीला, शूरपणाला, किंवा उत्साहाला, गोगलगाय करून टाकणारें तुझें अतितर हीन कर्म होय! अशा तुझ्या मोठ्या थोरल्या बहादुरीच्या (!?) कर्मानें तूं सर्वांस खरोखरच परिपीडित केलेंस! अग? ज्यांनीं तुला विपत्तिकालांत आश्रय देऊन सुखी केलें होतें. जे आपल्या स्वतंत्रते साठीं सिंह-नाद गाजवून तुला वारंवार त्रास देत असत. ते महामतिमान् शूर-वीर-यश-धीर-परम सुखदायी आणि परार्थी पुरुष थडग्यांत जेव्हा असें ऐकतील कीं, आपल्या शूर वीर पुत्रांच्या जयाची निशाणी तूं दांडगटपणानें काढून घेऊन त्यांस

कवडीच्या मोलाचे व निर्मानी केलें आहेस. तेव्हां कबरेंत असलेलीं त्या महत्पुरुषांचीं हाडकें, अथवा एखाद्या स्मशान भूमीच्या कोना कोपऱ्यांत त्यांच्या पडलेल्या अस्थी, हडबडून उठल्या शिवाय राहणार नाहींत!!! त्यांना किती वाईट वाटेल? त्यांची कशी स्थिती होईल; तें सांगण्यास खरोखर मी असमर्थ आहें! दुसरें तूं असें पहा ? पुष्कळ मौल्यवान् वस्तु आणून त्यांनीं तुला शृंगारिली होती. त्याच्या मोबदल्यांत तूं कमी किंवा जास्त किंमतीच्या चिजा, ज्या मनापासून प्रेमपूर्वक मोठा दरबार भरून, त्यांस वंशपरंपरे साठीं बक्षिसी दिल्या होत्यास, त्या देखील काढून घेतल्यास? तेव्हां हें तुझें कृतघ्न कृत्य, त्यांना किती वज्रबाणा प्रमाणें लागावें? तूं साधारण बंडाचे पुढारी—ज्या ठिकाणीं बंड होण्याचें भय होतें; तेथील—लोकां कडून शस्त्रें काढून घेतलींस? बरें घे. कारण, तुला तीं पीडा कारक झालीं होतीं. पण जी प्रजा केवळ निर्माल्य*! तिचीं

* वस्तुतः विचार करून पाहूं लागल्यास बंडाचा उपद्रव **उत्तर** हिंदुस्थानांतच होता. **गुजराथ** व दक्षिण **महाराष्ट्रां**तील कित्येक स्थलीं त्याचा संसर्गही नव्हता. **मद्रास** तर त्यापासून अगदीं निष्कलंक होता. पण सर्व स्थलांतील शस्त्रें घेण्याची आज्ञा देण्यांत आली. जो लोकांचा त्वेष नरम झाला नाहीं, तोंच असा जाहिरनामा फडकविल्यामुळें लोक फारच चकित झाले! प्रथम हा ठराव जेथें जेथें समजला, तेथें तेथें सर्व लोक आपल्या बळावर स्वस्थ होते. कितीएकांनीं तर शस्त्रें न देण्याबद्दल शपथा देखील वाहिल्या होत्या. कितीएकांनीं तीं घरांत लपविलीं, व कितीएकांनीं जमिनींत पुरून ठेविलीं; आणि कितीएक तर दोन वाईट लाईट देऊन चार चांगलीं राखून बसले. या ठराचा अंमल **रजपूतां**च्या मनावर फार झाला. **बंगाल**चा एक सिविलियन झणतो कीं, "जेव्हां हें वर्तमान

देखील शस्त्रें तूं हिसकावून घेतलींस! अग? रणोत्साही, युद्धासक्त व देशद्रोही जनांचीं शस्त्रें वळकावून बसलीस; पण त्या बरोबरच गरीब विचाऱ्या–युद्ध भयानें परिकंपित होणाऱ्याचीं ही शस्त्रें काढून घेतलींस? यावरून स्पष्ट दिसतें ना? तुझी राजयुद्ध शक्ति, स्वतंत्र, शूर, वीर, मर्दांशीं वैमनस्य करूं शकण्यास बिलकुल योग्य नाहीं! ह्यामुळेंच तुझें बायकयेपण उघड होतें. सर्वांच्या हातीं शस्त्रें द्यावीं, आणि त्यांनीं या तुझ्या मुरलीवर नाचावें, असें जेव्हां होईल तेव्हांच तुझी मर्दानगी. नाहीं–तर आहे काय? आह्माला तुझी तूर्तची स्थिती तर अशी दिसते आहे कीं, एखाद्याचे हात पाय वगैरे अवयव काढून टाकावे, आणि त्यास जसें सांगावें "बच्चा मर्दानगी असेल तर पुढें ये? तुला दाखवितों" ह्या सांगण्यांत कांहीं तरी पुरुषार्थ किंवा

रजपूतांस समजलें, तेव्हां ते खळबळून जाऊन मला म्हणूं लागले कीं, "आम्हीं जो निमक हलालपणा व राजनिष्ठा दाखविली; त्याचें हेंच बक्षिस काय? आह्मांला तुह्मीं मारून टाकिलें तरी बेहत्तर. परंतु आमचें रक्षक चिन्ह आम्हीं कधींही देणार नाहीं. शस्त्र काढून घेणें, म्हणजे आमचा अत्यंत अपमान करणें होय! आह्मांवर हा फार अन्याय गुजरत आहे." मी त्यांस सांगितलें कीं, हा अन्याय नव्हे, अपमान नव्हे, पण सगळ्या बदमाष लोकांचा तुह्मांस हा परिणाम भोगावा लागत आहे! आतां तुम्हीं आपलीं शस्त्रें सरकारच्या हवालीं करा. मागाहून तुह्मांविषयीं शिफारस करून तुह्मांस मर्तबा योग्य शस्त्रें देऊं. तरीही ते जुमानीत नव्हते! शेवटीं कसें बसें एकदांचें त्यांनीं ऐकिलें. सरकार जर ह्यावेळीं देखील प्रथमच्यासारखें उद्धताचरण करितें तर दुसऱ्या बंडास अवकाश नव्हताच! ठरावाप्रमाणें एका काठीनें सर्वांस हांकण्यांत आलें; हें तर फारच वाईट झालें!!! परंतु याशिवाय सरकारास दुसरा सोईचा मार्ग नव्हताच?

शहाणपणा आहेका? *सामसन सारखा बलवान् देखील मोह वश होऊन परतंत्र झाला! आणि पुढें त्याचें अतुलनीय बल असूनही, तो, आपल्या शत्रूचा पराभव करण्यास असमर्थ झाला.

* "**सामसन** एगोनिस्टिस" नामक वीर रस प्राधान्य काव्य, महाकवि सूरदास **मिल्टन**नें इंग्रजींत लिहिलें आहे. त्यांतील कथा प्रसंग बैबलांतून घेतला आहे. हा बलवान् **सामसन** भीमा सारखा परम प्रतापी आणि पराक्रमसंपन्न होता. त्याला पाहतांच, त्याच्या शत्रूंचा थरकांप होत असे. त्याला शत्रुपक्षांतील **डेलिला** नामक सुरेख स्त्रीनें आपले हाव भाव दाखवून वश केलें. आणि पुढें त्याचें लग्न झाल्यावर कांहीं दिवसांनीं **डेलिले**चीं जेव्हां पूर्ण खात्री झाली कीं, आतां हा आपल्या मोह पाशांत पुरा सांपडला आहे! तेव्हां तिनें त्याला विचारिलें. पतिराज? तुम्ही जे इतके बलिष्ठ आहां, तें तुमचें बल आहे तरी कशांत? **सामसन** रंगांत आलाच होता. त्यानें पट्कन उत्तर दिलें. कशांत म्हणजे? माझ्या केशांत. **डेलिलेस** इतके तत्त्व समजतांच, तिनें तें वर्तमान शत्रुपक्षास सांगितलें. आणि एकेदिवशीं **सामसन** झोपीं गेला असतां, त्याचे शत्रू **डेलिले**च्या अनुमतानें येऊन त्याच्या शेंडीचे केश कापून चालते झाले! त्या बरोबर **सामसन** निर्बळ झाला. नंतर शत्रूंनीं त्याचे डोळे काढिले. आणि त्यास कैदेत टाकिलें. त्यानंतर जेव्हां त्याला पुन्हा नवे केश आले, आणि तो बंदिखान्यांतून मुक्त झाला; तेव्हां त्यानें आपल्या शत्रूंचा चांगला सूड उगविला. त्यांतील तथ्य असें आहे. एकदां त्याचे शत्रु जे **पोलिस्टिनीस** ते जय संपादन करून आले होते. आणि त्या जयाचा महोत्सव करण्यासाठीं देवालयांत गेले होते. तेव्हां **सामसन**ही त्यां बरोबर गेला. तें देऊळ एका खांबावर होतें. आणि त्यांत प्रार्थने साठीं सर्व लोक एकत्र जमतांच या स्वारीनें त्या देवालयाचा स्तंभ उपटून सर्वांस ठार केलें! या काव्यांत **मिल्टन**नें स्त्रियांच्या उठाठेवी व चाळे ढवळे या विषयीं आणि त्यांच्या एकंदर इतर दोषां विषयीं चांगले सपाटे लगाविले आहेत. त्यांतील कैदखान्यांत असतांनाचा **सामसन**चा स्त्रियां विषयींचा धिक्कार तर हृदयाचें अगदींच विदारण करील असा आहे!!!

कारण त्याजवळ शस्त्रच नव्हतें! तेव्हां हें उघडच झालें कीं, हिंद प्रजेला बलवान् मानणें, हेंच केवळ अज्ञान होय! * तूं

* मद्रासचा गव्हरनर लार्ड हेस्तिंग ह्यानें सन १८१७ त जें पत्र लिहिलें आहे, त्यांतील बराच भाग येथें घेण्यासारखा आहे. परंतु आमचा खरोखरच नाइलाज असल्याकारणानें जरी आह्मांस तसें करितां येत नाहीं, तरी होईल तितकी सवड केली आहे. "ह्या देशांतील लोक ह्या देशांतील राजांच्या ताब्यांत असतांना ज्या स्थितींत होते, त्यापेक्षां हल्लीं त्यांची सुधारणा झाली आहे, असें ह्मणण्यास मला फार संशय वाटतो! कशी ही बंडाळी होवो. कोणत्याही परदेशी राजाचा हल्ला होवो. तरी कोणत्याही देशी राजाच्या प्रजेचें होत नसेल असें आपल्या प्रजेचें चांगलें रक्षण करण्यास आमचें इंग्रज सरकार स्वबलशक्तिसंपन्नतेनें समर्थ आहे. वरें इतकें असून त्या राज्यांत होण्यार नाहीं असें संसारी जुलमांतून संरक्षण इंग्रज सरकारच्या कायदे कानूनीं व राज्यबंधन नियमांनीं होत आहे. हें सर्व जरी खरें आहे, तरी या फायद्यांचा दर त्यांस फारच महाग पडतो. स्वतंत्रता, स्वदेश जनता, आणि ज्या ज्या वस्तूंनीं प्रजा सन्मान पावत असत्ये. त्या साऱ्या सन्मानांचा तिला भोग द्यावा लागतो; किंवा त्यावर जलांजली सोडावा लागतो. व्यापारी, मिरासदार, आणि शेतकरी आपआपला धंदा निर्धास्त करितात. आणि शांततेंत आपल्या मेहनतीच्या फळांचा उपभोग घेतात. पण शांतता प्राप्त होतांच, आबादी मिळविण्याची जी प्राणी मात्रांची स्वाभाविक इच्छा, तिकडे देशी लोकांस पहावयासच नको. आपल्या देशाच्या कायदे कौन्सिलांत, अथवा दिवाणी व लष्करी राज्यकारभारांत आपण एखादा मोठा भाग संपादन करूं, ही आशा त्यांनीं करितांच नये. जे लोक प्रसिद्ध सरकारी हुद्यांवर आहेत, किंवा त्या हुद्यांस जे लायक आहेत; त्यांच्या अनुसंधानानें इतर देशी लोकांस वागावें लागत असतें. ज्या ठिकाणीं असे बडे हुद्देवाले लोक नसतात तेथें इतर लोकांत पाणी तरी येणार कोठून? ह्या माझ्या ह्मणण्याचा परिणाम दरेक ब्रिटीश प्रांतांत अवलोकन करावयास सांपडतो. हिंदुस्थानचे लोक हिंदुस्थानांतच निःसंशय फार अधम दशेस पोंचले आहेत. लष्करी खात्यांत फार तर सुभेदारीपेक्षां त्यांस मोठी पदवी

जींहीं सर्व कृत्यें प्रत्यक्ष केलींस, तीं काय बरें दाखवितात? तुझ्या अब्रूचें त्यामुळें रक्षण झालें आहे? किंवा तुझी मगरूरी दिसत आहे? अथवा तुझ्या शक्ति विषयीं चांगला भाव असण्यास कारण मिळालें आहे? हें सर्व कृष्णकारस्थान तुझ्या ध्यानांत नसेल, असें कोणी ह्मणावें? तूं वांकड्या मार्गानें किती थोर आणि प्रौढ कर्में केलीं आहेस? परंतु हे प्रपंच राज्ञी? स्मरण ठेव! समर्थी आयुधा शिवायही आर्य प्रजा रणरंग माजवील! तूर्तच्या तुझ्या उत्तम-भेद-प्रताप प्रसादापासून कोणत्याही रीतीनें आयुध ग्रहण करून, तुला गडबडवील, हांकील, हाणील आणि घामाघूम करून घाबरवील!!! आतां हें खरें आहे कीं, तूं राज्य-संयोजन-विधी-यज्ञ तूर्त बंद ठेविले आहेस. तरी गुप्त रीतीनें देशी राज्याच्या

मिळण्याचा संभवच नाहीं. सेनाधिपतीपेक्षां पायदळ फलटणींतील निशाणदार (एन्सैन) जितक्या दर्जानें उतरता आहे. तितक्याच दर्जानें एन्सैनपेक्षां सुबेदार उतरता आहे.—कमांडर इन् चीफच्याखालीं निशाण धरणाराची जितकी योग्यता तितकीच त्याखालीं सुबेदाराची—अशा सुबेदारांपासून लोकांची योग्यता वाढणार काय? सिव्हिल खात्यांपैकीं दिवाणी व जमाबंदी शाखांतही देशी लोकांस लहानशा हुद्यापेक्षां मोठी जागा मिळण्याचा संभवच नसतो ह्मणून ते भिकारपगारदार नोकर लांच खाऊन आपल्या पोटाचा खळगा भरतात!!!" इ.

इंग्रज लष्करानें हिंदुस्थानांत जो विजय मिळविला आहे, त्यापासून हिंदुस्थानांतील लोकांचा उत्कर्ष झाला नाहींच. परंतु सर्व प्रकारें अपकर्षच होत आहे. "जिंकणाऱ्या" लोकांनीं राज्य व्यवस्थेंत "जिंकलेल्या" लोकांस घेण्याचें अगदींच इतकें गाळिलें, असें ब्रिटीश इंडिया शिवाय जिंकलेल्या देशाचें दुसरें एखादें उदाहरण आढळेल असें मला खरोखरच वाटत नाहीं.

लार्ड मनरो.

सत्तेस हानी पोहोंचत आहेच. हें तर खरें कीं नाहीं? अग? तूं पवित्र—शुद्ध—मनानें शहरांचीं शहरें स्वाहा करण्याची रीति त्यागिली आहेस—जरी त्याच रीतीनें तुला प्रौढी आली आहे. व भव्यता दिसते आहे. तरी तीही अतिशय दूरदर्शी व वग वशील्याचे पुरुषांनीं—जे एका काळीं तुझ्या दुर्दशेंतच लाभ समजत होते—त्यांनीं तुला दिली आहे—पण ह्यांत तुझा उत्तमपणा मानला जातो असा मुळींच अर्थ नाहीं! हे राज श्रेष्ठ देवी! हे ताम्र वर्ण तरुणि! हे यूरोपाधीशिणी! ऐक, ऐक. तुला ह्या सर्वांची स्मृति करणें, हें फारच दुःखदायक होणार आहे. परंतु जर तुझ्या कृति—वृत्तींत तूं फेरफार केला नाहींस, तर मी तुला कां क्षमा करावी? नाहीं! कधींही करणार नाहीं!! स० १८९८ झालेला तुझ्या राजकलेचा फेरफार, फक्त दर्शनीच होता! पण कर्मांत तूं जशीच्या तशीच राहिलीस!! स्वार्थांत तूं पूर्ण कपटी राहिलीस. मदातिशयानें गर्क झालीस. गर्वानें मूर्ख होऊन खूब माजून गेलीस. हानि करण्यांत सरस निघालीस. आणि हरतऱ्हेनें द्रव्य हरण करण्याविषयीं निर्भय बनलीस!!! डोळ्यांसमोर तावडतोब चुंफून घेऊन सत्यानास करण्याची रीति कांहीं दिवस बाजूस ठेविलीस. कारण, त्यामुळें वैर वाढूं लागलें आहे. असें तुला दिसूं लागलें असेल! पण बाई? गुप्त भेद तो निराळाच ठेविलास. तूं जो तात्कालिक उपाय योजिलास तो इतकाच कीं, तोफांच्या माऱ्यानें सुरुंग उडविण्याच्या रीतीचा त्याग करून, उंदरा प्रमाणें फुंकून फुंकून अवघें गिळंकृत करण्याच्या रीतीचें

ग्रहण केलेंस! मी इंडियचें सरकार किंवा इंग्लंडच्या विचारी लोकांवर दग्याफटक्याची खरोखर आळ आणूं इच्छित नाहीं. पण तूं जे नवे नवे डाव खेळूं लागलीस, ते असे होत कीं, एखादा अति मूर्ख मनुष्य देखील ते सहज समजूं शकेल! अशा हलक्या प्रयोगांच्या कामीं तुज सारख्या कावेबाज स्त्रीनें मन घालावें? छिः छिः !!! फारच नीच. अग? युरोपच्या प्रवृत्तींतील लोकांचा समानता धारा, ह्या देशांतील प्रजेस अनुकूल होणार नाहीं. आणि तशांतही पर देशी व परधर्मी प्रजेनें दिलेला—आपल्या विचारा प्रमाणें केलेला—धारा ह्या देशांतील लोकांस हितकर होऊन रुचणार नाहीं. बाई? आपल्या विचाराप्रमाणें बडलेला कायदा अमलांत आणूं लागलीस. हळू हळू अन्य प्रजेवर फार करडा धारा बसवूं लागलीस. व डाव पेंचानें कर लादण्याच्या रीतीचें त्वा अवलंबन केलेंस. इंग्लंडची राजसत्ता अंकुशित आहे. आणि इंडियांत मात्र निरंकुशित मदोन्मत्तपणा? प्रथम तूं शांतिराज्य प्रवर्तवून बंडशमविलेंस. व मागाहून देशी राजांस अभय वचनें दिलींस. आणि त्यांचा विश्वास मिळण्या करितां मोठमोठ्या सनदा व पट्टे करून दिलेस. हें तरी खरें? पण जर तुझ्या जाहिरनाम्यांत स्पष्ट होतें कीं, "ज्या राजांस रीतीप्रमाणें आपला वंश कायम ठेवण्याचा हक्क आहे, त्यांस दत्तक देण्याची पूर्णपणें मोकळिक आहे!" तर मग तूंच सांग? त्यांस सनदा आणि पट्टे करून देण्याची काय जरूर होती? पण त्यांत देखील तुझी सूक्ष्मगति झांकून राहिली नव्हती! ह्याच निमित्तानें तूं त्या

राजांस एका बाजूस झुगारून देऊन आपली सर्वोपरी सत्ता कबूल करविलीस? जरी वरचा डौल असा झुकता राखिलास कीं, "जी राज्य संयोजन नीति राखण्यांत आली आहे, तिचा आतां पुरा त्याग करण्यांत येईल!" हिंदुशास्त्र– मनूचा कायदा– सर्व रीतीनें संपूर्ण आहे. आणि आज पुष्कळ काळ लोटला, तरी त्यांत कोणी सुधारणा केली नाहीं. पण तूं तुझ्या पश्चिम राजनीतीचा डौल दाखवून केवळ देशी राज्य कर्त्र्यांस नम्र व विनयवंत करण्या करितां आणि बंडाचा भडका शांत करण्या साठीं, अशी हिकमत केलीस? एखाद्या हिंदु राज्यकर्त्र्यास त्याच्या रीति, कृति, वृत्ति प्रमाणें दत्तक घेण्याचा हक्क आहे. आणि मुसलमानांस त्यांच्या शराहः प्रमाणें काम केलें पाहिजे. हें तर खरें? त्यांमध्यें पडण्याची तुला कोणत्याही प्रकारची जरूर नव्हती. मग तूं त्यांचे घरसंसार, धर्म नीति, आणि रीति रिवाज या सर्वांच्या मध्यें पडून असें कां बरें दाखविलेंस? कीं, "माझेंच ऐकिलें पाहिजे"! वाः शानदार केलें त्वां! ब्रिटन बाई? नव्या रीतीनें विजय मिळविलास?–फक्त थोड्याशा बंडखोरांवर!–आणि ह्यामुळेंच जर तुझी सर्वोपरी सत्ता तूं नक्की मानून बसलीस, तर त्यांत हरकत करण्यासारखें कांहीं नाहीं? पण ह्या तुझ्या कबुलायती (!?) वरून सर्व बाजूंनीं इतकें सिद्ध होत आहे कीं, तुझे जे खादाड गव्हर्नर त्यांतही मुख्यतः **डालहौसीनें** दत्तक विधानाच्या बांध्यास चिकटून राहून, जीं राज्यें संयोजित केलीं; ती नीति अगदींच गैर वाजवी होय! असें जर तुला वाटलें असेल, तर

तीं राज्यें तूं पुन्हा ज्यांची त्यांस दिलींच असशील ! कायग? खरेंच सांग? परत दिलींस काय* ? नाहीं? तीं कां? तुझ्या अंगांत बाई? जर इमानीपणा होता, तर तूं गैर वाजवी रीतीनें घेतलेलीं राज्यें त्यांच्या वारसांस परत द्यावयाचीं होतींस! कारण तें करणें रास्त होतें. पण एकदां घशाखालीं उतरलेलें ओकण्याचें कोणी मनांत आणावें? हीच तुझी अक्कल? अग! पाहिजे तितक्या प्रामाणिकपणाच्या गोष्टी तोंडानें सांगतां येतात; पण त्याप्रमाणें हातानें कर्म करून दाखविणें फार मुष्किलीचें काम आहे! "पश्चिमे कडील-राजनीति बोलण्यांत मात्र फांकडी दिसते. परंतु प्रमाणिक पणाच्या नांवानें ढळढळीत नकार आहे! ते लोक कर्म करण्यांत बहादुर आणि साहसिक असतात. आणि आपली नीति अशी दाखवितात कीं, "एखाद्या ठिकाणीं नेम धरुन कोठें तरी भलत्याच ठिकाणीं मारावयाचें" अर्थात त्यांचें बोलणें आणि करणें अगदीं निराळें †पडतें! हा तुझा नेहमींचाच स्वभाव आहे! तूं तुझ्या रीति प्रमाणें दुष्टलोकांकरितां,—फक्त थोड्याशा जळलेल्या पोळलेल्या अंतःकरणाच्या लोकांसाठीं—सर्वांच्या डोळ्यांवर उलटें

* कितीएक लहान राज्यांस दत्तक घेण्याचा हक्क देण्यांत आला. हां ? पण **साताऱ्यास** कां मिळाला नाहीं ? खरोखर पाहूं गेलेंतर तें राज्य, मोठें; मराठ्यांचें त्यावर प्रेम, आणि **शिवाजी**नें स्थापन केलेलें होतें ! ह्मणून ?

† इ० सन १८७७ च्या जानेवारींतील "पायोनियर,, वर्तमान पत्रांत राणीनें जें "केसर-ई- हिंद" हें पद धारण केलें. त्या वेळच्या जलशा वरून जो सारांश निघतो, तो एका बड्या अधिकाऱ्यानें वरीलप्रमाणें लिहिला आहे.

पांघरूण घातलेंस? मदोन्मत्त, उद्धत, गर्विष्ट, द्वेषी, लहरी आणि मानासाठीं तान्हेलेल्या अधिकाऱ्यांचा पक्षपाति स्वभाव अमलांत आणण्या करितां—त्यांचें म्हणणें खरें करण्यासाठीं—असेल ह्यांत बिलकुल अंदेशा नाहीं. परंतु पुष्कळ बिचाऱ्या निर्दोषी देशी लोकांस झाडास लटकावून त्यांचे प्राण घेतलेस? कितीएकांस तोफेच्या तोंडीं बांधून यम सदनीं पोहोंचविलेंस! पण तेव्हां तुला तिळभर सुद्धां दया आली नाहीं! हें तुझें कर्म सामान्य लोकांस फार विचित्र आणि भयंकर वाटलें नसेल तर नसो. परंतु ज्ञानी जनास फार खराब दिसलें! असा अंमल चालवीत असतां तुला कशीग शरम वाटली नाहीं? तूं जेव्हां "जाहीरनामा,, बाहेर पाडिलास, आणि माफी पत्र लिहिलेंस कीं, "इंग्रज सरकारच्या रयतेचा खून करण्यांत प्रत्यक्ष संबंध ठेविल्याची ज्यांवर शाबिदी झाली असेल, अथवा होईल, त्या गुन्हेगारांवर दया करणें हें न्याय विरुद्ध आहे. पण त्याशिवाय बाकीच्या सगळ्या गुन्हेगारांवर दया करण्यांत येईल,, हें तरी आपलें वचन तूं खरें केलेंस? हजारों बिचाऱ्या निर्दोषीजनांची कत्तल झाली नाहीं? आणि धुंद अंमलदारांनीं त्यांस कापून टांकिलें नाहीं? असें तुझें मन तरी तुला सांगत असेल? पण तूं कोणाची तरी पर्वा बाळगली होतीस? आणि कोणाला तरी असा बोध केला होतास काय? कीं, बाळानों? "असें करूं नका. कराल तर शासन पावाल." नाहीं, अग? मुळींच नाहीं!—जणो, तुझे पुत्र आणि तुझे अंमलदार, हे कधीं अधर्म करणारच नाहींत! ते सकलगुणसंपूर्ण होते

वाटतें? असतील तर हें तुझें मानणें बिककुल खोटें आहे. असें कोण नाहीं ह्मणेल? मग इंग्लंडांतील पुष्कळ रहिवाश्यांनीं तुझ्या उद्धत नीतीस निंदिली होती, तें काय खोटें केलें होतें? तुला असें मानण्याला कांहीं कारण तरी आहे काय? कीं, तुझीं सर्व कृत्यें सर्व मान्य आहेत! अग? ह्या हिंदराणीचे ऋषि व मुनी जर तुझा हा समज पहातील किंवा ऐकतील तर ते हें तुझें म्हणणें कधींही कबूल करणार नाहींत! कारण त्यांची वृत्ति अति उदार, साक्षात् दयेची मूर्ति, महामतिमान्, बहु लक्षी व निवृत्तिपर आहे; ह्मणून ते नाहींच जुमानणार! पण तुझी प्रपंची, गर्विष्ट, कुरेंबाज, लहरी व महाभिमानी राज्यें तरी हें तुझें म्हणणें स्वीकारितील खरीं का? हिंदच्या महाबुद्धिशाली, यशस्वी, कर्मविजयीलोकांच्या देशांत तरी त्वां कोठें लज्जा नीतिची भीती जुमानावी होतीस? केव्हां तरी "विचार करावा" असें मनांत आणावें होतेंस? केव्हां तरी बंडखोरांशिवाय इतर निर्दोषी जनांवर दया करण्याचें मनांत आणावें होतेंस? सगळेंच ग अळंटळं व सांवळें गोंधळें कसें? तुझ्या वचनांत कांहींचका तथ्य नाहीं? तुला फुकट ग फुकट "दयेची मूर्ति" म्हणून तोंडानें म्हणावें मात्र! एरवीं दयाशील तर भारीच!! एखाद्यास यःकश्चित् निमित्त मात्रानें "देशद्रोहि" समजून जसा तांदुळांतून खडा निवडून टाकितात, तसा निवडून टाकावा? असली तुझी राक्षसी दया. जेव्हां पासून कांटेवाला पैसा बंद पडला; तेव्हां* पासूनच तुझी "वाघ आणि बकरें

* कांटेवाला पैसा अद्यापि देखील कोठें कोठें अवलोकनांत येतो. कंप-

हीं एकजागीं पाणी पितात,, ही नीति सत्य म्हणवणार नाहीं ! आणि खरोखरच, तूं जेव्हां पासून अधर्म कर्म करूं लागलीस, तेव्हां पासूनच हा तुझा अदल न्यायाचा पैसा बंद पडला ! बंडाव्यांत न्यायाची नीति किती राखिली होतिस ती सांगूं का ? फारच थोडी. अग ! अगदींच नाहीं ! आणि त्यालाही कारणें आहेत. कारणा शिवाय तूं कांहीं करशील, असें मानण्यास—ज्याच्यांत यत्किंचित् तरी बुद्धीचा अंकुर आहे. असा—या सृष्टीचा प्राणी कबूलकरणार नाहीं ! तुझी खात्री झाली कीं, जय तीर मिळालाच आहे. पण बेटा जरा महाग पडला आहे ! आतां जयाच्या मदांत जास्त क्रूरता दाखविली तर **यूरोप** आणि **आशियेंतिल** समर्थ राज्यें मला निंद्य मोजूं लागतिल ! इतकेंच नव्हे ; पण जीं राज्यें आणि प्रजा **ब्रिट**-नच्या आश्रया खालीं आहे, तींही आपल्या प्रामाणिकपणाविषयीं पुष्कळ बडबड करील ! आणि कोणी कोणी तर तसा भयंकर समय येतांच एक चित्तानें आपल्या विरुद्ध होतिल ! तेव्हां तूं शुद्धी-वर येऊन थोड्यांत आपलें शहाणपण आटोपलेंस. पण तुझ्या राज्याची "कर्मकथा" एखादा मनुष्य वाचावयास बसला, तर बंडा सारखा खराब काळ कोणाच्यानें वाचवणार नाहीं ! बंडाची स्थिरस्थावरता—आतां जशी सांगितली तशी—झाल्या नंतर तूं राज्य व्यवस्था करण्याच्या उद्योगास लागलीस. घोर घडूं

नीचें राज्य झाल्यावर आपला अदल न्यायी पणा दाखविण्यासाठीं हा पैसा सुरु झाला. परंतु सन १८५० नंतर त्याची टांकसाळच बंद पडली!!! असें कां झालें ? देव जाणें. ! !!!

लागलीस, आणि दरएक इलाख्यांत कायदे घडण्याकरितां एकेक टंकसाळ स्थापन करून लोकांस दाखवूं लागलीस कीं, आह्मीं न्यायीच आहों ! ! ! तुमचें रक्षण करण्या साठीं आलों आहों ! पुत्राप्रमाणें तुमची रक्षा करूं ! पण बाई ? प्रपंचांत पडलेली, लडबडीत झालेली, कापड्यांतील जणुं कीडच, तिनें ठरविलेले धारे, आणि कायदे, विचाऱ्या निस्पृही, निर्लोभी, निवृत्तिवान्, संतोषी, आपल्यांतच मजा मारणारांस कसे बरें अनुकूळ पडावे ? अनुकूळ पडले नाहींत, आणि पडतही नाहींत ! त्यांतही तुह्मीं पडलां परदेशी, परधर्मी; आणि हिंददेवीच्या स्थिती विषयीं बिन अनुभवी ! तेव्हां अशा सत्ता धाऱ्यांनीं घडलेले धारे निंदास्पद व दुःख त्रासदायक व्हावयाचेच ! आणि त्याप्रमाणेंच ते कर्डे धारे झाले ! मात्र त्राहि त्राहि पुकारावें लागलें नाहीं इतकेंच. तरी पण मागून महसुलांत वाईट परिणाम झालाच.* पुष्कळ कायदे घडले, पण त्यांत गोऱ्यांचा धारा निराळा. काळ्यांचा धारा निराळा. गोऱ्यांचा न्याय निराळा, काळ्यांचा न्याय निराळा करावा. तो तसा झालाच पाहिजे. हाच तुझ्या मोठ्या प्रामाणिकतेचा ढळढळीत दाखला आहेना ? † क्रिमिनल

* अगदीं दारिद्रि वर्गांतील जे शेतकरी त्यांस सर्वथैव संकटांत आणून व त्यांचें नुकसान करून स्टांप आक्टाच्या रूपानें महसुलांत भर पडली आहे. कज्जे फारच वाढले आहेत. ! !

सर जेम्स केर्ड.

† निःपक्षपाती पणाचे इमानी वर्तनाबद्दलची कीर्ती व लौकिक ह्यांवर इंग्लंडचा मोठेपणा बहुतांशीं अवलंबून आहे.

सन १८८५ तारीख ३० अक्टंबर रोजीं लॉर्ड इड्सूलेनें केम-ड्न टाऊन मध्यें केलेलें भाषण.

प्रोसिजर कोड केलेंत. पण त्यांत असा घोंटाळा आहे कीं, जसें ज्याला फावेल तसें त्यानें नांगरावें, अशी सत्ता अंमलदारांच्या हातीं दिली आहे ! विद्वान् पुरुष **आर्यपुत्रां**च्या वेदाचे अर्थ, जसे भिन्न भिन्न करितात; त्याप्रमाणें त्या **कोडा**चे निरानिराळ्या प्रकारचे अर्थ होऊं शकतात ! अंमलदार, इन्साफाचें स्वरूप पाहून त्यास कायद्याचें कलम लागू करीत नाहींत. तर ? उलट रीतीनें न्यायाच्या स्वरूपाची अशी रचना करून देतात कीं, त्या न्यायास आपण योजिलेल्या कलमांत घुसडून देतां यावें ! अशा कारणा बरोबरच दुसरें मोठें एक कारण असें सांगण्यांत आलें आहे कीं, गोरे साहेब या देशाची नीती, रीति व मर्यादा ईहीं करून वाकबगार नसल्यामुळें, त्यांनीं केलेले धारे सर्व मान्य होत. नाहींत आणि त्यामुळें **इंग्लंडा**च्या राज्याचा, व्यवस्था, नीति राखण्याचा जो हेतू, तो बरोबर रीतीनें अमलांत येत नाहीं. धाराच मुळीं **इंग्लंड**च्या प्रजेस अनुकूळ असा ! तेव्हां त्यांचें फावत नाहीं, लोक राजी नाहींत, आणि त्यांस राजी ठेवण्या विषयीं कोणी श्रमही घेत नाहींत ! लोकांस आवडो किंवा न आवडो. रुचो किंवा न रुचो. सुख होवो किंवा दुःख होवो. कांहीं झालें तरी न रुचणाऱ्या धाऱ्यांस त्यांना कसें नेमकें शरण जावें लागतेंच ! ! ! सन १८६० नंतर* पुष्कळ धारे घडण्यांत आले. बरें त्यांना कांहीं तरी सुमार ? का कांहीं उपमा !

* स० १८६० नंतर अवघ्या पंचवीस वर्षांतच कायदे आणि सर्क्युलरें मिळून अकराशें जवळ जवळ संख्या जाते ! त्यांतून सातशेंहून जास्त सरक्युलरें व कायदे रद्द करण्यांत आणि सुधारण्यांत आले आहेत. ! ! !

बिचारी प्रजा त्यांपासून वाचरी बुचरी झाली ! एखादा न्यायाधीश जर प्रामाणिकपणानें वागण्याची इच्छा धरून चालेल, तर वर्षांचीं वर्षें कायद्याच्या घोंटाळ्यांतच झोंके खाल्ल्याशिवाय राहणार नाहीं ! आजचा केलेला कायदा उद्यां फिरतो, आणि एकानें केलेलें दुसरा जुमानीत नाहीं. मिळून अर्थ काय ? रोज नवे धारे घडावे, आणि जुने रद्द करीत जावे. किंवा कांहीं रिकामटवळा फेरफार करावा ? आणि लोकांस होईल तितकें पुनः पुन्हां बुचकळ्यांत पाडावें ! हेंही तुझ्या व्यवस्था नीतींत फारच मोठें व्यंग आहे. लोकांस काय अनुकूल होईल ? आणि काय नाहीं ? ह्याविषयीं थोडें देखील समजण्यास इंग्लंडांतून येणारे अंमलदार मुळींच अशक्त असतात! आणि त्यांच्या हातीं मोठी सत्ता दिलेली असते—तेव्हां चांगलें तें काय होणार ? * जोंपर्यंत लोकांची अंतर्बाह्य स्थिति समजणार नाहीं, तोंपर्यंत लोकांचें कधींच कल्याण किंवा तुझें स्वतःचें खरोखर हित होणार नाहीं. तूं अदालत स्थापन केली आहेस खरी. पण त्यांतही पाहीनास ? न्यायाधीश फक्त बाहरून तपास करणारे असतात. ते, अंतरंग काय आहे ? हें जाणण्याची इच्छा देखील धरीत नाहींत ! पुष्कळ वेळ गुन्हेगार सुटून

* हाऊस ऑफ कामन्स मध्यें मि० जान **ब्राईट** ह्मणाले होते कीं, समासद हो ! **हिंदुस्थानां**त जी राज्यव्यवस्थेची पद्धति आहे, त्यासारखी दुसरी कोठेंच नाहीं. तेथें सारा देणारे लोकांचा राज्य व्यवस्थेंत मुळींच हात नसतो. तुह्मीं जाणतच असाल कीं, **हिंदुस्थानां**तील पुष्कळ लोकांस राज्य व्यवस्थेंत शिरण्यास बिलकुल मार्ग नाहीं. स्वतंत्र अशा **इंग्रज** लोकांचा देखील त्या राज्यव्यवस्थेवर दाब नाहीं. ! फक्त तेथें मतें ह्मणून

जाऊन बिचारे निरपराध लोक फशीं पडतात, इतकेंच नव्हे. कसलाही कज्जा असो, फैसल्ला व्हायलाच पुष्कळ वर्षें लागतात. आणि चुंथा चुंथीस तर पारावारच नसते!!! हें तुझ्या व्यवस्थेंत पुष्कळ समजण्या योग्य आहे—पण ह्या तरी सूक्ष्म बाबतीच आहेत. मोठ मोठ्या बाबतींत तूं काय केलें आहेस? कुकावर जें साहस झालें, त्यांत तरी तुझी दानत दारी वाखाणिली जाते का? नाहीं! त्या बिचाऱ्यास कोठच्या कोठें छपन्नाव्या कोनांत टाकून देऊन शेवटीं यमसदनही दाखविलेंस! त्याला ही शिक्षा कां केली? हेंही कोणाला अजून ठाऊक नाहीं! त्याला शिक्षा करणाऱ्या तुझ्या गोऱ्यांच्या साहसास झांकून टाकणारी जी तूं, त्या त्वां त्याचा थोडा तरी तपास करावचा होतास? पण नाहीं! काय हा तुझा उघड

जीं काय तीं सरकारचीं आणि मिलिटरी व सिव्हिल लोकांचीं! बहुत करून सिव्हिल लोकांचींच.!! परंतु ते लोक कर देणारे नव्हत. इतकेंच नव्हे, तर लोकांनीं दिलेला कर खर्च करून त्यावर मौज मारणारे असतात! प्रत्येक शहाण्या व न्यायी सरकारावर प्रजेशीं कर्तव्य कर्म स्मरून वागण्याचा जो मोठा बोंजा असतो, तो तडीस नेण्या विषयीं अशा अडचणींत सांपडल्यामुळें आपलें सरकार असमर्थ झालें आहे!! सिव्हिल सरव्हंट हे सनदी नौकर असल्यामुळें उद्दाम असतात—जुलमी झटलें तरी चालेल. आणि मिलिटरी लोकांवर कर देणारे लोकांचा व सिव्हिलियनचा दाब नसल्यामुळें ते नेहमीं अतृप्त व फाजील खर्च करण्या विषयीं उत्सुक असतात,, हें **जानब्राईट**चें करां विषयीं व पैशांच्या व्यवस्थे विषयींचें मत झालें. त्यां विषयींच मि० जे० एस० मिल काय म्हंणतो? तें पहा! साधारण बुद्धीचा नेटिव जें सहज समजतो; तें परकीयांस दळूहळू आभ्यासानें आणि अनुभवानें शिकावें लागतें! आणि इतकेंही करून त्यांचें ज्ञान कच्चें असतें तें असतेंच!!!

पक्षपात दिसत नाहीं? हा तुझा प्रामाणिक पणा वाटतें! किंवा न्याय? का धर्म? जर तूं इमानी ह्मणवित्येस, तर तुझें इतकें तरी कतव्य हातें कीं, त्यास शासन करणारांस सक्त शिक्षा दिली पाहिजे हातांस, ह्मणजे दुसरे कोणी त्याप्रमाणें वागले नसते. परंतु "आपना सो लाबसी और पराईकी कुसंका,, किंवा "आपला तो बाव्या आणि दुसऱ्याचें तें कारटें,, ह्या प्रमाणे देशांयांचो किंमत तुला थाडा वाटली? तुझे ते अमूल्य प्राणा सारख! मग त्यांचा तपास होणार कोठून? हाच तो "जिंकलेले" आणे "जिंकणारे" ह्यांतील भद. आतां तूंच पहा? लष्करानें बंड केलें, त्यांत प्रजचा कांहीं देव घेव होता? तूं प्रजेच्या डोचक्यावर काय ह्मणून कर बसविलास? खरोखर धन्य समज त्या हिंददेवीच्या गरीब पुत्रांची! त्यांनीं तुझा बिलकुल अनादर केला नाहीं! जरी ते बडबडले, रडले, कढले, तरी त्यांनीं आपली स्वराजनिष्ठा दाखविण्या करितां कर दिलाच! वास्तविक तो घेण्याचें कांहींच प्रयोजन नव्हतें. पण, तूं स्वतः जें राज्य मिळविलेंस, त्या साठीं तो इंग्लंडास पाठवावयाचा होता? आणि जबरदस्ताचें खांद्यावर! तेथें भल्याचें काय चालणार? तुझ्या हातांत राजदंड! त्यानें तूं ठेंचण्यास शक्तिमंत! तेव्हां कोणी हां कीं चूं करूं धजतो कसचा? बरें तुझ्या बलवान् पणाचे दाखले थोडे थोडके का आहेत? नाहींत.*

* "त्या लोकांच्या तर्फे मी तुह्मांस विनावतों. पुष्कळ वर्षां पासून तुह्मां लोकांची दया व न्याय बुद्धि जागृत करण्या कडे माझी सक्त मेहनत आहे. आणि आतां मी तुह्मांला अगदींच टेंकीस येऊन सांगत आहें. ह्याचें

त्यात तूं विवक केला किंवा करावयास शिकली असशील तर ईश्वराची शपथ! माझे पूर्वज रौरव नरकांत पडतील! मी असत्य भाषणी असेन तर! तूं तुझ्या इच्छेनुसार वागण्याचें ठरवून जेथून सांपडेल तेथून द्रव्यहरण करण्याचें कर्म आरंभिलेंस. * आणि खरोखरच त्याप्रमाणें तूं केलेंसही! खरें सांग? इंग्लंडांतून आलेल्यांस मोठे मोठे राक्षसी पगार द्यावयाचे ते कां? त्यामुळेंच त्यांनीं अतोनात दौलत ताणून जावें म्हणूनचना?

कारण इतकेंच कीं, ज्या विषया करितां मीं भांडत आहें, तो माझ्या फार जिव्हाळ्याचा विषय आहे. **हिंदुस्थानां**तील राज्य कर्त्यांनीं अपराध करून व चुका करून दुर्दैवी **हिंदुस्थाना**वर जीं संकटें उत्पन्न केलीं आहेत. त्या विषयीं सावध होण्यास **इंग्रज** लोकांच्या मनांत कांहींच दया उपजूं नये काय? जर तुम्हीं आपलीं मनें (नेटिवांविषयीं) लोखंडाचीं केलींत असाल आणि त्यांच्या दुःखाविषयीं कोणत्याच रीतीनें तुमच्या मनास पाझर फुटत नसेल, तर निदान आपल्या देश बांधवा विषयीं तरी मनांत कींव आणा!! मी ह्मणतों यावर पूर्ण विश्वास ठेवा. **हिंदुस्थानां**त हल्लीं चालत असलेल्या स्थितीचा परिणाम लौकरच फार भयंकर होईल!!!

जान ब्राईट.

* सन १८६९ त लार्ड **मेयो** आपल्या मित्रास लिहितो कीं, " पैशासंबंधानें आमची स्थिती जितकी चांगली असावी, तितकी नाहीं; असें मला वाटतें. लोकांच्या पैशाचा फारच उधळपट्टी होत असते. आणि कडक उपाय योजून व कठिण भाषणें बोलून त्याचा मला बंदोबस्त करावा लागत आहे." ह्च गृहस्थ आणखी तीन महिन्या नंतर सर हेनरी **डुरांड** यांस लिहितात कीं, " ह्यापुढें पैशाची ह्मणून तूट पडूं द्यावयाची नाहीं, असा मी निर्धार केला आहे. त्यामुळें सैन्य कमी करावें लागलें; किंवा सिव्हिल खात्यांत काटकसर करावी लागली; अथवा पब्लिक वर्क्स्चीं कामें कमीं करावीं लागलीं तरी चिंता नाहीं. " इ०

काय अन्याय हा! व्यापारांतही मुख्य लाभ **यूरोपियनां**सच करून देण्यांत येत आहे.* इतकेंही करून **इंग्लिशां**च्या फायद्या करितां, देशांतून द्रव्य उकळण्यांत येतेंच? सत्ता वाल्यांनीं कोठें बारांच्या बंदरी **इंग्लंडां**त असावें. आणि इकडे त्यांचा हुकूम चालावा! तिजोरीही कोठच्या कोठें पडली आहे! त्यांतून मनास वाटेल तशी व्यवस्था होत असत्ये! **इंग्लंडा**नें **अबिसिनिया**शीं लढावें. त्यांत **हिंदुस्थान**चें कांहीं दे घे होतें? किंवा **अबिसिनियां**त† जे कैदी पकडले ते काय

*नौकरांच्या पगारा विषयीं डाक्टर हंटर ह्मणतात कीं;–"राज्यव्यवस्था चालविण्या बद्दल लोकांस जे पगार द्यावयाचे, ते **इंग्रजां**च्या मानानें देण्यास **हिंदुस्थाना**स शक्ति नाहीं! कारण पगाराचे जे दर सर्व जगांत आहेत, त्यांहून हेच मोठे आहेत! परंतु **हिंदुस्थान** आपल्या दराप्रमाणें (हे दर सर्व जगांत फार कमी आहेत.) सदर्हु पगार देण्यास समर्थ आहे.

डा० **हंटर**चें "**भरत** खंडांत **इंग्लंड**चें काम"
नामक ग्रंथाचें पृष्ठ १३१ पहा.

† ह्या देशांतून **अबिसिनियां**त जें सैन्य नेलें आहे, त्याचा सर्व खर्च **हिंदुस्थाना**नें द्यावा, असा ठराव झाल्याचें ऐकून मला फार खेद होतो! * * * * * हा भाड्यानें देण्याचा किंवा उसनें देण्याचा प्रश्न नसून, ज्या देशानें सैन्य कामास लाविलें, त्यानेंच त्याविषयींचा खर्च देण्या विषयींचा प्रश्न आहे. बंडाच्या सालीं **हिंदुस्थानां**त **इंग्लंडा**हून जें इंग्रज सैन्य आलें त्याचा सर्व खर्च **हिंदुस्थाना**नें दिला. असें मी खात्रीनें म्हणतों, **चिनां**तील लढाईचा खर्च **हिंदुस्थानावर** थोडा तरी पडला होता, हें मला माहीत नव्हतें. आणि माझी खात्री आहे कीं, असें व्हायचेंच नाहीं" इ०

लार्ड **लारेन्स** सर स्टाफर्ड **नार्थकोट** यास
ह्मणतो. सन १८६७—६८

आतां लार्ड **केनब्रुक अबीसीनिया**च्या लढाई विषयीं काय ह्मणतात पहा? आजपर्यंत ज्या ज्या लढाया झाल्या त्या सर्वांत ही लढाई फारच

हिंदचे पुत्र लागले होते? वरें, जेव्हां लढाई सुरू झाली, तेव्हां कधीं तूं **हिंदुस्थान**च्या रहिवाश्यांस—तुझ्या प्रजेच्या एका भागास,—तुझ्याच ह्मणण्या प्रमाणें तुझ्या बच्चांस विचारिलें तरी होतेंस काय? कीं, "हें युद्ध आपल्या सामान्य सुखा करितां आहे. आणि जी अपकीर्ति येणार आहे, ती सर्वांस सारखी आहे! एतदर्थ सर्वांच्या संमतीनें आपण स्वरक्षणार्थ गेलें पाहिजे" विचार पूस केल्याशिवाय केवळ तुझ्या मदोन्मत्त पणानें तूं युद्ध सुरू केलेंस आणि त्याच्या खर्चाचा अर्धा हिस्सा **हिंदुस्था-नच्या** डोचक्यावरं आदळलास. * काय हें? ही तुझी व्यवस्था

दुष्ट बुद्धीनें उत्पन्न केलेली आहे." आणखी त्याच नामदाराचे हे मोल्यवान् शब्द होत. "आतां जें कृत्य करावयाचें त्यांत शुद्ध अन्यायी गोष्ट ही आहे कीं, जेव्हां आह्मीं इंग्रज सैन्य, **हिंदुस्थान**च्या कामीं लावितों—उदाहरणार्थ ५७ च्या बंडाच्या समयीं—तेव्हां त्या सैन्याचा सर्व खर्च —त्यानं **हिंदुस्थानां**त पाय ठेविल्यापासूनच-हिंदुस्थानावर पाडितों. परंतु जेव्हां **हिंदुस्थानां**तील सैन्य अन्य देश जिंकण्यासारख्या कामावा पाठवितों. तेव्हांही त्याचा सर्व खर्च **इंडिया**नें द्यावा म्हणून ठराव करितों" हाय! हाय!!! कशी खुबी आहे?

हेन्सर्ड पृष्ठ ३५९—४०७

* एक **फ्रेंच** ग्रंथकार म्हणतो कीं, **हिंदुस्थानां**त स्वतंत्र अशीं जीं संस्थानें आहेत, त्यांच्याविषयींच फक्त विचार **हिंदुस्थान** सरकारास केला पाहिजे; असेंच केवळ नाहीं. लोकांचें मत काय आहे? ह्याचाही विचार पाहिला पाहिजे. लोक मत दिवसें दिवस आपले विचार प्रगट करीत आहे. **हिंदुस्थानां**तील पंधरा कोटी हिंदुप्रजा राज्य कारभारांत मुळींच लक्ष देत नाहीं. आणि आपल्यास गुरांच्या कळपा प्रमाणें हवें तसें वागवूं देत्ये. असें समजणें चुकीचे होय **** राज्य कारभाराचे कामीं आपला हात असावा! अशी इच्छा सर्व साधारण आहे. अमदीं हलक्या

नीति, शांतीचें राज्य, मेहरबानचा न्याय, पवित्र वचन, आणि शीतल छत्र! हा आपला मोठा पक्षपात, अन्याय व गैरवाजवी लाभ आहे असं तुला कधीं तरीं वाटलें काय? नाहीं नाहीं. तुला त्याचें भानच* नाहीं! दर एक देशांत राज्य व्यवस्था विधी कशा चालतो? ह्याविषयीं तुला माहिती आहेच! आणि तुझ्या स्वतःच्या प्रदेशांत **सामराज्य** चालवून, त्याविषयीं यथार्थ नियम तूं चालविले आहेस. परंतु **भरत**खंडांत पहावें तेथें बळजोरीच्या नीति शिवाय दुसरी पद्धतीच नाहीं! परदेशाची व्यवस्था स्वदेशाप्रमाणेंच ठेवणें ह्याचें नांव खरी रीति. पण ती समजतो आहे कोण? एक वार तूं तुझें पवित्र वचन मोडून देशीयांस धुडकाविलेंस, म्हणजे दुसऱ्या वेळींही तुला सवड मिळालीच. **टर्की** आणि **रसिया** लढतात आणि तूं **सैप्रस** बेट बळकाविण्याचें मनांत आणिलेंस? हा कोण न्याय? प्रथम युद्धा प्रमाणें सगळा बोजा, जरी तूं तुझ्या शिरावर घेतला होतास, तरी ह्या गरीब लोकांस सोसावें लागलें नाहीं! असें कोण सांगेल? व्यापार धद्यांत आणि इतर पुष्कळ बाबतींत हो! हो! पुरे वाट!! आकांत हाऊन गेला!!! आणि थोडा किंवा पुष्कळ ताटा तिजोरीस सोसावा लागला! शेण पडलें कीं,

---

प्रतीचे लोकांत देखील ता इच्छा आहे. आणि त्यांची जीज्ञासा पुरी पाडण्याकारतां पुष्कळ वर्तमान पत्रें निघत आहेत. रेव्ह्यु. डी. डो. **मांडिस.**

*ह्या वेळचें पार्लमेंटचें ब्लु बुक पहा. मि० **ग्लाडस्टन** आणि मि० **ब्राईट** ह्याविरुद्ध होते. परंतु विशेष तक्रार झडली नाहीं. **आन्स्लो** नामक एक ऐरिश मेम्बर ह्याला "**लुटारु भाग**" म्हणतो.

तें धूळ घेतल्या शिवाय उठावयाचेंच नाहीं! काय हा अन्याय? कीं, अन्यायाचा बाप? याहून ही जास्त कंटाळा येण्यासारखी लढाई तूं दोन वेळ अमीराशीं चालविलीस* हें तर खरें? पहिल्या लढाईंत अपयश सोसून कोट्यावधींचा संहार आणि हजारोंची ह ि करून आलीस? तरीही, तुला दरकार राहिली नाहीं? त्यावेळचें तुझें पाऊल समयीं थोडें निंदा पावेल. पण शेवटचें अतिशयच निंद्य आहे! खरें कीं नाहीं? कारण अमीराशीं युद्ध करण्याचें तुला कांहींच प्रयोजन नव्हतें; किंवा त्याच्या राज्यांत दूत, हेर, अथवा वकील दाखल करण्याची कोणत्याही रीतीची तुला सत्ता नव्हती. मग एखाद्या शेजाऱ्याच्या येथें त्याची इच्छा नसतांना जाऊन अशी मागणी करावी काय? कीं, 'आह्मांला बोलावून आमचा आदर सत्कार करा. आमच्या चाकर ने करांस भोजन दक्षिणा द्या. आणि त्यांस इतरांहून श्रेष्ठ माना?' हें सांगणें जसें लज्जा दायक आहे—अग! नीति—रूढि—मर्यादे विरुद्ध आहे, त्या प्रमाणेंच तुझी त्या वेळची मागणी लज्जास्पद होतीना? शवटीं अगदीं उघड उघड तुझा तिरस्कार **अलीमसजीद**च्या पहारेवाल्या "अल्टी मेटम,,नें केला. तेव्हां तरी तूं सरळ समजावयाचें होतेंस? पण छीः! तूं पडलीस धीट

---

* आम्हीं शेजारच्या राजांशीं शुद्ध मनानें वागलों व नेहमीं स्नेह भावानें त्यांशीं व्यहार ठेविला तर त्यांच्या मानगडींत पडण्याचें आम्हांस कारणच पडणार नाहीं. हें कांहीं लोकांच्या नजरेस मीं आणित आह. आणि लौकर च सर्व लोकांस मी असें दाखवूं शकेन का, त स्वतंत्र व बलिष्ठ व्हावे. अशी **इंग्लंड**ची इच्छा आहे. कारण काय?

राणी.सरकारच्या एका प्रधानास **लार्डमेयो** म्हणतो.

मनाची बादशाहाजादी! सरळ कसें समजशील? राम राम कर! मदोन्मत्त-गर्विष्ट-धन-सत्ता-विद्या-कलाभि-मानांतच गर्क होऊन तर्क रहित झालेलीस हा अनादर माझ्या मतें बाई? फारच वाटावा! आणि त्याप्रमाणें डांचलाही!! पुप्कळ रोपास चढलीस, हट्टास पेटलीस. हाय हाय! हा अपमान कसा सहन व्हावा? ब्रिटीश "प्रेस्टिज" ला झांक लागलीग? छिःछिः!!! फारच शरमेची गोष्ट! त्यामुळें फ्रेंच नीति "कुपडिमेन" चा सपाटा लगाविणें योग्य दिसलें नाहीं? इंग्लंडांत व इंडियेंत राहणारे तुझे सुपुत्र त्या अपमानाचें वैर घेण्यास तुला चिथवूं लागले. त्यांनीं तुलाच श्रेष्ठ धनुर्धारी म्हणून, गडबड गुंडा करून ठोकून बसविलें; निरनिराळीं वचनें सांगितलीं, "तुला कोणताही प्राणी जिंकूं शकणार नाहीं. व तूं कधीं कोणास जिंकिली जाणार नाहींस,, ह्याच घमेंडीवर ते तैयार झाले. "गोकुळच्या गाई आणि म्हाबळ भट दान देई,, किंवा परक्याच्या पैशावर दिवाळी! तसें हिंदच्या पैशानें तुला ह्या वैराचें उसनें काढावयाचें होतें! तेव्हां त्यांस पंचाईत कसली? * एकदम तूं, तुझ्या आणि हिंदच्या अति पराक्रमी पुत्रांस त्यांची सफाई करण्यास पाठविलेंस! आणि तेथें जाऊन तुह्मीं खरें सांगहाँ! काय केलेंत? कांदा काढून आलां का? मी प्रथमच सांगितलें आहे कीं, हें युद्ध विना प्रयोजन आहे. आणि

* हिंदुस्थानची स्थिती फार खराब आहे. कारण त्या देशाचा महसूल जरी वाढत आहे, तरी त्यांतील सुमारें $\frac{1}{3}$ इंग्लंडांत खर्च होतो. कशा अवनतींत हिंदुस्थान येत आहे पहा?

फासेट पोली० ए० को० चें पृष्ठ ५०४ पहा.

तें करण्याची मुळींच आवश्यकता नव्हती. पण गर्वानें ओत-प्रोत भरलेली तूं! आपल्या जया करितां व द्वेष करणाराचा वध करण्यासाठीं गेलीस. परंतु अति भीतिनें हमेशची जी पीडित, तिला योग्य शासन झालें. तुझ्या आणि त्यां बरा-बरच हिंदच्या पुत्रांस ते जो अयोग्य पराक्रम दाखवायला गेले त्यांस जी शिक्षा झाली, ती योग्यच झटली पाहिजे. खासें झालें. फार प्राचीन काळा पासून मी तुला सांगत आल्यें आहे कीं, अग! तूं कधींही जंगली लोकांशीं झुंजावयास जाऊं नकोस. त्यावेळीं तूं तें माझें सांगणें कबूल केलें होतेंस? आणि "आतां पुढें कधीं तसें करणार नाहीं" झणून वचन दिलें होतेंस? पण तुझें तें बोलणें मिथ्या झालें? त्यामुळें मी आतां फार संतप्त झाल्यें आहें! कारण तूं तुझ्या सत्तेचा जय दर्शवूं गेलीस; आणि प्रथम दर्शनींच स्वतंत्रतेचा उच्छेद करून टाकिलास! कधीं तरी तूं ऐकिलें आहेस काय? कीं, जंगली, अज्ञानी, कलाविद्याविहीन, पशुतुल्य, धर्मशून्य, व गांडू लोक वश झाले आहेत? शार्लमेन यास जंगली लोक वश करण्या-करितां किति श्रम सोसावे लागले? हें तुझ्या ध्यानांत आहे? आणि तितके श्रम सहन करण्याची तुझ्या अंगीं शक्ति आहे? नाहीं! तर कां बरें छाती ठोकून पुढें सरलीस? केवळ हिंदच्या पुत्रांचा पाठारा उडविण्यास? आणि व्यर्थ द्रव्य उधळण्यास? अग! त्यांच्या पैशाची तूं रक्षक ठरली आहेस ना? मग त्यांचें तुला रक्षण केलें पाहिजे, तें एका बाजूस ठेवून केवळ उडाऊ पणानें हिंदचें द्रव्य असें उधळण्यांत, किंवा भक्षण

करण्यांत तूं बेवचनी होत नाहींस काय?* अलबत! हा बेवचनीपणाच विश्वास घाताचें मूळ आहे! आणि विश्वासघात हाच राज्यास विनाशरूप अनर्थ प्राप्त करून महत् कलह उत्पन्न करितो. हें तरी तुला माहीत आहे? या बाबतींत तूं मला एक विसरलीस. परंतु नीतिसही अज्जी विसरलीस? जसा मत्स्य वेध करणाराचा कांटा, स्वादिष्ट आमिषानें झांकलेला असतो; त्याप्रमाणें जो तुझा प्रपंच, तो अशा बाबतींत अगदींच उघड होतो. ह्याचेंच मला फार दुःख होतें! **आफगाणां**वर तूं जय मिळवूं शकली नाहींस? ह्यावरून तरी तुला अमें समजलें पाहिजे होतें कीं, जो देश तुझ्या छत्रा खालीं आहे, तो फारच शांत आहे. पण तें देखील तुला सुचत नाहीं? मी तुला सत्य सांगत्यें—कारण सत्याहून श्रेष्ठ आणि लाभ कारक दुसरें कांहींच नाहीं. सत्या शिवाय पुरुष किंवा देव देखिल शोभत नाहीं. आज जें मी तुला सांगत आहें, तें फक्त तुझ्या स्वतःच्या हितार्थ आहे†—एकदां तूं सुधारून

---

* पहिली **आफगाण** लढाई झाली, त्या संबंधानें जान **ब्राईट** म्हणतात कीं,:—गत वर्षीं **आफगाण** लढाईत जो अतोनात खर्च झाला त्याला अनुलक्षून हें माझें बोलणें आहे. तो खर्च सुमारें १५,०००००० रु० होता. आणि तो सर्व खर्च **इंग्लंड**च्या लोकांनीं सोसला पाहिजे होता. कारण ती लढाई इंग्लिश प्रधान मंडळानें केवळ **इंग्रज** लोकांचे हेतु साधण्या करितांच सुरू केली होती. हेच विचार दुसऱ्या लढाईच्या वेळींही त्यांनीं लागू केले होते.

† येथीलच एक श्रेष्ठ पुरुष जो तूर्तचा मोठा पुरुष आहे, तो काय म्हणतो तें ऐका. " एक क्षणभर तरी **हिंदुस्थाना**कडे आपली दृष्टी फेंका. हिंदुस्थान ह्मणजे तुमचे जिन्नस खपण्याचा एक बाजार आहे! सर्व

ज्या पंचवीस कोटी प्रजेच्या अधिष्ठात्री देवी पदाला पावली आहेस. तिची तूं विशेष काळजी बाळगणारी हो. बाकी ही भूमी कोणाची झाली नाहीं. आणि होणार देखील नाहीं! या भूमीवर हजारों आणि लाखों राजे होऊन गेले, परंतु तिन-मध्यें कांहींच फेरफार झाले नाहींत! मग तुझी पर्वा कसली? तूं अमीर **शेरअल्लीशीं** मुलाखात केलीस*. पण त्यापासून तुला काय लाभ मिळाला? कांहीं नाहीं! हाच प्रकार दुसऱ्या लढाईचा! देशांत प्रथम जी स्वस्थता राखण्यांत येत होती त्यांत कांहीं वर्षें तूं साधारण शहाणपणानें वागलीस इतकेंच पण पुढें हळू हळू तुझी राजनीति फारच दुःख दायक होऊं

जगांत तेंच एक असें स्थल आहे कीं, तुमच्या जिन्नसांस जकाती वगैरे कांहीं एक पडत नाहींत † † † † हिंदुस्थान नसेल तर **बर्मिंगहाम** शहरांत निरुद्योगी लोकांची संख्या इतकी वाढेल कीं, त्यामुळेंच मोठे अनर्थकारक परिणाम होतील! आणि संसारी व्यवस्था तर अतीशयच जोखमांत येईल!!!

लॉर्ड. आर. **चर्चील.**

सन १८८५ ता० २३ अक्टोबर.

* स० १८६९ ता० २७ मार्च रोजीं ह्मणजे लार्ड **मेयो**च्या कार-किर्दींत **अंबाला** येथें एक मोठे दरबार भरण्यांत येऊन, **ब्रिटीश** राज्याशीं अमिरानें मित्रत्वाने रहावें. एतदर्थ त्याला दरसाल बारालाख वर्षासन, देण्याचें ठरवून पुष्कळ नजर नजराणाही दिला. तूर्तचे अमीर **अबदुल रहिमान** यांविषयीं **ब्रिटीशांस** बिलकुल विश्वास नसून, त्यांस वरील रक्कम देण्यांत येते. सन १८४९ त **दोस्तमहमद**ाशीं करार मदार झाल्यावर देखील कोणीच परस्परांचा विश्वास धरीत नव्हते—अशी ही राज नीति आणि राज प्रपंच आहेत!

आणखी लार्ड **मेयो** लिहितो कीं, आमच्या जिंकिलेल्या प्रांतांत व मध्य ऐशियेंतही **अंबाला** येथील सभेच्या योगानें आमची सत्ता पुष्कळ दृढ

लागली* ती येथपर्यंत कीं, स० १८९२ व स० १८८० हीं दोन्हीं सम कालिन गणिलीं जातील—जर तुझी तूंच दीर्घ दृष्टीनें पहाशील तर तुझी बालंबाल खात्री होईल कीं, राज्याची पैदास वाढवून इंग्लंडच्या निरुद्यमी† व श्रीमंतांच्या निर्वाहा करितां केवळ करांच्या प्रहारांनीं ह्या देशांतील लोकांस ठेंचण्यांत येत आहे; करांची इतकी बेशर्थ झाली आहे कीं, त्यामुळें लोकांचा नाइलाज झाला आहे!! त्यांना हा जीव नको नको असें होऊन गेलें आहे. तुझी कर्म कथा किती सांगू? देशी राजांस धमकाऊन ताबेदार करणें, कारभाऱ्यांस डुरकावणें, त्यांच्या सत्तेंत हात घालणें, यःकश्चित् कारणा करितां त्यांवर जरब ठेवून दाबीत जाणें, आपल्या मर्जीप्रमाणें कारभारी नेमणें, तुझ्या यःकश्चित् नोकरानें त्याहून श्रेष्ठ पदवी भोगणें, जहागीरदारांचे व तालुकेदारांचे हक्क लुबाडणें, आणि

व सबल झाली आहे. लोकांची जर आम्हीं अशी खात्री करून देऊं कीं, लोकांच्या कामांत हात घालणें, आम्हांस आवडत नसून शांतता राहावी; हा आमचा हेतू आहे. आणि हल्लीं **इंग्लंड** हेंच काय तें अपक्रिया न करणारें राष्ट्र आहे. तर आजपर्यंत कधींही मिळालें नाहीं, असें महत्त्व आम्हांस मिळेल!

हंटर्स "मेयो" पृष्ट २७१

* लार्ड **लारेन्स** ह्मणतो कीं, वसाहतींत **इंग्लंडचें हिंदुस्थानाशीं** वर्तन अगदींच भिन्न आहे!

† सरजेम्स **केर्ड** थोड्या अगत्याचा पुरुष नव्हे, तो लिहितो कीं, आमच्या देशांतील पुष्कळ लोकांची अशी समजूत आहे कीं, थोर कुळांतील लहान मुलांस पैसा मिळविण्यास **हिंदुस्थान** हा एक सर्वांहून मोठा देश आहे. परंतु तेथील लोकां विषयीं माच आम्हीं बिलकूल काळजी [illegible] नाहीं।

लार्ड **होवर्ट**चें लाइफ व्हा० २ पृष्ट ६९

लागे बसविणें, राजेलोकांस माकडा प्रमाणें * नाचविणें, त्याप्रमाणें त्यांचा न्याय करणें, यामुळेंच सर्व लोक संत्रस्त झाले आहेत!!! इतक्यावरच तुझें नीच कर्म थांबलें आहे का? नाहीं! तुझ्या स्वतःचा स्वार्थ समय येऊंदे. कीं, त्यांच्या भानगडींत तूं पडलीसच. आणि त्यांच्या प्रजेचा चुराडा होईल तेव्हां, किंवा तेच दुःख पर्वत भाराक्रांत होतील तेव्हां, किंवा ते आपल्या प्रजेवर बेधडक अन्याय गुजरीत असतील तेव्हां त्यांची दाद सुद्धां न घेणें, हें असंतोष फैलावण्यास थोडें कारण आहे काय? जमिनीवर कर, † प्रजेच्या कमाईवर कर ††,

---

* ड्यूक आफ **वेलिंग्टन** सारखा समर्थ पुरुष सांगतो कीं; –आमच्या तहांतील शरतींवरून पाहूं लागल्यास, **हिंदुस्थानां**तील राजे स्वतंत्र आहेत; असें आम्हीं स्वीकारिलें आहे. तरी त्यांच्या दरबारांत आम्हीं रेसिडेंट ठेवितों. परंतु ते रेसिडेंट वकील ह्या नात्यानें न वागतां, राजांस बुद्धिवाद सांगण्याचें काम चालवीत असतात! सर्व खासगीकामांत देखील त्यांची ढवळा ढवळ असत्येच! राजाशीं विरुद्ध वागणाऱ्या लोकांस ते पाठीशीं घालतात. आणि आपल्या अधिकाराचा फार मोठा बाऊ करून दाखवितात!!!

† ह्यावरून असें दिसेल कीं, कर जरी शेंकडा १८॥ टक्के प्रमाणें वाढविला तरी महसुलाची रकम (लोकवृद्धीची बाब ध्यानांत आणिली तर) शेकडा १२॥ प्रमाणेंच कायती वाढली.

†† माजी लार्ड **होवर्ट** (ज्याहून **हिंदुस्थान**च्या गरीब लोकांस अधिक चांगला मित्र मिळणार नाहीं तो) दुसऱ्या एका ठिकाणीं म्हणतो कीं, हल्लींचा असलेला कर, हा एक शिरपट्टी (जिजीआ) प्रमाणेंच आहे. त्यांत आणखी गरीब व निराश्रित शेतकऱ्यांवर तो वाढाविण्यास माझें मन धजत नाहीं. (लाइफ व्हा० २ पृष्ठ ४८९) असे अतिशय कर बसाविण्यानें **हिंदुस्थान**ची कशी स्थिती होईल? ह्याविषयीं लार्ड **हार्टिंग्टन**, महाराणीचा

वेश्यांवर कर, मिठावर कर,* धान्यावर कर, दारूताडीवर कर, नरकाचें लिलांव, इत्याद्यनेककरकहरां विषयीं मी किती सांगूं? †

एक प्रधान **डार्विन** येथें ता० २४ आक्टोबर सन १८८५ या दिवशीं भाषण करीत असतां म्हणाला:—" मला असें वाटतें कीं, **अमेरिकेंतील** वसाहतींवर **ब्रिटिश** सरकारनें करायचें ओझें फार लादिलें हें खरें. आणि तो कर राजकीय कामा करितांच बसविला होता. तरी त्यामुळेच आम्हीं अमेरिकन वसाहतींस मुकलों आहों ! असें मला वाटतें."

* "गार्डेन इंडिया" नामक ग्रंथांत **जार्ज केम्पबेल** लिहितो कीं, "हल्लीं मिठावर जो कर आहे त्याचा $\frac{1}{20}$ कर मुसलमानी राज्यांत होता." आणि आतां? हें त्यानें सन १८५३ त म्हटलें होतें. परंतु तूर्त तर मिठाचा कर तीस पट वाढला आहे !!!

† ह्याविषयीं एक चांगला आधार—**हिंदुस्थानच्या** स्थितीविषयीं फारच चांगला आधार—**भरतखंडाचें** तन व मन सूरदास **फासेट**नें पोली बेको ग्रंथांतील चौथ्या प्रकरणांत जमीनीच्या करासंबंधी फार अग- त्याचा लेख लिहिला आहे तो पहा.

आणखी मि० **काटन** आपल्या "**नवें भरत** खंड" या पुस्तकांत म्हणतो कीं:—थोड्याशा अंमलदारांचे मनःपूत ठरावापेक्षां दुसरें एक कारण काळजी उत्पन्न करीत आहे. तें असें कीं, आमच्या महसुलाच्या पद्धतींत देशाची **जमीन ही रयतेच्या मालकीची नसून सरकारची आहे,** अशा नजरेने आम्ही वर्तन करीत आहों. जेव्हां सरकार म्हणजे प्रजा असें असतें, त्या प्रसंगीं जमीन सरकारची असें म्हणणें फारसें भयंकर नाहीं ; परंतु सरकार म्हणजे थोडेसे परकी लोक असे ज्या ठिकाणीं आहे तेथील गोष्ट अगदीं भिन्न आहे ! हे परकी लोक त्या देशांत उत्पन्न झालेल्या महसुलांतून सुमारें $\frac{1}{3}$ (७,००,००,००० रु०) आपल्या नोकरांकरितां खर्च करितात. बरें त्या नोकरांचें राहणेंही त्या देशांत नाहीं. आणि देशाच्या चांगल्या वाईटापासून त्यांचा नफा तोटाही नाहीं! ह्या धोरणानेंच आम्हीं सारा कायम बसलेले प्रांत खेरीज करून, बाकी सर्व **हिंदुस्थानभर** वागत आलों आहों. आणि शेतकरी वर्गास आम्हींच भिकारदेशेस आणले आहे. पृ० ५३–५४

त्याविषयीं बोलणेंही मोळ्या शरमेचें काम आहे! परंतु करावें कसें? माझा देखील नाइलाज झाला आहे! तूं आपल्या करांची हद्द सर्वच वाढाविलीस! आतां देशी राजे तुझें पाहून मतिहीन झाले आहेत. तेव्हां अग? अगदीं अलीकडे तूं त्या गांडूचा* न्याय करण्याचा फार्स करितेस? पण तो बापडा नांवाचा राजा! विलासी, शृंगारसागरांत लोळणारा, आणि स्वस्थतेनें काम करणारा, त्याची रखडपट्टी करून व मागून त्याला पद-भ्रष्ट करून त्वां आपला पक्का धाक बसविलास! आणि सगळ्या देशी राजांना असें सुचाविलेंस कीं, पहा? आतां तपासा! आमच्या विरुद्ध कांहीं बोलणें, अथवा कारणविरुद्ध काम करणें, हें तुमचें निसंतान-अनहित-कारक होईल!!! बाकीचे इतर राजे अशा दोषाला पात्र नव्हते काय? काय सगळेच व्यवस्थेनें वागत होते? सर्वांचीच प्रजा सुखी होती? अग! त्यांचें राहो. तुझी स्वतःचीच प्रजा खरी सुखी आहे? † मल्हारराव स्वभावाचाच नामर्द,

---

* **मल्हारराव** गायकवाडचा न्याय करण्याच्या निमित्तानें सर्वोपरी सत्ता चालविली आहे. तो स्वतः ओशाळा व निर्बल आहे; असे पाहून एक असंभवनीय तुफान केलें. त्याचा न्याय तर शरम भरलेला आहे; असें सर्वांनींच मानिलें! हा जो अन्याय झाला, त्याचा जबरदस्त घाय त्याच्या मनास फारच झोंबला!!! व त्यामुळेंच तो स० १८८३ त **मद्रास** येथें कैदेत असतांना मरण पावला!

† हिंदुस्थानची ज्यांस चांगली माहिती आहे त्या सर्वांचें असे एक मत आहे कीं, 'व्यवस्थित देशीसंस्थानें ही, हिंदुस्थानच्या राजकीय व नीतीच्या सुधारणेस मोठीं फायदेशीर आहेत. * * * * आपणांस संपूर्ण रीतीनें समजण्यास अशक्य अशी योग्यता व समानपणा ही दोन्ही त्यांच्या-पुतीं देशी राज्यांत आहेत.'

लार्ड केन बोर्न (१८६७).

त्याच्या लष्कराची व्यवस्था चांगली नाहीं. राजकुटुंबांत संप नाहीं. पूर्वीच्या राजाचें कुटुंब खवळलेलें, आणि त्याचा मोठा घोंटाळा ! तशांत ब्रिटिश राज्याची सत्ता प्रबळ आहे. तें न्यायी आणि प्रामाणिक आहे. योग्य न्याय करील असें समजून तो बिचारा गरीब गाई सारखा शरण आला ! ! ! हाच प्रकार जर खंडेराव्याकडे चालता तर ठिणग्या ठिणग्या उडाल्या असत्या ! जरी त्याच्या हालांस पारावार नसता (?) तरी तो क्षणभर स्वस्थ ह्मणून बसूं देताना ! एखाद्या हलक्या सलक्या मनुष्याच्या बोलण्यास महत्व देऊन प्रत्यक्ष राजाला पदभ्रष्ट करणें आणि तसें करतांना नवाच बूट काढणें, हें तुझ्या ताम्रमुखी राजनीतीस खरोखर धिःकारण्यासारखें होय!, तुझी प्रजा तरी कोठें सुखी आहे? तिचे हाल काय कमी आहेत? तिची बडबड कोठें कमी आहे? बिचाऱ्या बकऱ्याला क्रूरतेनें मारिलें ! आणि युवराजास बोलावून त्यास सगळ्या राजांकडून मुजरा करविला ! सगळे घेतलेलेच ! ते सहजच आले. नजर नजराणे झाले आणि अमूल्य वस्त्रें भूषणें देऊन राजकुमाराचा सत्कार झाला ! ह्या राजनिष्ठेचा बदला कांहीं तरी मिळाला काय? राणीला केसरिया करविलें आणि इंग्लंडची राणी ती भरतखंडाची महाराणी झाली. तथापि थोडाच विश्वास ठेवण्यांत आला, कीं क्वचित्च हक्क वाढविण्यांत आले. त्याच्या मोबदल्यांत देशी राजसभा* स्थापिली नाहीं, किंवा त्वां देशी-

* केसरे हिंद होऊन काय केलें आहे? व्यवस्था नीति तर जशाची तशीच आहे. देशीयांस कासावीस करणारा "आज हा कायदा आणि

यांची प्रीति आकर्षित करण्याकरितां नवा मोठा मार्ग खुला केला नाहीं. फक्त **केसरे हिंद** हें नाम धारण केलें! आणि शिक्क्यांत कोरलें!! पण त्याशिवाय लोकांस त्यांच्या हक्काच्या बाबतींत कोणता लाभ झाला? तुझी ही चपलता हिंदचे प्रिय-पुत्र समजलेच नसतील? ते तुझी शठता आणि कावेबाज-पणा ह्यांविषयीं मनांत विचारच करीत नसतील? आणि ते समजत असले, तर तुला नाहीं त्रास देणार? ते उठून तुझा धुव्वा नाहीं उडविणार? ते चैतन्यरहित जड तर नाहींत ना? ते जंगली आहेत? मूर्ख आहेत? का अज्ञान आहेत? नाहींच! तुझ्यासारखेच तेही मनुष्य आहेत. ते सगळें समजतात. त्यांची नीति ते चांगल्या रीतीनें जाणतात आणि त्यांत पुष्कळ चांगली उमेदही आहे. परंतु जोंपर्यंत वेळ आला नाहीं, तोंपर्यंत त्यांस असेंच दबलेलें, कुचंबत राहणें भाग आहे. ते सहनशील, विचारशील, मर्यादशील, वीरशील, व धैर्यशील आहेत. तशी शीलता दुसऱ्या कोणत्याही प्रजेंत अवलोकनांत येत नाहीं! नाहीं, ती **अमेरिकेंत** किंवा नाहीं ती

उद्यां दुसरा कायदा" हा टणत्कार देशीयांच्या कानांस फारच भयकर लागत आहे! कधींही त्यांस धारे आणि व्यवस्था समजविण्याचा प्रसंग आला नाहीं" असें एक अनुभवी अंमलदार म्हणतो. लार्ड **मेयो**नें म्हटलें आहे कीं, "**हिंदुस्थान**च्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत पुष्कळ हुशार लोक आहेत. आणि ते आपल्या राज्यकर्त्यांस सहाय्य करण्यास उत्सुक आहेत." पण सहाय्य घेण्यास कोण तयार आहे? सर डेविड **वेडरबर्न** म्हणतो कीं, 'नेटिव हॉऊस ऑफ कॉमन्स, स्थापन करणे, फार जरूरीचे होतें. परंतु केसरीहिंद झाल्यानंतर देखील कांहींच झालें नाहीं!!!

आफ्रिकेंत. आणि नाहीं ती **एशिया**च्या इतर लोकांत!! पण ते हेंही पक्कें समजून आहेत कीं, जोंपर्यंत तुझा सूर्य तेजस्वी आहे, तोंपर्यंत तुझ्या विरुद्ध कांहीं अवरोध करणें मिथ्या होय!!! कालाची मर्यादा असेल तोंपर्यंत तो सूर्य वाढेल, शोभेल आणि शेवटीं अस्तही पावेल! काळ येईल तेव्हां नित्याप्रमाणें सामसुम होईलच. ह्यामुळेंच ते निरांत बसून आपल्या तपोवृत्तीस घोंटीत आहेत. बाईग? **आर्य**पणा श्रेष्ठ होय. आणि ती श्रेष्ठता अजून त्यांनीं दवडिली नाहीं. तूं तुझ्या लाभाकरितां त्यांवर फारच हल्ले केलेस. दुसरी एक मोठी वहावी जात आहे! तिच्या पेक्षांही तूं फार कावेबाज पडलीस? तींस तूं दाबून टाकिलेंस! तरी तिला थोडेंसें वाईट वाटेल असें कांहीं केलें नाहींस! **भूतानाशीं** लढाई केलीस; तरीही ते बोलले नाहींत! तुझा प्रतिनिधी* अपमृत्यूनें मेला, त्याकरितां **हिंद** प्रजेला दुःख करण्याचें कांहींतरी कारण होतें? नाहीं! पण ती पडली सत्वस्थ! तिनें शोकवस्त्रें परिधान केलीं! हाहाःकार झाला!! दुखवटे झाले!!! तूं जें जें मागितलेंस तें तें तिनें दिलें. तुझ्या मोठ्या जाहीरनाम्यांत असें वचन दिलें होतें कीं, 'देशियांचे विद्या गुण पाहून त्यांस मोठे आणि चांगले हुद्दे† देण्यांत येतील!' तेंही वचन तूं पाळलें नाहींस.

---

*लार्ड **मेयो** पोर्टब्लेर येथें सन १८७२ ता० ८ फेब्रुवारीस मरण पावला!

†फक्त **औरंगजेबा**नें मात्र आपल्या धर्म भोळेपणानें, अभिमानानें आणि अविचारानें **हिंदु** लोकांचीं मनें कलुषित करून आपल्या प्रजेची अप्रीति संपादन केली होती. परंतु त्याच्या कारकीर्दीत देखील एका **हिंदूस** धर्माखातर मरण, कैद किंवा दंड द्यावा लागला असें झालेलें आढळत

तरीही पण त्यांना बोले सारखें नाहीं ! ! ! अस्मानी सुलतानी आफत येते, असें समजून ते अबोल राहिले ! आणि वैमनस्य होत आहे तरी, पक्षपात होताहे तरी, अन्याय होत आहेत तरी, अधर्म होत आहे तरीही, निर्दयता प्रदर्शित होत आहे तरीही कोणाचीच खरी मोठी ओरड बाहेर निघूं शकत नाहीं. इतकें झालें तरी तूं कोठें विचार करत्ये आहेस ?* हिंदचे लाखों पुत्र भुके तहानेनें

नाहीं ! किंवा त्याच्या राज्यांत पितरांचें श्राद्ध वगैरे करण्याच्या कामीं कोणाला अडथळा झाला ; असेंही आढळत नाहीं ! ! !

एल्फिन्स्टनचा इतिहास व्हा० २ पृष्ट ५५२.

* उदाहरणार्थ **अयोध्ये**च्या लोकां विषयीं स० १८८० त एच. सी. **इरवीन** आपल्या " गार्डन आफ इंडियेंत ३०७ पृष्ठावर लिहितो कीं, प्रजेचा समुदाय तर बहुतांशीं अर्धपोटीं असतो व तो वस्त्ररहित असून **आपलें** असें म्हणण्यास त्यापाशीं साधारणतः कांहींच नसतें ! ! ! "

हा प्रकार तेथेंच आहे असा अर्थ नसून अवघ्या **भरत** खंडांतील स्थिति तशीच आहे. सर रिचर्ड **टेम्पल** म्हणतो कीं, देशांत दारिद्र्यानें वास केला आहे. आणि उपासानें आपलें बीज रोपिले आहे ! व्यापार धंदा नाहीं, त्याचा नाश झाला आहे. तो सगळा **यूरोपियन** लोकांच्या हातांत आहे. ह्यामुळें त्यांची दुर्दशा झाली आहे. व्यापार धंदा कसा बसला ? ह्याविषयीं मिस्तर **इरवीन** लिहितो कीं, देशी राज्यांत मुख्य धंदे तीन होते. कापड काढणें, मीठ पिकविणें आणि दारु गाळणे. ह्यांतून पहिला धंदा **म्यांचेस्टर**च्या कर्माने पंगू झाला ! दुसरा कायद्याने बंद केला ! ! ह्यामुळे पुष्कळ लोकांचा उद्योग बुडाला. मिठाचा उद्योग बंद केल्यामुळे ४००००० रुपयांचें मीठ दरसाल बाहेरून या देशात येत असतें ! ! ! " धी गार्डन आफ इंडिया" पृष्ट ३०. इतकेही असतां एक ग्रंथकार लिहितो कीं, 'कूपर्स हिल कालेज' कां ठेविले आहे ? ईश्वर जाणे ! कारण त्यापासून **हिंदुस्थानास** सालीना ७३८३० रुपये खर्च येतो ! ! !

रखडत आहेत. पण तिकडे कोणी ही, कधीं तरीं लक्ष दिलें आहे का?* तुझे पुत्र सुखासनांत बसून महान् वैभव भोगून लीला लहेर करीत असतात! स्वतः कोणी वाजवी नीति जुमानित नाहींत! आणि दुसऱ्याकडून मात्र ती पाळली जाण्याचा यत्न करून "हितेच्छा आणि दया" या शब्दांवर जलांजली सोडितात! बरें, इतकेंही होऊन आणखी वाईट वासनेंत

---

* "हिंदुलोक झटले झणजे ते ध्यानी, अचंचल वृत्तीचे, बहुधा लढाईच्या कामीं भित्रे, स्वदेशाभिमानरहित, जाती भेदाच्या भानगडींत चूर झालेले, धर्माविषयीं संशयी, अर्धवट जंगली आणे संशयाने परिबद्ध झालेले असावयाचेच,!!!"

"फर्स्ट इंग्लिश मॅन इन् इंडिया."

"हिंदुलोक धर्मिष्ठ, मन मिळाऊ, गैरमाहितगारांचा सत्कार करणारे, विद्याज्ञानासक्तिसंपन्न, उमेदीनें कष्ट सहन करणारे, प्रीतिपूर्वक न्याय इच्छिणारे, एकांतवासी, काम करण्याविषयीं शक्तिमान्, कृतज्ञ, सत्यप्रिय, व आपल्या सर्व व्यवहारांत प्रामाणिक असे आहेत. त्यांचा **आर्य**पणा आपत्तिकालांत फारच शोभायमान् दिसतो! संग्रामांत थकण्याचा किंवा पिछे हट घेण्याचा त्यांना फार तिरस्कार आहे. त्यांतील वीर पुरुष इतके शौर्यसंपन्न आहेत कीं, जेव्हां लढाईंतील एखादा शेवट शंकित येतो, तेव्हां ते "**केसरिया**" करून आपलें शौर्य प्रगट करितात. व विजयमाला धारण करितात. आपले वडील आणि शिक्षागुरु यांस ते देवा प्रमाणें मान देतात. आणि **ईश्वर** प्राप्त्यर्थ आपले प्राण देण्यास ते बिलकुल मागें पुढें पहात नाहींत.

आईन, अकबरी.

हीं दोन्ही मतें तुह्मांपुढें आहेत. आतां यांतून विशेष बलवान् किंवा खरें कोणते? ह्याचा विचार वाचकांवरच सोंपविणें भाग आहे!

तत्पर असतात ते असतातच. मग हिंद पुत्रांचे हातांतील वर्तमान पत्रांची स्वतंत्रता मुसकुट दाबीच्या कायद्यानें हिराऊन घेऊन त्यांचे हात खालीं टाकिलेस? आणि काळ्याहून गोरा श्रेष्ठ-तीच देवता-असें मानिलेंस व मानविलेंस? असो; सारांश काय कीं, द्वेषभाव, इर्षा, तुच्छकार आणि अविनय हे तुझ्या अंमलदारांचे सद्गुण(?!) साधारणतः वाढतच चालले. आणि आतां तर त्यांची परिसीमा होऊन चुकली आहे! मला वाटतें कीं, आतां तुजविषयीं लोकांची अप्रीति झालीच पाहिजे. पार्लमेंटांत ज्या मोठ्या कडाक्याच्या धामधुमी होतात, त्या फुकटच्या फाकट शुद्ध मरणाचे वळसे होत. जणो, तेथें प्राचीन काळचें मोठें नाटकच होत असतें!* कोणा एकालाही हिंदुस्थानाविषयीं काळजी नाहीं. लोकांची व्यवस्था कोणत्या प्रकारची आहे? ती समजून घेण्यास थोडेच आतुर असतात. अभिमानानें प्रासिद्धीस येण्याची ज्यांस इच्छा असते; तेच बाहेर पडतात. आणि त्यांपैकीं अगदीं थोडे, थोड्याशा सत्यानें व प्रीतीनें काम करीत असतील तर कोण जाणे! पण त्यापासून कोणत्याही वेळीं फायदा होऊन हिंददेवीच्या पुत्रांचें कल्याण झालें आहे,

---

* ह्याविषयीं मि० जान ब्राइटचे स० १८७६ तील "धी टाइम्स" मधील भाषण पहा.

मि० ग्लाडस्टनचे शब्दही अगत्याचे आहेत. तो ह्मणतो. ह्या करितां १३ आगष्टच्या पूर्वी हिंदुस्थानच्या बजेटा विषयीं वादविवाद करण्यास आह्मांस फुरसत मिळत नाही. आणि तेरा आगष्ट ह्मटला ह्मणजे, पार्लमेंटाची सुरवात होऊन सात महिने झालेले असतात!

असा एखादा तरी दाखला असेल तर हे मानिनी ? मला दाखीव ?* कार्य किंवा अकार्य हें खरोखर केव्हांना केव्हां व्हायचेंच ! पण कोणत्याही रीतीची व्यवस्था म्हणून राहिलीच नाहीं !

* **हिंदुस्थानां**तील लोकांशीं आपलें कर्तव्य कर्म बजाविलें पाहिजे असें आमच्या मनांत येईल, तर त्या देशांतील चांगले व थोर लोकांच्या मदतीनें तें काम पार पाडितां येईल. **हिंदुस्थानांत** मुत्सद्दीपणा व बुद्धी ह्यांचें फारसे भांवडल नाहीं, असें समजणें मूर्खत्व होय. आपण फार अभिमान बाळगूं नका. **हिंदुस्थानांत इंग्रजी** राज्य कारभाराची पद्धति फार चांगल्या रीतीची आहे, असें आपण ह्मणतों; परंतु नेटिव लोक जर बारिक दृष्टीनें पाहून गुण दोष विवेचन करण्याचें मनांत आणितील तर **इंग्रज राज्य पद्धतींतील दोष त्यांस सहज दिसून येतील.**

सर स्टाफर्ड नार्थकोट.

ह्मैसूर विषयीं प्रश्न स० १८६७

युरोपियन लोकांस मांठे हुद्दे दिल्यामुळें ते पैशाचा संग्रह करून देश सोडून जातात. ह्याविषयीं **सर जान लॉ** लिहितो कीं, खर्चापेक्षां त्यांचा आदाय जास्त आहे. व आपली शिलक ते फार दूर देशास पाठवितात!

लॉर्ड **मनरो** लिहितो कीं, आह्मी जो कायद्यां विषयीं गर्व वाहतों, त्या आमच्या कायद्यांचा परिणाम हाच काय? कीं, स्वस्थता ठेवून लोकांस अशा दैन्यावस्थेंत लोटावें कीं, त्यांतील एक देखील विश्वासाचें व अधिकाराचें काम सोपण्यास योग्य होऊं नये? जर सरकारचा असा हेतु असेल की, त्यांजकडून बारिक सारिक कामां खेरिज, बाकी दुसरीं कामें घेऊं नयेत, तर प्रजेला अनहित कारक आणि आह्मांला घातक, अशी जी ही रीती आहे ती सोडण्याचा व उदार पद्धतीनें वागण्याचा हा समय आहे. **ब्रिटीश** सरकारचें धोरण आपल्या प्रजेची स्थिती सुधारावयाचे असल्यास, ते प्रजेला अधिकारांची व विश्वासाचीं कामें दिल्यावांचून कधींहीं दुसऱ्या कोणत्याच उपायानें सिद्धीस जाणार नाहीं. पण आज त्याची कोण स्मृति करितो आहे ? कोणी नाहीं !

हजारों लोक हक्कासाठीं आर्जवें करीत आहेत, विनवीत आहेत, प्रार्थना करीत आहेत. अग! तें राहूं दे. हात पसरून आणि तोंड वेंगाडून याचना करीत आहेत! पण तुझे कान उघडत नाहींत. तूं डोळ्यांवर कान पाडून बसत्येस! हे यशस्वी वीरनारी? हा प्रसाद तूं फार थोड्यांसच दिला आहेस!!! प्रजाप्रतिनिधिसमाज स्थापन करण्याविषयीं कित्येक मोठ-मोठ्या वीर पुरुषांनीं तुला सुचविलें असेल; परंतु तुला दाद कोठें आहे? ते म्हणाले होते कीं, "त्यांस जर आपण मोठमोठ्या हक्कांच्या आणि चांगल्या चांगल्या सुधारणेच्या लांबलचक गोष्टी सांगतों, तर ते हक्क त्यांस दिले पाहिजेत" परंतु हा काळपर्यंत त्यापैकीं तूं कांहींएक केलें नाहींस! *त्यांच्या इच्छेप्रमाणें कोणत्याही रीतीचा धारा केला नाहींस. रोजगारा विषयीं सवड करून दिली नाहींस. **ब्रिटानिये**? ज्यासाठीं लोक

---

* लार्ड **रीपन** प्रमाणें लार्ड **मेयो**नेंही ह्या देशाचे हित करण्याचें मनांत आणिलें होतें. तो थोड्यांतच म्हणतो कीं, जें जे मी करितों त्यांत माझा एकच हेतू आहे. **माझ्या मतानें हिंदुस्थानच्या लोकांशीं आमच जें कर्तव्य आहे, तें आह्मी केलें नाहीं. यूरोपियनां**-करितां कोट्यावधी रुपये आम्हीं खर्च केले आहेत! तो पैसा नेटीव लोकांस सुखी करण्यांत व त्यांना उच्च स्थितीस आणण्यांत खर्च करितां आला नसता काय? **** परंतु नेटीव लोकांच्या कामीं अधिक पैसा खर्चून व्याजाची रक्कम कमी केल्याविना, हा हेतू सिद्धीस जाणार नाहीं. *** **हिंदुस्थान**च्या लोकांस सुखी करावें हा आमचा मुख्य हेतू आहे. आणि येथें येऊन जर आम्हीं त्याचें सार्थक्य केलें नाहीं, तर आह्मी मुळींच इकडे न आलेले बरे!

प्रत्यहीं शंखध्वनी करीत आहेत! तरी तुला काय सांगू? तूं त्यांना चांगले हक्क दिले नाहींस. अग? जे हक्क **रशिया**सारखें जंगली राज्य **टर्कोमन**सारख्या लोकांस देण्यास उदार झालें*! तूं करभार कमी करून लोकांस निश्चित केलें नाहींस.† तर मग आतां सांग? लोकांची प्रीति तुजवर कां बसावी? कां त्यांनीं तुला महाप्रतापि समजून तुझा आदरसत्कार करावा? रोज रोज तुझे गुण कोणत्या रीतीनें आणि कशासाठीं गावे? प्रारंभापासून तूं त्यांचा सत्यानास करीत आली आहेस; आणि अजूनही तो तुझा रोजगार बंद झाला नाहीं! अजून तुझें दैव चांगलें. लोकांत जरी असंतोषाची चीड पसरली आहे,‡

---

* **रशिया**नें गव्हर्नर शिवाय सगळे हुद्दे **टर्कोमन** लोकांस दिले आहेत. परंतु **हिंदुस्थानां**तील सगळे मोठे हुद्दे परदेशीयांच्या हातीं आहेत!!!

† इनकम टॉक्स हा, **हिंदुस्थान**च्या दारिद्र्याची साक्ष देत असून तो बसविण्याचा हेतुही सिद्धीस गेला नाहीं. ही गोष्ट पौंडा मागें अडीज पेन्स म्हणजे शेंकडा १ रुपया कर बसविल्यानें ५,०००,००० रुपये उत्पन्न होतील, ह्यावरूनच सिद्ध होत्ये. आणि येथें ज्यांस कर द्यावा लागत नाहीं, त्यांच्या उत्पन्नावर तो कर (हिंदुस्थानांत) बसतो. ***** हा टॉक्स बसवूं नये असें जे **फासेट** म्हणतो, तें निराळ्या; परंतु सबळ कारणानें म्हणतो. आणि तें कारण इतकेंच कीं, **हिंदुस्थाना** सारख्या गरीब देशांत कराच्या कहरामुळें उद्योग धंदे मागें पडत जातील.
आन० **फासेट** पोलि० एको० चें पृष्ठ ५३७

‡ "हॅन्सर्ड" पृष्ठ १०७५ पहा. ही एक सर्वोत्तम सल्ला आहे. पण तिचा अंमल कोठें आहे?

तरी त्यांतून निघण्याचा उत्साह अजून त्यांस आला नाहीं!! नाहींतर आजला ते तुला पाहण्यासारखें चांगलें करून दाखविते असते!!! अजून असंतोष पूर्णपणें व्यापला नाहीं, इतक्यांतच त्याचा उपाय होण्यासारखा आहे. आतां तुझी इच्छा कसें वागावयाची आहे, तें मला सांग?* उपाय अजून हातांत आहे. कारण हिंदचा असंतोष अद्यापि तोंडचाच आहे.† तो जोंपर्यंत हातांनीं होऊं लागला नाहीं, तोंपर्यंत सगळे उपाय आबाद होतील. पण एकदां अंतःकरणांत प्रेतरूपी शत्रु फैलावला, म्हणजे तूं योजिलेलें कांहींच होण्याचा संभव देखील राहणार नाहीं!!! मग तूं चांगली चांगली फौज आणशील. परंतु तिचें निरर्थक निकंदन होऊन जाईल! या हिंदचा प्रताप तूं कमी समजूं नकोस! बाई? ती आज तुला गरिब व दयाळू दिसते आहे. तिच्या शरीरावर फाटकीं तुटकीं वस्त्रें आहेत. तिचा मुगूट ढळलेला आहे. तिच्या

---

* **हिंदुस्थान**च्या देशी सैन्यांत सरकाराविषयीं फार असमाधान झालें आहे. ह्याचें कारण त्यांतील नोकरांचा पगार थोडा असून त्यांस सुभेदारांपेक्षां मोठी जागा मिळण्याचा मार्गच नाहीं.

लार्ड **रेन्डाल्फ चर्चिल**चें स० १८८५
तारीख १५ मेचें भाषण.

† "यूरोपियन व नेटिव ह्या दोन्ही वर्गांच्या लोकांत असंतोष आणि अस्वस्थता फैलावली आहे. ह्याचें कारण कितिएक वर्षे नेहमीं करांचीच वृद्धि होत चालली आहे, हें होय! माझ्या मतें अशीं मनें असण्यापासून राज्य व्यवस्थेस भीति आहे. ह्या भीतिविषयी जितकें लिहावें तितकें थोडेंच"!!! **भरत** खंडाचा चौथा व्हाईसराय जो लार्ड **मेयो** त्याचे हे फार महत्वाचे शब्द होत.

तोंडावर पाणी दिसत नाहीं. आणि ती केवळ गाई प्रमाणें सौम्य वाटते आहे. परंतु ती कांतीनें **चंद्रा** सारखी, वेगानें **वायू** सारखी, स्थैर्यानें **मेरु** सारखी, क्षमेनें **पृथ्वी** सारखी, तेजानें **सूर्या** सारखी, लक्ष्मीनें **कुबेरा** सारखी, शौर्यानें **इंद्रासारखी** व बलानें **विष्णु** सारखी आहे,—समयीं त्यांपेक्षांही श्रेष्ठता दाखविण्या सारखी आहे! असें झटलें तरी चालेल. ती जेव्हां रोषांत येईल, तेव्हां तुला हैराण हैराण करील! आणि त्यामुळें तूं दुनियेंतील कोणत्याही अधमाधमापेक्षां अधम स्थितींत येशील!!! **स्पेन, पोर्तुगाल, इताली** व **ग्रीस** हीं गणतींत तरी राहिलीं आहेत. पण तुझी दाद देखील लागणार नाहीं. तुला जर खरोखर आपलें कल्याण* करून घ्यावयाचें असेल, झणजे फलार्थी होऊन वृक्षास विफल होऊं द्यावयाचें नसेल; तुझी स्वतःची श्रेष्ठता राखावयाची असेल; शुद्ध न्यायानें हिची खरी प्रीति संपादन करून घ्यावयाची असेल; बिघडणारा डाव सांभाळावयाचा असेल; सुधारावयाचा असेल आणि तूं असें झटलें होतेंस कीं, "प्रजेची चढती कळा हें आमचें बळ, तिचा संतोष हा आमचा निर्भयपणा, व तिची कृतज्ञता हें आमचें उत्तम यश राहील! लोकांच्या कल्याणा

---

* **इंग्रज** सरकार सर्व लढायांच्या खर्चाचा एक भाग **हिंदुस्थानावर** लादीत असतें आणि त्याला तें असें कारण दाखवितें कीं, **हिंदुस्थानचा** सुरक्षितपणा त्या लढायांवर अवलंबून आहे! परंतु ह्यामुळें त्याचा अन्यायीपणा व आपल पोटेपणा दाखविण्याची संधी नेटिव्ह वर्तमान पत्रांस मिळते!

रे० डे० ह्यु० **मांडीस** १५ जून सन १८८५.

करितां ह्या आमच्या इच्छा पार पाडण्यास तो सर्व शक्तिमान प्रभू आह्मांस आणि आमच्या हाता खालील सत्ताधिकाऱ्यांस शक्ति देवो." हें वचन जर सत्य करावयाची इच्छा असेल; **इंग्लंड** तुला जुनें **कार्थेज** करावयाचा हेतु नसेल; आणि **भरत** खंडास **स्पेन** बनविण्यास चहात नसशील, तर तूं असें करण्याचें वचन दे कीं, ज्या पासून तूं आणि **हिंद** यांत जो विराग उद्भवला आहे, कलहाचें जें मोठें बीजारोपण झालें आहे, तें, व ज्यामुळें देशांत एकानें दुसऱ्यास पाहिलें ह्मणजे वैरज्वाला निघत्यत त्या बंद होतील.* देशी लोक सर्व रीतीनें शांत होऊन तुझ्या अधिराजास मान देतील. तुला पुष्पवृष्टीनें भरून काढितील. चौखंड पृथ्वींत तुझा जयघोष गाजून राहील. आणि "जय" "जय" असे मोठे ध्वनी होतील! अशी आपण योजना करूं. स्मरण ठेव. हें सर्व ह्या कानानें ऐकिलें आणि त्या कानानें सोडून दिलें; असें करण्यापेक्षां एक निश्चयानें वागण्यांत फार मोठें शहाणपण आहे. एतदर्थ कोणताही निश्चय करून आग्रह धरण्यापूर्वी, त्याचा शेवटील परिणाम पहावा हें चांगलें. तसेंच तूं हेंही विसरूं नकोस कीं, "**भरत** खंडाच्या प्रजेचें कल्याण, सुख व वैभव तेंच इंग्लंडच्या प्रजेचें कल्याण, सुख व वैभव आहे." **इंग्रजां**चा धन लुब्धपणा, अविनय, व पशुतुल्य गणना, जर या **भरत**खंडाविषयीं होऊं लागलीं तर हें

* हें प्रकरण लिहिलें, तेव्हां **भरत** खंडात "इलबर्टाविला" च्या संबंधानें झगडा चालला होता. आणि त्याचें हें वास्तविक चित्र आहे.

इंग्लंडास क्षुधापीडित करणारें आणि दुःख शोकाचें कारण होईल.* तसेंच हेंही ध्यानांत ठेव कीं, असाही वेळ येईल! हे मदाभिमानिनि **ब्रिटानिये**! तूं जर दुराग्रह धरिशील, तर मी हिंदला सर्व रीतीनें सानुकूळ होऊन मोठ्या वैभवास चढवीन. कारण तिचें दुःख मला फार डांचत आहे. मी पांच हजार वर्षांत तिचें कधींही रक्षण केलें नाहीं! मी इतकी निष्ठुर कशी झाल्यें? हाच विचार मीं करीत आहें! शेवटीं इतकें तरी विसरूं नकोस कीं, युद्ध कुशलता दर्शविणें—राज्य लोभानें महान् राज्यें पायमाल करण्याचें मथन करणें—ह्यांत बिलकूल पुरुषार्थ नाहीं. तशा मथन करणाऱ्यांचीं राज्यें कधींही चांगल्या स्थितींत आलीं नाहींत. आणि येणार देखील नाहींत! अति शहाणपण करूं जातां अति नुकसान न व्हावें; ही तुला माझी शेवटची मोठ्या सावधगिरीची कुशल सूचना आहे. तुझ्या चांगुलपणांत सर्वांचें चांगलें आहे!"

स्वतंत्रता देवी फार गंभीरतेनें आणि प्रौढतेनें पाहूं लागली, तिनें आपला फक्कड बावटा मोहक रीतीनें फड फड उडवीत नृत्य आरंभिलें. तेव्हां **ब्रिटानिया** शांत होती, ती दिग्मूढा प्रमाणें झाली. तिला कांहींच बोलण्याची हिंमत होईना! जो मोठा लांबलचक इतिहास **स्वतंत्रतेनें** सांगितला, तो तिच्या छातींत वज्रबाणाप्रमाणें रुतून राहिला! आणि जणों, तिचीं दशेंद्रियें नाहींतशीं व्हावीं? किंवा चैतन्य विना स्थूल

* "**ब्रिटीश** इंडियांतील जाती आणि त्यांचा इतिहास."
व्या० २ पृष्ठ ३७२.

उभें असावें तशी प्रेत सम जड वृत्तीनें ती उभी आहे, असें वाटूं लागलें! त्या सत्य भाषिणी देवीच्या अमूल्य इतिहास कथनानें हिंदच्या मनांत नानातऱ्हेचे विचार येऊं लागले. आणि ती मनांत म्हणूं लागली कीं, इतका जो सर्व इतिहास महादेवी **स्वतंत्रतेस** माहीत होता, तो समजून घेण्याची मला कधींही सवड मिळाली नव्हती! यावरून ही किती प्रबल असावी? जिनें या **ब्रिटानिया**ची एका क्षणांत लोण्याप्रमाणें नरम स्थिती केली! ती किती शक्ति धारण करीत असेल? कोण जाणे!!!

बराच वेळ निघूंन गेला. तरी **ब्रिटानियेस** बोलण्याची हिंमत होईना! तिला कांहींच सुचेना. आपण आतां कोणता मार्ग धरावा? ह्याच घोंटाळ्यांत ती पडली. परंतु अजून तिच्या मनांतील गर्व दूर गेला नव्हता; ह्यामुळें असो, अथवा **स्वतंत्रता** आणखी कांहीं सांगते कीं काय? ह्या विचारांत ती असल्या कारणानें असो; तिनें प्रश्नकर्त्याच्या रूपानें म्हटलें:— "देवी तुझ्या सांगण्या वरून मी पुष्कळ समजल्यें. तूं खरीं कारणें दाखविलीं आहेस; हें मी कबूल करित्यें. परंतु ह्या भिकारड्या हिंदला जर तूं आश्रय देणार नाहींस, तर फार चांगलें होईल! कारण, इच्यांत यत्किंचित् देखील शक्ति नाहीं! मी म्हणतें. हिला सहाय करण्याची तरी तुला काय इतकी गरज पडली आहे? आमचा कलह आह्मीं दोघी पाहिजे तसा मिटवूं. त्याची भानगड तुला व्हावी कशाला?"

"नाहीं, नाहीं, तें तुझें ह्मणणें मुळींच चालावयाचें नाहीं, जर तसें असतें, तर इतका काळ कां जाता असता? कधीं नाहीं!" धिःकारानें **स्वतंत्रता** ह्मणाली:—"जर तुह्मीं दोघीही समंजस असतां, तर मी आल्येंच नसत्यें, **हिंद** इतकी रडती नसती आणि तुला बोलावयासही कारण मिळालें नसतें! माझ्याच नशीबांत या विग्रहाचा निकाल करावयाचा आहे, तो मला करूं दे. मीं काय करूं? मूर्ख, नादान! अजून समजत नाहींस! तुला गडदापेंच करून अशी चिरडून टाकीन कीं, त्यांतून उठण्यास तूं कधींही समर्थ होणार नाहींस. तूं काय समजली आहेस? **हिंद** काय करूं शकेल? हें तूं विचारूंच नकोस! हिनें जितकें केलें आहे, तितकें कोणीं पाहिलें देखील नसेल!! आणि कोणा करणारही नाहीं!!! तूं मला असें विचार कीं, **हिंदराणी** करूं शकणार नाहीं असें काय आहे! तूं काय समजत्येस! हा विषय तुझ्या समजुतींत येण्याकरितां मी मोठीं तीन ऐतिहासिक उदाहरणें तुला थोड्यांत सांगत्यें, ह्मणजे तूं आणखीही चांगली शुद्धीवर येशील! कारण अजून मला पुष्कळ करावयाचें आहे. तूं फार नम्र आणि प्रेमवचनें बोलण्यांत काय ती चतुर आहेस, हें मला माहीत आहे. परंतु तुझा आत्मा लोखंडाचा आहे! ह्यामुळें जी खऱ्या उपयोगाची व हितकर गोष्ट आहे, ती तुला समजत नाहीं; ह्मणून तुला आतां ताळ्यावर आणिलें पाहिजे. पुष्कळ काळपर्यंत देवतांनीं तुझा पक्ष धरिला होता; परंतु त्यांनीं आतां तुला चांगलें ओळखलें! त्यांस माहीत झालें कीं, तूं आजपर्यंत कोणाचीही

झाली नाहींस; एतदर्थ मला आतां जास्त खिजवूं नकोस. आणि फार बोलून तुझें वजन घालवूं नकोस! मी निश्चय केला आहे कीं, तुझी आणि हिची सुटका करावी आणि तुझ्या विषयीं माझ्या मनांत जो मान आहे, तो सारखा राहील असा विचार कायम राहूं द्यावा. तूं जशी सत्ता आणि ऐश्वर्य वाढविण्याचा लोभ धरून साऱ्या दुनियेंत धुमश्चक्री उडवून दिलीस, त्यापेक्षांही जास्त अंदाधुंदी पूर्वापार हिंदचे मोठे यशस्वी तनुज करीत आले आहेत!! हें तुला कोठें माहीत आहे?—तरी मोठ्या योद्धयाचें शौर्य व पराक्रम तुजमध्यें अजून आले देखील नाहींत!—अथवा असले तरी क्वचित्च दिसतात, आणि ह्या हिंदराणीमध्यें निरंतरचाच तसा प्रदीप्त अग्नि पेटत राहिला आहे. सहस्रार्जुन, रावण, कंस, व दुर्योधन हे महान् समर्थ पुरुष मानिले आहेत. पण कसल्या कर्मांत समजलीस? आपल्या प्रजेस पीडण्यांत, सर्व रयतेला त्रास देण्यांत, अष्ट दिशांस आपला गौरवप्रताप दर्शविण्यांत केवळ मदोन्मत्त आणि निरंकुश राहून दुसऱ्यावर जुलूम करण्यांत, वैभवाकरितां यथेच्छ मनसोक्त वर्तन ठेवण्यांत, उद्धटपणा, अहंकार, खटपट, प्रमाद, आणि नादानी करण्यांत. फार काय? भयंकर आणि असह्य कर बसविण्यांत, सुंदर आणि अति कोमल स्त्रियांचें हरण करून आपल्या जनानखान्यांत त्यांस कोंडून ठेवण्यांत, गोब्राह्मणप्रतिपालनाविषयीं न्यूनता दाखविण्यांत, देशाच्या कीर्तीची हानी करण्यांत, नीति अनीति, लाभ हानि, व सारासार विचार न करण्यांत, ऋषि आणि मुनी-

केवळ आपल्या तपोबळाच्या आधीन असणारे लोकांकडून कर घेण्यांत; आणि सर्व रीतीनें राजमूर्खत्व दाखविण्यांत त्यांचा हातधरणारा कोणी नव्हता. बाई? ते ज्या युक्ति प्रयुक्ति योजीत असत, त्यांचें दुःख दीर्घ काळपर्यंत लोकांस सहन करावें लागत होतें. ह्या सर्व राजांनीं-तामसी-वृत्ति वाल्यांनीं-असें मनांत आणिलें कीं, आतां आपला प्रतिस्पर्धी या पृथ्वीवर कोणीही माईचा पूत राहिला नाहीं! ह्यामुळें त्यांनीं जें जें मनांत आणिलें, तें तें बहुतांशांनीं सिद्धीस नेलें. कारण, ते जें करीत, त्याविषयीं त्यांना विचारणारा किंवा पुसणारा कोणीच नव्हता! परंतु सर्वांला अवधि असत्ये. बाई? काळ हा कोणालाही आपल्या तडाक्यांतून जाऊं देत नाहीं. तो जेव्हां येतो, तेव्हां सर्वांची राख रांगोळी उडवितो! तेव्हां त्याला एका क्षणाचाही अवकाश लागत नाहीं. **सहस्रार्जुनाला** इतका अनिवार मदातिशय झाला होता कीं, एका ब्राह्मणस्त्रीवर त्यानें कुदृष्टि केली, आणि त्या ब्राह्मणाचें धन हरण केलें; परंतु **परशुरामाच्या** हातून त्याचा एका क्षणांत निःपात झाला! **रावणानें** ब्राह्मणांकडे कर मागितला.* पण मला तूं सांग! ते काय देणार?

---

* रामायणांत ही गोष्ट प्रसिद्ध आहे. **रावणाने** सर्वांकडून कर घेतला अाणि गर्वातिशयानें ब्राम्हणांकडूनही कर घेण्याचें मनांत आणिलें. तेव्हां त्यांनीं आपल्या तर्जनींतील रक्तानें घडा भरून तो घडा त्याच्या अनुचरांजवळ दिला. तो पाहतांच **रावण** फार चरकला! त्याला वाटलें कीं, हें महाअनर्थास निमित्त होईल! तेव्हां त्यानें आपल्या अनुचरांस सांगितलें "हा कलश नेऊन कोठें तरी पुरून

त्यांच्याकडे वनवृक्ष आणि वनवास! यांशिवाय काय संपत्ति होती? परंतु त्या गर्विष्ठ **रावणाला** कांहीं तरी पाहिजेच होतें. ह्या करितां त्यांनीं आपल्या तर्जनींतून रक्त काढून तें त्याकडे पाठवून दिलें; आणि त्यामुळेंच त्याचा क्षय झाला! **रावणाचा** प्रत्यक्ष दासानुदास जो **इन्द्र**, त्यानें जेव्हां त्याच्या दुर्दशेचा समय आला आहे असें पाहिलें; तेव्हां आपला सारथी आणि रथ पाठवून **रामास** आश्रय दिला! आतां पहा म्हणजे झालें! **कंस**ही तसाच अहंकारी होता, आणि **दुर्योधनाचा** गर्व व जुलूम ह्यांत कोणत्याच प्रकारची न्यूनता नव्हती!! परंतु जेव्हां का त्याची पडती कळा आली, तेव्हां त्याच्याही विरुद्ध मोठमोठे प्रबलप्रतापसंपन्न राजे झाले! असो—या सर्वांवरून इतकें स्पष्ट होत आहे कीं, **आर्य**प्रजा केवळ सहिष्णु आणि नीतिबलावर विश्वास ठेवून चालणारी आहे. पश्चिमवासी जनाचें कसें असतें?—ते हमेशा आपलें बळ घुमण्यांत आणि मथन करण्यांत दवडितात. परंतु **आर्य** पुरुष तसें करीत नाहींत. हें समय येईल तेव्हां तुला कळेलच. मीं आतां फार पाल्हाळ करीत नाहीं. पण अर्वाचीन ऐतिहासिकदृष्टांत जवळच आहेत. **औरंगजेबानें** हिंदुलोकांस बाटवून सर्वांची सूनत करण्याचा विचार केला होता; तेव्हां एकटा **शिवाजी*** निघाला, त्या स्वदेशैकनिष्ठमहत्पुरुषाची आशा

टाका.” त्याप्रमाणें त्यांनीं केल्यावर त्यापासून **जानकी**ची उत्पत्ति झाली. आणि तिजपासूनच **रावणा**च्या सर्वकुळाचें निकंदन झालें।

* **शिवाजी** आणि **गुरुगोविंद** मुसलमानांविरुद्ध उठले होते. गुरु-

कोणा एकाला देखील नव्हती. असें झटलें तरी बाध येणार नाहीं ! त्याप्रमाणेंच थोडक्यांत तूं आपल्या विषयींही समज झणजे झालें. तूर्त जरी तुला सगळे सातव्या असमानांत चढवून तुझे ताबेदार बनले आहेत; तरी जेव्हां तुझी संपूर्ण प्रकारें पडती दशा येईल, जेव्हां तुझ्या पातकाचे घड भरतील, जेव्हां तुझा अवधी संपेल, जेव्हां तुझा अवनतिकाल प्राप्त होईल, तेव्हां हेच तुझी फुकटची प्रशंसा करणारे लोक, तुझ्या विरुद्ध होतील ! जय मुगुट धारण करून गमतीनें चेष्टा करण्याचाच तूर्त तुझा प्रसंग आहे ! बंदे गुलाम हटकून—आणि तेही तुझा असा तोंडपुजा स्वभाव ओळखून—तुझी स्तुति गाऊन तुला मोह उत्पन्न करिताहेत; परंतु प्रसंग येईल तेव्हां, तेच स्तुति-पाठक मुगुट फेंकून देण्यास कधीं चुकणार नाहींत ! बिलकुल वेळ लावणार नाहींत. ह्या मोहाच्या तेजांत तूं गर्क होऊन निर्भयपणानें असें मानून बसली आहेस कीं, मला आतां कोणी शत्रू नाहीं. पण जेव्हां समय येईल, तेव्हां हें सर्व विपरीत भासेल ! हें खूप ध्यानांत ठेव. अग ? अमेरिकनांचें उदाहरण तुझ्या डोळ्यांसमोर ताजें ढळढळीत आहे ! कीं, विसरलीस ? तूं अजून देखील भुलावा खाऊन तुझें राज्य स्वच्छ, स्वतंत्र व तेजस्वी करावयाचें सोडून देऊन, त्यांत घाणेरडेपणाची भर घालीत आहेस ! याहून तुझी विचार-

---

गोविंद हा **शीख** राज्याची स्थापना करणारा होय. आणि **महाराष्ट्र**राज्यसंस्थापक **शिवाजी**विषयीं इतिहासज्ञांस सविस्तर वृत्तांत अवगत आहेच.

शून्यता दुसरी काय पाहिजे? आणखी मूर्खत्वाला काय शिंगें असतात? ह्याहून जास्त खराबपणा कोणता सांग बरें? कोण याला सावधनीति म्हणेल? **जलशानें कैसरिया** करून घेतलेंस, आणि तुझ्या समक्ष पुष्कळ देशीराजांनीं मुजरा केला. यावरूनच तूं असें मानीत आहेस काय? कीं, तूं निष्कंटक राज्य चालविलें आहेस? हेच तुझे विचार तुझ्या जयचंद्रास कलंकयुक्त करितात, आणि ह्याच तुझ्या पोरकट नीतीनें तुझ्या राज्याचा अंत होईल! देशी राजांप्रमाणें करणारी होण्यास तुला अजून पुष्कळ करावयाचें आहे. त्यांतील लेशभर देखील विचार तुला रुचत नाहीं, हें पाहून तुझ्या दीर्घदृष्टीविषयीं फारच हलकें मत उत्पन्न होतें! मी जरी **हिंद**ला आश्रय दिला नाहीं, तरी ती कोण्हांना कोण्हां तरी बाहेर पडेल-मग ती लौकर पडो, किंवा उशीरानें पडो! ही नुस्त्या आशेवर टपत बसावयाची नाहीं. बाई? तशी हिला संवयच नाहीं! मला या कलहांत मध्यस्थी करण्याचें कारण इतकेंच कीं, जेव्हां प्रथम तूं या देशांत आलीस, तेव्हां **हिंद**ची छाती यवनांनीं रोधिली होती! तुला माहीत आहेना? हिचा श्वास घोंटाळत होता. तेव्हां मला वाटलें होतें कीं, तूं जात्ये आहेसच. हिला सावध करून एखाद्या नीतीला अनुसरून चार इकडच्या तिकडच्या बोधाच्या गोष्टी सांगून हिची त्या संकटांतून मुक्तता करशील व मला आपोआप बोलावशील.—माझा आदरसत्कार करिशील.—पण तूं पडलीस छपन्नबालंटी. तूं तें सारेंच ठेविलेंस एका बाजूला! जसें **अमेरिकेंत** केलेंस तसें येथें करूं लागलीस? "हम

बडे भाई, हम बडे भाई" तसें आपलेंच गुणगान करूं लागलीस? अमेरिकेनें मला खासगींत प्रथम विचारिलें कीं, मदत मिळेल? मी "होय" म्हणतांच तुझी बुद्धि लटपटली*. असो,

---

* **जार्ज** धी थर्डच्या वेळीं **अमेरिका** स्वतंत्र झाली. **इंग्लंदां**तून धर्मसंबंधाच्या दुःखानें परिपीडित झालेले लोक, तेथें जाऊन राहिले होते; आणि **इंग्लंड**चें पार्लमेंट तेथें गव्हर्नर पाठवीत असे. परंतु मागाहून **इंग्लंडा**नें सर्व सत्ता हातांत घेण्याचा विचार चालविला! आणि त्या लोकांवर कर बसविण्याची गोष्ट पार्लमेंटांत निघतांच, त्या स्वतंत्रता इच्छिणाऱ्या लोकांस तें आवडेनासें झालें. तेव्हां शेवटीं **इंग्लंडा**नें त्यांकडे इतकें मागितलें कीं, "चहावर तरी कर बसवूं द्या." तेंही त्या लोकांनी नाकबूल केलें! **अमेरिकनां**नीं (**बोस्टन** वाल्यांनीं) चहाचें गलबत बंदरांत आलें कीं, त्यावरील चहा समुद्रांत फेंकून देण्याचा सपाटा चालविला. ही उन्मत्तता **इंग्लंडा**स न सोसून त्यानें त्यांचें कायदे कौन्सील काढून टाकण्याचा प्रयत्न केला. ह्या नियमास अमेरिकेंतील तेरा संस्थानवासीयांनीं "प्रोटेस्ट" दिला, परंतु तो **इंग्लंडा**नें मान्य केला नाहीं. यामुळें इ० सन १७७५ त लढाई सुरू झाली. **अमेरिकनां**नीं नवीन नवीन सैन्य तयार केलें. आणि पुष्कळ लढाया दिल्या. शेवटीं **वाशिंगटन** नामक महापुरुषानें स० १७७६ च्या मार्चांत मोठा जय मिळविला. आणि **अमेरिका** अगदीं स्वतंत्र झाली! सन १७८२ त ही लढाई बंद झाली. आणि **इंग्लंडा**नें आपलें महत्व घालविलें! अमेरिकन लोकांनीं **इंग्लंड**ची समजूत करण्यास कोणत्याही प्रकारची कसूर केली नव्हती. परंतु त्यापासून कांहींच उपयोग झाला नाहीं. आज काल दुनियेंत सर्व राज्यांपेक्षां **युनायटेड-स्टेट्स**चें शांति राज्य सर्वोपरी शोभून राहिलें आहे!

तेथें तूं पाय मात्र ठेविलास त्या बरोबर जुलूम करूं लागलीस, कर बसवूं लागलीस, द्रव्य हरण करूं लागलीस, राजसत्ता स्थापन करण्याचा हेतू धरिलास, आणि माझ्या, अग? स्वतंत्रतेच्या नांवावर शून्य घातलेंस! काय वाई मूर्खत्व हें! ते अमेरिकन काय वेडेच होते? त्यांच्यानें कसें बरें स्वस्थ बसवेल? सर्वत्र उठले आणि सर्वोपरी राजाच्या मोठ्या श्रीमंत कर्त्याहर्त्या सत्ताधिकाऱ्यांस जागृदावस्थेंत आणून जेव्हां त्यांनीं तुझा पाठारा उडविला, तेव्हां कोठें तूं स्वस्थ बसलीस! पण हिंदुस्थानच्या लोकांची प्रकृतिच निराळ्या तऱ्हेची! आणि त्या लोकांची निराळ्या तऱ्हेची. ह्यामुळें हे मनाच्या मनांत जळफळून तुझा धिःक्कार करीत आहेत. तरीही तोंडानें बोलण्याची हिंमत धरीत नाहींत!! ह्मणून कांहीं बरें!!! नाहींतर, माझा धर्मच आहे कीं, ह्यांना मी साह्य करावें. एतदर्थच मी येथें आल्यें आहें. माझें दुसरें कांहींएक काम नव्हतें. आणि असतें तर तें देखील जेथच्या तेथें ठेऊन मुद्दाम इकडे आल्यें असत्यें! असो; माझा हेतू पार पडिल्याशिवाय मी कधींही जाणार नाहीं. जर तूं माझें सांगणें ऐकिलेंस, तर सुटलीस! नाहींतर बघ मग? तुला मी कीर्तिमान् करीन; आणि माझें ऐकिलें नाहींस तर, दंड करण्याविषयीं बेधडक असा नियम योजीन कीं, तूं तुझें चटूसारें विसरून जावेंस! हिंदला आजपर्यंत पुष्कळ दिवस तूं चमकाविलें आहेस, पुष्कळ वेळ ठकविलें आहेस, तसें यावेळीं मी तिला फसवूं* देणार नाहीं. तूं

* इंग्लंडानें पुष्कळ अभय वचनें हिंदुस्थानास दिलीं आहेत. परंतु

आतां इतकें स्मरण ठेव कीं, मी जी आज आल्यें आहें, ती केवळ तुला सल्ला देण्याकरितां आल्यें आहें. ह्मणजे तुझी शत्रु ह्मणून आल्यें आहें, असा अर्थ नाहीं. तर सखी ह्मणून आल्यें आहें. जितकें मला हिंदविषयीं वाईट वाटतें, तितकेंच तुजविषयींही वाटतें—तूं या देशाला स्वस्थतेंत आणिलें आहेस. कितिएक बाबतींत लोकांना पुढें नेलें आहेस, हें खरें. त्याचा मोबदला जोंपर्यंत तुला मिळाला नाहीं, तोंपर्यंत त्वां हिजपासून दूर व्हावें; असें करण्याची माझी इच्छा नाहीं. हिंद पुष्कळ बलिष्ठ आहे. तुझ्या हातांतील वस्तु जाऊन आणि त्या घेऊन ही आनंद पावणार नाहीं! हल्लीं तूं राजकाजांत निपूण व चतुर झाली आहेस, जरी कधीं कधीं तूं भेद प्रपंच करित्येस, तरी ते अद्यापि अगदींच नादान झाले नाहींत! एवढ्या करितांच तुला सांभाळावी, असा माझा कल्याणकारक हेतु आहे. हें मी तुला खऱ्या ममतेनें कळवित्यें. विचार करून उत्तर दे."

"ठीक! तेव्हां तुझा मुख्य हेतु हाच आहे वाटतें? माझी सर्व सत्ता हिसकावून घ्यावी; आणि मला निराधार करावें?" **ब्रिटानिया** एखाद्याला अतिशय दुःख होतें, आणि तो जसा गरिब होतो, त्याप्रमाणें होऊन दीनवाणीनें ह्मणाली. "पण हे सखी **स्वतंत्रते**! तूं इतकें ध्यानांत ठेव कीं, जिच्या साठीं तूं

त्यांतील बहुतेक हवेंत उडून गेलीं.! पार्लमेंटांत बसण्याचा हक मिळाला नाही; तरी राहो, पण सिव्हिल सर्व्हिसमध्यें दाखल करण्याचें, प्रजेला अनुकुळ होतील असे नियम करण्याचें, यथार्थ न्याय करण्याचें, इत्यादि थोडींच वचनें पाळलीं आहेत!!!

'बालिस्टरची' पदवी घेउन काम चालविण्यास आली आहेस ती अशी नाहीं कीं, एखाद्या दिवशीं तरी तुझ्या श्रमाचें सार्थक्य करील! माझें असें मत आहे कीं, तुला जी ही आशा आहे, ती अगदीं व्यर्थ आहे! माझ्या हातून सत्ता घेतल्यानंतर ती हिच्या हातांत रहावयाची नाहीं. कोणी दुसराच तिचा भोक्ता निघेल. कारण, बाई? हिचा राजसत्तेविषयींचा उद्देश फार खराब आहे!"

"तूं सांगत्येस त्यांत खोटें थोडेंच आहे." स्वतंत्रतेनें खुलासा केला. "माझें असें ह्मणणेंच नाहीं कीं, तुझ्या सत्तेचा अनादर करावा; अथवा ती काढून घ्यावी! माझा हेतु असा नव्हता; आणि आंतां झालाही नाहीं. माझा उद्देश इतकाच आहे कीं, तुझ्या राजरचनेंत सुधारणा करावी, तुझ्याविषयीं हिंदची जी अप्रीति झाली आहे; आणि तिला देशहितानें जें विशेष साह्य केलें आहे, त्याला चार बोधाच्या गोष्टी सांगाव्या. तूं असें पहा? तिचे पुत्र तुला खाऊं धांवताहेत, आणि तुझे पुत्र तिच्या पुत्रांचा धिःकार करिताहेत! खरें कीं नाहीं? ह्या सर्वांतील वसवसा, वैरभाव, असंतोष, वैषम्य दूर करावें. आणि सर्व ठिकाणीं जी अव्यवस्था झाली आहे ती घालवून शांति परिप्रसृत करावी! हाच माझा हेतू आहे. आतां काय? तुझा हेतु सुधारणा करून शांतीनें राज्य चालविण्याचा आहे किंवा नाहीं? स्थिती व प्रसंग समजला असून, लोकांच्या अरुची विषयीं ज्ञान झालें असून, त्यांची वृत्ति बदलली आहे, हें तुला माहित असून; तूं असाच नेम केला आहेस काय?

कीं, दुराग्रहानें हट्टास पेटून करडेपणा व कोडगेपणा करावा? आणि निरंकुश जालम सत्ता—**औरंगजेब** आणि **म्यांगू*** ह्यांनीं जशी योजिली तशी सत्ता—योजावी? बोल, असेंच असेल तर सांग? ह्मणजे एका क्षणाचा देखील अवकाश नको! आतांच्या आतां तुला काढून टाकित्यें. आणि **हिंदला** माझी सखी करून घेऊन बसत्यें! हा **स्वदेशहित**-साह्य आहेच. काय? बोल. बस्स झालें! तुझाच कक्का खरा, असा समज तूं अजून धरून बसली आहेस काय? सांग? तर मग आतां काढ तूं त्यांतून काय सत्व निघतें तें!" हें शेवटील वाक्य तिनें अतीशय क्रोधानें सांगितल्यामुळें **ब्रिटानियास** तें फार विषम लागलें.

"नाहीं, नाहीं; मी कधीं तुजविषयीं वैषम्य धरिलें नाहीं. आणि धरण्यासही इच्छित नाहीं! कोणी उगाच दाटून संकटास निमंत्रण करावें?" भीत भीत **ब्रिटानियानें** उत्तर दिलें "हे सौभाग्य—संपन्न, सुंदर—मुगुटयुक्त, चिर—शोभित, इंद्रा-हूनही विशेष तेजस्वी? **स्वतंत्रता** महादेवी? मी तुझ्या क्रोधास पात्र नाहीं! हा तुझा क्रोध अयोग्य आहे. चंद्राप्रमाणें शीतल होऊन मला भयरहित कर. ह्मणजे त्यापासून मी तुझ्या इच्छेला अनुकूळ होईन; आणि सुखरूप **हिंदवर** राज्य चालवीन"

* इ० सनाच्या तेराव्या शतकांत चायनीस **तार्तरी** येथें **चिनानें** पाठविलेला हा गव्हर्नर होता. ह्यानें अतीशयच स्वैच्छ शक्तिनें कारभार चालविला. त्यामुळें जिकडे तिकडे बंडें होऊं लागलीं; आणि तेथील लोकांस, हा जीव नकोसा वाटूं लागला होता!!!

ह्या वाक्यानें व **ब्रिटानिया**ची नम्रवाणी ऐकून **स्वतं**त्रतेस हसूं आलें! तेव्हां तिनें स्मितहास्य करून निर्मळ नेत्रानें तिजकडे पाहिलें. ह्यावेळीं **स्वतंत्रता**देवीच्या शरीरांतून मद वाहूं लागला, आणि आपणच सर्वांहून श्रेष्ठ व पराक्रमी आहें, असें समजून ती फारच समाधान पावली!

"जर तूं शांत झाली आहेस तर ऐक." **ब्रिटानिया** पुन्हा म्हणाली. "माझी सर्वोत्तम इच्छा हीच आहे कीं, माझ्या सखीचें—मला जिचें साह्य अति प्रिय आहे अशा **हिंद**राणीचें,—सत्कृत्यानें हित होईल तसें करण्यास मी तत्पर आहें; आणि तसें हित कोणतें आहे? तें तूं मला सांग? हें काय बरें? असें वेड्या सारखें करावें? तुला हें चांगलें का वाटतें? ज्यांत हिचें कल्याण होईल, आणि माझा मान, योग्यरीतीनें राहण्यास व्यत्यय येणार नाहीं; तशा सर्व योजनेस मी सन्मान देण्यास तयार आहें. ज्यांत माझें आणि हिचें प्रिय होईल, तसें करण्यास मी तुजवर सर्व प्रकारचा विश्वास ठेवित्यें; मग तर झालें कीं नाहीं? माझी संपूर्ण इच्छा अशी आहे कीं, "**हिंदुस्थानां**त ज्या प्रकारें योग्य व्यवस्था राहील, लोकानां सगळे चांगले हक्क मिळतील, न्याय व दया वास्तव्य करील, सर्व प्रकारें **यूरोपियन** आणि **आर्य** एक होतील, देशाच्या राजकार्यांत सामान्य रीतीनें सर्व सारखा भाग घेतील, मला हर्षवितील, आणि आपणही हर्ष पावतील;" तसे सर्व उपाय योजण्यास मी सिद्ध आहें. जर तुला माझी काळजी आहे, तर तूं मला

स्पष्ट सांग. तूं कोणत्या प्रकारची नवीन व्यवस्था करूं इच्छित आहेस? तुझ्या तरी मनांत खरें काय आहे?"

"चांगलें केलें. मोठ्या भाग्याच्या सुपुत्री **ब्रिटानिया**? तूं शहाणपण धरिलेंस आणि तुझी सर्वांहून मोठी जी अब्रू तिचेंही रक्षण केलेंस. ह्यालाच हिकमत म्हणतात! आज जर तूं उच्छृंखलतेनें माझ्या विरुद्ध कांहीं केलें असतेंस, तर मी निश्चयच केला होता कीं, तुझी पायमाल—दुर्दशा करावी! माझा हा हेतू साधलाही असता. कारण, आतां **हिंद**मध्यें तर्तरीत दम आला आहे, आणि तुझ्या नीच, रक्तवर्षावकारक, अभिमानी, प्रपंची, क्रूरकर्मी आणि अपयशी चालकांच्या* कृष्णकर्मांनीं ह्या राज्यांत सर्व प्रकारची अव्यवस्था होऊन चुकली आहे. हें तुला माहीत आहेच. अशा समयीं त्रासलेले लोक, माझ्या इच्छेस हटकून अनुकूळ होतील. आणि नाहीं झाले तर हें माझें हक्क कसब आहे कीं, मीं त्यांस उत्साह उत्पन्न करून तुफान व उन्मत्त बनवीन. मग पुन्हा तो? जालम—ध्यानांत ठेव! तुझा नेहमींचा शत्रू जो **रशिया** त्यास—या बाजूकडे ओढून

---

* लार्ड **लीटन**—या कान्सर्वेटिव व्हाइसरायाच्या काळांत फार अपयशकारक कर्मे झालीं आहेत! लोक सत्ता हिराऊन घेण्यांत, देशांत कडक कायदे स्थापण्यांत, देशी वर्तमानपत्रांची मुस्कटा काढून घेण्यांत, वसुलांत घोंटाळा होण्यांत, ह्यांची राजनीति अगदीं अपकीर्तिपात्र निवडली आहे. हा इ० स० १८७६ त **हिंदुस्थानांत** आला. आणि सन १८८० च्या जूनांत विलायतेस गेला. तेव्हां प्रजेकडून त्यास बिलकूल मान मिळाला नाहीं.

आणीन. **रशिया** आला कीं, सारे कंटाळलेले, व तुला प्रथम चढविणारे लोक, तूं **आफगाण** सरहद्दीवर गेलीस कीं, पुरे! आपआपलें सांभाळूं लागतील. व **इंग्लंडाहून** मदत येऊन पोहोंचेपर्यंत असा फेरफार होऊन जाईल कीं, जसें एखाद दुसऱ्या नादानाच्या उच्छृंखलतेनें **युनैटेड स्टेट्स** स्वतंत्र* झालें! तसी ही स्वतंत्र होऊन माझी पूजा करील!! पुढें हिची कशीही हाल हवाल होवो! किंवा कापाकापी† होवो. त्यांत मला थोडेंच ध्यावयाद्यावयाचें आहे? तें मागाऊन ही भोगीलच! परंतु तूर्तु तर तुझी कुंदी काढील? ज्या अर्थी तूं तिची सगळी सत्ता माझ्या हवालीं केली आहेस, त्या अर्थी तुला इतकें स्मरण ठेविलें पाहिजे कीं, मी तुझ्या हक्काचें सर्व प्रकारें रक्षण करून तुला विजयी करीन. तुला मी सांगत्यें जे जे मी माझ्या छत्राखालीं घेतले आहेत. ते ते मला नेहमीं चांगले आशीर्वाद देत आहेत! हें तुला ह्मणजे ठाऊक-

---

* **युनायटेड स्टेट्** कसें स्वतंत्र झाल? याविषयींची एक वार्ता अमेरिकेत अशी चालत आली आहे कीं, **फिलाडेल्फियां**तील पंधरा वर्षांच्या वयाच्या दोघां मुलांनीं एक मंडळी स्थापन केली. आणि तिचा मंत्र हा होता कीं, "देश हक्क सांभाळावे" त्याप्रमाण अवघ्या दाहा वर्षांत त्या नगरांतील निमे लोक त्या मंडळीचे मेम्बर झाले. आणि **इंग्लंडा** विरुद्ध लढण्याची त्या मंडळीनें उमेद धरिली! या असेंब्लीच्या चिथावणीनें प्रजासत्ताक राज्य स्थापन झालें. त्या दोघां मुलांचें स्मारक तेथें जो "**स्वतंत्र महाल**" बांधण्यांत आला आहे. त्यांत करून ठेविलें आहे.

† सन १७९२त **फ्रांन्सां**त झालेली कापाकापी, अव्यवस्था, अंधेर, खून, मारामारी आणि राजकुटुंबाचा शिरच्छेद!

नाहीं? किंवा मी सांगितलें पाहिजे असें मुळींच नाहीं! मी आतां फक्त हिंदचा काय विचार आहे? तो समजून घेण्यास इच्छित आहें. जर ती देखील मजवर लवादी संपवील, तर ज्याकृत्यानें तुह्मां उभयतांचें कल्याण होईल तसें करण्यास मी यत्किंचित् देखील कमी करणार नाहीं. हें, माझें हातीं धरिलेलें काम जर सिद्धीस गेलें, तर त्या राक्षस **रशियाचे कोसाक्स** लोकांस एक पाऊल देखील पुढें टाकण्याची हिंमत होणार नाहीं! समजलीस कीं नाहीं?"

स्वतंत्रता दुसऱ्या बाजूकडे वळली. **हिंद**ची छाती धडधडूं लागली. तिच्या मुखावर पांडुरता आली. आणि तिला बोलण्यास बिलकुल हिंमत राहिली नाहीं; असें दिसूं लागलें! तिची विचार शक्ति तत्पूर्तीच होती. भावी स्थिती विषयीं तिनें विचार करून कांहीं व्यवस्था केली नव्हती; किंवा तूर्त तशी बुद्धिशक्तिच तिच्यांत राहिली नव्हती, असें ह्मटलें तरी चालेल. ह्यामुळें तिला कांपरा सुटला आणि एखादी युक्ति योजून सत्वर पळून जाण्याचा तिनें विचार केला. पण तेव्हां तिला सवड होती कोठें? शेवटीं आतां काय होईल तें होवो! असें समजून ती नशिबावर हवाला ठेवून तेथेंच उभी राहिली होती.

"हे **शचि*** पेक्षांही विशेष आयुष्यमान् **हिंद**! तुला काय

* इंद्राची **इंद्राणी**. हिचें आयुष्य फारच आहे. पुराणांत इजविषयीं अशी कथा वर्णिली आहे कीं, **इंद्र** पाहिजे तितके बदलतात, पण **इंद्राणी** तीच असत्ये. जो शंभर अश्वमेध करितो, तो इंद्रपद प्राप्त करतो; आणि अगोदरच्या **इंद्रा**चा सर्व सत्ता त्याकडे जाते; व पूर्वीचीच

पाहिजे आहे, ह्याचा तूं विचार केला आहेस काय? का उगांच आपली पहात आणि ऐकत बसली आहेस?" घाबरलेल्या हिंदला थोडासा आनंद उपजावा अशा ऐटीनें स्वतंत्रता ह्मणाली. "तुझी इतकी भारी शक्ति नाहीं—अथवा जी आहे, तिचा बहुधा लोप झाला आहे—इतक्या करितां तूं स्वतःचीं राज्यें स्थापन करण्याची आशा थोडीच धरावीस हें चांगलें. तुला जें मागायाचें आहे, तें असें माग कीं, तूं सुखी व्हावीस व आनंद मानावास आणि त्या बरोबरच आशीर्वाद दे, व घे; ह्मणजे झालें."

"महान् शक्ति संपन्न सखी **स्वतंत्रते**? आतां जो तूं बोध केलास आणि ह्या माझ्या तुर्तच्या सर्वोपरी होऊन बसलेल्या राणीला वश केलेंस, त्यावरून माझी खात्री झाली आहे कीं, माझ्या हितार्थ तूं नशिबानेंच झालीस तर राजी होशील! एऱ्हवीं माझी इच्छा एवढीच आहे कीं, माझीं स्वतःचीं राज्यें चांगल्या रीतीनें संस्थापित व्हावींत. आणि आमचा देश आमच्या हातांत राहून त्यानें, अत्यानंदानें कल्लोळ करावा! हेंच सर्वांहून महत्सुखकर आहे. नाहीं तर तूं आज बरें करून जाशील, आणि उद्यांही खाष्ट, तें फिरवून टाकण्यास विलंब लावणार

इंद्राणी नव्या इंद्राशीं लग्न करून संसार विलास भोगिते. **ग्रीक** लोकांच्या इंद्रास **ज्यूपिटर** आणि त्याच्या स्त्रीस **ज्यूनो** ह्मणतात—ही **ज्यूनो**, **ज्यूपिटर**ची बहिण. यावरून भाऊ आणि बहिण यांत लग्न होत असे, अशी कल्पना करण्यास जागा राहते. भरत खंडांत **वेन**चा पुत्र **पृथु** आणि त्याची दुसरी कन्या **अर्ची** ह्यांत लग्न झालेल्याचा दाखला भागवतामध्यें सांपडतो; व तोच **पृथु** ईश्वराच्या चोवीस अवतारां पैकीं एक होय! असें मानिलें आहे.

नाहीं! कारण, बाह्यात्कारें लाडीगोडी दाखविण्यांत व फिक्का मान देण्यांत हिच्यासारखी दुसरी कोणीच वस्ताद नाहीं! राजधर्म हिला मुळींच समजत नाहींत. मला तूं सांग? हिला कोणी तरी मायबाप म्हणून ओळखीत आहे का? हिची कुलप्रतिष्ठा कशांत आहे? प्रजेचे हक्क देण्यांत हिनें खरा विचार कधीं-तरी केला आहे? माझी पूर्वींची राजनीति* काय वाईट होती? हल्लींची इंग्लंडची राजसत्ता पाहिजे तशी असली, तरी येथें ही माझ्या पुत्रांशीं तीन तेरा व नऊ अठरा ह्या रीतिनें राज्य चालवीत आहे. हिची प्रजेंत. एकचक्री — **रशिया**प्रमाणें कडक व राक्षसी नीति आहे.—देशी राज्यांत **फ्रेंचां**ची फ्युड्ल नीति आहे आणि स्वतांत आपलीच नीति आहे! ही हिची राजनीति मला बाई! नको. हिच्या जुलमानें मी तर अगदींच धुपून गेल्यें आहें!! आणि हिचें

---

* मनस्मृतीच्या सातव्या अध्यायांत राजधर्म आणि राजनीति विषयीं सविस्तर लिहिलें आहे. त्यांतील सारांश:—"राजानें न्यायानें चालावें, ब्राम्हणांकडून सालसपणा व गंभीरपणा शिकावा आणि त्यांकडूनच नीतिशास्त्र, राजधर्म, तर्कशास्त्र, व आत्मविद्येचा अभ्यास करावा. कृषि, व्यापार व इतर व्यवहारिक कला दुसऱ्या लोकांकडून संपादन कराव्या. काम-वासना आवरावी, क्रोध बंद करावा, निद्राजित व्हावें, राजानें सात किंवा आठ सचीव नेमावे." इ० इ० इ० पूर्वी सैन्यव्यवस्था नियमही उत्तम होते. वसूल जमाबंदीतही शहाणपणाचा नियम होता. इन्साफांत पुष्कळ सक्ति होती. आणि **ग्रीस**च्या ड्रेको प्रमाणे फौजदारी गुन्ह्यां-विषयीं कडक कायदा होता. हे राजनीति धर्म पुष्कळ वाचण्या योग्य आहेत पण स्थल संकोचामुळें नाइलाज आहे इतकेंच!

तोंड पाहिलें कीं, मला-ही खायलाच आली आहे, असें वाटतें!" हिंद म्हणाली.

"हे हिंद? आज तुझ्यां अंगीं कांहीं तरी नवीन शौर्य आलें असावें खरें! आणि तें बोलण्यांतही पुष्कळ चांगलें दिसतें. कांहीं विचार तरी कर? अग! तूं मूर्ख आहेस; तेव्हां तुझें पाहिजे तसें होईल. पण तुझ्या पुत्रांच्या व्यवस्थेचा विचार केलास का? कां उगांच तोंडास येईल तसें बडबडत्ये आहेस? नालायक असून तुला जर राज्य करण्याची भारी उमेद होती, तर ती सत्तावन्नांत कां नाहीं उपयोगांत आणीलीस? तुला थोड्या संधी देण्यांत आल्या नाहींत! परंतु कोणत्याच वेळीं त्वां 'शहाणपणाचें' भान राखिलें नाहींस! तुला तुझ्या मूर्खत्वाबद्दल मला आतां खरें उत्तर दिलें पाहिजे कीं, तूं राज्यें करण्यास नालायक आहेस, तुझीं थोडीं थोडकीं तरी राज्यें आहेतना? . पण त्यांत तूं काय निष्पन्न केलें आहेस? आणि आतां जास्त मागायला तयार होत्येस? जें देतां आणि घेतां येईल असें दुसरें कांहीं माग, उगीच्याउगीच ग काय!" स्वतंत्रतेनें धमकावून कडक उत्तर दिलें.

"जर तुझी अशीच इच्छा आणि आज्ञा आहे, तरीही ठीक! मला अमेरिकन, फ्रेंच, जर्मन किंवा दुसरें कोणतें तरी राज्य दे. पण हें कांहीं बाई नकोच!" हिंद म्हणाली.

"छीः छीः चल, मूर्ख कुठची! आणखी नादानी करित्येस? अजून देखील अज्ञानमती चालवूं पहातेस? ह्यामुळें तुझी नेभळी शक्ति उघड दिसून, तुला चांगल्या वाईटाचें कांहींच

ज्ञान नाहीं असें स्पष्ट होतें! आणि त्यावरून असेंही ह्मण-ण्यास जागा राहत्ये कीं, तूं मूळचीच जड आहेस; किंवा आतां तुझ्या इंद्रियांस मंदत्व आलें आहे. **फ्रेंच** तुला चांगले वाटतात? रोज चैन, कापाकापी, मारामारी करण्यांत पहिल्या नंबरचे! आज प्रजाराज्य, तर उद्यां राजराज्य! जिंकिले-ल्यांस तोंडानें मात्र समान ह्मणतात, पण करतात भलतेंच! हें तरी प्रजाराज्य आहे तोंपर्यंत ठाकठीक आहे; पण त्यांतही "शंभर मण तेलानें अंधार." एकदां तेथें राजसत्ताक राज्य होऊं दे. ह्मणजे तेच तुझी कुंदी काढण्यास लेशभर देखील डगावयाचे नाहींत! ते **हिंदुस्थानांत*** कोठें थोडीशी चांगली राज्यव्यवस्था ठेवीत आहेत तिनें लोभावून भाळलीस वाटतें? पण एकदां राज्याचा विस्तार वाढला ह्मणजे तिकडे पहायालाच नको! थोड्यांतच मौज आहे. **जर्मनींत आर्य** राज्याचे कांहीं भेद आहेत, पण ते तुला कोठें अनु-कूळ होणार आहेत? बरें त्यांतही थोडे कर आणि थोडे का जुलूम आहेत? अग! त्यांत एक थोर मनुष्य†

* मि० **दिनशाह** अरदेसर तालियर खान ह्यांनीं लिहिलेला "दक्ष-णचा प्रवास" पहा. **हिंदुस्थानांत** जीं **फ्रेंचां**ची ठाणीं आहेत, त्यांत **पांडिचरी** आणि **चंद्रनगर** या दोन्ही ठिकाणीं चांगली राज्यव्यवस्था आहे. आणि तेथील प्रजा सर्व गोष्टींनीं सुखी आहे. **इंग्रज** म्हणतात कीं, आमच्या इतका देश मिळवून ते लोक जेव्हां अशी राजनीति चाल-वितील जेव्हां खरी बात!!!

† एक **फ्रेंच** ग्रंथकार लिहितो कीं:—प्रिन्स **बिस्मार्क** या दुनियेंत श्रेष्ठ नर गणिला आहे. त्याच्या राजनीतिचा प्रकाश यूरोपांत सर्वत्र पडत आहे. तो सर्व राज्यांवर सरदारी भोगीत आहे, आणि एखाद्या राज्यास घाबरविण्याची शक्तिही त्याच्या आंगीं आहे!

आहे, तोंपर्यंत सर्व सलामत! तरीही दिव्याखालीं अंधारच. दुसऱ्या राज्यांत तूं **रशियाला** मागूंच नकोस. एक **युनैटेडस्टेट** आहे, पण तें तुला अशा स्थितींत आपल्या पदरीं घेणार नाहीं! त्यांत मात्र सगळे गुण आहेत, पण तें तुला, अशा अपकर्षदशेंतील, केवळ माणसांतून उठलेल्या, आणि कोणाचीही तांबेदार नाहीं अशाला आपल्या पदरीं घेतें कसचें? जरी त्यामध्यें सर्व गुण पूर्ण आहेत, तरी तें आपलें सलामत राहिलें ह्मणजे पुष्कळ मिळविलें! असें समजत आहे. अग? तेंही खरेंच. जेथें सर्वच निर्लोभी तेथें कोणकोणाची पंचाइत करितो? भल्यांनीं अशा खटपटींत पडूंच नये. दुसरें कोणी तुला घेण्याला खुषी होईल, पण माझी अक्कल जर तुला उपयोगाची किंवा चांगली वाटत असेल; मी केलेलें बहाल राखण्याची इच्छा असेल; तर तुला सांगत्यें कीं, तूर्तांतच कांहीं सुधारणा करण्याची आशा बाळग; आणि बाकीच्या साऱ्या खटपटी व वटवटी सोडून दे. राज्याच्या सलामती करितां, किंवा लोकांच्या खऱ्या हक्काच्या रक्षणार्थ, केवळ राजद्वारी बनाव चांगल्या रीतीनें झाले ह्मणजे झालें, इतकेंच नाहीं. स्वात्मविचारानें मुक्तता अथवा नीतिबल हाही एक उत्तमोत्तम गुण आहे आणि त्यांतही मोठ्यांत मोठा सद्गुण **सलामती** होय. ज्या राज्यांत सलामत नाहीं तेथें कितीही सुख असलें, तरी तें काय कामाचें*? इतर जे राजे येतील किंवा आहेत, ते **मुसलमानां**चा व **मोंगलां**चाही विसर पाडितील! त्यांचा जुलूम

* "The friend" S. T. Coleridge.

फार कठिण आहे हँ! ते तुह्मालोकांचा प्रथमतः विश्वास संपादन करण्याकरितां मोठे मोठे हक्क देतील. राजसत्ता व अधिकार देतील. पुष्कळ रीतीचीं अभयवचनें देतील. सारें करितील. पण ध्यानांत ठेव, त्यांच्यांत जी वाईट सवई आहे, ती जावयाची नाहीं. सत्तेचा अभिमान सर्व प्रकारें लोकर किंवा सावकाश सज्ज झाल्याशिवाय राहत नाहीं; आणि तो फार नडतो हेंही खरें! मग तेथें अप्रीति कां बरें उत्पन्न होणार नाहीं? इंग्लंडांत **फिनीयन** लोकांच्या पुष्कळ टोळ्या आहेत. **फ्रान्सांत कम्युनिस्ट** लोकांच्या आहेत. **जर्मनींत सोसिय-लिस्ट** लोकांच्या आणि **रशियांत निहिलिस्ट** लाकांच्या आहेत. हें तर खरें? आतां तूंच मला सांग. जर तेथील राजसत्ता चांगली आहे, तर त्या कां स्वस्थ बसत नाहींत? पहावें तिकडे त्यांची कांहींना कांहीं गडबड असत्येच! त्यांची राज्यपद्धति जर सुयंत्र आहे तर असें कां व्हावें? बरें तेंही असो. पण ते लोक तुला सांभाळावयास कोठें उत्सुक आहेत? जें राष्ट्र आपलें राज्य सुरक्षित आणि चांगलें राखण्यांत तत्पर असतें, तें कधींही बाह्यप्रांतीं देश मिळविण्यास राजी नसतें. त्याप्रमाणेंच कितीही चांगला राजा असला, व त्या राज्यकर्त्यांत आणि प्रजेंत जरी जातिविषयक ऐक्य नसलें तरी तेथें "जयी" आणि "जिंकिलेले" हा भेद रहावयाचाच! फार लांब कशाला शोधा-वयास पाहिजे? तुझाच **अकबर** बादशहा घेईनास! त्याच्या राज्यांत **मुसलमानांस** जितकी सत्ता व वैभव होतें; तितकें

हिंदूंस देखील होतें; असें कोण ह्मणेल*? कित्येक लोक चांगली सत्ता भोगीत असतील. परतु त्यावरून सर्व प्रजेस मोठे हक्क मिळत होते; असें ह्मणवणार नाहीं! त्यांत आणि ह्यांत इतकंच फरक आहे कीं, "बादशहा तेथें बाजार" ह्य ह्मणीप्रमाणें देशांतच राजाचें राज्य असल्यामुळें लोकास धंद्यारोजगाराची पंचाईत पडत नसते! तूर्त **ब्रिटानिया**च्या संबंधानेंही तेवढीच उणीव आहे; परंतु तिचा निकाल आतांच्या आतांच होण र नाहीं. ती सर्व हळुहळू आणि आपोआप दूर होईलच. प्रसंगच आला पाहिजे. एतदर्थ तुझे अज्ञानत्वाचे विचार तूं टाक, आणि खऱ्या मार्गानें चाल; ह्मणजे तुझा फायदा होईल. हें बालून चालून परदेशी राज्य. ह्य राज्यांत जितकें सुख मिळूं शकेल, तितकें मिळविण्याचीच तूर्त तूं आशा धर. बाकी परकीराज्य तें चांगलें असणार कोठून? तें मला सर्व ठाऊक आहे! जोंपर्यंत तुला सत्तेचें—खऱ्या सत्तेचें—ज्ञान झालें नाहीं, तोंपर्यंत आपल्या नुस्त्या बळावर उड्या मारणें, हें केवळ मिथ्या आहे! आजपर्यंत तूं जें गमाविलें आहेस, त्यांत तुझीही कम जास्त बेवकुबी खरीच! कारण तुह्मीं दोघीही अभिमानी! आतां त्यांत इत-

---

* **अकबर**च्या राज्यांत देशी लोक राजसत्ता भोगीत होते. पण कितीएक हुद्दे फक्त **मोंगलां**करितांच होते. तरीही जे मोठे हुद्दे देशीयांस देण्यांत येत, त्यांची आज इंग्रजी राज्यांतील मिळणाऱ्या हुद्यांशीं तुलना केल्यास ते फारच मोठे होते असें म्हटलें पाहिजे. सन १८७७ च्या जलशाच्या वेळीं **शिंद्यास** "कौन्सीलर" आणि **होळकरास** "सेनाधिपती" केले; पण तें केवळ नांवाचे! **अकबर** बादशहा, राजा **मानसिंह** व **बिरबल** इत्यादिकांस पुष्कळ वेळ युद्धांतही पाठवीत होता!!!

बडोदा ग्रंथ संग्रहालय.

कैच सुख मानायचें कीं, तुमचे दोघींचेही अभिमान हा वेळ पर्यंत चांगले आहेत; ह्मणून तुम्हीं अब्रूनें दिवस लोटित आहां इतकेंच. नाहींतर तुमचे हाल कुत्रा देखील खाता ना. माझें सांगणें तुम्हांला ग्राह्य वाटत असेल, तर अशा शहाणपणांतच मजा आहे. आतां तुझी अब्रू आणि शोभा राहील असा काळ नाहीं, समजलीसना? तुझी भूल दिसली कीं, सगळे उठून कसे पिसडून टाकतात, त्याची स्मृति आहे कीं, नाहीं? शहाणपण शीक, सलामतीची इच्छा धर, नीतिज्ञ हो, सत्य आणि स्थायी काय आहे, तें शोध, सबळ होईपर्यंत थांब; आणि तात्कालिक सुभाग्य होण्याकरितां यथार्थ असेल त्याचीच इच्छा कर."

हें बोलणें हिंदला आवडलें नाहीं. आणि आवडण्यासारखेंही नव्हतेंच. परंतु स्वतंत्रतेच्या विरुद्ध बोलण्याचें तिच्या आंगीं सामर्थ्यच राहिलें नव्हतें. आणि आतां तिच्याजवळ करण्यासारखी तक्रारही राहिली नव्हती, कारण, तिच्या साऱ्या तक्रारींचा निकाल झालाच होता. बरें तिची अशीही शक्ति नव्हती कीं, रण पराक्रम दाखवावा, आणि पळून जाऊन त्या जगज्जननीचा तिरस्कार करावा! तिच्यांत आतां विशेष कायतो अभिमानच होता. तिच्या मगजांत अशी धुंदी भरली होती कीं, मी ह्मणत्यें तसेंच झालें पाहिजे! तिजमध्यें जरी चिरडखोर स्वभाव आणि धुंदपणा ह्यांचा आवेश खूब खिलत होता तरी ती करित्ये काय? तिचें शहाणपण चालण्याजोगें नव्हतें! बाहेर जाण्याची हिंमत नाहीं.-दुःखानें चिरडून गेलेली,-

जवळ कोणी तसा सुपुत्रही नाहीं! ह्यामुळें तिला दुःखानें संकोचवृत्ति धरून राहणें भाग पडलें! एरवीं ती फार निश्चयी, सावध, पक्की, कितीही संकटें आलीं तरी न घाबरणारी, शौर्यसंपन्न, व आपल्या पूर्वकीर्तीनें मदभरित होती; ह्मणून तिला हा अनादर सहन होण्यासारखा नव्हताच. तिनें बोलण्यास—योग्य किंवा अयोग्य उत्तर देण्यास—पुष्कळ खटपट केली, पण ती शुद्ध सरल हृदया असल्या कारणानें बोलले असतां आपली लज्जा जाईल; अशा भयानें आपला स्वभाव दाबून द्वेषी किंवा हट्टी विचार न दाखवितां, स्वस्थच राहिली.

पुष्कळ वेळ झाला. हिंद कांहीं बोलेना! तेव्हां स्वतंत्रताही विचारांत पडली. 'कारण जर हिंद आतां कांहींच बोलत नाहीं, तर चांगला परिणाम होणार नाहीं. आणि त्यामुळें लाभाहून हानीच जास्त होईल. एतदर्थ तिनें पुन्हा कांहीं बोलावें व नरम व्हावें, ह्मणून मोठ्या कडाक्यानें स्वतंत्रता ह्मणाली:—

"हिंद! तूं आपल्या मनांत असें समजत आहेस काय? कीं, मी फार कुशल आहें! माझ्या प्रमाणें सर्वोपरी शक्ति कोणांतच नाहीं? तर तुझे ह्या खोट्या—कृत्रिमी—मिथ्या—मदाभिमानी—विचाराचें निकंदन करणें मला भाग आहे. मी तुला उघड सांगत्यें. तूं अशा पोंकळ विचारानें मिथ्याभिमानी झाली आहेस. ह्यामुळेंच तुझा जेव्हांतेव्हां चुराडा होत असतो. आज किती वर्षें झालीं? तूं मेंढरासारखी झाली आहेस! तुला जसें लागेल तसें, वाटेल त्यानें ठेंचावें. पण तुजमध्यें जास्त शक्ति ह्मणून येतच नाहीं. तूं लोभी नसून संतोषी आहेस.

क्रूर नाहीं पण स्नेहाळू आहेस, विवेकी आणि मर्यादशील आहेस. हें मला माहित आहे. परंतु आतांच तुला क्रूरतेची इच्छा झाली असेल किंवा रक्ताच्या नद्या वाहविण्याचे तुझ विचार असतील तर खुशाल सांग ! मी त्याचाही इलाज करित्यें; मजकडे सर्वांचे पाहिजे तसे विचार आहेत. ती काळजा तूं करूं नकोस ! पण सांभाळ, परदेशी राज्य आहे. तुझ्या पक्षांत राहून **ब्रिटानियास** मी नरम व मायाळू करण्यास इच्छित आहें. मग सत्याकरितां सांगितलें पाहिजे कीं, बलाबलांत—मात्र हल्लींच—तुझा आणि **ब्रिटानिया**चा सारखेपणा केल्यास, ही दांभिक, मूढ, तशांत सात्विक गुणी, तूं वाघीण आणि ही सिंहीण आहे. आणि जसें डुकराच्या व मांजराच्या बलांत अंतर, कुत्र्याच्या आणि वाघाच्या बलांत फरक, सशाच्या आणि हत्तीच्या बलांत फेर, त्याप्रमाणें तुझ्या आणि **ब्रिटानिया**च्या बलांत अंतर आहे. आज जर ही मनावर घेईल तर तुला क्षेत्र विरहित करून सोडील! परंतु तुजकडून मात्र तिचा बालाग्रही वांकडा होणार नाहीं!! तुझ्यांत तशी शक्तीच नाहीं. तुझ्या वाघाचें कपाळ हिनें चिरून टाकिलें आहे. त्याकडे पाहिलें म्हणजे, कोणी हिंमत धरण्याचा क्षणभर देखील विचार करणार नाहीं!! बलवानाशीं साधनबलानुकूलतेनें काम केलें पाहिजे. तेथें हट्टास पेटून कांहींच निष्पन्न व्हावयाचें नाहीं. तूं हट्ट घेऊन बसणार असलीस तर बस तुला तुझ्या कल्याणाकरितां माझें हें शेवटील सांगणें आहे—कारण मी तुझी लाज किंवा

कळकळ बाळगून येथें आल्यें आहें. ह्मणून मला तें अवश्य सांगितलेंच. पाहिजे—**ब्रिटानियास** मी सर्वप्रकारची सत्ता देईन; आणि सांगेन कीं, ही खराब ह्मातारी "साठी आणि बुद्धि नाठी" तशा अवस्थेस पोहोंचली आहे. कांहीं फिकीर नाहीं. हिला आपलें पाहून घेऊं दे!!!" "तूं तुझ्या इच्छेप्रमाणें वाग". मग ही तुला सुख देवो किंवा दुःख देवो; मारो किंवा तारो; मी कशाचीही जोखमदार नाहीं. अग? तुला काय ठाऊक आहे? हिला जी कांहीं थोडीशी भीति आहे, ती फक्त माझीच आहे. आणि जर एकदां मी हिला सर्व अधिकार दिला, किंवा हिला मनमुक्त बोकाळूं दिलें, अथवा पाहिजे तसें करण्यास परवानगी दिली तर मग हिला आडकाठी कोणाची बरें राहणार?"

"प्रियसखी? तूं इतकी क्रोधाविष्ट होऊं नकोस, तुझ्या इच्छेप्रमाणें वागण्यास मी राजी आहें." **हिंद**, जी एकदां भ्याली, त्या बरोबर तिनें एकदम सगळी कबूली दिली! "ज्या अर्थीं तुला माझी इतकी कळकळ, लाज किंवा आस्था आहे; व तूं माझ्या हितासाठीं इतकी आतुर आहेस; मला विचारल्या पुसल्या शिवाय माझ्या तर्फेनें वकीली घेऊन तूं ह्या मदभरितस्त्रीचा मदाभिमान उतरिला आहेस; त्याअर्थीं जर मी तुझ्या सांगण्याविरुद्ध वागल्यें, तर खरोखर माझ्यासारखी निमकहराम कोणीही नाहीं, असें होईल! हे सखी? जर तुला माझें कल्याण करावयाचें आहे, तर तें असें कायमचें कर कीं, ज्यापासून कांहीं काळ पर्यंत तरीं मला बिलकुल

बोलावें लागूं नये, आणि तसेंच मला कांहीं वाईटही वाटूं नये! "जयी" आणि "जिंकलेला" हा भेद होईल तितकें करूत टळेल असें पहा? आणि माझें निवृत्तिसत्वबल ज्या सदुपायांनीं वृद्धि पावेल असा उपाय योज. तुला माझी सर्वांहून शेवटील प्रार्थना हीच आहे कीं, ह्या जगतीतलाच्या पटांवर माझ्या पुत्रांस केवळ **नपूंसक** समजलें जातें! आणि ही **ब्रिटानि-** याही तसेंच समजत आहे. त्या अपवादांतून मी कशी मुक्त होईन? हें ही लक्षांत ठेवण्यास बिलकुल विसरूं नकोस. आणखी जशी माझी श्रेष्ठता होती; त्यापेक्षांही ती विशेष व्यापून सर्व मला ओळखतील; साऱ्या राज्यांत माझी कीर्ति गाईली जाईल; व सर्व स्थलीं मला मान मिळेल; असा करार या **ब्रिटानिया** बरोबर कर कीं, ज्यामुळें ही मला हीन मानणार नाहीं, आणि शस्त्रास्त्र वापरण्यांत मी जें उज्वल यश प्राप्त केलें आहे; तें ही वृद्धिगत होईल. हें तुझ्या ध्यानांत असलें म्हणजे झालें! मी विशेष कांहींच सांगत नाहीं. माझें कल्याण आतां तुझ्या हातांत आहे."

यावेळीं आपला अत्यंत महद्विजय झाला असें समजून नवाच रंग प्रदर्शित करण्याच्या हेतूनें **स्वतंत्रता** मोठ्या पोक्त-पणानें, उत्साहानें आणि शहाणपणानें खालीं लिहिल्या प्रमाणें बोलून तिनें दोघींसही सर्वोत्कृष्ट रीतीनें संतोषित केलें:—

"ह्या संबंधानें माझ्या शिरावर जें जोखीम आहे, तें मी बराबर समजत आहें. आणखी तुम्हाला मी विश्वासानें सांगत्यें. मी माझें कर्तव्य प्रामाणिकपणानें आणि उत्तम रीतीनें बजावीन.

ह्यांत मुळींच शंका नाहीं. कारण, मला इतकें चांगलें माहित आहे कीं, आज जर मीं तुमच्या तिऱ्हायतींत खऱ्याचें खोटें किंवा खोट्याचें खरें करून सांगेन किंवा कांहीं तरी तृतीय पंथीच इनसाफ करीन तर त्याचा ईश्वरासमक्ष जबाब देण्याचा एक काळ आहे, ह्यांत बिलकुल शंका नाहीं. तुह्मी दोन्ही प्रतिस्पर्धिनींनीं मजवर इतका पूर्ण विश्वास ठेविला आहे; आणि आपला स्वतःचा ह्मणून कांहींएक विचार न दर्शवितां हा **ठिंगूजी*** **देशहित** टकमक पहात राहिला आहे; आतां ह्यास मी माझा साक्षी ठेवित्यें. आणि आज एकदम तुमचा कलह-पाहाल तर कसा?-कायमचा मिटवून तुह्मां दोघींसही आनंदित करित्यें! तुह्मी दोघी ही माझें सांगणें मान्य

---

* **हिंदुस्थानांत** स्वदेशाभिमान, स्वदेशप्रीति, स्वदेशहित आणि स्वदेशाची कळकळ याविषयीं या ठिंगूजीस "वामन मूर्ति" ही उपमा यथार्थ आहे. "मुकर्जी मॅगझीन" मध्यें आह्मांस असें वाचलेलें आठवतें कीं, "हिंदुस्थानांत कोठें कोठें स्वदेशाभिमान आहे. परंतु खरोखर तो नाहींच! घरसंसारांत, धर्मांत, व्यापारांत, नीतींत, न्यायांत, जातींत, घरांत, सभांत, राजकाजांत, आणि सामान्य व्यवहारांत सर्वत्र देशाभिमान गाजून राहिला आहे; पण एक तरी काम या स्वदेशाभिमान्यांनीं केलें आहे? असें मला विचारण्यांत येईल तर मी साफ **नाहीं** म्हणून सांगेन! सरकारच्या शुष्क मानाची तृष्णा राखण्यांत, आपणास मोठा अधिकार मिळावा या करितां, केवळ खुशामत करण्यांत येते. मुलांस नोकरीची ही जर याचना करण्यांत येते, तर मग स्वदेशाभिमान राहणार कसचा? खरोखर स्वदेशाभिमानाकरितां थोड्याशा **शुष्क** मानाहून **विशेष** मानाची तृष्णा राखिली जाईल तर चांगलें". या मताशीं मिळता असा लॉर्ड **ब्रोहाम**चा एक विचार त्या खालींच घेतला आहे. **हिंदुस्थान**च्या स्वदेशाभिमानास "ठिंगूजी" म्हणण्याचें कारण तरी हेंच आहे कीं, जेथें पहावें तेथें सारी तोंडाची वडबड अवलोकनांत येते!!!

करून मला मोठा मान देण्यास तत्पर आहां तर तुमचें कल्याण करूं नये! असा माझा हेतुच नाहीं. तशांत आतां मला हेंही समजलें आहे कीं, तुमचा सर्व विश्वास मजवर आहे. मंग मी कसा बरें विश्वासघात करीन? तुह्मांला माहित आहे का? मित्रत्वाचा असा धर्मच नाहीं कीं, आपल्या दोन्हीं प्रियसख्यांस चढवून आपला स्वार्थ साधावा! फार प्राचीन काळीं मी असेच खेळ खेळत असें, पण आतां त्यांत कांहीं तथ्य आहे असें मला वाटत नसून लौकरच विनाश होतो; असें दिसून आल्यामुळें मी तसे खेळ खेळण्याचें अजी सोडून दिलें. त्यांतही जेव्हां पासून **फ्रान्स** देशांत कापाकापी झाली—तुह्मीं असें पहा? मनुष्यें झटलीं झणजे त्यांची जिंदगी फार अमूल्य गणिली आहे. तीं कुत्र्यापेक्षांही नीच रीतीनें मरण पावलीं! लहान मोठ्या टोळ्यांच्या पराक्रमानें मोठमोठ्या समर्थपुरुषांस गत प्राण केलें! माझे हक्क लुटले. राजाचा, राणीचा, आणि त्याच्या कुटुंबकबिल्याचा शिरश्छेद झाला!! आणि जेथें तेथें फाटाफूट होऊन माझा हात वळवळला नाहीं, ह्यामुळें मी फार दिलगीर झाल्यें! चालू शतकमध्याच्या सुमारास बंड खोरांनीं स्वतंत्र बखेडा केला. भयंकर अवरोधसाधनें तयार केलीं. आणि प्रत्यक्ष राजास देखील पिटाळिलें! तेव्हां पासून तर मी निश्चयच केला आहे कीं, जोंपर्यंत योग्य व्यवस्था होणार नाहीं, तोंपर्यंत आपण कोणालाच आश्रय देऊं नये. आणि सर्व सुखरूप राहतील, असें वर्तन ठेवावें. हें सारें प्रिय **ब्रिटानिया**? तुला सांगत

आहें.—समजलींसना? तें तरी इतक्या साठींच कीं, तूं माझा फार थोडा विश्वास बाळगत्येस! पण निष्काळजी राहा. तुला थोडीशी इजा होईल, किंवा तुझ्या गौरवास हानी पोहोंचेल, असें मी करणारच नाहीं." (यावेळीं **ब्रिटानिया**च्या मुख कमलावर फार लाली चढली. व तिनें आनंदानें आकाशाकडे पाहत कड-कड बोटें मोडीत एक मोठी थोरली जांभयी दिली.) "मी असें करीन कीं, तुम्हीं दोघींनींही आनंदित व्हावें. **ब्रिटन-जादी** तूं हिंदला त्रास देण्यांत कांहींच कमीपणा केला नाहींस. हिचे प्रांताचे प्रांत, राज्यसंयोजनविधीनें किंवा दत्तक विधानास प्रतिबंध करून अथवा आणखी अशाच निर-निराळ्या बहाण्यानें बळकाविले आहेस. पण आतां तसा काळ नाहीं. व तसें करण्यांत शोभाही नाहीं. जर तूं दत्तकाचा हक्क हिराऊन घेशील तर तुझी **सलामत**,—देशी लष्कर,—अगदीं अंविश्वासी होईल. आणि तें एकदां बिथ-रलें म्हणजे, तुझी सलामत कमी झाली असें समज—अग? जर लोकांची रुची जाऊन अरुची झाली, ते तुला खुनी नजरेनें पाहूं लागले,—जसे **पोल** लोक **रशियास** हमेश पहात असतात त्याप्रमाणें—तर तुझें राज्यकरणें थोड्या मुष्किलीचें नाहीं! वैराचे भडके सर्वत्र चोपीत चालले तर तुझें वजन काय राहिलें? **हिंद**? तूं आजला अतिशय दुःखदावस्थेंत चिरडून गेलेली, सत्य प्रतिज्ञ, महदद्भुत कर्म आदरणारी, **भारती** आहेस. परंतु तुलाही सांगत्यें कीं, जर तुला तुझी आबादानी करून घेण्याची इच्छा असेल, तुझ्या पुत्रांस जगतितलावर विख्याति

मिळून यशस्वी करावें असें तुझ्या मनांत असेल, तर तुझीं पूर्वींचीं मोठीं कामें* (?!), जीं तूं वारंवार आचरीत असस, तीं आतां बंद कर. अशा कर्मांनीं तूं कधींही विजयी झाली नाहींस. आणि पुढें होशील, ही आशाही तूर्त तर स्वप्नवत् आहे! ह्या तुझ्या भूमीनें यावच्चंद्र दिवाकर गुलामगिरी करून परदेशी सत्तेच्या ताब्यांत राहावें! माझा असा इरादाच नाहीं. परंतु तुझ्या पुत्रांत जे कांहीं राजकीय गुण पाहिजेत, ते जोंपर्यंत आले नाहींत; ते शूर, वीर, साहसि व बलवान् झाले नाहींत; आणि आपला खरा धर्म समजूं लागले नाहींत; तोंपर्यंतच तुला ह्या **ब्रिटानियाच्या** "शीतल छत्रा"खालीं राहिलें पाहिजे. आणि तेंच तुला फार लाभकारक होईल! जर तूं हिच्या फांसांतून निघालीस तर कवडीच्या किंमतीची होण्यास बिलकुल वेळ लागणार नाहीं. कारण, तुला दुसऱ्या कोणत्याही राजाशीं टक्कर धरीन, अशी मुळींच शक्ति राहिलेली नाहीं! तूं एकदां हिच्या फांसांतून निघालीस कीं, परदेशी गिधाड तुला पिसडून टाकतील परंतु जेव्हां तुझा समय येईल, तेव्हां याद राख; तुझी आपोआप बढती होईल. तूं एकदां खऱ्या शुद्धींत आलीस, तर असें कांहीं समजूं नकोस कीं, ही ब्रिटानिया क्षणभर येथें उभी राहील! ती आशाच नको!!! ही लगेच रामराम करून स्वदेशांत जाईल. नंतर तूं खरोखर आबादानीच्या शिखरावर

* हीं कर्में म्हणजे बंडे करणें, राजाविरुद्ध होणें, आपआपसांत लढणें, व कापाकापी आणि मारामारी करून दंगल उडविणें हीं होत.

पोहोंचशील!!! पण असें व्हायला पुष्कळ विलंब आहे. मी कांहीं समय निर्माणकर्त्री नव्हे. भल्याभल्यांचीं भविष्यें खोटीं पडलीं आहेत, तेथें माझ्या भविष्याची कसली कथा? पण इतकें पक्कें समज कीं, एक समय येईलच. आणि तेव्हां मी तुला सहाय आहेंच, ह्यांत मुळींच शंका मानूं नकोस. तूर्त तूं **ब्रिटानिया**ची ताबेदार रहा. ही तुला आजपासून **दासी** न मानितां **सखी** समजेल. इतक्या करितां आतांच एक महापुरुष पाठविण्याची मी हिला आज्ञा करित्यें. तो महा पुरुष, ईश्वरेच्छेनें देववंशांत अवतरला आहे. आणि **कैसर-ई-हिंद**ला यश देणारा आहे. तो तुझ्या देशांत दया, न्याय, प्रामाणिकपणा, प्रेम व ऐक्य स्थापन करील. जेथें जेथें तो जाईल तेथें तेथें त्यावर पुष्पवृष्टी होऊन तो देवांशी नरासमान पूजा पावेल! **विक्रम, युधिष्ठिर**, किंवा **राम** ह्यांच्या राज्यप्रवेश-विधी प्रमाणें विधी होऊन जेथें तेथें तो प्रवेश करील. स्त्रीपुरुष, वृद्ध तरुण, बालबालिका इ० सर्वांच्या मुखानें त्याचें यशगान होईल. **अयोध्येंत दिलीपा**नें विजय करून जसा प्रवेश केला* आणि रयतेच्या उत्साहानंदास पारावार राहिला नाहीं; तसा आनंद तुला प्राप्त होऊन पुढें कोणतीही चिंता बाळगण्याचें कारण राहणार

---

* **स्वतंत्रते**नें पाठविलेल्या **लार्डरीपन**च्या विजयाचा मुहूर्त ता० २० डिसेंबर सन १८८४ या दिवशीं **मुंबई** नगरींत झाला होता. त्यावेळचा रंगकाल **रामा**चा अयोध्येंत होणारा प्रवेश, किंवा **दिलीपा**च्या नगर प्रवेशाचें सर्व रीतीनें स्मरण होण्या सारखा होता!!!

नाहीं. **ब्रिटानिया!** ज्या पुरुषास **हिंदुस्थानांत** पाठविण्याची **ईश्वराकडून** मला प्रेरणा झाली आहे, तो **क्लैव्ह, बेंटिक्, क्यानिंग** अथवा **मेयो** या सर्वांहून विशेष यश प्राप्त करील. तुझे सुपुत्र त्याच्या कृत्याची तारीफ करून या **हिंद**च्या पुत्रांबरोबर त्या तुझ्या यशस्वी पुत्रावर, पुष्पवृष्टि करितील व त्यास सन्मान देण्यास तयार होतील. आणखी प्रातःकाळीं मोठमोळ्या पुरुषांचें नामस्मरण करण्यांत या **आर्य** भूमीचे सुतनुज सदां तत्पर राहतात, असे जे **हरिश्चंद्र, राम, कृष्ण, युधिष्ठिर** व **कर्ण** त्यांप्रमाणें तो तुझा पुत्र सदोदित अतिशय सन्मान पावेल; घरोघर त्याची पूजा होईल. आणि जेव्हां तो तुझा पुत्र स्वदेशीं येईल, तेव्हां तुझी अखिलप्रजा गर्वानें वेडावून जाईल! आणि त्या साक्षात् देववंशीयाची पूजाच बाकी राहील! तुला फार काय सांगूं? पण **क्राईस्ट**च्या मूर्तीची जे लोक पूजा करावयास नाकबूल होतात, तेही त्याची सेवा करितील!! ज्या तुझ्या पुत्रास मी या **हिंद**च्या प्राणरक्षणाकरितां योग्य समजल्यें आहें, तो शहाणपणांत **रामा** सारखा, युद्धांत **भीष्मा** प्रमाणें, विद्येंत **द्रोणा**सारखा, धैर्यानें **ध्रुवा**प्रमाणें, क्षमेनें **पृथ्वी** सारखा, कल्याणांत **महादेवा**प्रमाणें, माहात्म्यांत **गीते**सारखा, पवित्रतेंत **गंगे**प्रमाणें, कांतीनें **चंद्रा** सारखा, औदार्यांत **कर्णा** प्रमाणें, आणि वश करण्यांत व प्रिय बोलण्यांत **उर्वशी** प्रमाणें निपजेल!!! शत्रु असो किंवा मित्र असो, तो, सर्वांस सारखा मान देऊन सर्वत्रांच्या तारणाकडे लक्ष देईल.

आणि सर्वस्थलीं वायू प्रमाणें जी अप्रीतिच व्यापक होऊन राहिली आहे, तिच्या बदला प्रीति व आनंद परिव्याप्त होतील!!! तो अत्यंत परितप्त झालेल्यांस फार चातुर्यानें शीतल करणारा आहे, अत्यंत द्वेष्ट्यांचेंही हित करण्यांत आग्रही आहे, तो कधीं अपमानानें पीडित झाला नाहीं व भयानेंही कंपित नाहीं. परंतु नम्रता व नियम हे त्याचे रक्षक असल्या कारणानें तो सर्वदा आपत्तींतून मुक्त राहिला आहे. आणखीही हे प्रियभाषिणी **ब्रिटानिया**? त्या महापुरुषाच्या आगमनानें सर्व लोक इतके संतोषित होतील कीं, देवताही त्याचा हेवा करूं लागंतील! तो कधीं प्रहार करण्याची इच्छा धरणार नाहीं. आणि ज्यांचें चित्त व भाव ह्यांस तूर्त विभ्रम झाला आहे; त्या सर्वांचें तो उत्तम समाधान करून सर्वस्थलीं मोठा जयघोष गाजवील. पहा असा हा तुझा.—"

इतकें बोलतांच त्या पर्वतांत मधुर व मंजुळ गायन सुरू झालें. सर्व स्थलीं आनंदानें सुस्वर वाद्यें वाजूं लागलीं. आणि दशदिशा सुगंधयुक्तवायूच्या लहरींनीं मगज तर्र करून सोडूं लागल्या! ज्या ठिकाणीं ही महात्मा मंडळी जमली होती तेथून जवळच एका दिव्यसिंहासनावर विराजित झालेल्या एका पुरुषास घेऊन दोन अप्सरा एकाएकीं बाहेर आल्या. आणि त्या सिंहासनांवर परिशोभित झालेल्या पुरुषास त्या पर्वतावर उचलून धरून उभ्या राहिल्या. त्या पुरुषश्रेष्ठाच्या मस्तकावर श्वेतच्छत्र विराजमान झालें होतें, मुखावर सत्य प्रतिज्ञेचें तेज फांकलें होतें आणि त्याचें मेघासारखें

शीतल स्वरूप अवलोकन करितांच, तीं सर्व पात्रें विस्मय पावलीं!!!

"पहा! हाच तुझा तो तेजस्वी पुत्र! ज्यावर आज देवताही पुष्पवृष्टि करिताहेत! त्याच महापुरुषास तूं हिंदच्या पुत्रांचें राज्य अर्पण कर; ह्मणजे हा सर्वत्र जयजयकार प्रवर्तवून सर्व स्थलीं असाच आनंद गजर करील. आणि त्या आनंदांत या पुरुषास पाहतांक्षणींच जिकडेतिकडे गर्जना करण्यांत येईल कीं, "**रीपन् राजेंद्र दीर्घायुर्भव**"!!! माझी जी इच्छा आहे ती हीच आहे; आणि ती इच्छा संपूर्ण पार पडली. आतां **हिंद** व **ब्रिटानिया** तुह्मीं दोघीही प्रतिस्पर्धी प्रेमभावानें आलिंगन करा आणि आजपासून बावीस वर्षांपूर्वी **ब्रिटानिया**! तूं जें अभय वचन दिलें आहेस कीं, "प्रजेची चढतीकळा तें माझें बळ, तिचा संतोष तो आमचा निर्भयपणा, आणि तिची कृतज्ञता ते आमचें उत्तम यश." तें सर्व तुला यथार्थरीतीनें प्राप्त होईल. हे भिरु! तुमचें याहून विशेष कल्याण काय करावयाचें! मला वाटतें आतां या कृत्यापासून तुह्मीं दोघीही शांति पावाल; व उत्साहभरितचित्तानें अमर कीर्ति मिळवून अजित व्हाल, ह्यांत बिलकुल संशय नाहीं!"

स्वतंत्रतादेवीनें पाठविलेला हा प्रतापी महापुरुष महामति-मान, तेजस्वी, निर्मळ अंतःकरणाचा, कोमल, प्रेमल, सावध, धीर, चतुर, सद्गुणी आणि ज्याच्या प्रभावश्री—भव्य—कांतीस अवलोकून देव देखील थक्क होऊन जावेत! असा सकलगुण संपन्न होता. त्या प्रतापिपुरुषाचें दर्शन होतांच, दोघीही सख्या

अशा दंग होऊन गेल्या कीं, बराच वेळ त्या त्याच्याकडे पाहूं देखील शकल्या नाहींत! इतक्या त्या आश्चर्यभरित झाल्या!! नंतर कांहीं वेळानें त्यांनीं त्या सत्पुरुषास पाहिल्यावर **ब्रिटानिया** बोलण्यास प्रारंभ करीत होती, इतक्यांत **हिंद** प्रेमावेशानें म्हणाली!:—

"हा अतिवृद्धवयाचा दैवीपुरुष माझ्या भूमीला योग्य आहे. खरेंच बाई? हा सर्वांचें कल्याण करणारा, तारण करणारा आणि विस्मित करणारा, असा महापुरुष निपजेल! ह्यांत तीळभरदेखील संदेह नाहीं. यापेक्षां जास्त चांगला प्रतापि, श्रेष्ठ, व दिव्य पुरुष मला खरोखरच सांपडला नाहीं व सांपडणार ही नाहीं. हा माझ्या मुलांबाळांचीं सर्व सौख्यें पुरीं पाडील आणि ह्या **स्वतंत्रता** महादेवीची भविष्यवाणी पूर्ण करून आह्मां सर्वांस महत् सुयशास पोंचवीलच पोंचवील!"

"तुझें कल्याण असो, आणि तूं सर्वस्थलीं असेंच प्रतापयश मिळीव. हे उंच पर्वतावर विराजित होणारे **देवी स्वतंत्रते!**" **ब्रिटानिया** अत्यानंदित होऊन म्हणाली, "आहा! माझ्या भूमींत असें अनुपम रत्न होतें, हें खरोखरच मला माहीत देखील नव्हतें, परंतु शाबास तुझी! अग? तें शोधून काढण्याची तुझी उत्तम शक्तीच तुझा प्रताप दर्शवित्ये. चंद्रोदय समयीं जो विलक्षण शांति प्रभाव असतो, तशा प्रभावानें हा भरपूर आहे; असें ह्याची शीतल मुद्राच सांगत आहे. ह्याहून विशेष प्रतापि श्रेष्ठ पुरुष मला मिळणार नाहीं. हें मी मनापासून कबूल करित्यें. आणि सर्व प्रकारच्या महाभाग्यानंदासह तुझें वचनही शिरसा

वंद्य करित्यें. हे केसरीसमान बलवान्! हे भारती व ब्रिटानियाच्या यशाविषयीं आतुर! हे विवेकचतुर देवी! हे विचित्रप्रकारें युद्ध करणारी! हे भृकुटी कटाक्षानें क्षणांत कोणत्याही प्रजेस यमलोकांत पाठविण्याविषयीं कुशल! हे लोहमयी चंदनचर्चित सुंदरी! हे वज्रमणी? अग? मदोन्मत्तहस्तिस्वतंत्रे! सर्पिणी प्रमाणें विचित्र व अद्भुत प्रकारच्या सुतेज गौरवानें परिशोभित देवी! तूं हा कलह मिटविण्यांत जें बुद्धिचातुर्य खर्च केलें आहेस; जी सूक्ष्म दृष्टी योजिली आहेस; तशी कोणांत आहे? हा धर्मज्ञ पुरुष सर्वांस पूजार्ह आहे. तिन्ही लोकांत याहून विशेष उत्तमाचरणाचा अन्य कोणी सांपडेल, असें मला तर बिलकुल वाटत नाहीं. हा सर्व कार्यांत यथाविधि कर्म आचरील. इंग्लंड व इंडिया ह्यांतील सर्वलोकांचें ऐक्य करील. आणि सर्व महाराज्यात संपूर्ण यश मिळवून महान् कुलदीपक सुराजपुत्र निपजेल."

ह्याच वेळीं आकाशांत दुंदुभीनाद होऊन पुष्पवृष्टीही होऊं लागली. त्यावरून असें वाटतें कीं, त्या वाणीनें देवतांनीं देखील सुचविलें कीं "**हिंदचें कल्याण इच्छिणारा राजेंद्र रीपनाधीश होय.**"

"विजय, कल्याण आणि सर्व सिद्धी तुह्मांस सांपडोत. हा माझा तुह्मास शुभ आशीर्वाद आहे; आणि आज जें हें महत्कार्य पुष्कळ तऱ्हेचे त्रास भोगून, पुष्कळ कडवट वाक्यें बोलून, रोष दाखवून, दुःख उत्पन्न करून, मागील पुढील चांगलें, वाईट दाखवून निर्विघ्न पार पाडिलें आहे, आणि

त्यामुळें जो आनंद झाला आहे; त्या आनंदांतच जगदीशाचें स्तवन करूं—जो प्रभू या जगतांचें पालन पोषण आणि संहार करितो; ज्याच्या इच्छेविरुद्ध एक काडीसुद्धां हालूं शकत नाहीं, जो महा प्राज्ञ, महा मतिमान्, सर्व प्राण्यांचा हितकर्त्ता, आणि लोकत्रयांतील कांहींच ज्यास अविदित नाहीं, असा, कृपाळू सच्चिदानंद, आनंदकंद तुमच्या धर्माची वृद्धि करून तुह्मां सर्वांस श्रेयस्कर होवो—निरंतर तुमच्या कल्याणांत उद्युक्त राहो, तुमच्या सर्व प्रतिज्ञा पूर्णपणें पाळो. तुह्मीं दोघी सरख्या प्रमाणें एकमेकींस भेटून प्रेमपुरःसर आलिंगन द्या, आणि या शुभप्रीतियुक्तप्रार्थनेंत सामील होऊन हर्षानें आतां ह्मणा कीं:—


हिंद आणि ब्रिटानियाची

सामराज्यकीर्ति

अविचल राहो.

॥ शांतिः शांतिः शांतिः ॥

☞ येथें आमचा राजकीय कथारूपी निबंध समाप्त झाला. ह्यांत आम्हीं बऱ्याच ठिकाणीं शुद्धांतःकरणानें जसे ब्रिटिश-राज्याचे दोष दाखविण्यांत आणि साच्या वर्तणुकीचें अवलोकन करण्यांत आडवेतिडवे गेलों आहों, तसेच देशीलोकांचे गुणावगुण निर्दिशत करण्यांत आणि यांच्या मिथ्याभिमानाचें खंडण करण्यांत आह्मीं विलकूल कसूर केली नाहीं. सारांश, आह्मीं दोन्हीं पक्षांच्या तिरस्कारास जरी पात्र झालों आहों, तरी सद्-सन्निरूपण करण्यांत कांहींच संकोच धरण्याचें कारण नाहीं. आणि आह्मी धरिलाही नाहीं. असो, परमवंद्य स्वतंत्रता देवीनें, ज्या महापुरुषास आमच्या देशावर अधिकार देऊन पाठविलें, या पुरुषश्रेष्ठाचें यशस्वी कर्मचरित्र—जर प्रसन्न मनानें तुह्मी स्वीकाराल तर—तें चांगल्या रीतीनें सर्व प्रजेपुढें ठेवण्यास, खरोखरच आह्मांस उत्तेजन दिल्यासारखें होणार आहे. हा उज्वल इतिहास शालिवाहन किंवा विक्रम यांच्या यशाप्रमाणें यश पावो. शांतिः



विशेष विचार.

स्वतत्रंता देवीनें ज्या प्रतापिपुरुषास **भरतखंडांत** पाठविण्याविषयीं **ब्रिटानियास** सूचना केली होती, तो महापुरुष **अलिझां बहादुर खुदाविंद मार्किस ऑफ़ रीपन,** के० जी०, पी० सी०, जी० सी० एस० आय०, जी० सी० आय० इ०, **भरतखंडाचा व्हाईसराय** आणि **गव्हर्नर जनरल** या **भारतभूमीवर** तारिख ३१ माहे मे सन १८८० यादिवशीं आगमन करिता झाला. आणि तारिख २० डिसेंबर सन १८८४ या दिवशीं चार वर्षें, साहा माहिने, आणि एक दिवस, साम्राज्य चालवून स्वदेशीं गमन करिता झाला. त्या प्रसंगीं भारत-वासीयकविजनांनीं रचिलेल्या सर्वोत्तम कविता, ज्या आज देखील सर्वत्र अतिशयच महत्प्रेमानंदानें व मधुर संगीतानें गाइल्या जात आहेत, त्यांतील कांहीं खालीं दिल्या आहेतः—

साक्या.

लार्ड रीपना भारत भूचा, प्रतिनिधि करोनी आज ॥
"केसरि हिंदें" पाठवियेला, प्रजा रक्षणा काज ॥ ध्रु० ॥
न्यायें वर्तुनि लोक हिताचीं, कृत्यें बहुविध करोनी ॥
जय जयकारा! भारतिं करुनी जाई संतोषोनी ॥ १ ॥
महत्पुरुष तूं देशोत्कर्षक धन्य! धन्य! या लोकीं ॥
अखिल जनांचा प्रेम सुगौरव, न वर्णवे या तोकीं ॥ २ ॥
आर्य म्लेंच्छकीं यवनपारशीं, समान दृष्टी त्वांच ॥
ठेवियली वा! लौकिक केला, त्वत्सम नेतरिं साच ॥ ३ ॥

भरतखंड हें दीन हीनसें, झालेलें पाहोनी ॥
विविधायासीं गौरव केला, क्लेशदुःख दवडोनी ॥ ४ ॥
दीन रंकसे स्पष्टचि झाले, नरपालहि हे आतां ॥
सदयमनानें संकट जाणुनि, वारी त्वत्सम त्राता ॥ ५ ॥
निर्धन जनही विना प्रयासें, साधनसाधक झाले ॥
चतुर होउनी अत्यानंदें, तव यश गानीं रतले ॥ ६ ॥
उदार तैसें अविकारी मन, न्याय एक सर्वांतें ॥
श्री राज्ञीच्या सुमान्य वचना, धरुनी आधारातें ॥ ७ ॥
व्यर्थ न बोले, बोले तैसा, सत्य सर्वदां चाले ॥
कविजन ज्याचे निर्मल गुण हे, अतितर वर्णुनि डोले ॥ ८ ॥
प्रजा सुखार्थचि राज्य असे हें, चित्तीं आणुनि ज्यानें ॥
स्वतंत्रताही वार्ता-पत्रां, दिधली अति सन्मानें ॥ ९ ॥
राजा तैसा प्रजा हिनाला, ध्यानीं सदैव ठेवी ॥
न्याय-धर्म-पथ-नीती-रीती-अमूल्य लोकीं सेवी ॥ १० ॥
स्थानिक-राज्या संस्थापी जो, त्रास करांचा काढी ॥
रीपन राजा धर्मात्मा तो, प्रेम सुसौख्यें वाढी ॥ ११ ॥
जय जय! होवो सर्वत्रचि या, भारतहितकर्त्याचा ॥
राज्यधुरंधर भारतवर्षिय दुःखखेदहर्त्याचा ॥ १२ ॥
हिंदु जनांतें उन्नतिदात्या, प्रजावत्सला धन्य ॥
त्वत्सम आला नाहिं सख वा! सख भारतीं अन्य ॥ १३ ॥
भारतनभिं या उदित जाहला, चंद्रचि वाटे प्रजला ॥
हिमामृतानें उदार धीनें, सुवर्षणाकीं सजला ॥ १४ ॥
लार्ड क्लैव्ह जरी बाहुबलानें, जिंकुनि भारती गेला ॥
हेस्तिंग्सादिक अतिशय तीचा, प्रेमें पालक आला ॥ १५ ॥

सूर्यकिरणमाला.

किरण २रा.

"गंगा गोविंद सिंह" अथवा "वारन हेस्तिंग्सचा उजवा हात." ह्या ऐतिहासिक कादंबरींत खालीं दिलेल्या प्रकरणांचा समावेश केला आहे:—

अवतरण.
हेस्तिंग्सचें प्रियपात्र कोण?
कर वसूल करायच्या कीं चोरी करायची?
सासरा आणि सून.
रामानंद गोसावी.
देवीसिंह.
कलकत्त्यांत वसूल कामटीची कैदखाना.
स्थापना.
प्राणनगरचें जंगल.
हरराम.
नानकु.
बंधमुक्ति
देव कीं मनुष्य?
झोपडींत राहणारी.
कलकत्त्यास जाणें.
स्वप्न.
विप्लव फल.
शोध.
दयाल बाबू.
सुप्रीम कोर्ट.
दक्षयज्ञाची पर्वा कसली?
नदींतील पाणी नदींत.
बंधमुक्तता.
स्त्रीस्त्री.
कधींतरी मरायचेंच!!
ऋणमुक्तता.
मोंगलहाटचा लढाई.
पाटगांवचा कलंक!
पिटरसन.
शेवटचें कुकर्म.
पुत्रमुखदर्शन.
उपसंहार.

हिंद आणि ब्रिटानिया.

हें पुस्तक वही, रेळे आणि मंडळी, २री सुतारगल्ली, गिरगांव, मुंबई, यांचेकडे; मुंबईंतील इतर पुस्तक विक्रेणारांकडे, किंवा खालील पत्त्यावर विकत मिळेल.

दिनकर गोविंद बर्वे, सूर्यकिरणमाला प्रकाशक,
मु० मालवण, जिल्हा रत्नागिरी.